सोमवार
८
सप्टेंबर २०२५

अकोला
पाने : ८ + ४
वर्ष : १९
अंक : १८६
स्वागत मूल्य ३ रुपये
www.ajinkyabharat.com

# अजिंक्य भारत

बातम्यांचा गतिमान पाठलाग




दुबेने शेअर केला नव्या जर्सीतील फोटो
(पान ७ वर)

## महत्त्वाचे

### पडळकरांनी मनोज जरांगेंना धमकावले



**पुणे :** धनगर समाजाबाबत मनोज जरांगे यांनी वापरलेल्या अपशब्दांचा भाजप आमदार गोपीचंद पडळकर यांनी तीव्र निषेध केला. धनगर समाजाकडे सुभेदार मल्हार होळकर यांची तलवार, अहिल्यादेवींचा भासळा आणि पिंड, तसेच यशवंतराव होळकर यांच्या तोफा आणि बापू बिरू वाटेगावकर यांची कुऱ्हाड आणि बंदूक आहे. धनगरांना कुठे काय वापरायचे हे चांगलेच कळते, या शब्दात धनगरांसाठी अपशब्दांचा वापर केल्याप्रकरणी आमदार गोपीचंद पडळकर यांनी मनोज जरांगे यांना धमकावले. मराठा समाजाला सरसकट कुणबी दाखले देण्यास सर्वांचा आक्षेप आहे. सरकारने याबाबत स्पष्टता आणावी, जीआरमधील संभ्रम दूर करावा, जीआर स्पष्ट झाल्यावर आमची भूमिका मांडू. आम्ही कायमच ओबीसींसोबत आहोत आणि राहणार; असे भाजप आमदार गोपीचंद पडळकर म्हणाले.

### धनंजय मुंडे यांचे सामाजिक समतेविषयी वक्तव्य



**बीड :** राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार धनंजय मुंडे राजकारणात पुन्हा सक्रीय झाले आहेत. त्यांनी बीड जिल्ह्यातील सामाजिक समतेविषयी केलेले ताजे वक्तव्य चर्चेत आहे. बीड जिल्ह्यात काम करणाऱ्या पोलिसाला आडनाव लावता येत नसेल तर ही सामाजिक समता आहे का, असा सवाल आमदार धनंजय मुंडे यांनी उपस्थित केला. प्रत्येकाने आपआपलेच महामानव बांधून घेतलेत. छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती फक्त मराठा समाजाने साजरी करायची का ? डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची जयंती फक्त मागास प्रवर्गातील लोकांनी साजरी करायची का ? महात्मा फुले यांची जयंती फक्त माळी समाजाने साजरी करायची का? शिक्षणाची चळवळ महात्मा फुले यांनी सुरू केली म्हणून फक्त माळी समाजातील लोकांनी शिक्षण घ्यायचे का? भगवान बाबांची जयंती फक्त वंजारी समाजाने साजरी करायची का ? असा सवाल धनंजय मुंडे यांनी केला.

### गंगा नदीत तीन मुले बुडाली



**प्रयागराज :** प्रयागराज जिल्ह्यातील पुरामुफ्ती परिसरात आज गंगेत आंघोळीसाठी गेलेली तीन किशोरवयीन मुले बुडाली, असे पोलिस सूत्रांनी येथे सांगितले. मनीष (१३), शौर्य (१४) आणि नमन (१५) हे तीन किशोरवयीन मुले गंगेत आंघोळीसाठी आले होते, त्यावेळी नदीला पूर आल्याने ते खोल पाण्यात बुडाले. तेथे उपस्थित लोकांनी पोलिसांना याची माहिती दिली. माहिती मिळताच, पुरामुफ्ती आणि धूमंगंज पोलीस घटनास्थळी पोहोचले आणि मुलांचा शोध घेण्यासाठी बचाव मोहीम सुरू केली, असे त्यांनी सांगितले. पोलिसांनी सांगितले की, पाणबुड्यांच्या मदतीने सुमारे एका तासानंतर मनीष आणि शौर्य यांचे मृतदेह काढण्यात आले. नमनचा शोध अद्याप सुरू आहे, असे ते म्हणाले. पोलीस सूत्रांनी सांगितले की, बुडालेली तिन्ही मुले धूमगंज भागातील रहिवासी आहेत.

## गणरायाला भावपूर्ण निरोप!



दहा दिवसांच्या प्रतिष्ठापनेनंतर शनिवारी आणि रविवारी दुपारपर्यंत राज्यातील गणेश मंडळांनी आपल्या लाडक्या गणरायाला पुढच्या वर्षी लवकर या असे साकडे घालीत भावपूर्ण निरोप दिला. (सविस्तर वृत्त संमिश्र पानावर )

# ओबीसींच्या ताटातले काढून सरसकट प्रमाणपत्र देणार नाही-फडणवीस

**पुणे: दि. ८ वृत्तसंस्था**

मराठा आरक्षण देताना आम्ही ओबीसींना कोणताही धक्का लावला नाही, मराठ्यांना सरसकट प्रमाणपत्र न देता ज्यांची कुणबी नोंद सापडली आहे त्यांनाच फक्त आरक्षणाचा लाभ मिळणार आहे, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. ओबीसी समाजाच्या विकासासाठी सरकार कटीबद्ध आहे. पुण्यातील पुरंदर तालुक्यातील भिवडी येथे आद्यक्रांतिवीर राजे उमाजी नाईक यांची २३४ वी शासकीय जयंती सोहळा कार्यक्रम पार पडला. या प्रसंगी देवेंद्र फडणवीसांनी हे वक्तव्य केलं.

मराठा समाज आरक्षणापासून वंचित राहणार नाही, ओबीसींच्या ताटातील काढून घेऊन सरसकट प्रमाणपत्र देणार नाही. काहीही झाले तरी ओबीसींचे नुकसान होऊ देणार नाही. ओबीसींकरता योजना करणारे हे सरकार आहे असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. देवेंद्र फडणवीस म्हणाले की, आमच्या सरकारची नीती पक्की आहे. एकाचे काढून दुसऱ्याला द्यायचे नाही. इंग्रजांनी जे केलं ते आम्ही करणार नाही. मराठा आरक्षण देताना ओबीसींना धक्का लागणार नाही. मराठवाड्यात १९४८ पर्यंत इंग्रज राज्य नव्हते, तर निजाम राज्य होते. मराठवाड्याचे रेकॉर्ड हैदराबाद गॅझेटमध्ये होते. आता ज्यांच्याकडे नोंद असेल त्याला प्रमाणपत्र दिले जाईल असे आपण सांगितले आहे. देव देश धर्मांच्या लढ्यात हा रामोशी समाज अग्रेसर होता.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, ओबीसींना जोपर्यंत मुख्य प्रवाहात आणणार नाही त्यावर त्याचा विकास होणार नाही. ओबीसी विकास होईपर्यंत शिवकार्य पूर्ण होऊ शकत नाही. कोणीही मनात शंका घेऊ नका.

ब्रिटिशांना पहिला विरोध राजे उमाजी नाईक यांनी केला. त्यांनी सेना तयार करून इंग्रजांना पळवले. रॉबर्ट यांनी पत्र लिहिले का उमाजी नाईक शिवाजी महाराज झाले असते. उमाजी नाईक हे उत्तम प्रशासक होते, स्वतःच्या हाताने त्यांनी पत्र लिहिले आहेत. उमाजी नाईक सापडले नसते पण फितुरी झाली. शंभूराजे पण असेच पकडले गेले. राजे उमाजी नाईक यांना पकडून इंग्रजांनी फाशी दिली.

पण समाजाची लढाई थांबली नाही. इंग्रजांनी गुन्हेगारी कायदा करून समाजाला गुन्हेगार ठरवले. यांना नाही दाबले तर राज्य करता येणार नाही हे माहिती होते. पण इतिहासाने या समाजाचा इतिहास कधीच पुढे येऊ दिला नाही. जवळपास ८० वर्षे गुन्हेगारी म्हणून समाज मागे गेला, त्यांचा विकास नाही झाला. आता सरकारचा प्रयत्न आहे की त्यांना त्यांचा विकास शौर्य आठवण करून द्यायचा आणि त्यांना मुख्य प्रवाहात आणायचं असंही देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे.

## फुलांची रांगोळी आणि भगवा झेंडा; केरळमध्ये २७ स्वयंसेवकांवर गुन्हा

**कोल्लम: दि. ८ वृत्तसंस्था**

केरळमधील कोल्लम जिल्ह्यात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या २७ स्वयंसेवकांविरुद्ध एफआयआर नोंदवण्यात आला आहे. या स्वयंसेवकांवर आरोप आहे, की त्यांनी श्री पार्थसारथी मंदिर, मुथुपिलक्काडू येथे जाणाऱ्या रस्त्यावर 'ऑपरेशन सिंदूर' या थीमवर आधारित एक पुष्प रांगोळी (पुक्कलम) साकारली होती आणि त्यात भगवा झेंडा देखील तयार केला होता. ही रांगोळी ओणम सणाच्या काळात तयार करण्यात आली होती. सस्थमकोट्टा पोलिसांनी एफआयआर दाखल केला आहे. मंदिर समितीने दावा केला की, ही पुष्प रांगोळी आणि सजावट केरळ उच्च न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन आहे. याबाबत त्यांच्या तक्रारीनंतर पोलिसांनी गुन्हा दाखल केला. भाजपने पोलिसांच्या या कृतीचा निषेध करत म्हटले आहे की, मुथुपिलक्काडू येथील पार्थसारथी मंदिरात तयार करण्यात आलेली ही रांगोळी 'ऑपरेशन सिंदूर' च्या सन्मानार्थ होती. मंदिर समितीचे पदाधिकारी अशोकन सी. यांनी या प्रकरणी तक्रार दाखल केली होती. पोलिसांनी भारतीय न्याय संहिता अंतर्गत कलम २२३ (लोकसेवकांच्या वैध आदेशाचे (पान २ वर)

### भाजप आक्रमक : केरळ हे पाकिस्तान नाही

भाजपचे केरळ प्रदेशाध्यक्ष राजीव चंद्रशेखर म्हणाले की, देशात पहिल्यांदाच फुलांची रांगोळी तयार केल्याबद्दल गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ओणम हा मलयाळी समाजाचा उत्सव आहे. 'ऑपरेशन सिंदूर' लिहिल्यामुळे कायदेशीर कारवाई करून सरकार नेमके काय साध्य करू पाहत आहे? ते पुढे म्हणाले की, 'ऑपरेशन सिंदूर' हे भारतीय सशस्त्र दलाच्या शौर्याचे प्रतीक आहे, आणि यावर कारवाई करणे म्हणजे देशाचे रक्षण करणाऱ्या प्रत्येक सैनिकाचा अपमान आहे. भाजप प्रदेशाध्यक्षांनी सांगितले की, केरळ हे ना जमात-ए-इस्लामीद्वारे शासित प्रदेश आहे, ना पाकिस्तान आहे, आणि ते कधीच तसे होणार नाही. केरळ पोलिसांनी हे विसरू नये की, ते भारतात आहेत. त्यांनी मुख्यमंत्री पिनाराई विजयन यांच्याकडे ही एफआयआर तात्काळ मागे घेण्याची मागणी केली आहे.

## संगणक तज्ज्ञाला पोपकडून संतपद बहाल

**व्हॅटिकन सिटी : दि. ८ वृत्तसंस्था**



तंत्रज्ञानाच्या माध्यमातून श्रद्धेचा प्रसार करणाऱ्या १५ वर्षीय संगणक तज्ज्ञ युवकाला ख्रिश्चनांचे सर्वोच्च धर्मगुरू पोप लिओ १४ वे यांनी संतपद जाहिर केले आहे. कार्लो ऍक्युटिस असे या १५ वर्षीय युवकाचे नाव आहे. तंत्रज्ञानाच्या आधारे श्रद्धेचा प्रसार करणाऱ्या व्यक्तीला कॅथोलिक चर्चने पहिल्यांदाच संत म्हणून घोषित केले आहे. व्हॅटिकन सिटीतल्यासेंट पीटर्स चौकात झालेल्या सामुदायिक प्रार्थनासभेमध्ये तब्बल ८० हजार भाविकांना संबोधित करताना पोप यांनी कार्लो (पान २ वर)

## राज्यात वाघांनी घेतला २१८ जणांचा बळी

**नागपूर :दि. ८ वृत्तसंस्था**

### देशात सर्वाधिक हल्ले महाराष्ट्रात

जागतिक स्तरावर वाघांच्या संख्येत भारत अव्वलस्थानी असला, तरी वाघ आणि मानव यांच्यातील संघर्ष दिवसागणिक वाढत आहे. सन २०२० ते २०२४ या कालावधीत देशभरात वाघांच्या हल्ल्यात तब्बल ३७८ जणांचा मृत्यू झाला असून त्यापैकी एकट्या महाराष्ट्रात २१८ मृत्यू झाले आहेत. विशेषतः चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यात मृत्यूची आकडेवारी सर्वाधिक आहे. तर मेळघाटात गेल्या तीन वर्षात सहा जणांचे बळी गेले आहेत. राज्यात ताडोबा-अंधारी, नवेगाव-नागझिरा, पेंच, मेळघाट, बोर व सह्याद्री असे सहा व्याघ्र प्रकल्प आहेत. तर, ४८ अभयारण्ये असून ४ संवर्धन राखीव क्षेत्रे आहेत. व्याघ्र प्रकल्पात जागा अपुरी पडत असल्याने वाघांनी नवा कॉरिडॉर शोधला असून नजीकच्या राखीव जंगलाच्या दिशेने त्यांनी मुक्काम हलविल्याने मानव-वन्यजीव संघर्ष होत आहे. गेल्या काही वर्षांपासून महाराष्ट्रात वाघांची संख्या वाढत असली तरी त्यांच्या मृत्यूची संख्याही वाढलेली आहे. विविध कारणांमुळे वाघांचा मृत्यू होत आहे, ज्यात नैसर्गिक मृत्यू, दोन वाघांमधील संघर्ष आणि मानवी हस्तक्षेपामुळे होणारे अनैसर्गिक मृत्यू, शिकार, अपघात, विद्युतधक्का आदींचा (पान २ वर)



## भारत-अमेरिकेत नव्याने मैत्री पर्व?

### डोनाल्ड ट्रम्प यांच्या विधानावर मोदींकडून प्रतिसाद



**नवी दिल्ली: दि. ८ वृत्तसंस्था**

भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शनिवारी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या भारत-अमेरिका संबंधांबाबतच्या विधानावर सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. ट्रम्प यांनी दोन्ही देशांमधील संबंधांचे सकारात्मक मूल्यांकन केल्याबद्दल त्यांचे कौतुक करत मोदींनी भारत आणि अमेरिकेतील संबंध 'व्यापक आणि जागतिक धोरणात्मक भागीदारी' दर्शवणारे आणि 'सकारात्मक' असल्याचे म्हटले. अलीकडेच दोन्ही देशांमध्ये व्यापारावरून तणाव निर्माण झाला असताना या विधानांमुळे संबंधांमध्ये सुधारणा होण्याची आशा व्यक्त होत आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी केलेले तब्बल चार फोन कॉल्स उचलले नसल्याचा खळबळजनक दावा एका प्रतिष्ठित जर्मन वृत्तपत्राने केला आहे. भारत-अमेरिका यांच्यातील व्यापार आणि टॅरिफ (आयात शुल्क) वादाच्या पार्श्वभूमीवर प्रसिद्ध झालेल्या या वृत्तामुळे आंतरराष्ट्रीय राजकारणात मोठी चर्चा सुरू झाली आहे. व्हाईट हाऊसमध्ये एका कार्यक्रमात शुक्रवारी (स्थानिक वेळेनुसार) ट्रम्प यांनी भारत-अमेरिका संबंधांना 'अतिशय विशेष नाते' म्हटले होते. आपण आणि पंतप्रधान मोदी नेहमीच मित्र राहतील, असे ट्रम्प यांनी सांगितले होते; पण त्याच वेळी त्यांनी 'सध्या मोदी जे करत आहेत' त्याबद्दल नाराजी व्यक्त केली. भारत (पान २ वर)

## आर्यना सबालेंकाने दुसऱ्यांदा यूएस ओपन ट्रॉफीवर कोरले नाव!



**बेलारूसची टेनिस स्टार आणि जागतिक क्रमवारीत अव्वल स्थानावर असलेली आर्यना सबालेंकाने यूएस ओपन २०२५ च्या महिला एकेरीचे विजेतेपद पटकावत इतिहास रचला. तिने अंतिम सामन्यात अमेरिकेची अमांडा अनिसिमोव्हाचा ६-३, ७-६ (७/३) असा पराभव करत सलग दुसऱ्यांदा हा खिताब आपल्या नावावर केला.**

(सविस्तर वृत्त क्रीडा पानावर)

## मराठा आरक्षणासंदर्भात न्यायालयात कॅव्हेट दाखल!

**मुंबई : दि. ८ वृत्तसंस्था**

मराठा आरक्षणाचे आंदोलक मनोज जरांगे यांचे समर्थक गंगाधर काळकुटे यांच्याकडून सर्वोच्च न्यायालय आणि उच्च न्यायालयात मराठा आरक्षणाच्या जीआरबाबत कॅव्हेट दाखल करण्यात आले आहे. पाच पानांचे कॅव्हेट दाखल करण्यात आले आहे.

मराठा समाजाची बाजू ऐकून घेतल्याशिवाय मराठा आरक्षणाबाबतचा कोणताही जीआर रद्द करू नये असं या कॅव्हेटमध्ये म्हटलं आहे. मराठा आरक्षण आणि हैदराबाद गॅझेटला होणारा विरोध लक्षात घेता काळकुटे यांच्या माध्यमातून हे कॅव्हेट दाखल केले आहे. ओबीसी समाज न्यायालयात या गॅझेटला आव्हान देण्याची शक्यता आहे. सर्वोच्च न्यायालय अथवा उच्च न्यायालयाकडून या जीआरला स्थगिती देण्याची परिस्थिती निर्माण झाली तर मात्र मराठा समाजाला म्हणणं मांडता येईल. त्यानंतर कोणताही कायदेशीर निर्णय हा घेतला जाऊ शकतो. काही लोक न्यायालयात जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे काळकुटे यांच्या माध्यमातून कॅव्हेट दाखल करण्यात आला आहे.

### शासन न्यायालयीन लढाई लढेल-बावनकुळे

नागपूर: मराठा समाजाच्या मागणीसंदर्भात शासनाने जीआर काढला आहे. त्या संदर्भात काही लोक कोर्टात कॅव्हेट घेऊन गेले आहेत, तो त्यांचा अधिकार आहे. या प्रकरणी न्यायालयात लढाई झाली तर शासन आपली बाजू मांडेल अशी भूमिका महसूलमंत्री, ओबीसी उपसमितीचे अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केली.

## रशियाने विकसित केली कॅन्सरला हरविणारी लस




**कॅन्सरला हरवणाऱ्या रशियाच्या लसचे पहिल्या टप्प्याचे ह्युमन ट्रायल सप्टेंबर - ऑक्टोबर २०२५ पासून सुरू होणार आहे. या प्रयोगाकडे भारतासह अनेक देशांचे लक्ष आहे.**

**मॉस्को : दि. ८ वृत्तसंस्था**

रशियाने कर्करोगाला प्रतिबंध करणारी लस अर्थात कॅन्सरला प्रतिबंध करणारी लस विकसित केल्याचे जाहिर केले आहे. या लसचे रुग्णांवरील प्रयोग सुरू आहेत. प्रीक्लिनिकल ट्रायल यशस्वी झाली असून पुढील टप्प्याचे प्रयोग सुरू आहेत. आतापर्यंतच्या प्रयोगांमध्ये ट्युमरचा आकार ६० ते ८० टक्क्यांनी कमी करण्यात लस यशस्वी झाली आहे. यामुळे इतर औषधांच्या मदतीने रुग्णाला बरे करणे शक्य होत आहे. कर्करोग म्हणजे कॅन्सर. कॅन्सर हा आजार झाला की रुग्ण आणि त्याचे नातलग निराश होतात. हे नैराश्य अनेकदा रुग्णाच्या मृत्यूचे मुख्य कारण असते, असे डॉक्टर सांगतात. कारण कॅन्सरवर केमो थेरपी आणि इतर औषधांनी उपचार करतेवेळी शरीरावर अनेक साईड इफेक्ट अर्थात प्रतिकूल परिणाम होतात. या त्रासातून बरे होण्यास अनेकदा काही आठवडे किंवा काही महिन्यांचा कालावधी लागतो. तोपर्यंतचा कालावधी हा अनेकदा जीवघेणा (पान २ वर)

## निर्णय

### नवीन कार्यकारी आदेश जारी

# तर 'त्या' व्यापारी भागीदार देशांना जकात सवलत: ट्रम्प

**वॉशिंग्टन: दि. ८ वृत्तसंस्था**

**अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी एक नवीन कार्यकारी आदेश जारी केला आहे, ज्या अंतर्गत सोमवारपासून त्या व्यापारी भागीदार देशांना जकात सवलत दिली जाईल जे अमेरिकेसोबत औद्योगिक निर्यातीवर करार करतील. या सवलतीचा फायदा विशेषतः निकेल, सोने, औषधी संयुगे आणि रसायने यासारख्या महत्त्वाच्या गोष्टींवर दिला जाईल. जागतिक व्यापार व्यवस्थेची पुनर्रचना करणे, अमेरिकेची व्यापार तूट कमी करणे आणि व्यापारी भागीदारांना अधिक सौदाबाजी करण्यास प्रेरित करणे हा त्याचा उद्देश आहे.**

ट्रम्प प्रशासनाच्या या आदेशानुसार, ४५ पेक्षा जास्त गोष्टींच्या श्रेणी समाविष्ट करण्यात आल्या आहेत, ज्यावर सहयोगी भागीदारांना शून्य आयात शुल्क मिळेल. हे भागीदार असे देश असतील जे अमेरिकेसोबत एक फ्रेमवर्क करारावर स्वाक्षरी करतील आणि ट्रम्प प्रशासनाने लादलेले परस्पर शुल्क आणि शुल्क कमी करण्याचे वचन देतील. हे पाऊल जपान, युरोपियन युनियन यासह अमेरिकेच्या विद्यमान सहयोगी देशांशी केलेल्या करारांशी देखील सुसंगत आहे. ही सवलत सोमवारी मध्यरात्री १२ वाजल्यापासून लागू होईल. या आदेशात काही कृषी उत्पादने, विमान आणि त्याचे भाग आणि पेटंट नसलेल्या औषधी वस्तूंसाठी देखील सूट देण्यात आली आहे. आदेशानुसार, संबंधित व्यापार करार झाल्यानंतर, यूएस व्यापार प्रतिनिधी, वाणिज्य विभाग आणि सीमाशुल्क अधिकारी नवीन कार्यकारी आदेशाची आवश्यकता न पडता या वस्तूंवरील शुल्क स्वतंत्रपणे माफ करू शकतील. तसेच, या नवीन आदेशाने प्लास्टिक आणि पॉलिसिलिकॉन (जे सौर पॅनेलसाठी आवश्यक आहे) यासह काही पूर्वी दिलेल्या सवलती रद्द केल्या आहेत. स्वित्झर्लंडसारखे प्रमुख पुरवठादार देश, ज्यांनी अद्याप वॉशिंग्टनशी करार केलेला नाही, त्यांच्यावर ३९% कर आकारला जातो. या हालचालीचा उद्देश असा आहे की ज्या वस्तूंचे उत्पादन देशात पुरेशा प्रमाणात करता येत नाही त्यावरील अमेरिकेच्या अवलंबित्व कमी करणे. नवीन ऑर्डरचा जागतिक व्यापारावर मोठा परिणाम होईल आणि अमेरिकेच्या औद्योगिक हितांचे रक्षण करण्यास देखील मदत होईल.



### कोणत्या वस्तूंना सूट दिली जाईल?

व्हाईट हाऊसच्या मते, ज्या वस्तूंचे उत्पादन, उत्खनन किंवा उत्पादन अमेरिकेत नैसर्गिकरित्या करता येत नाही किंवा ज्यांचे देशांतर्गत उत्पादन पुरेसे नाही अशा वस्तूंवर कर कपात लागू होईल. या सवलती दिलेल्या वस्तूंमध्ये नैसर्गिक ग्रॅफाइट, विविध प्रकारचे निकेल (जे स्टेनलेस स्टील आणि इलेक्ट्रिक वाहनांच्या बॅटरीसाठी आवश्यक आहेत), लिडोकेन सारखे औषधी संयुगे आणि वैद्यकीय निदान चाचणीसाठी अभिकर्मक यांचा समावेश आहे. याशिवाय, पावडर, पाने आणि बुलियन सारख्या सोन्याच्या विविध वस्तूंचा देखील या सवलतींमध्ये समावेश आहे.

# लाडक्या गणपती बाप्पाला साश्रू नयनांनी निरोप, देशभरात विसर्जन मिरवणुकांचा उत्साह

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**मुंबई, दि.७ :** अनंत चतुर्दशीच्या दिवशी अर्थात ६ सप्टेंबरला महाराष्ट्रासह देशभरात विसर्जन सोहळ्याचा उत्साह पाहण्यास मिळाला. घरोघरी आणि सार्वजनिक मंडळांमध्ये विराजमान झालेल्या लाडक्या गणपती बाप्पाला निरोप देण्यात आला. गणपती गेले गावाला, चैन पडे ना आम्हाला, एक दोन तीन चार गणपतीचा जयजयकार, गणपती बाप्पा मोरया पुढच्या वर्षी लवकर या अशा घोषणांनी मुंबई, पुणे आणि महाराष्ट्रातील तमाम शहरांमधली विसर्जन स्थळं दुमदुमून गेल्याचं चित्र पाहण्यास मिळालं. गणेश भक्तांनी इको फ्रेंडली मूर्तींवर भर दिला होता. प्रदूषणाचा प्रश्न निर्माण होऊ नये म्हणून अनेक गणेशभक्तांनी घरांमध्ये विराजमान केलेल्या मूर्ती या पर्यावरणपूरक आणि शाडू मातीच्या असतील यावरच भर दिला होता.

गिरगाव चौपाटीवर भाविकांची मोठी गर्दी गणेश विसर्जनाच्या दिवशी मुंबईतल्या गिरगाव चौपाटीवर भाविकांची गर्दी मोठ्या प्रमाणावर दिसून आली. छोट्या मूर्तींसह आता सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांचे मोठे गणपतीही विसर्जनासाठी दाखल होऊन त्यांचं विसर्जन करण्यात आलं. मुंबईत पावसाची रिपरिप सुरू असली तरी भक्तांच्या उत्साहात कुठेही कमतरता दिसली नाही. ढोल-ताशांच्या गजरात, जल्लोषी वातावरणात आणि ''गणपती बाप्पा मोरया''च्या जयघोषात चौपाटीवर भक्तांनी हजेरी होती. उत्साह, भक्ती आणि भावनांचा संगम स्पष्ट दिसून आला.

## सामान्य ग्राहकांना स्मार्ट प्रीपेड मीटरची सक्ती?

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**नागपूर, दि. ७ :** महावितरणकडून राज्यातील वीज ग्राहकांकडे सक्तीने 'स्मार्ट प्रीपेड मीटर' लावले जात आहे. परंतु, यंदाच्या गणेशोत्सवात राज्यातील बहुतांश सार्वजनिक गणेश मंडळांना तात्पुरत्या जोडणीसाठी मात्र साधे मीटर लावले गेल्याची सूत्रांची माहिती आहे. त्यामुळे महावितरणच्या कामावर स्मार्ट प्रीपेड मीटरला विरोध करणाऱ्या वीज कामगारांच्या संघटना आश्चर्य व्यक्त करत आहे.

राज्यात २ कोटी २४ लाख ८८ हजार ८६६ गैरकृषी वीज ग्राहक आहे. त्यांच्या मीटरला 'स्मार्ट मीटर'मध्ये बदलवले जाणार आहे. या मीटरला अनेक ग्राहक संघटनांचा विरोध आहे. विदर्भ ग्राहक संघटनेकडून या मीटरविरोधात उच्च न्यायालयात जनहित याचिकाही दाखल केली गेली आहे. सुरुवातीला महावितरणचे अधिकारी या मीटरबाबत बोलणे टाळत होते. परंतु, त्यानंतर या मीटरचे नाव टी.ओ.डी. मीटर करून बदलणे सुरू झाले.

मात्र, यंदाच्या सार्वजनिक गणेश उत्सव मंडळांनी मागितलेल्या तात्पुरत्या जोडणीत निवडक मंडळ सोडले तर बहुतांश ग्राहकांकडे 'स्मार्ट प्रीपेड मीटर' लावताना काढलेले जुने मीटरच लावले गेले आहे.

या वृत्ताला राज्यातील काही जिल्ह्यांतील महावितरणच्या अधिकाऱ्यांनी नाव न टाकण्याच्या अटीवर दुजोरा दिला. महावितरच्या मुख्य आणि इतर जनसंपर्क अधिकाऱ्यांनी या मुद्यावर बोलणे टाळले.

## पान 1 वरून...

### राज्यात वाघांनी घेतला ...

समावेश आहे. मानव-वन्यजीव संघर्ष या गंभीर समस्येवर नियंत्रण मिळवण्यासाठी सरकार विविध उपाययोजना करत आहेत. मानवी वस्तीजवळ फिरणा-या वाघांवर लक्ष ठेवणे, त्यांना पुन्हा जंगलात सोडणे आणि लोकांना यासंदर्भात जागरूक करणे, ही प्रक्रिया निरंतर सुरूच असल्याची माहिती मेळघाट व्याघ्र प्रकल्प क्षेत्र संचालक आदर्श रेड्डी यांनी दिली.

### संगणक तज्ज्ञाला पोपकडून...

ऍक्युटिस याला संत म्हणून घोषित केले. पोप लिओ यांनी इटलीचे पीअर जिओर्जिओ फ्रासाति यांनाही संत म्हणून यावेळी घोषित केले. कार्लो ऍक्युटिस आणि जिओर्जिओ फ्रासाति या दोघांनी आपले जीवन देवाला समर्पित करून आपल्या आयुष्यापेक्षाही जास्त उत्कृष्ठ योगदान दिले आहे, असे पोप यावेळी म्हणाले. कार्लो ऍक्युटिस याचा जन्म ३ मे १९९१ साली लंडनमध्ये झाला होता. श्रीमंत असलेल्या ऍक्युटिस यांचे कुटुंबीय त्याच्या बालपणीच मिलान येथे स्थायिक झाले.

### फुलांची रांगोळी आणि भगवा ...

उल्लंघन), १९२ (दंगल भडकावण्याच्या उद्देशाने जाणीवपूर्वक उकसवणे) यासह इतर कलमांतर्गत एफआयआर नोंदवला आहे. एफआयआरनुसार, आरोपितांनी मंदिराच्या मुख्य रस्त्यावर राष्ट्रीय स्वयंसेवक संघचा झेंडा दाखवणारी पुष्परांगोळी तयार केली होती, जी की उच्च न्यायालयाच्या आदेशाच्या विरोधात होती. न्यायालयाने आधीच स्पष्ट आदेश दिले होते की मंदिर परिसरात मंदिर समितीच्या परवानगीशिवाय कोणतीही सजावट, फ्लेक्स बोर्डसह करता येणार नाही. मंदिरापासून ५० मीटर अंतरावर छत्रपती शिवाजी महाराजांचा एक फ्लेक्स बोर्ड देखील लावण्यात आला होता. आरोप आहे की यामागचा उद्देश प्रतिस्पर्धी राजकीय गटांमध्ये हिंसा भडकवण्याचा होता. मंदिर समितीचे सदस्य मोहनन यांनी सांगितले की, सणांच्या काळात मंदिराजवळ झेंडे लावण्यावरून यापूर्वी अनेक वेळा वाद झाले आहेत. त्यामुळे अशा वादांना टाळण्यासाठी त्यांनी केरळ उच्च न्यायालयात धाव घेतली होती. न्यायालयाने २०२३ मध्ये आदेश दिला होता की मंदिर परिसराजवळ कोणत्याही प्रकारची सजावट, झेंडे यावर बंदी घालण्यात यावी. मोहनन म्हणाले की, या आदेशानंतरही राष्ट्रीय स्वयंसेवक संघ स्वयंसेवकांनी मंदिर समितीच्या पुष्परांगोळीच्या शेजारीच आपला झेंडा असलेली पुष्परांगोळी तयार केली आणि त्यात 'ऑपरेशन सिंदूर' असे लिहिले. यामुळे न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन झाले आणि वाद निर्माण होण्याची शक्यता होती, म्हणूनच तक्रार दाखल करण्यात आली.

### रशियाने विकसित केली ...

असतो. हा त्रासच रुग्ण आणि त्याच्या नातलगांना जास्त निराश करतो. पण या समस्येवर उपाय सापडला आहे. रशियात झालेल्या संशोधनामुळे नवी आशा निर्माण झाली आहे. रशियाची लस तंत्राद्वारे विकसित केली आहे. यात प्रत्येक रुग्णाच्या शरीरातून आधी अर्थात रिबोन्यूक्लिक आम्ल घेतले जाते. या रिबोन्यूक्लिक आम्लाच्या मदतीने संबंधित रुग्णासाठी लस विकसित केली जाते. यामुळे संबंधित रुग्णाच्या शरीरात पसरत असलेल्या कॅन्सरला प्रतिबंध करणारी लस विकसित करणे सोपे होते. लस कमालीची प्रभावी ठरते. कोलोन कॅन्सर, ब्रेन कॅन्सर ग्लियोब्लास्टोमा, स्किन कॅन्सर मेलेनोमा या आजारांवर रशियाची लस प्रभावी असल्याचे आढळले आहे. सध्या या लसची किंमत तीन लाख रुबल म्हणजेच अडीच लाख रुपये एवढी आहे. रशिया सरकार कॅन्सर रुग्णांना लस विनामूल्य देण्याबाबत विचार करत आहे.

### भारत-अमेरिकेत नव्याने मैत्री ..

आणि अमेरिका यांचे संबंध खूप खास आहेत. सध्या तणाव असला तरी मी आणि मोदी कायम मित्र राहू. ते एक उत्तम पंतप्रधान आहेत, ते महान आहेत. पण ते सध्या जे करत आहेत, ते मला आवडत नाही. तरीही भारत आणि अमेरिका यांच्यातील संबंध खूप विशेष आहेत. त्यामुळे काळजी करण्यासारखे काही नाही, कारण अशा काही गोष्टी दोन्ही देशांमध्ये होत असतात. ट्रम्प यांना विचारले होते की, ते भारतासोबतचे संबंध पुन्हा सुधारण्यास तयार आहेत का? कारण टॅरिफमुळे दोन्ही देशांचे संबंध गेल्या दोन दशकांत सर्वात वाईट टप्प्यातून जात आहेत. ट्रम्प यांनी सांगितले की, भारत रशियाकडून मोठ्या प्रमाणात तेल खरेदी करत असल्यामुळे त्यांना खूप निराशा झाली आहे. आम्ही भारतावर ५० टक्क्यांपर्यंत टॅरिफ लावला आहे. पंतप्रधान मोदी यांच्यासोबत माझे संबंध चांगले आहेत, ते महान आहेत. याआधी ट्रम्प म्हणाले होते की, आम्ही भारत आणि रशियाला चीनच्या हातात गमावले आहे असे आम्हाला वाटते. यासोबतच ट्रम्प यांनी मोदी, पुतिन आणि शी जिनपिंग यांचा एक फोटोही पोस्ट केला होता. ट्रम्प यांच्या विधानानंतर पंतप्रधान मोदींनी लगेचच 'एक्स'वर (ट्विटर) प्रतिक्रिया दिली. त्यांनी ट्रम्प यांच्या भावनांचे आणि दोन्ही देशांच्या संबंधांबद्दलच्या सकारात्मक मूल्यांकनाचे मनापासून कौतुक केले. परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनीही भारत-अमेरिका संबंधांच्या महत्त्वावर भर दिला. दोन्ही देशांमध्ये मजबूत लोकांशी संबंधित नाते आहे. ही भागीदारी अनेक संक्रमणे आणि आव्हानांना तोंड देत पुढे आली आहे आणि आम्ही आमच्या वचनबद्धतेवर लक्ष केंद्रित करत आहोत, असे त्यांनी स्पष्ट केले.

## धारूर तालुक्यात फलकावरून दोन गटात तणाव; सहा जणांविरुद्ध गुन्हा

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**बीड , दि. ७ :** धारूर तालुक्यातील एका गावात रविवारी दोन गटात वाद झाले. सोमवारी होणाऱ्या एका मेळाव्यावरून फलक लावणे व काढण्यावरून झालेल्या वादातून दोन्ही गट आमने-सामने आले. यावरून गावात तणावाची परिस्थिती असून, पोलीस दाखल झाल्यानंतर काहीसा तणाव निवळला असला तरी हे प्रकरण ठाण्यात पोहोचल्यानंतर सहा जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

गावात रविवारी एका गटाकडून मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.या मेळाव्याच्या संदर्भाने गाववेशीवरील प्रवेशव्दार असलेल्या कमानीवर काही फलक लावण्यात आले होते.

या फलकावर देवतांसह संतमहापुरुषांसह नेत्यांचेही छायाचित्र होते. मात्र हा फलक पाच ते सहा युवकांनी फाडल्याचा आरोप होत असून, त्यांचे कृत्य काहींनी पाहिल्याचा दावाही करण्यात आला आहे. तसेच, प्रवेशव्दारावर दुसऱ्या गटाकडून त्यांच्या नेत्याच्या स्वागताचा फलक लावताना दोन्ही गट आमने-सामने आले. या फलकावर ''दुनिया झुकती है, झुकानेवाला चाहिए''सारखी वाक्य लिहिण्यात आले होते. अशी वाक्यं विरोधी गटाला डिवचणारी आणि बोचणारी असल्याचा आरोप करण्यात आला व यातूनच उद्भवलेला वादाची माहिती पोलिसांना देण्यात आली. यानंतर या ठिकाणी पोलीस दाखल झाले व दुसऱ्या गटाकडून लावण्यात आलेला फलक काढल्याने तणावाचे वातावरण निवळले.

## अल्पवयीन मुलीवर अत्याचार, आरोपी फरार

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि.७ :** जुन्या शहरात एका अल्पवयीन मुलीवर बलात्कार करण्यात आल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणी डाबकी रोड पोलिसांनी बलात्काराचा गुन्हा दाखल केला असून तौहिद समीर बैद असे आरोपीचे नाव आहे. मिळालेल्या माहितीनुसार आरोपी तौहिद याने अल्पवयीन मुलीला चाकूचा धाक दाखवत हा प्रकार केल्याचे पोलिसात दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे. या प्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

अकोल्याच्या डाबकी रोड पोलीस स्टेशन हद्दीत काल शनिवार, ६ सप्टेंबर रोजी दुपारी ४:३० वाजच्या दरम्यान पीडित मुलीचे नातेवाईक सर्व गणेश विसर्जन मिरवणूक पाण्यासाठी गेले होते. याच वेळी कोणी नसल्याचा फायदा घेत हा आरोपी हा पीडित अल्पवयीन तरुणीच्या घरी आला. तेव्हा पीडीतीचा मानलेला भाऊ हा त्या ठिकाणाहून जात असताना आरोपीचा आणि पिढीतेचा आवाज त्याला आला. तेव्हा त्यांनी आरोपीला हटकले तर आरोपीने जवळील चाकू काढून त्याला धाक दाखवला. तेवढ्यातच आजूबाजूचे शेजारी आवाजाच्या दिशेने पाहण्यासाठी आले असता त्यांनाही आरोपीने चाकूचा धाक दाखवला. यावेळी आरोपी २४ वषय तौहिद समीर बैद याच्या तावडीतून सुटून भयभीत झालेली मुलगी ही दिलीप नावाच्या व्यक्तीच्या पडलेल्या घरात लपली, तेव्हा मुलीच्या पाठीमागे आरोपी गेला आणि चाकूचा धाक दाखवून सोळा वर्षीय अल्पवयीन मुलीचे जबरी शारीरिक शोषण केले. यावेळी मुलीने आरडाओरडा करण्याचा प्रयत्न केला, मात्र त्यांनी चाकूचा धाक दाखवून जीवे मारण्याची धमकी दिली, तसेच याबाबतची माहिती नातेवाईकांना दिली तर तुझ्या आई, वडील, भाऊ यांनाही मारून टाकू अशी धमकी दिली. त्याच्यावर आरोपी शोषण करून निघून गेला यानंतर पीडित मुलीची आई घरी आल्यानंतर तिला पीडीताने सर्व हकीकत सांगितली.

### बजरंग दल झाले आक्रमक

अल्पवयीन मुलीच्या अत्याचार प्रकरणी डाबकी रोड पोलीस स्टेशन गाठून आरोपी विरोधात मुलीच्या आईने तक्रार दिली आहे. पीडित मुलीच्या तक्रारीवरून डाबकी रोड पोलिसांनी आरोपी विरोधात पोस्कोसह विविध कलमानुसार अंतर्गत गुन्हे दाखल केले, या प्रकरणानंतर बजरंग दलाचे कार्यकर्ते चांगलेच आक्रमक झाले. त्यांनी पोलीस ठाण्यात जमा होऊन आरोपीवर कडक कारवाई करण्याची मागणी केली. आरोपींनी यापूवही रामदास पेठ पोलीस स्टेशन आणि इतर अनेक ठिकाणी गुन्हे केले असल्याची माहिती समोर आली आहे.

## मनोज जरांगेंना सरकारचा ड्राफ्ट आधीच माहिती होता: मराठा समन्वयकाचा गंभीर आरोप

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**मुंबई , दि.७ :** मराठा समजाला आरक्षण मिळाले यासाठी मनोज जरांगे यांनी पुकारलेल्या आंदोलनावर आणि त्यांनी केलेल्या मागणीवर मराठा समन्वयक आणि अभ्यासक डॉ. संजय लाखे पाटील यांनी आक्षेप नोंदवित जरागेंवर सडकून टीका केली आहे. मराठा आरक्षण हा जगन्नाथाचा रथ आहे, पण जरांगेंना वाटतं की हा रथ मी एकटाच ओढतोय, अशा शब्दांत लाखे पाटील यांनी जरांगेंना सुनावलं आहे.

तसेच शासनाने दिलेला ड्राफ्ट जरांगेंना आधीच माहित होता, केवळ सरकारचा जयजयकार करण्यासाठी गुलाल उधळला गेला. अभ्यासकांना बोलावून चर्चा करण्याचे नाटक करून समाजाची फसवणूक केली असल्याचं लाखे पाटील म्हणाले आहेत. च्या अजेंड्यानुसार जरांगे मराठा समाजाला इतर समाजापासून वेगळं पाडण्याचं काम करत आहेत, असा आरोप त्यांनी केल्याने मोठी खळबळ उडाली आहे.मनोज जरांगे स्वतःचे मत वाढवण्यासाठीच आंदोलन करतात. ते समस्त मराठा समाजाचे नव्हे तर कुणबी समाजाचे नेतृत्व करत आहेत. जरांगेंची एकही मागणी वैद्य, कायदेशीर, घटनात्मक आणि मराठा समाजाला आरक्षण मिळावे या पद्धतीची नाही, असा आरोप लाखे पाटील यांनी केला आहे. त्यांना कायदा आणि शासन आदेश यातला फरकच कळत नाही, असं देखील ते म्हणाले.मनोज जरांगे हे आंदोलनाच्या माध्यमातून स्वतःची बुवाबाजी चालवत आहेत. मुंबई आंदोलनादरम्यान जरांगे यांना शासनाने दिलेल्या ड्राफ्ट अगोदरच माहित होता.

केवळ सरकारचा जयजयकार करण्यासाठी गुलाल उधळला. मराठा समाजातील घटनात्मक आवाज आणि अभ्यास असलेल्या लोकांना सूत्रबद्ध पद्धतीने मनोज जरांगे टार्गेट करत असून , मराठा समाजाला इतर समाजापासून वेगळं पाडण्याचा आरएसएसचा अजेंडा ते राबवत असल्याचा गंभीर आरोप मराठा आरक्षणाचे अभ्यासक आणि समन्वयक डॉ. संजय लाखे पाटील यांनी केला आहे.

## टीईटी वरून संभ्रम,शिक्षकांनी घाबरण्याचे कारण नाही- जयदीप सोनखासकर

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**अकोला, दि.७ :**नुकताच सर्वोच्च न्यायालयाने शिक्षकांबाबत निर्णय दिला आहे. यानुसार आता शिक्षकांसाठी टीईटी परीक्षा उत्तीर्ण करणे बंधनकारक करण्यात आली असून त्यानंतरच त्यांना सेवेत कायम ठेवता येईल किंवा त्यांना पदोन्नती मिळेल. मात्र या निर्णयामुळे संपूर्ण महाराष्ट्र राज्यात शिक्षकांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले असून अनेक शिक्षकांना आता हा निर्णय आपल्यासाठी बंधनकारक आहे काय?अशी शंका निर्माण झाली आहे. याबाबत विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाचे प्रांतीय उपाध्यक्ष जयदीप सोनखासकर यांनी पत्रकाद्वारे कळविले आहे की, टीईटी परीक्षा पहिली ते आठवी वर्गच्या शिक्षकांना नोकरी मिळवण्यासाठी आणि नोकरीत कायम राहण्यासाठी तसेच पदोन्नतीसाठी आवश्यक आहे. टेट ही परीक्षा इयत्ता नववी ते बारावीपर्यंत नोकरी मिळवण्यासाठी आवश्यक आहे. मात्र अल्पसंख्यांक शिक्षण संस्थेसाठी हा नियम तूर्तास लागू नाही.

सर्वोच्च न्यायालयाने महाराष्ट्र, तामिळनाडूसह इतर राज्यातून टीईटी संदर्भात दाखल झालेल्या याचिकेमुळे हा निर्णय दिला आहे. या निर्णया आधीच अनेक राज्यांनी आपल्या राज्यात हा निर्णय लागू केला आहे.यामुळे दि. २९जुलै २०११पूर्वीच्या नियुक्त शिक्षकांना टिईटी बंधनकारक नाही.

महाराष्ट्र राज्यात १३ फेब्रुवारी २०१३ पासून टीईटी बंधनकारक केली आहे. २३ जून २०१७ पूर्वीचे शिक्षक बारावी पर्यंत नोकरीला लागलेले आहेत त्यांना टेट परीक्षा तूर्तास लागू नाही. न्यायालयाच्या निर्णयावर अजून महाराष्ट्र शासनाने कुठलाही आदेश पारित केला नाही. सबब सध्या इयत्ता एक ते आठ व नऊ ते बारापर्यंत शिकवणाऱ्या शिक्षकांना कुठलीही भीती बाळगण्याचे कारण नाही.अशाप्रकारे शिक्षकांवर अन्यायकारक शासन निर्णय लादल्यास विदर्भ माध्यमिक शिक्षक संघ द्वारे शिक्षक आमदार सुधाकर अडबाले व महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षक महामंडळाचे सरचिटणीस माजी आमदार व्ही.यू. डायगव्हाणे यांचे नेतृत्वात महाराष्ट्र शासनाकडे व न्यायालयात सुद्धा लढा दिला जाईल. त्यामुळे शिक्षक बंधू-भगिनींनी आपल्या मनात कुठलीही शंका ठेवू नये अशी माहिती विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाचे प्रांतीय उपाध्यक्ष जयदीप सोनखासकर यांनी प्रसिद्ध केलेल्या पत्रकाद्वारे दिली आहे.

## विठ्ठल सूतगिरणीच्या माध्यमातून परिवार एकवटला

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**पंढरपूर, दि.७ :** कर्मवीर औदुंबर अण्णा पाटील यांनी १९८० साली लावलेल्या विठ्ठल सूतगिरणीच्या रोपट्याची वाढ आता सुरू झाली असून, आमदार अभिजीत पाटील यांच्या माध्यमातून या रोपट्याचे वटवृक्षात रूपांतर होणार आहे, असे विठ्ठल सुतगिरणीचे चेअरमन दिनकर पाटील यांनी सांगितले. यावर अभिजीत पाटील यांनी या ठिकाणी खाजगी बाजार समिती उभारण्याचे प्रयत्न सुरू असल्याचे सांगितले.

श्री विठ्ठल सूतगिरणीच्या पंढरपूर-कुर्डुवाडी रोडवरील ३४ एकर जागेवर व्यापारी संकुलाचे उद्घाटन ह. भ. प. डॉ. किरण महाराज बोधले यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी ते दोघेही बोलत होते. यावेळी विठ्ठल कारखान्याचे माजी व्हाईस चेअरमन लक्ष्मण आबा पवार, मोहन अण्णा कोळेकर, ज्ञानेवर बापू गायकवाड यांच्यासह विठ्ठल कारखान्याचे आजी माजी संचालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. व्यासपीठावरील हे चित्र अखंड विठ्ठल परिवाराची ताकद दर्शवणारे होते. विठ्ठल सुतगिरणी स्थापन करण्याचा निर्णय १९८० साली कर्मवीर औदंबर अण्णा पाटील यांनी घेतला. मात्र, आजतागायत ही सूतगिरणी होऊ शकली नाही. परंतु सभासदांनी विश्वास ठेवल्यामुळेच सूतगिरणीचा निधी जसाच्या तसा राहिला.

## संत रविदास ऐतिहासिक प्रतिष्ठाण संस्थापक अध्यक्षपदी प्रा. डॉ. गणेश बोरकर



दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. ७ :** शासकीय विश्रामगृह-सभागृहात अकोला जिल्ह्यातील चर्मकार समाजाच्या विविध संघटनांच्या पदाधिकाऱ्यांची बैठक पार पडली. या बैठकीत समाजाच्या ऐक्याचे प्रतीक म्हणून अकोला शहरात भव्यदिव्य संत रविदास ऐतिहासिक प्रतिष्ठाण उभारण्याचा निर्णय घेण्यात आला.

या प्रतिष्ठाणच्या संस्थापक अध्यक्षपदी सर्वानुमते प्रा. डॉ. गणेश बोरकर यांची निवड करण्यात आली. समाजातील अनुभवी व सक्षम व्यक्ती पुढाकार घ्यावा, अशी विनंती आयोजकांनी केली होती. त्यावर सर्वांच्या सहमतीने बोरकर यांना ही जबाबदारी सोपविण्यात आली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रतिष्ठाणचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून हा निर्णय घेण्यात आल्याचे पदाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

शिक्षण, आरोग्य आणि युवकांना रोजगार या क्षेत्रांसह अद्यावत रुणालय उभारून समाजोपयोगी उपक्रम हाती घेण्यात येणार असल्याची माहिती प्रा. डॉ. गणेश बोरकर यांनी दिली. यासाठी शहरालगत जमीन खरेदी करण्याचे प्रथम लक्ष्य निश्चित करण्यात आले असून ते येत्या दोन महिन्यांत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

बैठकीला सेवानिवृत्त कर्नल पाडुरंग वाडेकर, गजानन भटकर, प्रविण चोपडे, प्रशांत भटकर, मधुकर वानेटकर, रामाभाऊ उंबरकर, संज्योती मांगे, छाया इंगळे, कविता बुंदे, शिवलाल इंगळे, योगेश इंगळे, आशाताई चिम, नंदकिशोर ढाकरे, सुनील गवई, प्रतिभा शिरभाते, गजानन वझिरे, वर्षा वझिरे, वनिता गवई, पिके रेवस्कर, कोमल तायडे, सतीश अस्वारे, माजी नगरसेवक पुरुषोत्तम पानझाडे, वंदना कांबळे, अमोल वानखडे, निरंजन गव्हाळे, श्रीराम राखांडे, विजय भटकर, गजानन काकडे, मुरलीधर इंगळे यांच्यासह समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रविण चोपडे यांनी केले तर आभार प्रशांत भटकर यांनी मानले.

## विसर्जन | अत्याधुनिक तराफ्यावर गणेशमूर्ती चढविताना अडचण

# लालबागच्या राजाच्या विसर्जनास विलंब

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**मुंबई, दि. ७ :** राज्यासह मुंबईत गणरायाला भावपूर्ण वातावरणात निरोप देण्यात आला. मात्र मुंबईतील प्रसिद्ध लालबाग सार्वजनिक गणेश मंडळाची गणेश मूर्ती गेल्या चार तासांपासून गिरगाव चौपाटीवरच आहे. यंदा लालबागच्या राजाच्या विसर्जनासाठी तयार करण्यात आलेल्या अत्याधुनिक तराफ्यावर गणेशमूर्ती चढविताना अडचण होत आहे.लालबागच्या राजाच्या विसर्जन मिरवणुकीला २४ तास उलटले आहेत. मात्र रविवारी सकाळी साडेसातच्या सुमारास गिरगाव चौपाटीवर दाखल झालेल्या लालबागच्या राजाचे विसर्जन झालेले नाही. तत्पूर्वी काही तासांपूर्वीच लालबागच्या राजाच्या मूर्तीवरील दागिने काढण्यात आले आहेत. मात्र अत्याधुनिक मोटराईझ तराफ्यावर गणेशमूर्ती चढविता येत नसल्यामुळे गेल्या चार तासांपासून लालबागच्या राजाच्या गणेशमूर्तीचा अर्धा भाग समुद्रातच आहे. त्यामुळे लालबागचा राजा सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाचे कार्यकर्ते व गिरगाव चौपाटीवर जमलेला अलोट जनसागर विसर्जनाच्या प्रतीक्षेत आहेत.

दरम्यान, लालबागचा राजा रविवारी सकाळी साडे सात वाजताच्या सुमारास गिरगाव चौपाटीवर पोहोचल्यानंतरच समुद्राला भरती आली. तेव्हा अत्याधुनिक तराफा हलू लागला. त्यामुळे त्यावर मूर्ती ठेवणे धोकादायक होते. त्यामुळे लालबागचा राजा सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाने थोडे थांबण्याचा निर्णय घेतला आणि गणेशमूर्ती समुद्रात थोड्या आतमध्ये नेऊन सगळे दागिने काढले. मात्र समुद्राला भरती मोठ्या प्रमाणात आल्यामुळे ज्या ट्रॉलीवरून लालबागचा राजा आणला, त्यावरून तराफ्यावर चढविताना अडचण निर्माण झाली आहे. कार्यकर्त्यांसह स्थानिक कोळी बांधवांकडून प्रयत्न सुरू आहेत. आता भरती कमी झाल्यावर गणेशमूर्ती अत्याधुनिक तराफ्यावर चढविण्यात येणार आहे.

## प्रेमप्रकरणामुळे पित्याकडून मुलीचा खून

**जालना:** प्रेमप्रकरणाच्या कारणावरून पोटच्या मुलीचा गळा दाबून खून करून तिचे प्रेत गळ्यास दोरी बांधून लटकवून आत्महत्या असल्याचे भासवणाऱ्या पित्यास बदनापूर पोलिसांनी अटक केली आहे. पोलिस उपनिरीक्षक संतोष कुकलारे शुक्रवारी रात्रीच्या वेळी गस्तीवर असताना ही घटना समोर आली. शनिवारी दुपारी या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला. बदनापूर तालुक्यातील दावलवाडी गावात हरी बाबूराव जोगदंड यांच्या मुलीने आत्महत्या केली असल्याचे समजल्यानंतर पोलीस पथकासह घटनास्थळी पोहोचले. मात्र मुलीच्या आत्महत्येबद्दल पोलिसांना संशय आला.

## महत्त्वाचे

### ठाण्यातील भिवंडीत कारखान्याला भीषण आग

**मुंबई :** ठाण्यातील भिवंडीत एका कारखान्याला भीषण आग लागली. कामतघर परिसरात असलेल्या बालाजी डाईंग फॅक्टरीत ही आग लागल्याची माहिती दिली जात आहे. ज्या इमारतीत आग लागली ती इमारत दोन मजली इमारत असून, ती आगीच्या भक्ष्यस्थानी होती. कारखान्यात ठेवलेल्या कपड्यांमुळे आग वेगाने पसरली आणि आजूबाजूच्या मजल्यांनाही वेढले. अग्निशमन दलाच्या अनेक गाड्या घटनास्थळी दाखल असून, आग विझवण्याचे शर्थीचे प्रयत्न सुरु करण्यात आले. त्यानंतर ही आग आटोक्यात आणण्यात आली.भिवंडी शहर आणि ग्रामीण भागात आगीच्या अनेक घटना आत्तापर्यंत पाहिला मिळाल्या आहेत. भिवंडीतील दाट लोकवस्ती असलेल्या परिसरातील एका कापड डाईंग कंपनीत शुक्रवारी रात्री उशिरा मोठी आग लागली. बालाजी पॉलिस्टर लिमिटेड नावाच्या या कंपनीत आग लागताच परिसरात गोंधळ उडाला. अग्निशमन दलाच्या तीन गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या.

### विसर्जन मिरवणुकीत विजेचा धक्का; पाच भाविक होरपळले

**मुंबई :** मुंबई अंधेरीच्या साकिनाका येथे विसर्जन मिरवणुकीला गालबोट लागले आहे. विसर्जन मिरवणूकीच्या ट्रॉलीला उच्चदाब वीज वाहिनीच्या वीज वाहक तारेचा स्पर्श झाला. यावेळी ट्रॉलीत असलेले ५ भाविक होरपळले. त्यात एकाचा मृत्यू झाला. शनिवारी मध्यरात्री १ च्या सुमारास ही दुर्घटना घडली. जखमींमध्ये दोन लहान मुलांचा समावेश आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार साकिनाका येथे श्री गजानन मित्र मंडळ आहे. शुक्रवारी रात्री अनंत चतुदर्शीच्या दिवशी मंडळाच्या गणपतीची विसर्जन मिरवणुक निघाली होती. रात्री ढोलताशांच्या गजरात मिरवणूक खैराणी रस्त्यावरून जात होती. मध्यरात्री एकच्या सुमारास ही मिरवणूक एसजे स्टुडियोसमोर आली. त्या ठिकाणी उच्चदाबाची वीज वाहक तार लोंबकळत होती. त्या तारेचा स्पर्श विसर्जन ट्रॉलीला झाला. त्यामुळे वीजेचा धक्का लागून ट्रॉलीवर असलेले ५ जण होरपळले. या घटनेमुळे एकच गोंधळ झाला. जखमींना उपचारासाठी खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.या दुर्घटनेत ट्रॉलीवर असलेला बिनू शिवकुमार (३६) या तरुणाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला.

### मुंबई सेंट्रल येथे प्रवाशाकडून पैसे उकळल्याचा आरोप

**मुंबई :** पश्चिम रेल्वेच्या मुंबई सेंट्रल टर्मिनसवर एका प्रवाशाकडून पैसे उकळल्याचा आरोप असलेल्या रेल्वे पोलिस दलाच्या (आरपीएफ) तीन जवानांनी अटकपूर्व जामिनासाठी उच्च न्यायालयात धाव घेतली आहे. गेल्या आठवड्यात सत्र न्यायालयाने त्यांना अटकेपासून संरक्षण देण्यास नकार दिला होता.राहुल भोसले (४७), ललित जगताप (५०) आणि अनिल राठोड (३७) हे तिघे १८ ऑगस्ट रोजी गुन्हा दाखल झाल्यापासून फरार आहेत. त्यांनी सुरूवातीला अटकेपासून संरक्षण मिळवण्यासाठी सत्र न्यायालयात धाव घेतली होती. परंतु, सत्र न्यायालयाने त्यांना दिलासा नाकारल्याने तिघांनीही उच्च न्यायालयात अटकपूर्व जामिनासाठी याचिका केली आहे. आरोपींनी तक्रारदार प्रवाशाच्या बॅगेची तपासणी सीसीटीव्ही देखरेखीखाली न करता एका खोलीत केली होती, हे नियमांचे उल्लंघन असून आरोपींचा त्यामागे कुहेतू असल्याचे दिसून येते, असे निरीक्षण सत्र न्यायालयाने भोसले, जगताप आणि राठोड यांचा अटकपूर्व जामिनासाठीचा अर्ज फेटाळताना नोंदवले होते.

## कीव हादरले! हल्ल्यात १ वर्षीय चिमुकल्याचा मृत्यू

# रशियाने पुन्हा युक्रेनवर डागली ड्रोन अन् क्षेपणास्त्रे

**कीव : दि.७ वृत्तसंस्था**



रशिया आणि युक्रेन युद्ध गेल्या तीन वर्षाहून अधिक काळ सुरु आहे. जगभरातून हे युद्ध थांबवण्यासाठी प्रयत्न सुरु आहे. परंतु सर्व प्रयत्न अपयशी होताना दिसत आहे. पुन्हा एकदा रशियाने युक्रेनची राजधानी किववर हल्ला केला आहे. पुन्हा एकदा कीव हादरले आहे.

रशियाने रविवारी (०७ सप्टेंबर) पहाटे युक्रेनवर ८०० हून अधिक ड्रोन्स डागले आहे. तसेच डेकॉय शस्त्रांचाही हल्ला केला आहे. रशियाच्या या हल्ल्यात दोन जणांचा मृत्यू झाला असल्याची माहिती समोर आली आहे. दिवसेंदिवस हे युद्ध तीव्र रुप धारण करत आहेत. रशियाने रविवारी केलेला हल्ला एवढा भयानक होता की कीवसह इतर शहरेही हादरली. यामुळे संपूर्ण युक्रेनमध्ये भीतीचे वातावरण आहे.

रशियाच्या या हल्ल्यानंतर कीवमधील एका कॅबिनेट इमारतीमधून प्रचंड धूर निघतानाही दिसत आहे. यामुळे लोकांना बाहेर पडणे कठीण झाले होते.

या हल्ल्याच्या एक दिवस आधीच युक्रेनने रशियाने हल्ला केला असल्याचे म्हटले होते. पण युक्रेनच्या सैनिकांनी रशियाच्या ड्रोनला हाणून पाडले असल्याचा दावा त्यांनी केली. परंतु सर्व हल्ल्यांना रोखण्यात युक्रेनला यश मिळाले नाही. रशिया सातत्याने युक्रेनवर हल्ले करत आहे. याच वेळी एक मोठी माहिती समोर आली आहे. रशियाने डोनेट्स्क प्रजेशातील मार्कोव्ह आणि मोक्याचे शहर ताब्यात घेतले असल्याचे युक्रेनने म्हटले आहे.

**डोनाल्ड ट्रम्प यांचे युद्धबंदीचे प्रयत्न अपयशी**

याच वेळी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी व्हाइट हाउसमध्ये प्रतिनिधींसोबतच्या बैठकीदरम्यान युद्ध थांबवण्यात अपयशी ठरल्याचे कबुल केले आहे. त्यांनी म्हटले होते की, मला वाटले हे युद्ध थांबवणे सर्वात सोपे असेल, परंतु असे नाही. पुतिन यांच्याशी चांगले संबंध असून देखील मी मदत करु शकलो नाही असे त्यांनी म्हटले आहे.

### दोन जणांचा मृत्यू, १० जखमी

**कीवच्या स्थानिक प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, दोण जणांना हल्ल्यात मृत्यू झाला असून, यामध्ये एक वर्षाच्या मुलाचाही समावेश आहे. चिमुकल्याचा मृतदेह बाहेर काढण्यात आला आहे. कीवचे महापौर विटाली क्लिट्स्को यांनी दिलेल्या माहितीनुसार, रशियाने कीवर डागलेल्या ड्रान्स आणि डेकॉय एका निवासी इमारतीवर पडले आहे. यामध्ये १० जण जखमी झाल्याची माहिती मिळाली आहे.**

## शेतकऱ्यांसमोर आत्महत्येशिवाय पर्याय उरणार नाही- केजरीवाल

**नवी दिल्ली : दि.७ वृत्तसंस्था**



आम आदमी पार्टीचे राष्ट्रीय संयोजक अरविंद केजरीवाल यांनी नुकतीच एक पत्रकार परिषद घेतली. यावेळी त्यांनी केंद्रातील नरेंद्र मोदी यांच्या सरकारला धारेवर धरण्याचा प्रयत्न केला. ते म्हणाले, ''केंद्र सरकारने कापसावरील आयात शुल्क कमी करण्याचा निर्णय घेतल्यामुळे भारतातील शेतकऱ्यांना मोठा फटका बसणार आहे. मोदींच्या या निर्णयामुळे शेतकऱ्यांसमोर आत्महत्या करण्यावाचून दुसरा पर्याय उरणार नाहीत.''

केजरीवाल म्हणाले, ''आतापर्यंत आपल्या देशातील शेतकऱ्यांनी उत्पादन केलेल्या कापसाची बऱ्यापैकी विक्री होत होत होती. परंतु, अमेरिकेचा कापूस देशात फारसा विकला जात नव्हता. परंतु, मोदी सरकारने १९ ऑगस्टपासून कापसावरील ११ टक्के आयात शुल्क हटवलं आहे. यामुळे अमेरिकेतून आयात केलेला कापूस भारतीय बाजारात भारतातील शेतकऱ्यांनी पिकवलेल्या कापसापेक्षा प्रति किलो १५ ते २० रुपये स्वस्तात विकला जाईल. आपल्या देशातील शेतकरी येत्या ऑक्टोबर-नोव्हेंबर महिन्यात त्यांचा कापूस घेऊन बाजारात जातील तेव्हा त्यांच्या कापसाला ग्राहक मिळणार नाही. ग्राहक मिळाले तरी ते कमी भावात कापूस मागतील ज्यामुळे शेतकऱ्यांचं प्रचंड प्रमाणात नुकसान होईल.

## मुनीर जनतेवर अत्याचार करताय, पाकिस्तानात अघोषित मार्शल लॉ- इम्रान खान

**इस्लामाबाद : दि.७ वृत्तसंस्था**



पाकिस्तानचे माजी पंतप्रधान इम्रान खान यांनी पाकिस्तनाचे लष्करप्रमुख असीम मुनीर यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला आहे. इम्रान खान म्हणाले की ''मुनीर हे पाकिस्तानी जनतेवर अत्याचार करत आहेत. अत्याचार करून ते सगळं काही नियंत्रणात ठेवू पाहत आहेत जेणेकरून ते दीर्घकाळ त्यांची सत्ता टिकवू शकतील आणि त्यांची राजवट चालवू शकतील. यावेळी पाकिस्तानात अघोषित मार्शल लॉ लागू करण्यात आला आहे.''

पाकिस्तानचे माजी क्रिकेटपटू आणि माजी पंतप्रधान इम्रान खान हे सध्या तुरुंगात आहेत. जेलमधूनच त्यांनी एक निवेदन प्रसिद्ध केलं आहे ज्यात त्यांनी असीम मुनीर यांच्यावर टीका केली आहे. ते म्हणाले, ''२०२४ च्या निवडणुकीत हेराफेरी करून शाहबाज शरीफ यांचं सरकार स्थापन करण्यात आलं. आता असीम मुनीर यांच्या इशाऱ्यांवर सरकार शरीफ यांच्याच कार्यकर्त्यांवर अत्याचार करत आहे.''

इम्रान खान यांनी एक्सवर एक पोस्ट केली आहे. या पोस्टमध्ये त्यांनी म्हटलं आहे की ''असीम मुनीर हे त्यांची त्यांची राजवट टिकवून ठेण्यासाठी पाकिस्तानच्या जनतेवर अन्याय करत आहेत, त्यामुळे देश कमकुवत होत आहे. ज्यांनी (मुनीर अँड कंपनीने) जनादेश चोरला आहे ते आता काहीसे घाबरले आहेत. याच भीतीमुळे आमच्यावरील अत्याचार वाढत आहेत.''

इम्रान खान यांनी आपल्या पोस्टमध्ये पाकिस्तानमधील सध्याच्या स्थितीची १९७१ मधील याह्या खान यांच्या काळातील स्थितीशी तुलना केली आहे. तेव्हा गृहयुद्धानंतर पूर्व पाकिस्तान वेगळा होऊन नव्या बांगलादेशचा जन्म झाला होता. इम्रान खान म्हणाले, ''१९७१ आणि आजच्या काळात एकच फरक आहे की आता लोक अधिक जागरुक झाले आहेत. समाजमाध्यमांमुळे लोकांपर्यंत थोडंफार सत्य पोहोचत आहेत. समाजमाध्यमांमुळे तथ्ये लोकांपर्यंत पोहोचत आहेत.

## अमेरिकेच्या हवाई राज्यावर घोंगावतय 'किको' वादळाचे संकट

**होनोलुलु :** अमेरिकेच्या हवाई राज्यावर मोठ्या संकटाचा इशारा जारी करण्यात आला आहे. राष्ट्रीय हवामन सेवेच्याने दिलेल्या माहितीनुसार, अमेरिकेच्या हवाई राज्यावर किको या शक्तीशाली वादळाचे संकट घोंगावत आहे.

शनिवारी (०६ सप्टेंबर) सकाळी हे वादळ होनोलुलुपासून १,२०५ मैल आग्नेये दिशेला होते. या वादळाचा वेग १३० मैल प्रती तास नोंदवण्यात आला आहे.

ने दिलेल्या माहितीनुसार, किको वादळ पश्चिम-वायव्येकेडे २५ मैल प्रती तासाच्या गतीने सरकत आहे. यामुळे प्रशानासनाने हवाई राज्यात आपत्कालीन स्थिती जाहीर केली आहे.

## काशी विश्वनाथ मंदिराच्या पुजाऱ्यांना मिळणार २०० टक्के पगारवाढ

**वाराणसी : दि.७ वृत्तसंस्था**

### ३० हजारांचा पगार थेट होणार ९० हजार



एक ऐतिहासिक निर्णय घेत, उत्तर प्रदेश सरकारने श्री काशी विश्वनाथ मंदिर ट्रस्टच्या पुजारी आणि कर्मचाऱ्यांसाठी नवीन सेवा नियमांना मंजुरी दिली आहे. या निर्णयानुसार, त्यांना राज्य सरकारी कर्मचाऱ्यांचा दर्जा मिळेल आणि त्यांच्या पगारातही लक्षणीय वाढ होईल. पुजाऱ्यांचे मासिक वेतन, जे आतापर्यंत सुमारे ३० हजार रुपये, ते आता नवीन नियमांनुसार जवळजवळ तिप्पट होईल. गेल्या चार दशकांतील पुजाऱ्यांच्या सेवा नियमांत ही पहिली मोठी सुधारणा आहे.

नुकत्याच पार पडलेल्या १०८ व्या बैठकीत, श्री काशी विश्वनाथ मंदिर ट्रस्टने इतर अनेक प्रस्तावांना मान्यता दिली. यामध्ये पारंपारिक शिक्षणाला चालना देण्यासाठी मिर्झापूरमधील काक्राही येथे मंदिराच्या ४६ एकर जमिनीवर वैदिक शिक्षण आणि प्रशिक्षण संस्था स्थापन करणे याचा समावेश आहे. याशिवाय, भाविकांचा प्रवास सुलभ करण्यासाठी काशी विश्वनाथ धाम आणि शक्तीपीठ विशालाक्षी माता मंदिर दरम्यान थेट मार्ग तयार करण्यासाठी इमारती खरेदी करण्यास मान्यता देण्यात आली. धाममध्ये सुरक्षा उपाययोजना मजबूत करण्यासाठी एक प्रगत नियंत्रण कक्ष आणि आधुनिक सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्याचा निर्णयही घेण्यात आला आहे.

१९८३ मध्ये राज्य सरकारने मंदिराचे प्रशासन ताब्यात घेतले, परंतु आतापर्यंत पुजारी आणि कर्मचाऱ्यांच्या सेवा परिस्थितीत कोणतीही लक्षणीय सुधारणा झालेली नाव्हती. या बदलामुळे मंदिर कर्मचाऱ्यांना उत्तर प्रदेशातील इतर सरकारी कर्मचाऱ्यांच्या बरोबरीने अतिरिक्त फायदे मिळतील. समानता आणि आदराच्या त्यांच्या दीर्घकालीन मागणीला मान्यता म्हणून या निर्णयाकडे पाहिले जात आहे. पण, भारतातील बहुतेक राज्यांमध्ये हिंदू पुजाऱ्यांना सरकारी कर्मचारी मानले जात नाही, तेलंगणा हा अपवाद आहे.

काशी विश्वनाथ मंदिर ट्रस्टचे मुख्य कार्यकारी अधिकारी विश्व भूषण मिश्रा यांनी एएनआयला सांगितले की, ''मंदिराचे पुजारी पूर्वी कोणत्याही औपचारिक चौकटीशिवाय काम करत होते. आमच्या पुजाऱ्यांना पूर्वी कोणतेही सेवा नियम नव्हते. आता नियमांसह कराराला ट्रस्टने मान्यता दिली आहे.

## अमेरिकेत हेलिकॉप्टर कोसळले ; सर्व प्रवाशांचा मृत्यू

**मिनेसोटा : दि.७ वृत्तसंस्था**

; अमेरिकेतील मिनेसोटा याठिकाणी ट्विन सिटीज परिसरात विमानतळाजवळ काल एक हेलिकॉप्टर कोसळल्याची दुर्घटना घडली आहे. घटनेनंतर हेलिकॉप्टरला आग लागल्याने सर्व जणांचा मृत्यू झाल्याची अधिकाऱ्यांनी पुष्टी केली आहे. अपघातग्रस्त हेलिकॉप्टरची ओळख रॉबिन्सन ६६ अशी झाली आहे. ते एअरलेक विमानतळाच्या पश्चिमेला कोसळले. ही घटना स्थानिक वेळेनुसार दुपारी २:४५ च्या सुमारास घडली.

एका इंग्रजी वर्तमानपत्राच्या वृत्तानुसार, घटनास्थळी पोहोचलेल्या आपत्कालीन कर्मचाऱ्यांनी हेलिकॉप्टर पूर्णपणे जळून खाक झाल्याचे पाहिले. अपघातातून कोणीही वाचले नाही. पोलिस आणि अग्निशमन दलाच्या पथकांनी तातडीने घटनास्थळी पोहोचून बचाव कार्य सुरू केले. अधिकारी हेलिकॉप्टरची चौकशी करण्यात आणि अपघाताचे कारण शोधण्यात पूर्णपणे गुंतले आहेत. हेलिकॉप्टरमध्ये किती लोक होते हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. पोलिसांच्या म्हणण्यानुसार, अपघातस्थळ निवासी आणि गैर-व्यावसायिक क्षेत्रात आहे आणि जमिनीवर कोणीही जखमी झाल्याचे कोणतेही चिन्ह नाही.रॉबिन्सन आर६६ हे रॉबिन्सन हेलिकॉप्टर कंपनीने डिझाइन केलेले हलके, सिंगल-इंजिन टर्बाइन हेलिकॉप्टर आहे.

## जपानमध्ये राजकीय गोंधळ! पंतप्रधान शिबेरू इशिबा यांची राजीनाम्याची घोषणा

**टोकीयो : दि.७ वृत्तसंस्था**




जपानचे पंतप्रधान शिगेरू इशिबा यांनी रविवारी राजीनामा देणार असल्याचे संकेत दिले. त्यांच्या पक्षातून वाढत्या टीकेनंतर आणि जुलैमध्ये झालेल्या संसदीय निवडणुकीत झालेल्या दारुण पराभवानंतर त्यांनी हा निर्णय घेतला आहे. जपानच्या एका वृत्तवाहिनीच्या वृत्तानुसार, पक्षाच्या नेत्यांनी त्यांना राजकीय जबाबदारी घेण्याची मागणी केली होती.

इशिबा यांनी गेल्या वर्षी ऑक्टोबरमध्ये पंतप्रधानपदाची सूत्रे स्वीकारली. मात्र, गेल्या एका महिन्यापासून त्यांच्यावर पक्षाच्या उजव्या विचारसरणीकडून राजीनामा देण्यासाठी दबाव येत होता, परंतु ते या मागणीला सतत विरोध करत होते. इशिबा यांचे हे पाऊल अशा वेळी आले जेव्हा त्यांचा लिबरल डेमोक्रॅटिक पक्ष (एलडीपी) सोमवारी पक्षात लवकरच नेतृत्वाची निवडणूक घ्यायची की नाही याचा निर्णय घेणार होता. हा निर्णय इशिबाविरुद्ध अविश्वास ठरावासारखा असता.शिगेरू इशिबा यांनी ऑक्टोबरमध्येच पंतप्रधानपदाची सूत्रे स्वीकारली, परंतु जुलैमध्ये झालेल्या संसदीय निवडणुकीत त्यांच्या पक्षाला दारूण पराभवाचा सामना करावा लागला. २४८ जागांच्या वरिष्ठ सभागृहात बहुमत नसल्याने सरकारच्या स्थैर्यावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले होते. या पराभवानंतर इशिबा पक्षातील विरोधकांचे लक्ष्य बनल्या. विशेषतः उजव्या विचारसरणीचे लोक सतत त्यांच्या राजीनाम्याची मागणी करत होते. आतापर्यंत ते दबाव सहन करत राहिले, परंतु शेवटी त्यांनी पद सोडण्याचा निर्णय घेतला.

### नवीन नेतृत्व निवडणुकीपूर्वी मोठे पाऊल

**इशिबाचे हे पाऊल खूप महत्त्वाचे मानले जात आहे, कारण त्यांचा पक्ष दुसऱ्याच दिवशी म्हणजे सोमवारी नेतृत्व बदलावर मतदान करणार होता. जर हा प्रस्ताव मंजूर झाला असता, तर ते इशिबावर थेट अविश्वास व्यक्त करण्यासारखे झाले असते. ही परिस्थिती टाळण्यासाठी आणि पक्षातील वाढती असंतोष शांत करण्यासाठी त्यांनी स्वतः राजीनाम्याचा मार्ग निवडला.**



## ब्रिटनच्या उपपंतप्रधान एँजेला रेयनर यांचा तडकाफडकी राजीनामा

**लंडन : दि.७ वृत्तसंस्था**

ब्रिटनच्या उपपंतप्रधान एँजेला रेयनर यांनी शुक्रवारी तडकाफडकी आपल्या पदाचा राजीनामा दिला. उपपंतप्रधानपदाबरोबरच गृहसचिव पदाचाही त्यांनी राजीनामा दिला. रेयनर यांनी अलिकडेच खरेदी केलेल्या घरावरील पूर्ण कर त्यांनी भरलेला नसल्याचे अंतर्गत चौकशीच्या अहवालामध्ये निष्पन्न झाले होते. त्यानंतर लगेचच रेयनर यांनी राजीनामा दिला.

रेयनर या मजूर पक्षाच्या ताकदवान नेत्या समजल्या जातात. घरावरील पूर्ण कर न भरून त्यांनी मंत्र्यांसाठीच्या आचारसंहितेचे उल्लंघन केले असल्याचा ठपका त्यांच्यावर ठेवण्यात आला आहे. त्यांच्या राजीनाम्यामुळे पंतप्रधान कीर स्टार्मर यांना आपल्या मंत्रिमंडळाची तातडीने फेररचना करावी लागते आहे. मंत्रिमंडळातील वरिष्ठ मंत्र्यांमध्ये फेरबदल केला जाऊ लागला आहे. आपल्या मंत्रिमंडळ चमूतील सर्वात वरिष्ठ सहकारी मंत्री महिलेला वगळावे लागत असल्याबद्दल त्यांनी खेद व्यक्त केला आहे. तटस्थ सल्लागारांनी रेयनर यांच्या वर्तणुकीबद्दल दिलेल्या अहवालामध्ये त्यांना पदावर राहू दिले जाऊ नये, अशी शिफारस पंतप्रधान स्टार्मर यांच्याकडे केली होती.

रेयनर यांनी यापुर्वी गृहनिर्माण, समुदाय आणि स्थानिक सरकार मंत्रालयाचे राज्य मंत्री म्हणूनही काम केले होते. अतिरिक्त तज्ज्ञ कर सल्ला न घेण्याच्या आपल्या निर्णयाबद्दल खूप पश्चात्ताप होतो आहे. पण तसे करण्याचा आपला कधीही हेतू नव्हता. योग्य निधीचा कर भरला जायला हवा होता. या प्रकरणी आपल्या कुटुंबावर मोठा दबाव येऊ लागला असल्याचेही रेयनर यांनी पंतप्रधान स्टार्मर यांना पाठवलेल्या राजीनामा पत्रात म्हटले आहे.

अंदाज | शास्त्रज्ञांनी मांडले वास्तव

## पृथ्वीवरील सजीव सृष्टी सहाव्यांदा नष्ट होणार?

**नवी दिल्ली , दि.७ वृत्तसंस्था**



मानव जागतिक जैवविविधता आणि परिसंस्थेचा ऱ्हास करत आहे. या परिणामांमुळे शेकडो वनस्पती आणि प्राण्यांच्या प्रजाती नष्ट झाल्या आहेत आणि आज अंदाजे १० लाख प्रजाती नामशेष होण्याचा धोका आहे. परंतु, एका नवीन अभ्यासाच्या लेखकांनी सध्याच्या जैवविविधतेच्या संकटाला तोंड देण्यासाठी तातडीने उपाययोजना आखण्याची गरज व्यक्त केली आहे. त्यांच्या संशोधनातून असे दिसून आले आहे की, अद्याप पृथ्वीवरील सहावे मास एक्स्टिंक्शन (सजीव सृष्टी सामूहिकपणे नष्ट होण्याची प्रक्रिया) सुरू झालेले नाही.

''अलिकडच्या एका अभ्यासात असे दिसून आले आहे की, प्राण्यांच्या प्रजातींचे नष्ट होण्याचे प्रमाण वेगाने वाढत आहे आणि यामुळे मानवी अस्तित्व धोक्यात आले आहे'', असे अमेरिकेतील ॲरिझोना विद्यापीठातील पर्यावरणशास्त्र आणि उत्क्रांती जीवशास्त्राचे प्राध्यापक जॉन वियन्स यांनी म्हटले आहे.

पृथ्वीच्या इतिहासात, ५ वेळा मास एक्स्टिंक्शन झाले आहे. यामध्ये कमीत कमी ७५ टक्के प्रजाती अल्प भूगर्भीय कालावधीत नष्ट झाल्या आहेत. असे असले तरी पृथ्वीवरील जीवन टिकून राहिले आहे.

सुमारे ४४३ दशलक्ष वर्षांपूर्वी ऑर्डो विशियन काळाच्या शेवटी पहिल्या मास एक्स्टिंक्शमुळे पृथ्वीवरील सर्व प्रजातींपैकी ८६ टक्के प्रजाती नष्ट झाल्या. त्यानंतर ३७५ दशलक्ष वर्षांपूर्वी ७५ टक्के प्रजाती नाहीशा झाल्या.

दरम्यान, ४ सप्टेंबर रोजी बायोलॉजीमध्ये प्रकाशित झालेल्या वनस्पती आणि प्राण्यांच्या नामशेष होण्याच्या नवीन विश्लेषणामध्ये सहावे मास एक्स्टिंक्शन सुरू झाले नसल्याचे म्हटले आहे. संशोधकांचा असा अंदाज आहे की, अलिकडच्या शतकांमध्ये मानव-प्रेरित प्रजातींचे नष्ट होणे दुर्मिळ झाले आहे.

हे पत्र मालक,मुद्रक,प्रकाशक आणि **मुख्य संपादक तिक्ष्णगत सुगत वाघमारे** यांनी भास्कर प्रिंटिंग प्रेस एन.एच.६ बोरगाव मंजू येथे मुद्रित करून दै.अजिंक्य भारत, सुगत भवन,बारा ज्योतिर्लिंग मंदिराजवळ, रणपिसेनगर, अकोला येथे प्रकाशित केले.✲ **कार्यकारी संपादक-रूबेन डी.वाळके (✲पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची)** आरएनआय-MAHMAR/2009/35271

आपले पत्र या मेलवर पाठवावे, आम्ही त्याला प्रसिद्धी देऊ
ajinkyabharat23@gmail.com

## संपादकीय...

# चीनचे शक्तिप्रदर्शन

चीनचे सर्वेसर्वा शी जिनपिंग यांनी शांघाय परिषद आणि दुसऱ्या महायुद्धाला ८० वर्षे पूर्ण झाली. या निमित्ताने राजधानी बीजिंग येथे नुकतेच लष्करी संचलनाचे आयोजन केले होते. लष्करी संचलनात चीनने अत्याधुनिक शस्त्रास्त्रे आणि क्षेपणास्त्रांचे प्रदर्शन केले. त्यात बॅलेस्टिक क्षेपणास्त्रे, महासागरांच्या पाण्याखाली वापरले जाणारे महाकाय ड्रोन, अत्याधुनिक लढाऊ विमाने यांचा समावेश होता. आठ चाकी एचझेड ५५ या चिलखती वाहनावर ते ठेवण्यात आले होते. शत्रूचे शस्त्र किंवा उपकरणांवरील ऑप्टिकल सेन्सर्स नष्ट करण्याची या शस्त्राची क्षमता आहे. या संचलनात नवे युद्धतंत्र ठरलेल्या एलवाय १ या लेझर शोचे विशेष आकर्षण होते. जेएल१, डीएफ ६१, डीएफ या घातक क्षेपणास्त्रांचेही प्रदर्शन चीनने केले. जे२०, जे२०ए, जे २०एस, जे ३५ए, जे ३५ या पाच प्रकारच्या अत्याधुनिक लढाऊ विमानांचेही प्रात्यक्षिक केले. नवी क्रूझ क्षेपणास्त्रे, चिलखती वाहने, संरक्षण यंत्रणा, तिन्ही दलांच्या ताफयातील अत्याधुनिक आणि प्रभावी शस्त्रास्त्र यांचेही प्रदर्शन चीनने अतिशय दिमाखात केले. चीनने डीएफ ५सी या द्रवरूप इंधनाचा वापर असलेल्या आंतरखंडीय अण्विक क्षेपणास्त्राचीही चाचणी घेतली आहे. या क्षेपणास्त्राचा पल्ला तब्बल २० हजार किलोमीटरचा आहे. याचाच अर्थ संपूर्ण जगातील कुठलेही लक्ष्य चीन भेदू शकते. जगातील वाढत्या संघर्ष आणि शस्त्रास्त्र स्पर्धेत चीनने एका अत्यंत घातक हत्याराने सर्वांना हादरवले आहे. -१ हे उच्च-शक्तीचे लेझर हत्यार, ज्याची मारक क्षमता तब्बल २० हजार किलोमीटरपर्यंत आहे, हे चीनच्या नव्या सैन्य सामर्थ्याचे प्रतीक ठरले आहे. यामुळे चीन जवळपास संपूर्ण जगाच्या टप्प्यात आला असून, पृथ्वीवरील कोणत्याही भागात, अगदी अंतराळातील धमकींनाही प्रत्युत्तर देण्यास सक्षम झाला आहे. चीनच्या सरकारी वृत्तपत्र 'ग्लोबल टाईम्स'ने लिहिले की, हे डायरेक्टेड एनर्जी वेअपन मुख्यतः नौदलासाठी डिझाइन केले गेले असून, ते ड्रोन आणि मिसाइल नष्ट करण्यासाठी उपयुक्त आहे. मात्र, जमिनीवरही त्याचा वापर शक्य आहे. परेडमध्ये हे हत्यार प्रथमच सार्वजनिकरित्या दाखवण्यात आले. यामुळे चीनच्या सैन्य तंत्रज्ञानातील प्रगतीचे दर्शन घडले. याची रेंज २० हजार किलोमीटरपर्यंत असल्याने, ते जगभरातील कोणत्याही ठिकाणी हल्ला करण्यास सक्षम आहे. अगदी पृथ्वीबाहेरील धमकींनाही प्रत्युत्तर देऊ शकते. हे हत्यार नौदलाच्या जहाजांवर बसवण्यासाठी प्राधान्याने डिझाइन केले असले तरी, जमिनीवरही तैनात करता येते. चीनने याची अनेक तांत्रिक वैशिष्ट्ये गुप्त ठेवली आहेत, पण परेडमधील दर्शनाने जागतिक शस्त्रास्त्र स्पर्धेत नवीन वळण आले आहे. या शक्तिप्रदर्शनाला रशिया, उत्तर कोरिया, इराण, बेलारूस, इंडोनेशिया, कंबोडिया, व्हिएतनाम, मलेशिया, म्यानमार, नेपाळ, मालदीव, पाकिस्तान, कझाकस्तान, काँगो, क्युबा, मंगोलिया आदी २६ देशांचे प्रमुख उपस्थित होते. चीनने आयोजित केलेल्या या भव्यदिव्य स्वरूपाच्या लष्करी संचलनाने या २६ देशांचे प्रमुखही अचंबित झाले. लष्करी संचलनातील शस्त्रास्त्रे आणि क्षेपणास्त्रांच्या प्रदर्शनातून चीनने, अमेरिकेला शह देण्याची क्षमता चीनमध्ये असल्याचा संदेश देतानाच आपल्या निमंत्रणावर जगातील २६ देशांचे प्रमुख जमू शकतात हे सुद्धा सिद्ध केले आहे. केवळ आशिया खंडच नाही, तर जगाचेही नेतृत्व चीन करू शकतो, हे चीनने दाखविले. चीनचे पुनरूत्थान रोखणे अशक्य असल्याचे प्रतिपादन करून जिनपिंग यांनी अनेक बाबी साध्य केल्या आहेत. जगावर आपली पकड अधिक मजबूत करण्याचा चीनचा प्रयत्न यशस्वी झाला आहे. या संचलनामुळे अमेरिका आणि खासकरून डोनाल्ड ट्रम्प यांचा चांगलाच जळफळाट झाला असण्याची शक्यता आहे. ट्रम्प यांनी आयात शुल्काद्वारे चीनला डिवचण्याचा प्रयत्न केला. पण चीनने जोरदार पलटवार करून अमेरिकेला चांगलाच धडा शिकविला आहे. ट्रम्प यांच्या हेकेखोर आणि मनमानी कारभारामुळे जगभरात अस्वस्थता आहे. तसेच युद्धामुळे रशिया कमकुवत झाला आहे. त्यामुळे जगात चीनचा उदय झाला असून इथून पुढे अनेक बदल घडण्याचे संकेत चीनने या लष्कर संचलनाने दिले आहेत. २००८ साली चीनने बीजिंगमध्ये ऑलिम्पिक सोहळ्याचे भव्यदिव्य आयोजन करून जगाचे लक्ष वेधून घेतले होते. आता हे नेत्रदिपक लष्करी संचलन करून चीनने जगभरात धडकी भरवली आहे. विशेष म्हणजे, ज्या तियानमेन चौकाचा इतिहास रक्तरंजित आहे, त्याच चौकात हा सोहळा आयोजित करून जिनपिंग यांनी स्पष्ट केले आहे की हा नवा चीन आहे आणि त्याच्या महत्त्वाकांक्षाही नव्या आहेत. लष्करी संचलनाबरोबरच चीनचे सर्वेसर्वा शी जिनपिंग यांनी आयोजित केलेल्या शांघाय शिखर परिषदेला (एससीओ) एकूण दहा देशांचे प्रमुख हजर होते. त्यात रशिया, भारत, इराण, बेलारूस, कझाकस्तान, उझबेकिस्तान, किर्गिझस्तान आणि ताजिकिस्तान या देशांचा समावेश होता. ही बैठक अपेक्षेप्रमाणे जोरदार झाली. परिषदेचे सर्वच्या सर्व सदस्य देशांच्या प्रमुखांनी उपस्थिती लावत त्याचे महत्त्व वाढविले. चीनचा विस्तारवाद, आक्रमकता आणि गरीब देशांना जाळ्यात ओढण्याच्या इराद्यांची भलेही भरपूर चर्चा होत राहते, पण चीनमधील बैठकीकडे कुणीही पाठ फिरविली नाही. तर, याच बैठकीच्या दोन दिवसांनी भव्य अशा लष्करी संचलनाचे आयोजन झाले. चीनने आपल्या मनीषेप्रमाणे सारे काही पार पाडले. चीन हा बेभरवशाचा देश असल्याचा कितीही कांगावा केला जात असला तरी प्रत्यक्षात त्याच्या निमंत्रणावरून मध्य अशिया आणि दक्षिणपूर्व आशियामधील देशांचे नेते आवर्जून संचलनात सहभागी झाले. याचाच अर्थ चीनला हे देश स्वीकारत आहेत किंवा चीनविषयी त्यांची फारशी तक्रार नाही, असे एकंदरीत दिसून येते.



## लक्ष्यभेद

जयदीप सोनखासकर
9890508017

### लालबागचा राजा



असा कसा रुसला
लालबागचा राजा
समुद्राकडे चला
म्हणे सारी प्रजा

ते गुजरातचे तराफे
कामात नाही आले
ह्या कोळी बांधवांचे
कौशल्य पणा लागले

राजाही म्हणतो आता
भेदभाव तो करू नका
दरबारात माझ्या येता
श्रीमंत गरीब पाहू नका

## ॥ अभंगवाणी ॥

- प्रवीण हटकर
८०५५२१३२८१

मीच मीच माझा
माझा माझा मीच ।
अहं म्हणे नीच
ज्याला त्याला ॥

लेखकाला चढे
अहंकार जेव्हा ।
सृजनता तेव्हा
वांझ होते ॥

अहं नष्ट होण्या
सहवास हवा ।
सोबतीला हवा
गुरू मित्रा॥

उतारा असतो
अहं ज्याला मित्रा ।
रामबाण मित्रा
गुरु मंत्र ॥

# आठवणीतील शिक्षक



प्रासंगिक

रोशनी दाते डोंगरवार
मो. ९४०५५१९७९०



समाजातील आदर्श माणूस घडविणाऱ्या सर्व गुरुवर्यांना शिक्षक दिनाच्या हार्दिक शुभेच्छा...का कुणास ठाऊक, आपण पुढे कितीही शिकलो, अगदी देश विदेशातून सर्वोच्च पदव्या मिळविल्या, तरी आपल्याला आठवणीत राहतात केवळ आपल्या प्राथमिक शिक्षण दिलेल्या शाळेतील बाई. अंगणवाडी, प्राथमिक आणि माध्यमिक शाळेतील शिक्षकांना तर आपण जन्मात विसरूच शकत नाही. कारण आपल्या व्यक्तिमत्वाची जडणघडण त्यांच्याच हातून झालेली असते. शाळेतील चिमुकल्यांच्या पाखरांना बळ देण्याचं काम त्यांनी केलेलं असतं. कोणता विद्यार्थी कसा आहे? त्याच्या आवडीनिवडी काय? हे ओळखून ज्यांनी आपल्याला प्रगतीपथावर नेऊन घडविले त्यांना कसं बरं विसरताच येत नाही. आपल्याला महाविद्यालयात उत्तम अध्यापक लाभलेले असतात पण प्राथमिकच्या बाई ओल्या कातर संध्याकाळी आठवतात आणि मन त्यांच्या आठवणीत चिंब भिजून जातं. त्या शाळेच्या आठवणी, तिथल्या गमती जमती, मौजमस्ती आणि सोबतची सवंगडी आपल्याला आठवणीत ठेवायला लागते. आपल प्राथमिक शिक्षण कुठे झालं? कसं झालं? आणि आपण कसं शिकत गेलो? याचा हळूहळू त्यावेळी उलगडा होत जातो. त्यावेळी शिक्षक दिन कसा साजरा व्हायचा? आम्ही काय करायचो? आणि मग आताच्या शिक्षक दिनामध्ये होणारा बदल हळूहळू कळू लागतो. शिक्षक म्हणजे कोण? शि म्हणजे शिस्त, क्ष म्हणजे क्षमता आणि क म्हणजे कर्तव्य या तिन्ही शब्दांचा मेळ असणारा व्यक्ती. शिक्षक म्हणजे एक जादू, जादूगर अस म्हणायला हरकत नाही. शिक्षकांनी कितीतरी लाखो विद्यार्थी आपल्या आचरणातून, अनुभवातून घडविलेले असतात. तीस पस्तीस वर्षा आधी आम्ही जेव्हा शाळेत जायचो तेव्हा आम्ही शिक्षकांना बाई किंवा गुरुजी म्हणायचो. आता मात्र काळानुरूप व्याख्या बदलली आणि बाईच्या मॅडम आणि गुरुजींचे सर झालेत. जसा शब्दांमध्ये बदल होत गेला तसा शिक्षकांच्या राहणीमानात, आचरणात आणि अनुभवात देखील बदल होत गेला. शिकणे आणि शिकवणे या दोन वेगवेगळ्या क्रिया आहेत. आताच्या शिक्षण पद्धती अध्ययन अध्यापन प्रक्रियेत अध्ययन प्रक्रियेला अधिक महत्त्व असल्यामुळे अध्यापनामुळे अध्ययनाला मदत होते. एखादे शिक्षक म्हणत असतील मी पाठ शिकविला, मी कविता शिकविली पण ते एकतर्फी शिकवणे होय. तर त्या शिकवण्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये कितपत ज्ञान उतरलं आणि त्यांनी कसा अनुभव दिला हे खरे शिक्षण. शिक्षक शिकवतात ते आपल्या अनुभव आणि ज्ञानाच्या जोरावर. मातीच्या गोळ्याला आकार देणारा जसा कुंभार असतो. तीच भूमिका शिक्षकांची आहे. घरून येणारा प्रत्येक विद्यार्थी हा मऊ, कोवळा आणि लुसलुशीत मातीचा गोळा आहे. शिक्षक जसे मार्गदर्शन करतील तसा तो घडत जातो. असं म्हणतात ना, इमारतीचा पाया पक्काच असायला हवा. इमारतीचा पाया जर कच्चा असला तर इमारत खचून जाईल. परंतु इमारतीचा पाया जर मजबूत बनला तर ती इमारत कधीच खचणार नाही. उलट त्यावर मजलेच मजले चढतील आणि ती इमारत एक दिवस इतकी उंच पोहचेल की, त्या उंचीला थांबवणार कुणीच नसेन. तसेच विद्यार्थ्यांच असत. त्यांचा पाया हा प्राथमिक शिक्षणात मजबूत करायचा असतो. आणि जर एकदाचा पाया मजबूत झाला तर तो नेहमीसाठी मजबूतच राहतो. म्हणूनच म्हणतात ना प्राथमिक शिक्षण हे आपल्या मातृभाषेतूनच व्हायला हवे. हा प्राथमिक शिक्षणाचा पाया जर कोणी करत असतील तर ते म्हणजे आमचे प्राथमिक शिक्षक. म्हणूनच माणूस कितीही मोठा झाला तरी आपलं बालपण आणि बालपणीची शाळा, मित्र, शिक्षक यांना विसरुच शकत नाही. मला अजूनही आठवते, ती माझी बालपणीची प्राथमिक शाळा. जिथे मी वर्ग पहिली ते चौथी पर्यंतचे शिक्षण घेतले. अगदी गावाच्या मधोमध बाजारपेठेत असलेली माझी ती छोटीशी शाळा. प्रत्येक वर्गाचे दोन तुकडी असलेली माझी शाळा. मला शिकवायला आमच्या देशमुख बाई होत्या. खूप प्रेमळ, सोज्वळ, नम्र, सुस्वभावी, मितभाषी आणि सुंदर असे त्यांचे व्यक्तिमत होते. बाई वर्गात आल्या की, वर्ग अगदी शांत व्हायचा. आम्ही त्यांना घाबरायचो नाही, पण त्यांची आदरयुक्त भिती वाटायची. बाईंनी आवाज दिला की, अख्खा आमचा वर्ग धावत जायचा. बाईंनी घरी बोलवलं तर आम्ही त्यांच्या घरी सुद्धा जायचो. बाई नसल्या की, आम्हाला शाळेत करमत नव्हतं. दुसरे शिक्षक वर्गात आले तरी आमचं मन काही अभ्यासात लागेना. बाईंची शिर्डीच्या साईबाबा वर नितांत श्रद्धा होती. त्यामुळेच त्यांनी गावात साईबाबांचे मंदिर बांधले. कधी मधल्या वेळेत आम्ही जेवण करत असू आणि बाईंनी आवाज दिला तर आम्ही हातातला घास तिथेच टाकून धावतच पळत जायचो आणि बाईंना काय लागते ते बघायचं. कधी बाईंनी जर पाणी आणायला लावलं तर धूम ठोकत जाऊन आणि लगेच बाईसाठी कोणाच्यातरी घरून एक ग्लास पाणी घेऊन यायचो. इतकी आपुलकी आम्हा शिक्षक विद्यार्थ्यांत होती. गरीब मुलांना पाटी, पेन्सिल आणि नोटबुक पण त्या घेऊन द्यायच्या. कधी त्यांनी कुणाचे मन दुखावले नाही. मला अजूनही डोळे मिटले की, त्यांचा तो चेहरा आठवतो. त्यांचं ते निखळ हास्य. राग आला की रागावणं. पण बाईंनी कधी आम्हाला मारलं नाही किंवा कठोर शिक्षा पण केलेली नाही. त्यांचा राग फार कमी यायचा. आलाच तर आम्हाकडे पाहून उडून जायचा. त्याचं विद्यार्थ्यांवर खूप प्रेम होतं. त्यामुळे त्यांचा हात कधी उगाच उगारलाच नाही. पण बाईनी सांगितलेलं काम, दिलेला अभ्यास आम्ही तितकाच नियमाने आणि काटेकोरपणे करायचो. बाईंना कुठलाही त्रास होऊ नये असं नेहमी आम्हा विद्यार्थ्यांना वाटायचं. देशमुख बाई माझ्या आदर्श शिक्षिका आहे. त्यांच्या संस्कारामुळे आज मी आणि कितीतरी विद्यार्थी घडले आणि त्यांच्या ध्येयापर्यंत पोहचले आहेत. देशमुख बाईसारखें जर सर्वांना शिक्षक मिळाले तर विद्यार्थी नक्कीच घडतील आणि शाळाही बनतील. सद्या शिक्षक एखाद्या बाहुलीप्रमाणे झालेला आहे. आदेश आला की, अंमलबजावणी करा. मग तो आदेश दिल्लीपासून गल्लीपर्यंत कुणाचाही असू शकतो. आदेश अमलात आणताना त्याची शाळा, विद्यार्थी मात्र मागे पडले, याची कुणालाही काळजी नाही. सद्या फक्त सर्वजण कागदी घोडे नाचवन्यात मग्न आहे. आजचे विद्यार्थी उद्याचे भावी नागरिक आणि शिल्पकार आहे. पण शिक्षण व्यवस्था मोडकळीस येताना कुणाला दिसत नाही. आपल्या शिक्षकांचे मूळ काम शिकवणे किंवा विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणे आहे. विद्यार्थ्यांच्या पंखांनाना भरारी देणे आहे. विद्यार्थिरुपी फुलांमध्ये कमी पडलेले रंग भरणे आहे. ही सर्व कामे सोडून त्याला भलत्याच कामात गुंतवून ठेवल्यामुळे आजचा विद्यार्थी मागे पडत आहे, शाळा ओस पडत आहे. या कारणांमुळे विद्यार्थ्यांचा आणि पालकांचा कल इंग्रजी शाळांकडे वाढलेला दिसत आहे. या विद्यार्थ्यांना जर सामोरे आणायचे असेल, मराठी शाळा टिकवायचे असतील, मराठी विद्यार्थी घडवायचे असतील आणि आकाशात भरारी घेण्याचा सामर्थ्य जर विद्यार्थ्यांमध्ये द्यायचे असेल तर शिक्षकांना त्याच्या मूळ कामापासून कोणीही परावृत्त करणार नाही याची खबरदारी घेणे तेवढेच आवश्यक आहे. शिक्षक दिनाच्या दिवशी शिक्षकांचा सन्मान करून, त्यांना शाल आणि श्रीफळ देऊन होत नाही. तर त्यांना विद्यार्थ्यांमध्ये मिसळू द्या. त्यांना शिकवू द्या, मार्गदर्शन करू त्यांच्याशी हितगुज करू द्या. विद्यार्थ्यासोबत त्यांच मैत्रीचं नातं घट्ट करू द्या. तेव्हाच त्यांना त्यांचा शिक्षक दिनाचा खरा पुरस्कार मिळेल. तसेच ज्या दिवशी इतर कामातून सर्व शिक्षक मोकळे होतील आणि आपल्या विद्यार्थ्यांमध्ये गुंततील त्यादिवशी खरा शिक्षक दिन साध्य झाला असे म्हणावे लागेल.

# विकास.... की विकासाचे वाटोळे!

विचारमंथन

रवी देशमुख
७५१७८९६०५५





कुठल्याही विकासात राजकारण आणू नये, पण राजकारण आल्याशिवाय विकासाचे श्रेय घेता येत नाही, हे डोक्यात बसल्याने अकोला शहरात अक्षरशः विकासाची वाट लागली आहे. नगर परिषद असताना व स्व. विनयकुमार पाराशार यांच्यासारखा दृढनिश्चयी राजकारणी असताना अकोला शहर व त्याचा विकास हा राज्यात चर्चेचा विषय होता. शहर कसे असावे तर अकोला शहरासारखे. आता मात्र अकोला शहर केवळ नावालाच महानगरपालिका झाले आहे. शहर वाट्टेल तिकडे वाढत आहे मात्र, मूलभूत सोयीसुविधांच्या नावाने बोंबाबोंब आहे. शहराचा विकास करताना रस्ते बांधले जातात, अन् एखादी योजना आली की रस्ते तोडले जातात. त्यानंतर त्या रस्त्यांकडे पहायला ना प्रशासनाला वेळ असतो ना नागरिकांना, त्यामुळे शहराचे वाटोळे होत चालले आहे. रस्ते बांधले म्हणजे ते कसेही असले तरी मंजूर अशी विचारधारा अकोलावासीयांची झाली आहे. त्यामुळे रस्ते केवळ बांधले जातात आणि काही महिन्यातच त्याचे पितळ उघडे पडते. यावर कुणीही आवाज उठवत नाही. अशी निद्रिस्त झालेली जनता प्रशासन आणि शासन दोघांनाही हवी असते. दर पावसाळ्यात कुणाच्या घरात तर कुणाच्या दुकानात पाणी शिरते. बाधीत नागरिकांना आर्थिक फटका तर बसतो त्याला यामधून सावरायला अवधीही लागतो. शासनाकडून केवळ थातुरमातुर आर्थिक मदत दिली जाते. हे चक्र दर पावसाळ्यातील झाले आहे, प्रशासन मुसळधार पावसाचे कारण पुढे करुन हात वर करुन देते. याला कारणीभूत केवळ प्रशासन आहे. लेआऊटला परवानगी देताना काहीच पाहले जात नाही का? की केवळ पैसे घेऊन ले-आऊटला मंजूरी दिली जाते. ज्या नागरी वस्तीत पाणी शिरले त्या ले-आऊटला कुणी मंजूरी दिली, हे तपासण्याची गरज आहे. पण तिथपर्यंत पोहोचण्यासाठी सर्वसामान्यांची ताकद कमी पडते. लोकप्रतिनिधींनी खोलात जाऊन याची चौकशी करायला पाहिजे. पण, तसे होताना दिसत नाही. त्यामुळे अधिकारी वर्ग मस्तवाल झाले असून वाट्टेल तशा परवानग्या देत सुटले आहेत. ले-आऊटमध्ये नाली, रस्ते, विद्युत व्यवस्था असल्याशिवाय ले-आऊटला मंजुऱ्या देण्यात आल्या. त्यामुळे लाखो रुपयांची गुंतवणूक करुन कसेबसे घर बांधणाऱ्या नागरिकांना ले-आऊटमध्ये साध्या सुविधाही मिळत नसल्याची परीस्थिती आहे. महानगरपालिका घर बांधकाम परवानगीसाठी नागरिकांकडून विकास शुल्क घेते परंतु, ले-आऊट मालकाने कुठल्याही सोयी-सुविधा दिल्यात हे पाहण्याची साधी तसदीही घेत नाही, अशी अवस्था झाली आहे. शहराचा सत्यानाश करण्यात महापालिका प्रशासन सर्वाधिक पुढे आहे. याला महसुल विभागाचाही मोठा हातभार आहे. जो विकास झाला आहे, त्याची अवस्था काय आहे, हे आपण सर्व पाहत आहोत. कोट्यवधी रुपये उधळून उड्डाणपुल बांधण्यात आला, त्याचे पितळ सहा महिन्यातच उघडे पडले. भूयारी मार्ग अजुनही बंद आहे. सिमेंट रस्त्यांची ऐसीतैसी झाली आहे. उलट मुंबई येथील प्रतिभा कंपनीने २० वर्षापुर्वी बांधलेले रस्ते अजुनही चांगल्या स्थितीत आहे. शिवणी विमानतळाचा विस्तारीकरणाचा प्रश्न कायम असून औद्योगिक वसाहतीत एकही मोठा प्रकल्प आपण आणू शकलो नाही, हे आपले अपयश आहे. शहराची हद्दवाढ झाली म्हणजे विकास झाला असे होत नसते, उलट यामुळे शहराचे वाटोळे झाले आहे. जनता जेवढी निद्रीस्त तेवढी ती शासन आणि प्रशासनाच्या सोयीचे असते. अकोला शहरात तेच झाले आहे. कितीही मोठी समस्या येऊ द्या, अकोलेकर तोंडाला पट्टी बांधून असतात. कुणीही रस्त्यावर येऊन निषेध करीत नाही. उलट गोडवे गायचे असले की, अकोलेकरांना राजकारणी आपले सोबती करुन घेतात. अशाने शहराचा विकास होणार नाही, हे धान्यात ठेवा.

# काळजातला मित्र

व्यक्ती विशेष

सुनील भेले
मो. 9421786227





काही नाती रक्ताच्या पलीकडची असतात, जणू काही जन्मांतरीचे देणेघेणेच. माझी आणि शैलेशची मैत्री ही त्याच पठडीतल. आता लोक म्हणतील की, 'सुनील शैलेशवर लिहितो आणि शैलेश सुनीलवर'. पण काही नात्यांचा जाहीर उत्सव साजरा करायचा असतो आणि आज माझ्या मित्राच्या वाढदिवसाचे निमित्त आहे. शैलेश पांडे, हे नाव आज मराठी पत्रकारिता, साहित्य आणि भाषा क्षेत्रात एखाद्या वटवृक्षाप्रमाणे उभे आहे. मराठीच नव्हे तर इंग्रजी आणि हिंदी भाषेवर वर्चस्व. 'जनवाद'पासून 'लोकसत्ता', 'सकाळ' ते 'तरुण भारत' पर्यंतचा त्याचा झंझावाती प्रवास मी जवळून पाहिला आहे. पण आज यशाच्या शिखरावर असलेल्या या माणसाला पाहिल्यावर, 'मारेगावचा आपला शैल्या तो हाच का?' यावर क्षणभर विश्वास बसत नाही. 'दिव्याखाली अंधार'म्हणतात, तसा त्याचा स्वभाव आहे; बाहेरून जितका मोठा, आतून तितकाच साधा, निगर्वी आणि परखड.

तो 'भाषाप्रभू' आणि 'शब्दप्रभू' आहे, हे मी केवळ मित्र म्हणून नाही, तर मराठी साहित्याचा एक विद्यार्थी म्हणून जबाबदारीने सांगू शकतो. पन्नासहून अधिक पुस्तकांना प्रस्तावना लिहिणारा आणि असंख्य लेखकांना घडवणारा हा अवलिया, शब्दांची अचूक पेरणी कशी करावी याचा चालताबोलता वस्तुपाठ आहे. त्याचे तर्कशास्त्र बिनतोड आणि आकलन नेमके असते. त्याच्याशी गप्पा मारणे म्हणजे विचारांचे टॉनिक घेण्यासारखे आहे. मैत्री करावी तर शैलेशसारखी! त्याच्या मैत्रीच्या कक्षा खूप रुंद आहेत; तो माझा मित्र आहे आणि माझ्या मुलांचाही. कोणताही लोभ किंवा अपेक्षा नसलेला, मनाने श्रीमंत असलेला हा माणूस नेहमी म्हणतो, 'काय घेऊन जाणार आहोत आपण सोबत?' त्याचा स्वभाव थोडा अलिप्त आहे. तो सहसा कोणाला फोन करत नाही, आपल्यालाच त्याची ख्यालीखुशाली विचारावी लागते. मी अधूनमधून फोन केल्यावर आमचा संवाद ठरलेला असतो. 'काय पांड्या, काय सुरू आहे?'त्याचे उत्तर, 'काय बे भाड्या', असे आले की समजायचे, 'सब ठीक है'. पण जर त्याने 'बस, चल रहा है' म्हटले, की समजायचे गाडी कुठेतरी अडकली आहे. मग मात्र मला राहवत नाही, मी त्याला जाऊन भेटतोच. आमचा हा शिवराळ पण काळजाचा ठाव घेणारा संवाद ऐकण्यासाठी माझी मुलेही फोन स्पीकर ऑन ठेवायला सांगतात. आपल्या बापालाही कुणीतरी हक्काने शिवी देणारे आहे, यात त्यांना कोण जाणे कोणता आनंद मिळतो!

आमच्या वर्तुळात आम्ही त्याला 'अवलिया बाबा' म्हणतो. तो सतत कोणत्या ना कोणत्या क्रिएटिव्ह कामात गढलेला असतो. त्याची स्वतःची पुस्तके, त्याने हात लावलेली इतरांची पुस्तके आणि त्याने काढलेले विशेषांक पाहिले, की त्याच्या सर्जनशीलतेची खोली लक्षात येते. तो स्वतःच्या विश्वात रमलेला असतो, पण एकदा का मनमोकळा झाला की मैफल जिवंत करतो.

आमच्या मैत्रीचा खरा 'सुवर्णकाळ' म्हणजे आमचे कॉलेजचे दिवस. तो काळच वेगळा होता. आम्ही एकत्र येऊन अनेक उपक्रम राबविले. अंधश्रद्धा निर्मूलनासाठी पथनाट्ये केली, स्त्री-पुरुष समानतेचा जागर केला. नेहरू जन्मशताब्दीनिमित्त तीन दिवसांचे राज्यस्तरीय सामाजिक कार्यकर्ता संमेलनही आम्हीच भरविले होते. शैलेश लिहायचा आणि मी चित्रे काढायचो. एकदा मी सहजच एक डोळा रेखाटला, त्यावर त्याने 'डोळा'नावाची इतकी सुंदर कविता लिहिली की ती आजही माझ्या स्मरणात आहे. (कवितेतील तो डोळा कुणाचा होता, हे मात्र त्याने अजून सांगितले नाही.) विद्यापीठाने स्नेहसंमेलने बंद केली, तेव्हा आम्ही कॉलेजमध्ये 'युवा महोत्सव' सुरू केला. आमचे मोठे बंधू प्राध्यापक दिलीप अलोणे आणि प्राध्यापक रमाकांत देशपांडे सरांच्या मार्गदर्शनाखाली शैलेश आणि आमचा मित्र दीपक 'गुरू'जुनेजा अप्रतिम नियोजन करायचे. तेव्हा आम्ही 'चाहूल' नावाचे हस्तलिखित भित्तिपत्रक सुरू केले होते; शैलेशच्या संपादकीय कौशल्याची ती पहिली प्रयोगशाळा होती. सर्वांत अविस्मरणीय क्षण म्हणजे, प्राचार्य राम शेवाळकर सरांच्या 'रेखा' आणि 'असोशी' या काव्यसंग्रहांवर आम्ही तयार केलेले चित्र-काव्य प्रदर्शन. शैलेशच्या सुंदर हस्ताक्षरात कविता आणि माझी त्याला साजेशी चित्रे. सर प्रदर्शन पाहायला आले. एक-एक पोस्टर न्याहाळताना त्यांच्या चेहऱ्यावरचे कौतुक आणि अभिमान आजही माझ्या डोळ्यांपुढे आहे. 'असोशी' कवितेच्या पोस्टरजवळ येऊन त्यांनी माझा स्केचपेन मागितला आणि त्यावर एक झोकदार सही केली. ती सही म्हणजे आमच्या 'चंगू-मंगूच्या जोडी'ला मिळालेला आशीर्वादच होता. काळाच्या ओघात माणसे दूर जातात, पण मैत्रीची मुळे काळजात घट्ट रुतून बसतात. शैलेश असाच काळजातला मित्र आहे. जिगर, कलेजा... मित्रा, वाढदिवसाच्या खूप खूप शुभेच्छा!

## कविता

### ‘ गुरुंमुळे जीवन उजळते ’....

गुरुंमुळे जीवन उजळते,
गुरुंमुळे वाटा खुलतात
प्रकाश होतो अंतरी अंतरी,
अज्ञानाचे मेघ विरतात ।।

शब्दांतून झरे वाहतात,
आशेचे गीत उमलते,
मनामनातील स्वप्नांना
नवे पंख ते मिळते
गुरुंमुळे जीवन उजळते ।।

कधी कठोर शिकवणीतून
सहनशीलता शिकवली,
कधी मायेच्या ओंजळीतून
जगण्याला गोडी दिली
गुरुंमुळे जीवन उजळते ।।

स्वतः जळून दीप व्हावे,
हीच शिकवण लाभली,
गुरुचरणी नतमस्तक होऊ
हीच आमुची प्रार्थना झाली
गुरुंमुळे जीवन उजळते
गुरुंमुळे वाटा खुलतात ।।

**डॉ. विनय वसंतराव दांदळे ,**
वसंतकुंज, गोकुळ कॉलनी ,
अकोला - ४४४००१.
सुसंवाद - ९८२२२३१७६९.

### खेळ खेळा...!




मन स्वच्छ करा,
आळसाचे जाळे काढून टाका,
आणि खेळ खेळा,

बाहेर जाणाऱ्यांना,
मित्रांना एकत्र करा,
चपळाईचे दरवाजे उघडा,

मग मित्रांसोबत हॉकी आणि क्रिकेट खेळा.
भारताने किती प्रगती केली आहे ते पहा,
अनेक बक्षिसे जिंकली आहेत
तूम्ही खेळा
आणि तुमचे नाव उज्वल करा

**- हिमांशू निलेश बन्सल**
(१३ वर्षांचा बालकवी)

## बिपाशा नंतर आता मृणाल ठाकूरने अनुष्का शर्मावर साधला निशाणा ?





टीव्ही इंडस्ट्रीतील असूनही, मृणाल ठाकूर चित्रपट जगतावर राज्य करत आहे. या अभिनेत्रीने बॉलीवूडला अनेक हिट चित्रपट दिले आहेत. ‘सन ऑफ सरदार २’ मधील मृणालची व्यक्तिरेखा देखील प्रेक्षकांना खूप आवडली. त्याच वेळी, ही अभिनेत्री पुन्हा एकदा प्रसिद्धीच्या झोतात आली आहे. बिपाशा बसूवर टीका करणारा व्हिडिओ अजून शांत झाला नव्हता की मृणालचा आणखी एक व्हिडिओ आता समोर आला आहे. सोशल मीडिया वापरकर्ते त्याचा संबंध अनुष्का शर्माशी जोडत आहेत, ज्यामुळे मृणालला पुन्हा एकदा सोशल मीडियावर ट्रोल केले जात आहे. या व्हिडीओमध्ये आता अभिनेत्री नक्की काय बोली आहे आणि लोकं तिला ट्रोल का करत आहेत जाणून घेऊयात.

खरंतर सलमान खानच्या सुलतान चित्रपटासाठी अनुष्का शर्माऐवजी मृणाल ठाकूरची निवड करण्यात आली होंती, परंतु नंतर अनुष्का शर्माने ही भूमिका खूप चांगली साकारली आणि हा चित्रपट सुपरहिट ठरला. आता मृणालने मुलाखतीत याबद्दल सांगितले आणि म्हटले की तिने स्वतः काही चित्रपट नाकारले कारण ती तयार नव्हती. तिच्या मते, त्या चित्रपटाने अभिनेत्रीला उंची दिली पण जर तिने हे चित्रपट केले असते तर ती स्वतःला गमावले असते.

## कविता

### वाटचाल शिक्षकाची

जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षकाला
ओळखावे तरी कसे?
वर्ग असो, मिटींग असो, केंद्र संमेलन
अथवा प्रशिक्षण असो कुठे......
क्षमतावह्या, नोंदवहया, उपचारात्मक
कृती आराखड्यांचे नियोजन करी तो
नित्ये...........
त्यामुळे सर्वांना प्रश्न तो पडे, त्यांना
शिक्षक म्हणावे का शिष्ये ...

जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षकाला
संबोधावे तरी काय ?
शिपाई, कारकून, शिक्षक, विद्यार्थी का
हेडमास्तर......
तंत्रस्नेही, विषय शिक्षक, संगिततज्ञ,
ड्रॉईंग टीचर का स्पोर्टमास्तर...

मात्र शासनाची झाली पक्की खात्री, की तो
आहे ऑलराउंडर ....
जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षकाने
करावे तरी काय?
प्रवेशपात्र, साक्षर, निरक्षर, शाळाबाह्य,
दारिद्र रेषा सर्वेक्षण, वरून बी. एल. ओ.
निवडणूकीचे...
नैतिकतेची जाणीव करून देण्यात येते की,
ही तुमची कामे राष्ट्रीय कर्तव्याचे.......
मात्र हेच मोठे आहेत विषम अडथळे,
शहरी-ग्रामीण विद्याथी प्रगतीचे ...

जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षकाची
व्यथा ती काय ?
शंभर टक्के शिकवण्याची ईच्छा, मात्र
कारकुनी फार..
खेड्यातूनही बनवायचे डॉक्टर-इंजिनिअर,
मात्र पालकांची गरिबी फार.......

एवढ असूनही तो करतो अडचणींवर मात
करून प्रयत्न अपार.....
शिक्षण वाटेवरचा असा वाटसरू हा,
अविरत झटत आहे या दरित......
प्रतिकुलतेतून अनुकुलता समाजात या,
निर्माण आहे तो करित........
ज्ञान समता स्नेह बंधुभाव त्या, चिमुकल्या
मनात आहे पेरित......
अटलनिश्चल अविरत सदैव तो, मग्न
आपुल्याच आहे धूंदित
सदैव मग्न आपुल्याच धुंदित !........

**शालिनी पी. तायडे - विरघट**(स. शिक्षिका)

## राशी-भविष्य

**मेष :** कौटुंबिक संबंध असोत किंवा प्रेमसंबंध असोत, एका नात्याला चालना देण्यासाठी इतर कोणत्याही नात्याला त्रास देऊ नका.

**वृषभः** तुमच्या प्रियजनांच्या जवळ येण्याच्या चांगल्या संधी सोडू नका. अशा परिस्थितीत, तुम्हाला तुमच्या मर्यादेपलीकडे एखाद्यासाठी काही करावे लागले तरी घाबरू नका.

**मिथून :** तुमच्या मित्रांशी कोणत्याही वादात पडू नका आणि जर कोणताही वाद झाला तर त्यात फक्त तुमच्या फायद्यांबद्दल बोलत राहू नका.

**कर्क :** तुमच्या कामात नियमित राहण्याचे फायदे कमी लेखू नका. जर तुम्हाला तुमची आर्थिक स्थिती वाचवायची असेल तर जास्त उदारता दाखवू नका. थोडासा हात पुढे करा.

**सिंह :** जर तुम्हाला तुमचा चांगुलपणा टिकवायचा असेल तर कोणत्याही प्रकारच्या गैरसमजुतीत पडू नका.

**कन्या :** तुमच्या कामाच्या किंवा व्यवसायाच्या बाबतीत असे कोणतेही मोठे पाऊल उचलू नका ज्यामुळे तुम्हाला धोका निर्माण होऊ शकेल.

**तुळ :** लोकांकडून सहज मदत मिळाल्याने स्वतःसाठी कोणताही धोका निर्माण करू नका. खर्च वाढवणे ही देखील एक प्रकारची चूक आहे जी नियंत्रणाबाहेर जाऊ देऊ नये.

**वृश्चिक :** कामाच्या क्षेत्रात कोणाशीही मतभेद करू नका, मग तो तुमचा सहकारी असो किंवा तुमचा बॉस.

**धनु :** प्रेमसंबंध समजून घेण्यात किंवा त्यात वेळ घालवण्यात कोणतीही कसर सोडू नका. परिस्थिती उपयुक्त आहे, म्हणून तुम्हाला तुमच्या परिस्थितीचे योग्य मूल्यांकन करावे लागेल.

**मकर :** कोणत्याही छोट्याशा गोष्टीमुळे कुटुंबातील काहीही बिघडू नका. तुम्हाला मदत करण्याचा प्रयत्न करणाऱ्या महत्त्वाच्या व्यक्तीला रागावणे योग्य नाही.

**कुंभ :** तुमचे कठोर परिश्रम आणि समर्पण असे करा की ते तुम्हाला लोकांशी जोडू शकेल. कामाच्या क्षेत्रातही चांगल्या नातेसंबंधांच्या शक्यता वाढतील.

**मीन :** कोणत्याही प्रकारच्या वादविवादात पैशाचा मुद्दा बनवू नका. असे केल्याने पैसे अडकण्याची शक्यता असते आणि सध्या हे योग्य नाही.

आचार्य पं. श्रीकांत पटैरिया: मो. ७८७९३७२९१३

## आपणचं तयार करा हे महाशब्दकोडे 153

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | स | मा | धा | न | | | | |
| | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | मो | | | | |
| | | | प | | | | | | ती | | | | |
| | | | य | | | | | | चु | | | | |
| | | | स्वि | | | | | | र | | | | |
| | | | नी | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | |
| | | | | स | र | ब | त्ती | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | |

### हे कोडे कसे सोडवाल

मित्रांनो
तुम्हाला संकेतामध्ये काही शब्द दिलेले आहेत. हे शब्दच योग्यप्रकारे या चौकटीत लिहून हे महाशब्दकोडे आपणचं तयार करा.

**संकेत शब्द :–**

**दोन अक्षरी**
अंग
आत्या
कास्य
काटा
चव
चुरा
त्रय
दर्भ
दाव
धावा
धंदा
नस
नंद
नाम
नीर
पळ
पान
बोका
मेह
माई
मोट
मौन
रती
रंक
रंभा
राधा
वण
सती
ससा

**तीन अक्षरी**
अकरा
अंकुर
कविता
जावई
तबेला
तलब
नवस
नीरस
पाचक
बारसे
वळसा
सालस
संदर्भ

**चार अक्षरी**
अत्यानंद
कुरूक्षेत्र
कुणकुण
गदाधर
तत्ववादी
तणतणी
ताबेदार
दिवासांज
नभांगण
नवरात्र
नसवार
पयस्विनी
प्रक्षेपण
बोळवण
मनमानी
मेणबत्ती
मोतीचुर
रसातळ
रमजान
राजवट
लबालब
लावसट
वाताहत
वैजयंती
वैमनस्य
शेतकरी
सरबत्ती
समाधान
संभावित
साधारण

**पाच अक्षरी**
नजरचूक

(उत्तर पुढील अंकी)

### मागील महाशब्दकोडेचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| भा | र | त | | प | रि | हा | स | | क | रो | ड | प | ती |
| न | त | म | स्त | क | | क | र | णी | | ग | | र | |
| | न | | | ड | र | | ळ | | शं | | ज | का | त |
| शं | | म | ध | | क्त | | व्या | हि | भो | ज | न | | र्ज |
| का | लां | त | रा | ने | | र | ज | त | | मा | न | हा | नी |
| | छ | | त | म | स्वी | | | चिं | त | न | | जी | |
| | न | व | ल | | का | ड | वा | त | | त | या | र | |
| म | | र्च | | प | र | म | | क | स | | ग | ज | रा |
| ळ | | स्व | ग | त | | ड | क | | ब | टू | | वा | |
| व | ग | | र | न | | म | ल | म | ल | | क | बी | र |
| ट | | का | वा | | कै | | म | म | | भा | स | | ण |
| | प्र | क | र | ण | | ए | क | ता | | गी | र | | धी |
| ब | का | ल | | | पं | | सा | | दा | दा | | प | र |
| | श | क | | कु | च | रा | ई | | स | र | प | ण | |

Uday Munde - 8446302691

## महाशब्दकोडे 534

| | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | २ | ३ | | | ४ | ५ | | | ६ | ७ | ८ | ९ | | |
| | | १० | | | ११ | | | | १२ | | १३ | | | | १४ |
| १५ | १६ | | | १७ | | १८ | | १९ | | | २० | | | २१ | |
| | २२ | | २३ | | २४अ | | २४ | | | २५ | | | २६ | | |
| २७ | | | २८ | | | | | | २९ | | ३० | ३१ | | | |
| | | ३२ | | | | ३३ | | ३४ | | ३५ | | | ३६ | | ३७ |
| ३८ | ३९ | | | | ४० | | | ४१ | | | | ४२ | | | |
| | ४३ | | | ४४ | | | ४५ | | | | ४६ | | | | |
| | ४७ | | ४८ | | ४९ | | | | ५० | ५१ | | | ५२ | ५३ | |
| ५४ | | | ५५ | | | | | ५६ | | | | ५७ | | | |
| ५८ | | ५९ | | | ६० | | | | | | | ६१ | ६२ | | ६३ |
| | | | | ६४ | | | | | | | ६५ | | | | |
| ६६ | ६७ | | ६८ | | | | ६९ | | ७० | ७१ | | ७२ | | ७३ | |
| | ७४ | | | | | ७५ | | | ७६ | | | | ७७ | | ७८ |
| ७९ | | | | ८० | | | | | ८१ | | | ८२ | | ८३ | |
| ८४ | | | ८५ | | | | ८६ | ८७ | | | | ८८ | ८९ | | |
| | | ९० | | | ९१ | | | | | ९२ | | | | | |

**—: आडवे संकेत :—**

१) डोळयांना आनंद देणारे आल्हाददायक दृश्य
४) आदर, सन्मान (अरबी)
६) वैकुंठ लोकचे श्रीविष्णुचे दोन द्वारपाल
१०) जमवून ठेवलेले, संग्रहीत
११) गोत्रातील मुख्य पूर्वज
१३) तरुण, सैनिक
१५) चित्ताकर्षणासाठी केलेला नट्टापट्टा
१८) सांगणे, कथन करणे
२०) मोठी नदी
२१) परस्त्रीशी संग करणारा, यार
२२) इतिहासकाळात मोगल आक्रमणाला एकाकी झुंज देणारा एक राजपूत राजा
२४) चारित्र्य, चांगले वर्तन
२६) चष्मा
२७) तुरुंग
२८) लवकर न तुटणारा, चिवट
२९) रोगाचे निदान करून औषधी मिळण्याचे ठिकाण
३२) प्रिय व्यक्तीच्या दुराव्याने होणारे दु:ख
३३) गोड, स्वादिष्ट
३५) भाजीत टाकण्याचा मसाल्याचा एक प्रकार
३८) उत्पादित वस्तूंचे वितरण करणारा
४०) कावळा
४१) सहाय्य, सहकार्य
४२) तांदूळावरचे टरफल
४३) धुंदी, उन्माद, मस्ती
४४) दिवसाचा राजा सूर्य
४६) लोखंडाचे सोने करणारा दगड
४७) तिडीक, वेदना
४९) पहिला ऋतू
५०) तीन तारांचे एक तंतूवाद्य
५२) खांदा
५४) स्वास्थ ठीक नसलेला, आजारी,
५५) प्रशंसा, वाहवा
५६) बांबूच्या सहाय्याने जड ओझी वाहून नेण्यासाठी केलेले साधन
५८) कलाबतूचे, जरीचे विणकाम केलेले
६०) कमळासारखे सुंदर डोळे असलेला
६१) हानी, तोटा
६५) पाच वर्षाच्या आतील मुलगा
६६) हळव्या मनाचा, दयाळू (उर्दू)
६९) हमखास, खात्रीने, निश्चितपणे
७२) इच्छापूर्तीसाठी देवाजवळ केलेला संकल्प
७४) मोठेपणा
७५) बेंबी
७६) धाटणी, पद्धति, शैली, ढब
७७) जलाशय, सरोवर
७९) भीतिप्रद, भयंकर, भीषण
८०) भांडाभांड, दंगा, बोलाचाली
८१) मार्ग, रस्ता
८३) अभिप्राय, विचार
८४) शृंगार, वाद्यांचा समुदाय
८५) शरीर, देह
८६) सूर्य ८८) शाश्वत, चिरकाल
९०) रुकार, संमत, कबूल, संभावित
९१) कोंकणातील वतनदार, सरकारसाठी गावाचा वसूल जमा करणारा
९२ ) स्वराशीस गुरु या ग्रहाची अनुकूलता असणे

**—: उभे संकेत :—**

१) नव, नूतन
२) मोठया व्यक्तिंस दिलेली भेटवस्तू
३) विष्णूपत्नी
४) धरित्री, धरती, पृथ्वी
५) फिरता भिक्षेकरी, प्राण्यांचे खेळ दाखविणारा
७) होमहवन
८) भांडण, कलह
९) लोक, जनता
१२) आलाप, लकेर, स्वरांनी रागाचा केलेला विस्तार
१४) ऊंसाचा रस काढण्याचे यंत्र
१६) घोडयाला खाजविणे
१७) वडिलांचे वडील, आजोबा
१९) अर्धा भाग, सैन्य
२१) लग्नात वरपक्षाच्या मंडळीस उतरण्यास दिलेली जागा
२३) प्रचार करणारा
२४अ) वस्त्र, पडदा
२५) नवीनच आलेला
३०) लोणच्यातील वाळलेला रस
३१) केवळ नावापुरता असलेला
३२) दुधाचे दही करण्याची प्रक्रिया
३३) संक्रांत, सूर्याचे मकर राशीत प्रवेश करणे
३४) सुंदर स्त्री
३६) घोडदळातील एक अधिकारपद
३७) अक्राळ विक्राळ स्त्री, डाकीण
३९) तमाशा दाखवून लोकाचे मनोरंजन करणारा
४०) एक जाड कवचधारी जीव
४५) अभिप्राय विचार
४६) इतर श्रेष्ठ,
४८) एका विशिष्ट हरिणांच्या नाभीत आढळणारे एक सुगंधी द्रव्य
५०) एखादे कार्य नेहमीच हातून घडत राहिल्याने होणारा सराव
५१) चोप, मारणे
५३) ..... याला कितीही उगाळले तरी तो काळाच राहतो
५४) उदरनिर्वाहासाठी करण्यात येणारा व्यवसाय, उद्योग
५६) कान व डोळ्यांमधील जागा
५७) अंदाज, तर्क
५९) जगातील सात आश्चर्यांपैको एक आश्चर्य
६२) लाकूड कापण्याचे हत्यार
६३) दिवसभर उपोषण करून रात्री भोजन करण्याचे व्रत
६४) (पाण्यास कितीही मारले तरी ते दुभंगत नाही यावरून) निष्फळ श्रम वा प्रयत्न
६७) सुनील दत्त, राजकुमार, विम्मीचा एक रहस्य चित्रपट
६८) दिवस, वार ६९) संमत, पसंतीचे मत
७०) बलिष्ठ, शक्तिमान ७१) धातुचा पत्रा
७३) सुरक्षित, काहीही इजा न होता (उर्दू)
७५) नाळ, शीर ७८) देश, राष्ट्र
७९) गुरे मारून त्यांच्या मांसाची विक्री करणारा
८२) कौशल्य, हातोटी
८५) जो ताणला जावू शकतो असा पदार्थ (इलेस्टीक)
८७) झाडाचे पान
८९) नारी, स्त्री (उत्तर पुढील अंकी)

### मागील महाशब्दकोड्याचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| व्य | | आ | र | व | णे | | प्र | थ | मो | प | चा | र | | म | रु |
| क्ति | | ड | | ळू | | वि | स्ता | र | | रि | | क्षा | ल | न | |
| म | हा | का | ली | | अ | | व | | पा | सं | ग | | स | क | ल |
| त्व | | ठी | | आ | रा | ध | ना | | | वा | ह | वा | | व | |
| | अ | | अ | व | ज | ड | | नि | वे | द | न | | पा | डा | व |
| अ | नु | भ | व | | क | | श | र | द | | | क | | | ल्हे |
| | जा | | नी | | ता | रा | | पे | | अ | थ | पा | सू | न | |
| वि | | क | | गु | | | अ | क्ष | वृ | त्त | | ळ | | ग | र |
| स | क | ल | गु | ण | सं | प | न्न | | | र | | मो | | र | सा |
| र्ज | | म | | का | त | | छ | टा | क | | भ | क्ष | क | | ळ |
| न | | क | रा | री | | | त्र | | ष्टा | | क्ष्य | | व | सा | |
| | आ | सा | म | | आ | धा | | अ | र्जि | त | | शा | | ख | वा |
| सु | र | ई | | अ | का | र | ण | | त | प | शी | ल | वा | र | |
| | क्षि | | सं | | श | क | | की | | मा | ल | क | | झो | त |
| ह | त | भा | गी | | वा | | व | र्त | मा | न | | | ज्ञा | प | न |
| ट्टी | | त | न | म | णी | | ध | न | | प्र | भा | त | | | य |

Uday Munde - 8446302691

## महत्वाचे

### शिवभोजन आंदोलन आज

**नागपूर :** शहर शिवभोजन थाली केंद्र संचालक संघटनाच्या वतीने ८ सप्टेंबर रोजी दुपारी दोन वाजता संविधान चौकात शिवभोजन धरणे आंदोलन करण्यात येणार आहे शिवभोजन योजनेचा नागपूर शहर ग्रामीण भागातील केंद्र संचालकांच्या मागील सहा महिन्यांच्या प्रलंबित बिलाच्या मागणीसाठी संविधान चौकात करण्यात येत आहे.
शहर अध्यक्ष तानाजी वनवे, शहर सचिव डॉ. जानबा मस्के, शहर कोषाध्यक्ष किशोर ठाकरे, नागपूर ग्रामीणचे अध्यक्ष राजू पोलकुमवार तसेच भास्कर पराते यांनी पत्रपरिषदेमध्ये यासंदर्भात माहिती दिली.

### गणेशोत्सवात रमले दृष्टीहिन


**नागपूर :** द ब्लाइंड रीलिफ असोसिएशन येथे गणेश उत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमात दृष्टीहीन विद्यार्थ्यांनी भजन आणि कीर्तन सादर करून उपस्थितांचे मन जिंकले. विद्यार्थ्यांच्या 'गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या' च्या गजरात मिरवणूक काढण्यात आली. विसर्जनप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष मकरंद पांढरीपांडे, सचिव कानगे, शाळेतील सर्व शिक्षक, वृद्ध कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते. सर्व उपस्थितांनी एकत्रितपणे उत्साहात गणपती बाप्पाचे विसर्जन सोहळ्यात सहभाग घेतला.

### जिल्हास्तरीय कार्यशाळा उद्यापासून

**नागपूर:** 'आदी कर्मयोगी अभियान'अंतर्गत आदिवासी गावांच्या विकासासाठी मास्टर ट्रेनर्सना प्रशिक्षित करण्यासाठी ९ ते ११ सप्टेंबरदरम्यान महादुला येथील इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ युथ वेलफेअरच्या परिसरात कार्यशाळा होत आहे जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर यांच्या हस्ते मंगळवारी सकाळी ११ वाजता कार्यशाळेचे उद्घाटन होईल. आदिवासी विकास विभागाच्या अप्पर आयुक्त आयुषी सिंह अध्यक्ष तसेच विशेष अतिथी म्हणून आदिवासी विभागाचे उपायुक्त डिगांबर चव्हाण उपस्थित राहणार आहेत. नागपूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी यांचे यावेळी विशेष मार्गदर्शन लाभणार आहे. कार्यशाळेच्या माध्यमातून मास्टर ट्रेनर्स तयार करण्यात येणार असून, ते गावपातळीवर लोकांना प्रशिक्षण देतील आणि अभियानाची माहिती लोकांपर्यंत पोहोचवतील.

## निधन

### शकुंतला फाटे



**नागपूर :** अमरावती मार्गावरील नागपूर विद्यापीठ परिसरातील काचिमेट येथील रहिवासी शकुंतला वासुदेव फाटे यांचे शनिवारी निधन झाले त्या ७८ वर्षांच्या होत्या त्या डॉ. विजय फाटे यांच्या आई होत शकुंतला फाटे यांच्यावर शनिवारी दुपारी अंबाझरी घाट स्मशानभूमीत अन्त्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात बराच मोठा आप्तपरिवार आहे.

# प्रभाग रचना: हरकतींवर मंगळवारी सुनावणी

## अंतिम प्रभाग रचना जाहीर होण्याआधीची प्रक्रिया

**नागपूर, दि. ७ प्रतिनिधी**

**आगामी महानगरपालिका निवडणुकीसाठी २३ ऑगस्टला प्रसिद्ध केलेल्या प्रारूप प्रभाग रचनेवर ४ सप्टेंबरपर्यंत प्राप्त झालेल्या एकूण ११५ हरकती व सुचनांवर ९ सप्टेंबर रोजी सकाळी ११.०० वाजता आयुक्त यांच्या सभाकक्ष, नागपूर महापालिका, मुख्यालय, सिव्हिल लाईन नागपूर येथे सुनावणी घेण्यात येणार आहे.**




नागपूर महानगरपालिका निवडणुकीच्या प्रभाग रचनेच्या प्रारुपावर शेवटच्या दिवशी (४ सप्टेंबर) ३१ आक्षेप प्राप्त झाले. त्यामुळे आतापर्यंत ११५ आक्षेप प्राप्त झाले आहेत. या आक्षेपावर मंगळवारी सुनावणी होऊन लवकरच अंतिम प्रभाग रचना जाहीर करण्यात येणार आहे. जवळपास सर्वच राजकीय पक्षांकडून आक्षेप नोंदवण्यात आले. शेवटच्या दिवशी पूर्व नागपूरचे आमदार कृष्णा खोपडे, काँग्रेसचे विधानपरिषद सदस्य अभिजीत वंजारी आणि माजी स्थायी समिती सभापती विजय झलके यांनी आक्षेप नोंदवले. प्रभाग रचनेचे प्रारुप जाहीर झाल्यानंतर त्यावर २३ ऑगस्टपासून हरकती व सूचना मागवण्याची प्रक्रिया सुरू झाली होती. गुरुवारी आक्षेप नोंदवण्याचा शेवटचा दिवस होता. पूर्व नागपूरचे आमदार कृष्णा खोपडे यांनी आक्षेप नोंदवत विधानसभा मतदारसंघाप्रमाणे प्रभाग रचना करण्यात यावी. त्यामुळे लोकप्रतिनिधी व नागरिकांना अधिक सुविधाजनक होईल. काँग्रेसचे विधानपरिषद सदस्य अभिजीत वंजारी यांनी प्रभाग २६ व २७ च्या सीमांकनाबद्दल आक्षेप घेतला आहे. या दोन्ही प्रभागांमधील काही भाग एकमेकांना जोडण्यात आले आहे. सुमारे सात हजार लोकसंख्या असलेले प्रभाग २६ मध्ये जोडण्यात आलेले भाग प्रभाग २७ मध्ये जोडावेत, अशी मागणी वंजारी यांनी केली आहे.दरम्यान, महापालिकामार्फत सर्व संबंधित आक्षेप कर्त्यांना उपस्थित राहण्याबाबत नोटीस पाठविण्यात आल्या आहे. आक्षेप कर्त्यांना नोटीस मिळणे संदर्भात काही अडचण असल्यास त्यांनी महानगरपालिका मुख्यालयातील निवडणूक विभागाशी संपर्क साधता येईल.

**सुनावणीसाठी प्राधिकृत अधिकारी म्हणून 'महाराष्ट्र मेट्रो रेल्वे'चे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे मंगळवारी त्यांच्या समक्ष सुनावणी होणार आहे. यावेळी आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी सुनावणीस उपस्थित राहणार आहेत.**

## बाप्पाला निरोप



**हिंगणा : श्रीगणेश बाप्पांना निरोप देण्यात येत असून, जड अंत:करणाने विसर्जन करण्यात येत आहे तालुक्यातील खैरी पन्नासे येथील वेणा नदीत विसर्जनप्रसंगी बालकांनी वाद्य वाजवून श्रीगणेशाला पुढील वर्षी लवकर येण्याचा आग्रह करत निरोप दिला.**

## विशेष गोवर-रुबेला लसीकरण पंधरवडा १५ सप्टेंबरपासून

**नागपूर, दि. ७ प्रतिनिधी**

सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत संपूर्ण राज्यात १५ ते ३० सप्टेंबर २०२५ या कालावधीत जिल्हाधिकारी डॉ. विपीन ईटनकर यांच्या मार्गदर्शनात आणि मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी यांच्या सूचनांनुसार 'गोवर-रुबेला विशेष लसीकरण मोहीम' राबविण्यात येणार आहे. जिल्ह्यातील शाळा, आश्रमशाळांमधील ५ वर्षे ते १५ वर्षे वयोगटातील सर्व बालकांना गोवर-रुबेला प्रतिबंधक लस देण्यात येणार आहे.

भारत सरकारने सन २०२६ पर्यंत गोवर आणि रुबेला या आजारांचे उच्चाटन करण्याचे ध्येय ठेवले आहे. या राष्ट्रीय उद्दिष्टाचा भाग म्हणून लसीकरणापासून वंचित राहिलेल्या किंवा अर्धवट लसीकरण झालेल्या बालकांपर्यंत पोहोचून त्यांना संपूर्ण संरक्षण देणे हा मोहिमेचा मुख्य उद्देश आहे. गोवर हा एक गंभीर आणि संसर्गजन्य आजार असून, लहान मुलांमध्ये गंभीर गुंतागुंत निर्माण होऊन प्रसंगी मृत्यूही ओढवू शकतो. रुबेलामुळे गर्भवतींमध्ये गर्भपात किंवा बाळाला जन्मजात दोष निर्माण होण्याचा धोका असतो.

**मोहिमेचे स्वरुप**

सदर मोहीम प्रामुख्याने शाळा आधारित असेल. जिल्ह्यातील सर्व शासकीय, खाजगी, अनुदानित आश्रमशाळामध्ये आरोग्य विभागाची सहा सदस्य असलेली पथके लसीकरण उपक्रम राबवतील सोबतच शाळाबाह्य मुले आणि अंगणवाड्यांतही विशेष सत्रांचे आयोजन केले जाईल. आरोग्य विभागानुसार, पालकांनी आपल्या ५ वर्षे ते १५ वर्षे वयोगटातील मुला-मुलींना गोवर-रुबेलाची लस अवश्य द्यावी. याआधी लसीकरण झाले असले तरी अतिरिक्त संरक्षणासाठी हा डोस देणे अत्यंत महत्त्वाचे आहे. तसेच, ही लस पूर्णपणे सुरक्षित आणि प्रभावी आहे. जिल्हाधिकारी कार्यालयाने शिक्षण विभाग, महिला व बालविकास विभाग आणि इतर संबंधित विभागांना संबंधित मोहिमेच्या यशस्वीतेसाठी सक्रिय सहकार्य करण्याचे निर्देश दिले आहेत. सर्व शाळा व्यवस्थापन आणि पालकांनी सहभाग होत गोवर-रुबेला मुक्त करण्याच्या राष्ट्रीय कार्यात योगदान द्यावे, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. विपीन ईटनकर यांनी केले आहे.

## मंडळातर्फे शिक्षकदिन

**नागपूर, दि. ७ :** दत्तात्रय नगर-रघुजी नगर येथील ज्येष्ठ नागरिक मंडळातर्फे शिक्षक दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमात अध्यक्ष नामदेव फटिंग यांनी डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेस हार अर्पण करून अभिवादन केले. प्रा. महादेव बोराडे आणि हरीश देशमुख यांनी शिक्षकांच्या कार्याचा गौरव करताना म्हटले, की शिक्षक हा आदर्श नागरिक घडविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करतो. समाजात शिक्षकांचा सन्मान होणे गरजेचे आहे. निवृत्त शिक्षण विस्तार अधिकारी गुलाब उमाठे आणि मोरेश्वर मेघरे यांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाला श्रीराम दुरगकर, पद्माकर आगरकर, हभप वाल्मीक आंबेकर, गजानन महाले, अरविंद गुंटेवार, कल्पना गाडगे, पद्माकर बाविस्कर, सुरेश धामणकर आदी मान्यवर उपस्थित होते अल्पोपहारानंतर कार्यक्रमाची सांगता झाली.

## अनुकंपा तत्वावर १५६ उमेदवारांना शासकीय नोकरीची संधी

### पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे निर्देश

**नागपूर, दि. ७ प्रतिनिधी**

नागपूर जिल्ह्यातील सुमारे १५६ प्रतीक्षायादीतील अनुकंपातत्वावर घेण्यात येणाऱ्या उमेदवारांपैकी सद्यस्थितीत ७९ जागांवर पात्र उमेदवारांना लवकरच शासकीय सेवेत नियुक्ती मिळणार आहे.

जिल्हा प्रशासनाने येथील नियोजन भवनात प्रतीक्षायादीतील सर्व उमेदवारांना निमंत्रित करून समुपदेशन केले. प्रत्येक पात्र उमेदवारांच्या शैक्षणिक पात्रता व आवडीनुसार विविध विभागांतर्गत रिक्त पदांसाठी अर्हतेनुसार पसंतीक्रम निश्चित केले. लवकरच मान्यवरांच्या उपस्थितीत पात्र उमेदवारांना नियुक्तीपत्र बहाल करण्यात येतील, असे जिल्हाधिकारी



डॉ. विपीन इटनकर यांनी सांगितले.

जिल्हा प्रशासनातर्फे निवासी उपजिल्हाधिकारी अनुप खांडे यांनी पात्र उमेदवाराशी संवाद साधून त्यांना नोकरीबाबत व त्यांना सोपविण्यात येणाऱ्या कामांबाबत माहिती करून दिली. प्रत्येक उमेदवारांशी त्यांनी संवाद साधून त्यांच्यातील क्षमता ओळखून विविध विभागांतर्गत उपलब्ध असलेल्या जागेनुसार पसंतीक्रम निश्चित केला. लवकरच संबंधित विभागाच्या नियुक्ती प्राधिकाऱ्यांकडे पात्र उमेदवारांची शिफारस जिल्हाधिकारी डॉ. इटनकर यांच्या निर्देशानुसार करण्यात येत आहे.

## प्रवीण बागडेंचा साहित्य सन्मान

**नागपूर, दि. ७ :** नागपूरचे साहित्यिक प्रवीण बागडे यांना 'प्रबुद्ध साहित्य रत्न' पुरस्कार जाहीर झाला आहे. नांदेड येथील आंबेडकरी चळवळीचा आवाज 'दैनिक प्रबुद्ध परिवार' वृत्तपत्राच्या १६ व्या वर्धापन दिनी आयोजित भव्य सोहळ्यात हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. प्रवीण बागडे मराठी साहित्य क्षेत्रात सक्रिय आहेत. वृत्तपत्रीय संपादकीय, सामाजिक जाणिवा निर्माण करणारे लेख, निवडणूक प्रक्रिया, धार्मिक-सांस्कृतिक घडामोडी यांवरील त्यांचे लेखन वाचकवर्गात लोकप्रिय झाले आहे. वास्तवाशी प्रामाणिकपणा, मुद्देसूद मांडणी आणि स्पष्ट दृष्टिकोन ही त्यांच्या लेखनशैलीची वैशिष्ट्ये आहेत. प्रवीण बागडे यांना उत्कृष्ट कर्मचारी पुरस्कार, उत्कृष्ट अधिकारी पुरस्कार, लम्पी योद्धा पुरस्कार अशा सन्मानांनी गौरविण्यात आले आहे.

## प्रहार सैनिकी शाळेत शिक्षकदिन जल्लोषात

**नागपूर, दि. ७ प्रतिनिधी**




रविनगर येथील प्रहार सैनिकी शाळेत शिक्षक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. दहावीच्या विद्यार्थ्यांनी शिक्षकांची भूमिका साकारत संपूर्ण दिवसाचे अध्यापन केले. विद्यार्थ्यांनी घेतलेला हा पुढाकार पाहून शिक्षक भारावून गेले.

कार्यक्रमाची सुरुवात भारत माता पूजनाने झाली. त्यानंतर शिक्षकांचे औपचारिक स्वागत करण्यात आले. विद्यार्थ्यांनी शिक्षकांसाठी खास खेळ व स्पर्धांचे आयोजन केले. शिक्षकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत वातावरण आनंदमय केले. मुख्याध्यापिका वंदना कुलकर्णी यांनी या उपक्रमाचे कौतुक करताना विद्यार्थ्यांचे आभार मानले. शिक्षक दिन म्हणजे केवळ आदर व्यक्त करण्याचा दिवस नाही तर, शिक्षणातून मिळणाऱ्या संस्कारांची उजळणी करण्याची संधी आहे. आमच्या विद्यार्थ्यांनी शिक्षकांच्या भूमिकेतून जे आत्मविश्वासाने काम केले ते खरोखर कौतुकास्पद आहे, असे त्या म्हणाल्या संपूर्ण कार्यक्रमात शिक्षकांसाठी घेतलेल्या स्पर्धांमुळे वातावरणात आनंद व उत्साह भरला होता. दिवसअखेर सर्व शिक्षकांना विद्यार्थ्यांनी हस्तनिर्मित शुभेच्छापत्रे भेट दिली. प्रहार मिल्ट्री स्कूलमधील हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी अनुभवसमृद्ध तर शिक्षकांसाठी संस्मरणीय ठरला.

## नाईक तलावातील पानकांदा काढणार

### आयुक्तांनी केली लेंडी तलाव परिसराची पाहणी

**नागपूर, दि. ७ प्रतिनिधी**

महानगरपालिकाच्या वतीने नाईक तलावातील पानकांदा काढण्यासह पुनर्भरण कामे करण्यात येणार आहे यासंदर्भात आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांनी नाईक आणि लेंडी तलाव परिसराची पाहणी केली. तसेच, आवश्यक उपयोजना करण्याचे संबधित विभागांना निर्देश दिले.

उपायुक्त राजेश भगत, मुख्य अभियंता मनोज तालेवार, अधीक्षक अभियंता डॉ. श्वेता बॅनर्जी, मुख्य स्वच्छता अधिकारी डॉ.गजेंद्र महल्ले, सहायक आयुक्त धनंजय जाधव, कार्यकारी अभियंता राजेश दुफार, अश्विनी येलचेटवार, कनिष्ठ अभियंता संदीप लोखंडे, कमलाकर राजूरकर, माजी उपमहापौर दीपराज पार्डीकर, व्हीएनआयटीचे डॉ. अविनाश



वासुदेवन यांच्यासह परिसरातील नागरिक उपस्थित होते.

केंद्र सरकारच्या अमृत योजना टप्पा १ अंतर्गत कामे पूर्ण झाली आहेत. अमृत योजना टप्पा २ अंतर्गत नाईक तलाव पुनरुज्जीवन प्रकल्पामध्ये तलावाच्या सौंदर्यीकरणासाठी करण्यात येत आहे. या अनुषंगाने डॉ. अभिजीत चौधरी यांनी नाईक तलावाला भेट दिली. यावेळी त्यांनी नागरिकांच्या समस्या जाणून घेतल्या. तलावातील पान कांदा काढण्यासाठी स्थानिक युवकाची मदत घेण्याच्या सूचना संबधित विभागांना केल्या.याशिवाय आयुक्तांनी पावसाळ्यात ओवरफ्लो होणारी सिवर लाईन, बजरंग घाट आणि रस्त्यावरील अतिक्रमनाची पाहणी केली. लेंडी तलावाशी जुळलेल्या नाल्याचे खोलीकरण आणि सफाई करण्याचेही निर्देश दिले.

## मानेवाडा रिंगरोडवर जीवघेणा अपघात

**नागपूर, दि. ७ :** मानेवाडा रिंगरोडवर जीवघेणा अपघात घडवून आणल्याने दुचाकीस्वाराचा मृत्यू झाला ही दुर्घटना शनिवारी दुपारी घडली पोलिस सूत्रांनुसार, अरुण कोंडबाजी गायकवाड शनिवारी दुपारी सव्वा बाराच्या सुमारास आपल्या दुचाकीवरून जात असताना आरोपी मिराज खान सिराज खान (वय ३६, बिहार) याने आपल्या ताब्यातील ट्रक भरधाव वेगाने आणि निष्काळजीपणे चालवत गायकवाड यांना धडक दिली यावेळी ते खाली पडून गंभीर जखमी झाले. उपस्थित लोकांनी त्यांना मेडिकल रुग्णालयात दाखल करण्यात आले; परंतु डॉक्टरांनी तपासून त्यांना मृत घोषित केले. गायकवाड यांचा भाचा पीयूष अरुण कुमार गवारे यांच्या तक्रारीवरून ट्रक चालकाविरोधात संबंधित कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**बाप्पाचे विसर्जन ...** महानगरपालिका कर्मचारी अहोरात्र तैनात

# भक्तिमय वातावरणात गणरायाला निरोप

**नागपूर, दि. ७ प्रतिनिधी**

**मागील १० दिवसांपासून प्रत्येकाच्या मनात घर करणाऱ्या गणरायाचे 'मोरया मोरया, गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या...' च्या गजरात विसर्जन करण्यात आले. नागपूर महानगरपालिका प्रशासनाने शहरातील २१६ ठिकाणी तयार केलेल्या ४१९ कृत्रिम तलावांच्या विसर्जन कुंडांमध्ये अत्यंत शिस्तबद्ध व भक्तीपूर्ण वातावरणात श्रीगणेशाला निरोप देण्यात आला.**

पोलिस आयुक्त डॉ. रवींद्र सिंगल यांच्या मार्गदर्शनात विसर्जनासाठी पोलिसांचा चोख बंदोबस्त करण्यात आला होता.



तसेच, मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांच्या मार्गदर्शनात मनपाच्या विविध विभागाद्वारे विसर्जनाची उत्तम व्यवस्था करण्यात आली होती.

मनपा आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी, अतिरिक्त आयुक्त वसुमना पंत, वैष्णवी बी. यांच्या मार्गदर्शनात श्रीगणेशांच्या प्रतिष्ठापनेपासून विसर्जनापर्यंतच्या व्यवस्थांचे नियोजन करण्यात आले होते विसर्जनस्थळी गणेशभक्तांना अडचण जाणार नाही, याची पुरेपूर काळजी मनपा प्रशासनाने घेतली. नैसर्गिक जलस्रोत असलेल्या तलावांत मूर्तींचे विसर्जन न करण्याचे आवाहन करण्यात आले होते. विसर्जनासाठी २१६ ठिकाणी ४१९ कृत्रिम विसर्जन कुंड निर्माण करण्यात आले होते. मोठ्या मूर्तींचे विसर्जन करण्यासाठीकुंड तयार करण्यात आले होते. गोरेवाडा, पोलिस लाईन टाकळी व लकडगंज भागातील कच्छीविसा परिसरात मोठे कृत्रिम तलाव करण्यात आले होते. निर्माल्य कलश सुद्धा ठेवण्यात आले होते. त्यामुळे विसर्जन कुंडाच्या ठिकाणी कचरा न होता परिसर स्वच्छ राखण्यास मदत झाली.

घनकचरा व्यवस्थापन विभागाच्या कर्मचाऱ्यांसह दहाही झोनचे सहाय्यक आयुक्त, कर्मचारी सर्व विसर्जन कुंडांवर तैनात होते. मूर्तींचे निर्माल्य काढून घेणे, त्यांना कोणत्या कुंडात जावे, यासाठी मार्गदर्शन करीत होते. विसर्जन अत्यंत शिस्तबद्ध व गोंधळ न होता व्हावे, यासाठी महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाचे कर्मचारी तैनात झाले होते. त्याचप्रमाणे नागपूर पोलिस प्रत्येक विसर्जन कुंडावर हजर होते. विविध ठिकाणी नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आला होता. पोलिस आयुक्त रवींद्र कुमार सिंगल यांनी स्वत: गोरेवाडा येथील कृत्रिम विसर्जन कुंडाला भेट देत व्यवस्थेची पाहणी केली. यावेळी राज्याच्या ज्येष्ठ सनदी अधिकारी तसेच प्रधान सचिव विनिता सिंगल सुद्धा उपस्थित होत्या.

## राज्यमंत्री जयस्वाल यांच्याहस्ते विकासकामांचे भूमिपूजन



**रामटेक, दि. ७ प्रतिनिधी**

ग्रामपंचायत सोनेघाट कवडक (दुधाळा) येथील परमात्मा एक आश्रम दुधाळा परिसर विकासकामांचे भूमिपूजन राज्यमंत्री ॲड. आशीष जयस्वाल यांच्या हस्ते करण्यात आले. सदर कामांसाठी १५ लाख रुपयांच्या निधीची तरतूद केली आहे

कार्यक्रमात परमात्मा एकचे मार्गदर्शक जयराम महाजन, रामदास मथुरे, अध्यक्ष सुनिल देवगडे, रामटेक नगर परिषदेचे माजी सभापती बिकेंद्र महाजन, संजय येनुरकर , नीलकंठ महाजन, नारायण कारामोरे, जितू वालोकर, देवा मेहरकुळे, नत्थू मानकर,हेमराज चांदेकर, माणिक चौधरी, दुष्यंत कारामोरे, सुषमा महाजन, इंद्रकला मथुरे, सुलोचना कारामोरे, वंदना येनुरकर,जीजा काटोले आदी उपस्थित होते तसेच, परमात्मा एक आश्रम दुधाळा येथील पदाधिकारी, सेवक, सेविका प्रामुख्याने उपस्थित होते.

महत्त्वाचे

## अफगाणिस्तानचा टी-२० क्रिकेटमध्ये ऐतिहासिक विजय!



अफगाणिस्तानने शुक्रवारी खेळल्या गेलेल्या तिरंगी टी-२० मालिकेतील सामन्यात संयुक्त अरब अमिराती (युएई) संघाला पराभूत करून एक मोठी कामगिरी केली आहे. या विजयासह अफगाणिस्तानने शारजाह क्रिकेट स्टेडियमवर २९ सामन्यांमध्ये २० विजय मिळवले आहेत. परदेशी मैदानावर एकाच स्टेडियमवर २० सामने जिंकणारा अफगाणिस्तान हा पहिला संघ ठरला आहे.

यासह, अफगाणिस्तानचा संघ एकाच मैदानावर २० टी-२० आंतरराष्ट्रीय सामने जिंकणारा जगातील दुसरा संघ बनला आहे. यापूर्वी बांगलादेशने ही कामगिरी केली होती. बांगलादेशने ढाक्का येथील शेरे बांगला राष्ट्रीय स्टेडियमवर ४८ टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांपैकी २४ सामने जिंकले आहेत.

## १७ वर्षांनंतर आफ्रिकेचा संघ पाकिस्तान दौऱ्यावर!

**नवी दिल्ली :** ऑस्ट्रेलिया विरुद्ध दक्षिण आफ्रिका यांच्यामध्ये नुकतीच मालिका पार पडली या दोन्ही मालिकांमध्ये ऑस्ट्रेलियाच्या संघाला दक्षिण आफ्रिकेने पराभूत केले. त्याचबरोबर सुरु असलेल्या इंग्लड दौऱ्यावर देखील दक्षिण आफ्रिकेच्या संघाने कमालीची कामगिरी केली आहे. सध्या दक्षिण आफ्रिकेचा संघ दमदार फॉर्ममध्ये आहे. दक्षिण आफ्रिकेच्या अनेक नव्या खेळाडूंना संघामध्ये स्थान मिळाले आहे. वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप २०२५ नंतर संघाने फॉर्म कायम ठेवला आहे. ऑस्ट्रेलियाला हरवून पहिल्यांदाच वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप जिंकणारा दक्षिण आफ्रिकेचा संघ पाकिस्तानचा दौरा करून कसोटी मालिका खेळणार आहे. गेल्या तीन वर्षांत पहिल्यांदाच दक्षिण आफ्रिकेचा संघ पाकिस्तानमध्ये कसोटी सामना खेळणार आहे.



# आर्यना सबालेंकाने यूएस ओपन ग्रँड स्लॅमचा जिंकला मुकूट

नवी दिल्ली : दि. ७ प्रतिनिधी

**यूएस ओपनचा काल जेतेपदासाठी सामना झाला. हा सामना अमेरिकेच्या अमांडा अनिसिमोवा विरुद्ध आर्यना सबालेंका यांच्यात खेळवण्यात आला होता. या सामन्याने प्रेक्षकांचे भरपूर मनोरंजन केले. जगातील नंबर वन बेलारूसची महिला टेनिसपटू आर्यना सबालेंकाने यूएस ओपनमध्ये इतिहास रचला आहे. महिला एकेरीच्या अंतिम फेरीत अमेरिकेच्या अमांडा अनिसिमोवाला हरवून सबालेंकाने सलग दुसऱ्यांदा ट्रॉफी जिंकली.**

अमेरिकन दिग्गज सेरेना विल्यम्सनंतर सलग दुसऱ्यांदा हे विजेतेपद जिंकणारी सबालेंका पहिली महिला खेळाडू बनली आहे. तिने अंतिम सामना एक तास ३४ मिनिटांत जिंकला. सेरेनाने २०१२ आणि २०१४ मध्ये हे विजेतेपद जिंकले. सबालेंकाच्या कारकिर्दीतील हे चौथे ग्रँड स्लॅम विजेतेपद आहे. यापूर्वी तिने दोनदा ऑस्ट्रेलियन ओपन विजेतेपद जिंकले होते. अमेरिकन ओपन महिला एकेरीच्या अंतिम फ ेरीत आर्यना सबालेंकाने अमांडा अनिसिमोवाला ६-३, ७-६(३) असे हरवून आपले जेतेपद राखले. पहिल्यांदाच चॅम्पियन बनण्याच्या इराद्याने अमांडा अंतिम फ ेरीत पोहोचली पण तिचे जेतेपद जिंकण्याचे स्वप्न भंगले. २०२५ मध्ये सबालेंकाला यापूर्वी दोनदा अंतिम फेरीत पराभव पत्करावा लागला होता. तिला ऑस्ट्रेलियन ओपन आणि फ्रेंच ओपनच्या अंतिम फेरीत पराभव पत्करावा लागला होता. यापूर्वी, अमांडा या वर्षी विम्बल्डनच्या अंतिम फ ेरीतही पराभूत झाली होती जिथे इगा स्वीएटेकने तिला ६-०, ६-० असे पराभूत करून विजेतेपदापासून वंचित ठेवले होते. ने जाहीर केलेल्या ताज्या क्रमवारीत अमांडा आता चौथ्या क्रमांकावर पोहोचेल. विम्बल्डनच्या उपांत्य फेरीत ॲरिना सबालेंका अनिसिमोवाविरुद्ध पराभूत झाली. तिने याचा बदलाही घेतला. यासह तिने अमेरिकन खेळाडू अमांडाविरुद्धचा तिचा विक्रम सुधारला. या दोन्ही खेळाडूंमध्ये आतापर्यंत खेळल्या गेलेल्या नऊपैकी सहा सामन्यांमध्ये अनिसिमोवाने विजय मिळवला होता. दोन महिन्यांपूर्वी ऑल इंग्लंड क्लबमध्ये सबलेंका यांना पराभूत केल्यानंतर, अनिसिमोवा तिचा पहिला ग्रँड स्लॅम फायनल इगा स्वीटेककडून ६-०, ६-० असा गमावला.

**आर्यना सबालेंकाने शेवटची अमेरिकन ओपन फायनलमध्ये सहकारी अमेरिकन खेळाडू जेसिका पेगुलाला हरवले होते. या वर्षी सबालेंका तिसऱ्यांदा ग्रँड स्लॅम फायनलमध्ये पोहोचली होती, त्यापैकी गेल्या दोन वेळा तिला पराभवाचा सामना करावा लागला होता.**

# आशिया कपसाठी उद्यापासून चुरस

## टीम इंडिया दुबईत दाखल; सरावाला जोरदार सुरुवात

नवी दिल्ली : दि. ७ प्रतिनिधी



आशिया कप सुरू होण्यासाठी आता अवघे काही दिवसच उरले आहेत. २०२५ च्या आशिया कपचे सामने यूएईमध्ये खेळवले जाणार आहेत. दुबई इंटरनॅशनल स्टेडियमव्यतिरिक्त, स्पर्धेचे सामने अबू धाबी येथील शेख झायेद स्टेडियममध्येदेखील होतील. या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी भारतीय संघ यूएईमध्ये पोहोचला असून, संघाने सरावाला सुरुवात केली आहे. आशिया कप स्पर्धा ९ सप्टेंबर रोजी सुरू होईल, तर १० सप्टेंबर रोजी भारताचा पहिला सामना होईल. गट अ मधील भारताचा पहिला सामना यूएई विरुद्ध होणार आहे.टीम इंडियाने यूएईमध्ये पोहोचताच सरावही सुरू केला आहे. खेळाडू दुबईला पोहोचले आहेत आणि शुक्रवारी येथे संघाचे पहिले सराव सत्र झाले. सूर्यकुमार यादव याच्या नेतृत्वाखालील संघाचे सर्व खेळाडू त्यात सहभागी झाले. या सराव सत्राचे अनेक फोटो आणि व्हिडीओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झालेले पाहायला मिळत आहेत. यावेळी मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीरदेखील दिसले. आशिया कपमध्ये पहिल्यांदाच गौतम गंभीर भारतीय संघाच्या मुख्य प्रशिक्षकाची जबाबदारी सांभाळतील.

भारतीय क्रिकेट संघ शेवटचा ४ ऑगस्ट रोजी मैदानावर दिसला होता. भारत आणि इंग्लंड यांच्यात ओव्हल येथे खेळल्या गेलेल्या कसोटीचा हा शेवटचा दिवस होता. टी-२० बद्दल बोलायचे झाले, तर भारताने वर्षाच्या सुरुवातीला शेवटचा सामना खेळला. त्यानंतर संघाचा सामना इंग्लंडशी झाला.

# झिम्बाब्वेकडून झाडाझडती; श्रीलंकेला आशिया चषकापूर्वी पराभवाचा दणका

नवी दिल्ली : दि. ७ प्रतिनिधी



आशिया चषकाची तयारी म्हणून आयोजित झिम्बाब्वेविरुद्धच्या टी मालिकेतल्या दुसऱ्या लढतीत श्रीलंकेचा धक्कादायक पराभव झाला. आयसीसीच्या टी क्रमवारीत झिम्बाब्वेचा संघ १२व्या स्थानी आहे तर श्रीलंकेचा सातव्या. पहिल्या टी लढतीतही झिम्बाब्वेचा संघ श्रीलंकेला दणका देण्याच्या तयारीत होता. मात्र दिलशान मधुशनकाच्या हॅट्ट्रिकमुळे श्रीलंकेने निसटता विजय मिळवला होता. दुसऱ्या सामन्यात मात्र सर्वांगीण खेळाच्या जोरावर झिम्बाब्वेने श्रीलंकेला ५ विकेट्सनी धूळ चारली.हरारे स्पोर्ट्स क्लबच्या खेळपट्टीचा नूर ओळखून सिकंदर रझाने नाणेफ ेक जिंकून गोलंदाजीचा निर्णय घेतला. झिम्बाब्वेच्या गोलंदाजांनी हा निर्णय सार्थ ठरवला. जबरदस्त फॉर्मात असलेला पाथुम निसांका ८ धावा करुन तंबूत परतला. आक्रमक खेळासाठी प्रसिद्ध कुशल मेंडिस एका धाव करू शकला. कर्णधार चरित असालंकाकडून श्रीलंकेला मोठ्या खेळीची अपेक्षा होती मात्र तो १८ धावा करुन माघारी परतला. कामिंदू मेंडिसला भोपळाही फोडता आला नाही. अनुभवी दासून शनकाने १५ धावा केल्या.

# शिवम दुबेने शेअर केला नव्या जर्सीतील फोटो

नवी दिल्ली : दि. ७ प्रतिनिधी



आशिया कप २०२५ साठी सर्व आठ संघांनी आपली तयारी पूर्ण केली असून, प्रत्येक संघाच्या खेळाडूंची यादी जाहीर झाली आहे. भारतीय क्रिकेट संघाचे नेतृत्व सूर्यकुमार यादवकडे असून, उपकर्णधारपद शुबमन गिलकडे देण्यात आले आहे. या संघात स्थानिक क्रिकेट आणि आयपीएलमध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या अनेक खेळाडूंना संधी मिळाली आहे. आता आशिया कप २०२५ साठी भारतीय संघाची नवीन जर्सी समोर आली आहे.

# पुरुष कंपाऊंड संघाने गोल्ड मेडल जिंकून रचला इतिहास

नवी दिल्ली : दि. ७ प्रतिनिधी



जागतिक तिरंदाजी चॅम्पियनशिप २०२५ मध्ये भारताच्या संघाने आता खाते उघडले आहे. भारताच्या दोन्ही संघानी या चॅम्पियनशिप २०२५ मध्ये दमदार सुरुवात केली आहे. मिक्स टीममध्ये भारताच्या संघाच्या हाती सिल्वर मेडल आले पण पुरुष संघाने पहिल्या राऊंडनंतर कमालीचा कमबॅक करुन गोल्ड मेडल नावावर केले. भारताच्या या पुरुष संघाने सातत्याने कमालीची कामगिरी केली आहे. भारताच्या पुरुष संघाने या स्पर्धेमध्ये फ्रान्सच्या संघाला पराभुत करुन इतिहास रचला आहे. ७ सप्टेंबर रोजी रविवारी जागतिक तिरंगाजी चॅम्पियनशिप सामने सुरू आहेत. भारताच्या दोन संघ हे फायनल मध्ये पोहोचले होते. यामध्ये आता भारताच्या मिश्र जोडीने सिल्वर मेडल मिळवले आहेत तर पुरुषांने गोल्ड मेडल नावावर केले आहे. दुसऱ्या क्रमांकावर असलेल्या भारतीय पुरुष संघ रिषभ यादव, अमन सैनी आणि प्रथमेश फ ुगे या तिरंदाजांचा समावेश आहे तर या संघाने फायनल च्या सामन्यांमध्ये फ्रान्सच्या संघाला २३५ २३३ असा पराभव करून सुवर्णपदक भारताच्या नावावर केले आहे. रिषभ यादव, अमन सैनी आणि प्रथमेश फ ुगे हे तीनही तिरंदाज वैयक्तिक स्पर्धेमध्ये देखील सहभागी होणार आहेत त्यामुळे आता सर्वाच्या नजरा तिकडे टिकून आहेत. रिषभ यादव आणि ज्योती सुरेखा यांचा भारतीय मिश्र संघामध्ये समावेश होता. या जोडीचा फायनलच्या सामन्यांमध्ये नेदरलँड कडून पराभवाचा सामना करावा लागला.

## जीएसटी कपातीमुळे पर्यटन, हरित ऊर्जा क्षेत्र बहरणार



**नवी दिल्ली :** जीएसटी कपातीमुळे प्रतिदिन ७,५०० रुपयांपर्यंत दर आकारल्या जाणाऱ्या हॉटेलमधील खोल्यांचे दर कमी होतील, असे हॉस्पिटॅलिटी अर्थात आदरतिथ्य उद्योगातील तज्ज्ञांनी सांगितले. सध्या, प्रतिदिन ७,५०० रुपयांपर्यंत दर असलेल्या हॉटेल खोल्यांचे इनपुट टॅक्स क्रेडिटसह १२ टक्के वस्तू आणि सेवा कर (जीएसटी) लागू होतो. आता जीएसटी दर घटल्याने विवेकाधीन उत्पन्न वाढण्यासह भारतीय अर्थव्यवस्थेला चालना मिळेल. परिणामी विविध क्षेत्रांमधील ग्राहकांच्या खर्चात वाढ होईल. जीएसटीमध्ये कपात केल्याने भारतीय प्रवाशांसाठी हॉटेलमध्ये राहणे अधिक परवडणारे होईल, ज्यामुळे देशांतर्गत बाजारपेठेत मागणी वाढेल, असे मेकमायट्रिपचे सह-संस्थापक आणि समूह मुख्याधिकारी राजेश मगो म्हणाले.देशात पर्यटनातून मिळणाऱ्या महसुलात चांगली वाढ शक्य आहे. मुख्यतः परदेशी पर्यटकांसाठी देशात वास्तव्य स्वस्त होणार आहे. पर्यटनाची मागणी थेट वाढणार असल्याने आदरतिथ्य क्षेत्र मूल्य साखळीत अधिक खर्च करण्यास प्रोत्साहन देईल.

# रुपया घसरून नव्या निच्चांकी पातळीवर

नवी दिल्ली : दि. ७ प्रतिनिधी



अमेरिकेने भारताविरोधात लावलेल्या आयात शुल्काचा नकारात्मक परिणाम निर्यातीवर होण्याची शक्यता आहे. अशा परिस्थितीत रुपयाच्या मूल्यावर गेल्या पंधरा दिवसापासून सुरू असलेला दबाव आजही कायम राहिला. शुक्रवारी भारतीय रुपयाचे मूल्य पंधरा पैशांनी कोसळून ८८.२७ रुपये प्रति डॉलर या ऐतिहासिक निचांकी पातळीवर गेले. डॉलरची मागणी वाढत आहे. त्याचबरोबर परदेशी संस्थागत गुंतवणूकदार भारतातून परकीय गुंतवणूक काढून घेत आहेत. त्यातच अमेरिका पुन्हा भारतावर काही प्रमाणात शुल्क आकारण्याची भीती निर्माण झाली आहे.

त्यामुळे रुपयाच्या मूल्यावर दबाव येत असल्याचे सांगण्यात आले. सुदैवाने खनिज तेलाच्या किमती सध्या माफक पातळीवर आहेत. त्यामुळे रुपयाच्या मूल्यात माफक घसरण होत आहे, असे चलन बाजारातील व्यापाऱ्यांनी सांगितले.

काही विश्लेषकांनी सांगितले की, काही वृत्त माध्यमांमध्ये अमेरिका भारतातील माहिती तंत्रज्ञान सेवावर आयात शुल्क लावणार असल्याची बातमी फिरत होती. त्यामुळे सकाळच्या सत्रात रुपयाचा भाव बऱ्याच प्रमाणात कमी झाला. मात्र दुपारी अमेरिकन प्रशासनाने भारतातील माहिती तंत्रज्ञानावर अधिक आयात शुल्क लावण्याची शक्यता फेटाळून लावली. त्यानंतर रुपयाच्या मूल्यात बरीच सुधारणा झाली. विशेष म्हणजे इतर सहा चलनाच्या तुलनेत डॉलरचे मूल्य दर्शविणारा डॉलर इंडेक्स कमकुवत होऊन ९८.३ अंकावर आला.

मात्र तरीही डॉलरच्या तुलनेत रुपयाचे मूल्य पिछाडीवर राहिले. दरम्यानच्या काळामध्ये शेअर बाजाराचे निर्देशांकही काही प्रमाणात कमी झाले. अशा परिस्थितीत रुपयाला आधार मिळाला नाही. परदेशी संस्थागत गुंतवणूकदारांनी गुरुवारी १०६ कोटी रुपयांच्या शेअरची विक्री केली.

उत्पादन वाढ

## नीती आयोगाचा अहवाल प्रसिद्ध

# डाळींमध्ये देश जागतिक आघाडीवर

नवी दिल्ली : दि. ७ प्रतिनिधी



डाळींच्या क्षेत्र आणि उत्पादनात भारत अजूनही जगात अग्रेसर आहे. त्याचवेळी, देशातील उत्पादन क्षमतेत सुधारणा करण्यासाठी अजूनही भरपूर वाव आहे. नीती आयोगाने गुरुवारी यासंदर्भात एक अहवाल प्रसिद्ध केला आहे. त्यानुसार, जागतिकस्तरावर डाळींचे उत्पादन ३ टक्के वार्षिक वाढीच्या दराने वाढत आहे, ज्यामध्ये सुमारे ७५ टक्के उत्पादन विकसनशील देशांमधून येते आणि आशियाचा वाटा ४४ टक्क्यांपेक्षा जास्त आहे. २०२२ मध्ये, जागतिक डाळींच्या लागवडीचे क्षेत्र ९७.०९ दशलक्ष हेक्टर होते आणि उत्पादन ९६.०४ दशलक्ष टन होते, तर उत्पादकता ०.९८९ टन/हेक्टर होती.नीती आयोगाचे सदस्य प्रा. रमेश चंद, सीईओ बी.व्ही.आर. सुब्रह्मण्यम आणि इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांनी गुरुवारी नवी दिल्लीत 'स्वयंपूर्णतेच्या ध्येयाकडे डाळींच्या वाढीला गती देण्यासाठी धोरणे आणि मार्ग' या शीर्षकाचा अहवाल प्रकाशित केला. या अहवालात भारतातील डाळींचे उत्पादन वाढविण्यासाठी, स्वयंपूर्णता प्राप्त करण्यासाठी आणि भविष्यात मागणी पूर्ण करण्यासाठी धोरणे आणि मार्गदर्शक उपाययोजनांचे तपशीलवार विश्लेषण सादर केले आहे.या अहवालानुसार, सुके शेंगदाणे, हरभरा, तूर, मसूर आणि वाटाणे या प्रमुख डाळी आहेत. गेल्या पाच वर्षांत, सुके शेंगदाणे ३५.९७ दशलक्ष हेक्टर क्षेत्र आणि २७.४२ मेट्रिक टन उत्पादनासह यादीत अव्वल स्थानावर होते, जरी त्याचे उत्पादन ०.७७४ टन/हेक्टर आहे. दुसरीकडे, वाटाण्याचे सर्वाधिक उत्पादन १.९ टन/हेक्टर आहे.

भारत हा जगातील सर्वात मोठा डाळी उत्पादक देश आहे.भारततही डाळींचा वापर वाढत आहे. २०२२-२३ मध्ये दरडोई वापर १७.१९ किलो/वर्ष होता, जो आयसीएमआर-एनआयएनने सुचवलेल्या १४ टक्के दैनिक ऊर्जेच्या पातळीपेक्षा कमी आहे. शहरी भागात तयार उत्पादनांचा वापर जास्त आहे, तर ग्रामीण भागात तूर आणि इतर पारंपरिक डाळींचा वापर जास्त आहे. जागतिक व्यापारात भारत एक प्रमुख आयातदार आहे.

## टाटा मोटर्सकडून दरकपात जाहीर




नवी दिल्ली : दि. ७ प्रतिनिधी

टाटा मोटर्स कंपनीने आपल्या विविध वाहनांच्या दरात ६५ हजार रुपये ते १.४५ लाख रुपयापर्यंत दर कपात जाहीर केली आहे. जीएसटी कपातीचा पूर्ण फायदा ग्राहकांना पहिल्या दिवसापासून म्हणजे २२ सप्टेंबरपासून देण्यात येणार असल्याचे कंपनीने स्पष्ट केले आहे.

टाटा मोटर्सच्या प्रवासी वाहन विभागाचे व्यवस्थापकीय संचालक शैलेश चंद्रा यांनी सांगितले की, जीएसटी परिषदेच्या निर्णयाचे आम्ही स्वागत करतो. आमच्या विविध वाहनांच्या दरात कपात करीत आहोत. त्यामुळे वैयक्तिक वाहन वापर करणाऱ्यांची संख्या वेगाने वाढणार आहे. विशेषतः छोट्या कारची विक्री वेगाने वाढण्यास मदत होणार आहे.

जीएसटी परिषदेने घेतलेल्या निर्णयानुसार बहुतांश कारवरील जीएसटी आता २८% वरून केवळ १८ % इतका होणार आहे. दरम्यान टाटा मोटर्सने जाहीर केलेल्या या दर कपातीनंतर लवकरच इतर वाहन कंपन्या दर कपात करणार आहेत.

# पुढच्या वर्षी लवकर या....



लोखंडी पुलावरून विसर्जन मिरवणूक जात असतानाचे दृश्य.







मोहम्मद अली चौकात मशिदीसमोर गणेश विसर्जन मिरवणुकीचे निरीक्षण करताना एस. पी. अर्जित चांडक.



छायाचित्रे
संजय ताथूरकर
सजावट व मांडणी
अक्षय जायले










गणेश भक्तांना मंडळातर्फे प्रसादाचे वाटप करण्यात आले.








दोन वर्षाच्या अधिराज अक्षय खाडे या बालकानेही आपल्या जीप गाडीत गणपती बाप्पांना बसवून त्यांना निरोप दिला.











Mrs Sunita Jatal Madam's
SHREE G-SQUARE GUIDANCE
9767930223
11th/ 12th NEET /JEE /MHT- CET STATE BOARD
8th, 9th, 10th STATE BOARD / CBSE FOUNDATION
•SBI बँकेच्या बाजूला भारत पेट्रोल पंप समोर,कौलखेड अकोला.
•चैतन्य कॉलनी,एकविरा ग्राउंड मागे, गौरक्षण रोड,अकोला

अजिंक्य भारत
आपलं अकोला
अकोला, सोमवार, दि. ८ सप्टेंबर २०२५ www.ajinkyabharat.com

OM COACHING CLASSES
COMPUTER SCIENCE
11th & 12th
Behind Tathod Mangal Karyalaya, Shastri Nagar, Akola,
Mrs. Anjali mam 9404845492

# पुढच्या वर्षी लवकर या... बाप्पांना निरोप!

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. ७ :** सार्वजनिक गणेश विसर्जन मिरवणुकीत मानाच्या बाराभाई गणपतीची पूजा करून मिरवणुकीला प्रारंभ करण्यात आला. सार्वजनिक गणेशोत्सवांसह घरोघरी विराजमान विघ्नहर्ता गणपती बाप्पाला रविवारी अनंत चतुर्दशीला वाजतगाजत भावपूर्ण निरोप देण्यात आला. ढोल ताशाच्या गजरात व पारंपरिक पध्दतीने मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीत ६२ गणेशोत्सव मंडळांसह ५ आखाड्यांनी सहभाग घेतला होता.

मानाच्या गणपतीची पूजा पालकमंत्री आकाश फुंडकर, आ. रणधीर सावरकर, आ. साजिद खान पठाण, माजी मंत्री गुलाबराव गावंडे, पुलिस अधीक्षक अर्चित चांडक, सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाचे अध्यक्ष ॲड. मोतीसिंह मोहता यांनी पूजा आणि महाआरती केली. गेल्या दहा दिवसांपासून विराजमान झालेल्या गणरायाला अनंत चतुर्दशीच्या दिवशी निरोप देण्यात येतो. विसर्जन मिरवणुकीसाठी जिल्हा पोलीस, मनपा प्रशासनाने जय्यत तयारी केली होती. गणेश विसर्जन मिरवणुकीला सकाळी ११.३० वाजता जयहिंद चौक येथून प्रारंभ करण्यात आला. यावेळी मानाच्या श्री बाराभाई गणपतीचे लोकप्रतिनिधी, अधिकारी, सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाचे पदाधिकारी यांनी पूजन केले. श्री बाराभाई गणपतीच्या पाठोपाठ मिरवणुकीमध्ये मानाचे राजेश्वर गणपती, जागेश्वर गणपती व खोलेश्वर गणपती व इतर मंडळे सहभागी झाले होते. जयहिंद चौकातून निघालेली मिरवणूक अगरवेस, दगडी पूल, मामा बेकरी, उदय टॉकीज, मानेक टॉकीज, वाशिम स्टँड, सुभाष चौक, तेलीपुरा चौक, ताजनापेठ पोलीस चौकी, किराणा बाजार, सराफा बाजार, जैन मंदिर, गांधी चौक, गांधी रोड, शहर कोतवाली मार्गे मिरवणूक गणेश घाटावर पोहोचली. यावर्षी मिरवणुकीत ६२ सार्वजनिक गणेश मंडळे व ५ आखाड्यांनी सहभाग घेतला होता. यादरम्यान विविध आखाड्यांनी चित्तथरारक प्रात्याक्षिके सादर करून लक्ष वेधून घेतले. तर ठिकठिकाणी राजकीय पक्ष, सामाजिक संस्था, मंडळाच्या वतीने गणेशोत्सव मंडळाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांचा सन्मान करण्यात आला. गणेश विसर्जन मिरवणुकीत पारंपरिक वाद्यावर गणेशभक्त ठेका धरत तरुणाईचा उत्साह दिसून येत होता. त्यानंतर वेगवेगळ्या ठिकाणी सार्वजनिक गणपतीचे विसर्जन करण्यात आले.

## पोलिसांचा कडक बंदोबस्त

अकोल्यात गणेशोत्सवातील सर्वात मोठा टप्पा म्हणजे मिरवणूक आणि विसर्जन. यावेळी जिल्हा पोलीस प्रशासनाने आखलेल्या काटेकोर आणि नियोजनबद्ध बंदोबस्तामुळे यंदाची मिरवणूक कुठल्याही अडथळ्याविना भक्तीमय वातावरणात शांततेत पार पडली. किरकोळ अपवाद वगळता कुठेही कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला नाही. त्यामुळे अकोलेकरांसह जिल्हावासियांनी सुटकेचा निःश्वास सोडला. अकोला शहरात तब्बल १९७ सीसीटीव्ही कॅमेरे, अकोटमध्ये १६४, तर संपूर्ण जिल्हाभरात एकूण ३६१ सीसीटीव्ही कॅमेरे सक्रिय करण्यात आले होते. याशिवाय ४८ व्हिडिओ कॅमेरे आणि ७ ड्रोन कॅमेऱ्यांद्वारे गदच्या मंडळांवर व विसर्जन घाटांवर सतत लक्ष ठेवण्यात आले.



## जय हिंद चौकात पालकमंत्री फुंडकर यांच्या हस्ते महाआरती

श्री सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाच्या १३२ वर्षांच्या परंपरेतील विसर्जन मिरवणुकीचा प्रारंभ जयहिंद चौकातून पालकमंत्री ॲड.आकाश फुंडकर यांच्या हस्ते महाआरतीने झाला. यावेळी आमदार अमोल मिटकरी, साजिद खान पठाण, पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, माजी मंत्री डॉ. रणजीत पाटील, गुलाबराव गावंडे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. लाडक्या बाप्पाला निरोप देण्यासाठी हजारो गणेशभक्तांनी गर्दी केली होती. पारंपरिक वाद्यांच्या गजरात आणि उत्साहात मिरवणूक पुढे सरकत होती.



गणेशोत्सव मिरवणुकीत श्री हरिहर व्यायाम क्रीडा व शिक्षण प्रसारक मंडळ मुख्य शाखा हरिहर पेठच्या वतीने चित्तथरारक प्रात्यक्षिक सादर करण्यात आली. व्यायाम शाळेतील सदस्यांनी मल्लखांब, दांडपट्टा, तलवारबाजी, भोवरा, लेझिम व इतर अनेक खेळ आदी प्रात्यक्षिकांची गणेशभक्तांच्या डोळ्यांचे पारणे फेडले. श्री हरिहर व्यायाम मंडळाच्या कार्यकर्त्यांनी मल्लखांब सह दांडपट्ट्याचे चित्तथरारक प्रात्यक्षिक सादर केले.



शहरातील गणेश विसर्जन मिरवणुकीत पंजाबच्या कलाकारांनी सादर केलेल्या थरारक कलाबाजीने प्रेक्षकांची अक्षरशः मने जिंकली. ढोल-ताशांच्या गजरात आणि संगीताच्या तालावर पारंपरिक पंजाबी नृत्य व कसरतींनी वातावरण उत्साहात न्हाऊन निघाले. या अप्रतिम कलाविष्कारासाठी नागरिकांची मोठी गर्दी उसळली होती. कलाकारांच्या प्रत्येक थरारक प्रयोगाला टाळ्यांचा कडकडाट मिळत होता.



❑ जिल्हा पोलीस प्रशासनाने नेमून दिलेल्या नियम व अटींचे पालन नागरिक आणि गणेशभक्तांनी मनापासून केले. सर्वांच्या सहकार्यामुळे बाप्पांचे विसर्जन भक्तिमय वातावरणात, आनंदात आणि शांततेत पार पडले. आगामी सर्व सण-उत्सव याच पद्धतीने पार पडावेत यासाठी पोलीस प्रशासन तत्पर आहे.

**अर्चित चांडक,** जिल्हा पोलीस अधीक्षक, अकोला

# तिक्ष्णगत मल्टीपर्पज वेल्फेअर सोसायटीच्या 'बालस्नेही श्री गणेशाचे' थाटात विसर्जन

## बालहक्क व संरक्षणाचा संदेश देणारा देखावा ठरला आकर्षक




दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. ७ :** बालकांना जगण्याचा, विकासाचा, संरक्षणाचा आणि सहभागाचा हक्क मिळवून देण्यासाठी सातत्याने कार्यरत असलेली तिक्ष्णगत मल्टीपर्पज वेल्फेअर सोसायटी, अकोला या वर्षी गणेशोत्सवात समाजजागृतीसाठी पुढे सरसावली. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष उद्योगरत्न तथा सामाजिक कार्यकर्ते डॉ. सुगत वाघमारे यांची संकल्पना व मार्गदर्शनात तसेच सचिव विष्णुदास मोंडोकार यांच्या समन्वयातून संस्थेच्या मंडळात आकर्षक गणेशमूर्तीची प्रतिष्ठापना करण्यात आली. त्यासोबत 'बालस्नेही अकोला' या विषयावर विचारप्रवर्तक देखावा उभारण्यात आला होता.

दहा दिवस सकाळ-सायंकाळ गणेश आरतीच्या गजराने संस्थाचे मंडळ परिसर भक्तिभाव व श्रद्धेने निनादत राहिला. महिला, युवक, बालक व ज्येष्ठ नागरिकांनी मोठ्या संख्येने आरतीत सहभाग होता. गणेशोत्सवाच्या पहिल्या दिवशी या देखाव्याचे उद्घाटन पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांच्या हस्ते झाले. या वेळी ठाणेदार मालती कायटे, राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाचे माजी सदस्य तथा मार्गदर्शक ॲड. संजय सेंगर, समन्वयक सचिन पाटील, अश्विन शिरसाट, विशाल शिंदे यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

दहा दिवसांच्या कालावधीत अनेक मान्यवरांनी देखाव्याला भेट देत कौतुक केले. न्यायाधीश सौ बंसल (जिल्हा विधी सेवा प्राधिकरण सदस्य/सचिव), गिरीश पुसदकर (जिल्हा महिला व बालविकास अधिकारी), राजू लाडूलकर (जिल्हा बाल संरक्षण अधिकारी), राजेश देशमुख (सदस्य, बाल कल्याण समिती), ॲड. मनिषा भोयर, ॲड. परिहार, ॲड. विनोद फाटे, राजेश मनावर, वैभव भदे (चाइल्ड हेल्पलाईन) यांचा समावेश होता.

या देखाव्यातून बालकांना भेडसावणाऱ्या समस्या, त्यांच्या हक्कांचे महत्त्व आणि त्यांच्या संरक्षणासाठी समाजाने सजग राहण्याची गरज यावर प्रभावी प्रकाश टाकण्यात आला. त्याचबरोबर पर्यावरण संवर्धन व वृक्षारोपण मोहिमेचा संदेश देणारे सादरीकरणही विशेष आकर्षण ठरले.

शनिवारी महाआरतीनंतर गणेश विसर्जन जल्लोषात पार पडले. गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या! या गजरात श्रद्धा, भक्तीभाव व उत्साहाचे अनोखे दर्शन घडले.या उपक्रमात उमेश, श्वेता, सुचिता, सपना, यशवंत, करण, अंकुश, भिमराज यांच्या सह सम्पूर्ण तिक्षगत सदस्यांनी परिश्रम घेतले. शेवटी डॉ. सुगत वाघमारे व विष्णुदास मोंडोकार यांनी सर्व मान्यवर, अधिकारी आणि नागरिकांचे मनःपूर्वक आभार मानत 'बालस्नेही अकोला' हा संदेश प्रत्येक घराघरात पोहोचवण्याचे आवाहन केले. हा समाजजागृतीपर उपक्रम अकोल्यातील सामाजिक चळवळींना नवी दिशा देणारा ठरला असून, संस्थेच्या प्रयत्नांबद्दल सर्वत्र कौतुक होत आहे.



गणपती बाप्पांचे विसर्जन करताना तिक्ष्णगत मल्टीपर्पज वेल्फेअर सोसायटीचे कर्मचारी



देखाव्याचे निरीक्षण करताना सिव्हिल लाईनच्या ठाणेदार मालती कायटे.







## महत्त्वाचे

### शिक्षक दिनानिमित्त हातरुणमध्ये शिक्षक कार्यशाळेचे आयोजन

**बाळापूर:** तालुक्यातील हातरूण येथे शिक्षक दिनाचे औचित्य साधून जमात ए इस्लामी हिंद, शाखा हातरुण यांच्या वतीने इकरा इंग्लिश स्कूल येथे शिक्षणाच्या आधुनिक, वैज्ञानिक व नैतिक पद्धतींबाबत शिक्षकांना मार्गदर्शन करणे यासाठी एक विशेष शिक्षक कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेत हातरुण परिसरातील अनेक शिक्षकांनी सहभाग घेतला.

कार्यशाळेतील प्रमुख मार्गदर्शक मोहम्मद शकील इंजिनियर यांनी शिक्षकांना प्रभावी अध्यापनाच्या विविध पैलूंवर सविस्तर मार्गदर्शन केले.विद्यार्थ्यांच्या मानसिकतेची समज, त्यांच्याशी प्रेमाने व सन्मानाने वागणे हे उत्तम शिक्षणासाठी अत्यावश्यक आहे, शारीरिक शिक्षा किंवा भेदभावामुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास ढासळतो,शिक्षणाच्या आधुनिक पद्धती इंटरॅक्टिव्ह लर्निंग, विद्यार्थी-केंद्रित दृष्टिकोन आणि तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर याबाबतही मार्गदर्शन केले. ''शिक्षण म्हणजे केवळ पदवी मिळवणे नसून चारित्र्य घडवणे आहे. इकरा इंग्लिश स्कूलचे संचालक मोहम्मद वसीम यांची विशेष उपस्थिती होती.

### रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (गवई गट )अकोला जिल्हाध्यक्षपदी प्रा. राहुल इंगळे

**अकोला :** महाराष्ट्र राज्य निवडणूक अधिकारी डॉ. गौतम गोसावी यांनी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (गवई गट ) चे महाराष्ट्रातील विविध जिल्हयांचे अध्यक्ष घोषीत केले आहेत .त्यांच्या घोषणेनुसार अकोला जिल्हाध्यक्ष पदी प्रा. राहुल यशवंत इंगळे यांचे नाव घोषीत केले आहे. अकोला जिल्हा अध्यक्ष म्हणून प्रा. राधवकुमार उर्फ राहुल यशवंत इंगळे यांची नियुक्ती महाराष्ट्र राज्य निवडणूक अधिकारी डॉ. गौतम गोसावी यांनी घोषित केली आहे. थांची नियुक्ती झाल्याबद्धल जिल्हयातील रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या पदाधिकारी व कार्थकत्यामध्ये उत्साह संचारला आहे..यावेळी उपस्थित सर्व रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे अकोला जिल्हा पदाधिकारी विजयकुमार चक्रे, नागेश वाहुरवाघ, साहेवराव इंगळे (गुरूजी), सौ. लक्ष्मीताई डोंगरे, श्रीमती मायाताई गवई, सौ. शांताबाई काकड, सौ. यशोमती इंगळे, गोवर्धन अभ्यंकर,प्रा. पी.आर. मास्कर, प्रा. अविनाश दयोधन, प्रशांत भगत, संदिप सावंग, रत्नदीप खरात, अड. प्रमोद रौराळे, रामेश्वर अहीर, देवानंद अंभोरे, डॉ. सहदेव वाड़ेकर, प्रमोद गणवीर, प्रकाश गवारगुरू , संजय नाईक, संजय शेटी, विलास पळसपगार,गणेश गवई, संतोष इंगोले,निलेश विसपुते, दिनेश दळवी, विश्वास तेलगोटे, रामकृष्ण शिरसाट, गजानन भटकर, निलेश अरखराव, मुकेश भावसार,.बलदेव सावंग, कीर्ती विरघट, अशोक इंगळे, गजानन हिवराळे, विवेक गवारंगुरू,सहदेव गवई, राजेश गायकवाड, परेश गवई इत्यादिनी प्रा. राघवकुमार उर्फ राहुल यशवंत इंगळे यांच्या निवडीचा जल्लोष केला.

# तालुक्यात पिके पाण्याखाली; शेतकऱ्यांवर ओल्या दुष्काळाचे सावट

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**अकोट , दि. ७ :** तालुक्यात सततच्या संततधार पावसाने शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे.मागील पंधरा दिवसापासून सतत संताधार पाऊस असल्याने शेतकऱ्यांच्या शेतातील पिके पाण्याखाली असून शेतिला तलावाचे स्वरूप आले आहे.शेतकऱ्यांचे प्रचंड आर्थिक नुकसान झाले असून ओल्या दुष्काळाचे सावट शेतकऱ्यांवर आले आहे.

तालुक्यातील कुटासा,कावसा, चौहट्टा ,उमरा, आसेगाव, ढगा, अकोलखेड,अकोली जहागीर सर्वत्र परिसरामध्ये सरासरीपेक्षा जास्त पाऊस झाल्याने शेतकऱ्यांची प्रमुख पिके कपाशी,तूर,सोयाबीन ही पिके अति पाण्याने करपले असून हळुवारपणे नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत.शेतकरी हा आर्थिक संकटात सापडला असून अकोट तालुक्यातील शेतकऱ्यांना शासनाच्या मदतीची अत्यंत आवश्यकता आहे. तालुक्यामधील झालेल्या संततधार पावसामुळे पिकांच्या नुकसानीचे पंचनामे शासनाने त्वरित करावे व आर्थिक नुकसान भरपाई शेतकऱ्यांच्या खात्यामध्ये जमा करावी. व शेतकऱ्यांना दिलासा द्यावा अशी मागणी तालुक्यातील व परिसरातील शेतकऱ्यांनी शासनाला केली आहे.

शेतकऱ्यांच्या नुकसानी संदर्भात परिसरातील राजकीय पक्ष व संघटनांच्या वतीने नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या शेतीचे त्वरित पंचनामे करून शासनाने नुकसान भरपाई द्यावी याकरिता आक्रमक भूमिका घेतली जात आहे. सततच्या संततधार पावसामुळे अनेक शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान झाले असून पाऊस न थांबल्यास अनेक शेतकऱ्यांना आर्थिक नुकसानाला सामोरे जावे लागत आहे परिसरामध्ये नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या शेतीचे पंचनामे शासनाच्या वतीने केल्या जात आहेत. मात्र मदत कधी मिळेल? असा प्रश्न शेतकरी उपस्थित करत आहेत.

## हातगावच्या मुख्य रस्त्यावर चिखलाचे साम्राज्य

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**मुर्तिजापूर , दि. ७ :** गेल्या ३० ते ३५ वर्षांपासून प्रतिक नगर हातगाव येथील मुख्य रस्ता चिखलमय अवस्थेत आहे. पावसाळा सुरू झाला की या रस्त्यावर पाऊल ठेवणेही नागरिकांसाठी दूभर होते. पावसाचे पाणी साचून रस्त्यावर चिखलाचे साम्राज्य निर्माण झाले असून दररोज या रस्त्यावरून प्रवास करणाऱ्या शेकडो नागरिकांचे हाल होत आहेत. स्थानिक ग्रामपंचायतीने अनेक वेळा रस्त्याचे डांबरीकरण किंवा काँक्रीटीकरण करण्याच्या आश्वासनांची बरसात केली, मात्र प्रत्यक्षात आजपर्यंत कोणतीही कामे झालेली नाहीत. नियोजनशून्य कारभारामुळे नागरिकांना चिखल व खड्ड्यांतूनच प्रवास करावा लागत आहे.

दरवर्षी निवडणुकीच्या काळात रस्त्याचे डांबरीकरण होईल, अशी ग्वाही दिली जाते; मात्र निवडणुका झाल्यानंतर आश्वासने हवेत विरून जातात.

लहान मुले, शाळकरी विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिक तसेच वाहनधारक सर्वांनाच या दुर्दशेचा सामना करावा लागत आहे. ग्रामपंचायतीकडून आणि संबंधित विभागाकडून या गंभीर समस्येकडे वारंवार दुर्लक्ष होत असल्याने नागरिकांमध्ये संतापाची लाट पसरली आहे. रस्त्यावरील चिखलामुळे अपघात होण्याची शक्यता वाढली असून, तातडीने पावले न उचलल्यास मोठे संकट ओढवेल, अशी नागरिकांची भीती व्यक्त होत आहे. हातगाव ग्रामपंचायतीने तातडीने रस्त्याचे डांबरीकरण करावे, अन्यथा तीव्र आंदोलनाचा इशारा स्थानिक नागरिकांनी दिला आहे.

## हजारो भाविक भक्तांनी महाप्रसादाचा घेतला लाभ

### हेडा परिवाराची गेली १६ वर्षांपासून महा प्रसादानिमित्य अविरत अन्न-दान सेवा

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**वाशीम , दि. ७ :** श्रद्धा, भक्ती आणि उत्साहाचा संगम लाभलेल्या श्री विसर्जन दरम्यान महाप्रसाद वितरण सोहळ्याला दि. ६ सप्टेंबर शनीवारी रोजी स्थानिक जुनी नगर परिषद जवळ टेकडी शाळेत स्व. शंकरलाल हेडा, व स्व.यमुनाबाई शंकरलाल हेडा यांच्या स्मुर्ती-प्रितार्थ गेली १६ वर्षांपासून अविरत हेडा परिवाराच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात येते.

या महा प्रसादासाठी हजारो भाविक भक्तांची मोठी गर्दी झाली होती. पहाटेपासूनच सदर परिसरात भाविकांचा ओघ सुरू झाला होता. धार्मिक वातावरणात घंटानाद, भजन, कीर्तन यामुळे परिसर मंगलमय झाला.महाप्रसादासाठी आयोजक समितीने विशेष व्यवस्था केली होती. हेडा परिवारांच्या निकट व्रतीय स्वयंसेवकांच्या मदतीने भाविकांना शिस्तबद्ध रांगेत उभे करून प्रसादाचे वाटप करण्यात आले. महिलांसाठी स्वतंत्र व्यवस्था तसेच ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग आणि लहान मुलांसाठी विशेष सोयी उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या.

दिवसभरात किमान ३० हजारा पेक्षा जास्त भाविक भक्तांनी महाप्रसाद ग्रहण करून अध्यात्मिक समाधानाचा अनुभव घेतला. गावातील तसेच बाहेरगावाहून आलेल्या भक्तांनी श्रद्धेने या सोहळ्यात सहभाग घेतला. महाप्रसाद घेताना अनेक भक्तांच्या चेहऱ्यावर समाधान आणि आनंद दिसून येत होता.

यावेळी धार्मिक गाणी, कीर्तन, भजन यामुळे वातावरण अधिकच पवित्र झाले होते. सदर परिसरातील रस्त्यांवरही भक्तांची प्रचंड गर्दी उसळली होती. स्थानिक नागरिक आणि ग्रामीण ग्रामस्थ, युवक मंडळे, हेडा परिवारातील महिला यांनीही या सोहळ्यात सक्रिय सहभाग घेऊन भाविकांची सेवा केली.

## रोबोटिक्स टेक्नोक्रॅटला अखेरचा निरोप : अंतिम यात्रेत उसळला जनसागर

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**कारंजा (लाड) , दि. ७ :** आर्टिफिशियल इंटेलिजन्स आणि रोबोटिक्स टेक्नॉलॉजीचा उदयोन्मुख तारा अयान खानला रविवारी सकाळी शहरवासीयांनी अश्रूंनी निरोप दिला. सकाळी ८.४५ वाजता डाफनीपुरा येथील निवासस्थानावरून निघालेल्या जनाजामध्ये प्रचंड गर्दी झाली. सकाळी १० वाजता दारव्हा रोडवरील मुस्लिम कब्रस्तानासमोरील मैदानात हजारोंनी नमाज-ए-जनाजा अदा केली आणि त्यानंतर अंतिम विधी पार पाडण्यात आले.

२५ ऑगस्ट रोजी ब्रिटनमधील एडिनबर्ग शहराजवळील हारलौ जलाशयात बुडाल्याने अयानचा मृत्यू झाला होता. ही बातमी कळताच कुटुंबियांसह संपूर्ण शहर शोकसागरात बुडाले. सर्वात मोठे आव्हान म्हणजे अयानचा पार्थिव भारतात कसे आणायचे हे होते. स्कॉटलंडमधील गुंतागुंतीच्या कायदेशीर प्रक्रियेमध्ये अयानचे नातेवाईक जावेद खान, अरशान खान, रोमान खान यांनी स्कॉटलंड पोलिस अधिकारी जेनिफर, भारतीय दूतावासाचे अधिकारी नेगी व हेरियट विद्यापीठाचे डायरेक्टर पॉवेरी कॅम्पबेल यांच्याशी ऑनलाइन संपर्क साधला. प्रयत्नांनंतर प्रक्रिया पूर्ण झाली आणि पार्थिव भारतात पाठविण्यात आले.

या संपूर्ण प्रक्रियेत केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, आमदार सई ताई डहाके, भाजप नेते देवव्रत डहाके, मुख्यमंत्री यांचे खासगी सहसचिव अमोल पाटणकर, शाम देशमुख, एआईएमआईएम नेते मो. युसुफ पुंजानी यांच्यासह अनेक जनप्रतिनिधींनी परराष्ट्र मंत्रालयाशी संपर्क साधून महत्त्वाची भूमिका बजावली.

रविवारी पहाटे २.४० वाजता कतार फ्लाइटने अयानचे पार्थिव नागपूर विमानतळावर पोहोचले. कायदेशीर प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर सकाळी ४.३० वाजता कुटुंबीयांच्या ताब्यात देण्यात आले. नागपूरहून रुग्णवाहिकेतून सकाळी ८ वाजता पार्थिव कारंज्यात पोहोचले. अंतिम दीदारासाठी हजारो हिंदू-मुस्लीम महिला-पुरुषांची गर्दी झाली. धार्मिक विधी पूर्ण झाल्यानंतर जनाजा रवाना झाला.

## श्री शेतकरी राजा ग्रुपचा वर्धापन दिनानिमित्त सामाजिक उपक्रम

### कृषी उत्पन्न उपबाजार समिती येथे वृक्ष लागवड

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**चांनी , दि. ७ :** पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी सार्वजनिक वृक्ष लागवड खूप महत्त्वाचे आहे दिवसेंदिवस अवैध वृक्ष तोड होत आहे..फ त्यामुळे पर्यावरणाचा ऱ्हास होत आहे आणि नैसर्गिक आपत्तीला शेतकऱ्यांना तोंड द्यावे लागत आहे. पर्यावरणाचा समतोल राखावा व पर्यावरणामध्ये चांगला बदल व्हावा या अनुषंगाने चांनी येथील कृषी उत्पन्न उपबाजार समिती व आठवडी बाजारामध्ये वृक्ष लागवड करण्यात आली.

सामाजिक तसेच शासकीय, गोरगरिबा शेतकऱ्यांसाठी वेळोवेळी आपल्या हक्कासाठी, न्यायासाठी हा ग्रुप पातुर तालुक्यामधे लढण्याचा काम करत आहे. तसेच पर्यावरनाचा मित्र म्हणून त्यांची ओळख आहे. वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे.. सेवा परम धर्म श्री शेतकरी राजा ग्रुप आपले सामाजिक उपक्रम राबवत आहे. मानव आपल्या स्वार्थासाठी अवैध पद्धतीने वृक्षतोड करीत आहे त्यामुळे त्याचा परिणाम पर्यावरणावर होतो त्यामुळे पर्जन्यमानाचा लहरीपणा दिसून येतो. त्यामुळे निसर्गाचा समतोल राखण्यासाठी वृक्ष लागवड हा पर्यावरणाचा खरा मित्र आहे. आजची एक झाड म्हणजे उद्याचा आपला श्वास वाचविणे आहे. सर्वांनी सार्वजनिक ठिकाणी एक तरी वृक्ष लागवड करावी. त्यामुळे पर्यावरणाचा समतोल ठेवता येईल.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष गजानन पाटील. संचालक कृषी उत्पन्न बाजार समिती खरेदी विक्री पातूर. तर प्रमुख उपस्थिती म्हणून चांनीचे वैभव भागवताचार्य ह भ प प्रदीप महाराज ताले संस्थापक अध्यक्ष श्री भक्ती साधना आश्रम चांनी व किरण तायडे सचिव कृषी उत्पन्न बाजार समिती पातूर. व सामाजिक कार्यकर्ते शालिग्राम राऊत महादेव येनकर गजानन राखोंडे वसंता पाटील बंडू येनकर दिगंबर आढाऊ वासुदेव पाटील रामधन शेळके गोपाल सोनोने गुलाब कलंत्री दशरथ ताले पांडुरंग घोगरे शेंडे काका. प्रमोद पाटील संतोष इंगळे तसेच श्री शेतकरी राजा ग्रुपचे सेवक रवि सोनोने ज्ञानेश्वर गाडगे प्रज्वल सोनोने गणेश ताले रामेश्वर जाधव दीपक सोनोने प्रणव चराटेआदीसह उपस्थित होते.

### आपत्कालीन शोध व बचाव पथक यांची जिल्ह्यातील विविध ठिकाणी सेवा

**अकोला:** अनंत चतुर्थीच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील अनेक गणेश विसर्जन घाटावर गणेश विसर्जन संपन्न झाले यामध्ये संत गाडगेबाबा आपत्कालीन बचाव पथक, वीर भगतसिंग आपत्कालीन बचाव पथक यांनी विविध गणेश घाटावर आपली सेवा दिली आहे

जिल्ह्यातील अनेक गणेश विसर्जन घाटावर गणेश मूर्तींचे मोठ्या उत्साहात विसर्जन संपन झाले यावेळी जिल्हाधिकारी, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी संदीप साबळे यांच्या सूचनेवरून जिल्ह्यातील बाळापुर येथील गणेश घाट, अकोला तालुक्यातील गांधीग्राम गणेश घाट, कुरणखेड येथील काटेपूर्णा गणेश घाट, या दोन्ही पथकाच्या सदस्यांनी आपली सेवा देत त्यांनी आपत्ती व्यवस्थापन विभागात कोणतीही अडचण येऊ नये जीवित हानी होऊ नये यासाठी त्यांनी कडा पहारा दिला. त्याचबरोबर बाळापूर येथे बोटीच्या साह्याने सुद्धा गणेश घाटावर त्यांनी सेवा कार्य राबवले आहे त्यामुळे कुठल्याही अनुचित प्रकार घडला नाही यावेळी मानव सेवा आपत्ती व्यवस्थापन फाउंडेशन संचालीत संत गाडगेबाबा आपत्काली बचाव पथकाचे प्रमुख दीपक सदाफळे, विर भगतसिंग आपत्कालीन शोध व बचाव पथक अध्यक्ष विजय माल्टे, योगेश विजयकर, शाहबाज शहा तथा पथका मधील सर्व सदस्य उपस्थित होते.

## आदिवासी भागातील समस्या व उपाययोजना करिता आढावा बैठक संपन्न

### स्वयंसेवी संस्था 'खोज' चा स्तुत्य उपक्रम

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**अडगाव बु., दि. ७ :**आदिवासी भागातील आदिवासींच्या विविध समस्या व त्यावरील उपाययोजना यासाठी ''खोज'' या स्वयंसेवी संस्थेच्या पुढाकाराने आयोजित करण्यात आलेली आढावा बैठक लगतच्या धोंडाआखर येथे संपन्न झाली.आदिवासी करीता असलेल्या विविध योजना, शैक्षणिक सुधारणा, आर्थिक उन्नती या बाबींना घेऊन ॲड बंड्या साने व ॲड दशरथ बावणकर यांचे मार्गदर्शनाखाली ''खोज'' या सामाजिक संस्थेने धोंडाआखर येथे आढावा बैठकीचे आयोजन केले होते.

आदिवासी विकास निरीक्षक संकल्प खरात यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत गट शिक्षणाधिकारी श्रीमती सुनीता बकाल, केंद्र प्रमुख शिवाजीराव तायडे, मुख्याध्यापक किशोर कोल्हे, रामदास भीलावेकर, अनिल मावशे व जयकिसन दरसिमबे यांची प्रमुख उपस्थिती होती.यावेळी आदिवासी करिता आदिवासी विभागामधून असलेल्या सर्व योजनांची माहिती परिसरातील धोंडाआखर, चीपी,भिली,करी रुपागड येथील बहुसंख्येने उपस्थित आदिवासींना देऊन असलेल्या योजनांचा लाभ घेण्यासाठी आदिवासी बांधवांनी स्वतःहून पुढाकार घेतला पाहिजे असे आवाहन आदिवासी विकास निरीक्षक संकल्प खरात यांनी केले.. जिल्हा परिषद शाळांचा दर्जा सुधारणे तसेच विद्यार्थी पटसंख्या वाढी करीता शिक्षक,पालक व शाळा व्यवस्थापन समिती यांनी विशेष लक्ष द्यावे ही बाब गटशिक्षणाधिकारी बकाल यांनी मांडली यावेळी आदिवासी भागात बरेच ठिकाणी शाळा खोल्यांची अवस्था चांगली नसल्याची तक्रार बहुसंख्य पालकांनी केली.

यावर गटशिक्षणाधिकारी बकाल यांनी खोल्यादुरुस्ती बाबत लवकरच उपाययोजना केल्या जाईल अशी माहिती दिली कार्यक्रमाचे संचालन अनिल मावशे यांनी आभार प्रदर्शन सुरेश तायडे यांनी केले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी उपसरपंच संजय गवते, बाबाराव मावसकर, प्रकाश मावस्कर, सोनाजी कासदेकर, गुलाब पोकळे, आनंद भारसाकळे,नंदु दही, रमेश ठाकरे, रामगोपाल दही, नामदेव दही,अमर मावशे व लखन बेटे यांनी अथक परिश्रम घेतले.

## मुर्तिजापूर तालुक्यात सततच्या पावसामुळे ओल्या दुष्काळाची चिन्हे


### शेतकऱ्यांचे नियोजन विस्कळीत: पिकांवर रोगराई, तणाचे साम्राज्य, शेतकरी मदतीच्या प्रतिक्षेत



वार्तापत्र

प्रा एल डी सरोदे

मुर्तिजापूर तालुका प्रतिनिधी



**मुर्तिजापूर:** गेल्या ११ ऑगस्टपासून सुरू असलेल्या सततच्या अतिवृष्टीमुळे मुर्तिजापूर तालुक्यात शेतीचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. मुसळधार पावसाने शेतकऱ्यांनी पाहलेले हिरवे स्वप्न वाहून गेले तर संपूर्ण कृषी नियोजनसुद्धा कोलमडले असून ओल्या दुष्काळाचे संकेत स्पष्टपणे दिसू लागले आहेत. मात्र प्रशासकीय यंत्रणा अजूनही याकडे गंभीर्याने पाहत नाही. शेतकऱ्यांच्या डोळ्यादेखात त्यांच्या शेतातील सुपीक माती वाहन गेली. तर पीके काहींची वाहून गेली तर सतत पावसामुळे पिवळी पडत सडत आहे. आणि शेतीची मशागत करायला उसंत मिळत नसल्याने तण आणि पिकांच्या वाढीच्या स्पर्धेत पीके कमजोर झाली आणि तण मोठया प्रमाणावर वाढली आहेत. त्यातच शेतकऱ्यांचे उत्पन्नाचे स्रोत बंद पडल्याने शेतकरी अडचणीत सापडला आहे. कर्जमाफी अद्याप न झाल्याने शेतकरी कर्जबाजारीपणाच्या ओझ्याखाली करपत आहे. त्यामुळे शेतकरी संघटनांकडून तातडीने मदत, कर्जमाफी आणि योग्य पंचनाम्याद्वारे नुकसानभरपाईची मागणी केली जात आहे.

यावर्षी पावसाळ्याच्या प्रारंभी पिकांना पोषक असा पाऊस पडत असल्यामुळे पीके डोलत होती. त्यामुळे त्या पीकांकडे पाहत शेतकरी मनोमन हिरवी स्वप्ने पाहत शेतीत राबत होता. मात्र निसर्गाला शेतकऱ्यांच्या शेतातील पिकांमुळे शेतकरी आनंदी होत असताना पाहवत नव्हते की काय? अचानक ११ ऑगस्ट पासुन सततधार पावसाचा मारा करीत शेतकऱ्यांच्या डोळ्यादेखत त्यांच्या शेतातील उभी पीके आणि शेतातील सुपीक माती वाहून नेली. त्यामुळे शेतकऱ्यांची हिरवी स्वप्ने भंगली आणि त्यांच्या चिंतेत भर पडतच आहे. चिंता कमी होण्या ऐवजी वाढतच आहे. त्यामुळे त्याला मदतीच्या आशेने शासनाच्या निर्णयाची वाट पाहत आहे.

**शेतातील कामे ठप्प**

सततच्या पावसामुळे खूरपणी, डवरणी आणि फवारणीचे वेळापत्रक विस्कळीत झाले आहे. परिणामी शेतात तणाचे प्रमाण वाढले असून पिकांवर रोगराईचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणावर दिसून येतो.

**सुपीक माती वाहून गेली**

अतिवृष्टीमुळे शेतातील सुपीक माती खरडून गेली आहे. नदीकाठ व नाल्याकाठच्या शेतांमधील पिके पूर्णपणे पाण्याखाली जाऊन जळून नष्ट झाली आहेत.

**जीवितहानीने हळहळ**

अचानक आलेल्या पुरामुळे कंझरा येथील मजुरी करणाऱ्या महिलेचा पाण्याच्या प्रवाहात वाहून मृत्यू झाला. या घटनेमुळे तालुक्यात शोककळा पसरली आहे.

## तेल्हारा नगरपरिषद कार्यालयासमोर सुईवाल यांचे आमरण उपोषण

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी




**तेल्हारा बु., दि. ७ :**तेल्हारा नगरपरिषद मुख्याधिकारी यांच्या मनमानी कारभारा विरोधात नरेंद्र सुईवाल यांचे आमरण उपोषण आज दिनांक ९ ऑगस्ट पासून नगरपरिषद कार्यालयासमोर करण्यात येत आहे.

तेल्हारा नगरपरिषद मुख्याधिकारी यांच्या विरोधात वेळोवेळी पुराव्यासह तक्रारी केलेले आहेत, त्याचप्रमाणे पोलीस स्टेशनमध्ये सुद्धा तक्रारी केली आहेत तरीसुद्धा यावर कुठलेही प्रकारची कारवाई होत नसल्यामुळे नाईलाजास्तव नरेंद्र सुईवाल यांना आमरण उपोषण साठी बसावे लागत आहे. आमरण उपोषणासाठी आवश्यक ती परवानगी साठी प्रशासना कडे उपोषणकर्त्यांनी अर्ज केला आहे. उपोषणादरम्यान जीवितास काही धोका निर्माण झाल्यास याची जबाबदारी शासनाकडे राहील असे उपोषणकर्त्यांनी अर्जामध्ये नमूद केले आहे.

अजिंक्य भारत
# आपलं वाशिम
अकोला, सोमवार, दि. ८ सप्टेंबर २०२५ www.ajinkyabharat.com


महत्त्वाचे

## रस्ता ओलांडताना विद्यार्थिनीचा अपघातात मृत्यू



**वाशिम :** शिकवणीला सायकलने जाण्यासाठी घरून निघालेल्या मुलीचा रस्ता ओलांडतांना अपघाती मृत्यू झाला. कु. संध्या उमेश सारसकर (वय १६) असे मृत मुलीचे नाव आहे शुक्रवार ५ सप्टेबर रोजी सायंकाळी शिकवणी वर्गाला जाण्यासाठी सायकलवरून निघाली होती. दरम्यान, रस्ता ओलांडत असताना याचवेळी त्याच रस्त्याने भरघाव वेगाने आलेल्या खासगी ट्रॅव्हल्सने जोरदार धडक देऊन युवतीला उडविले. यामध्ये सदर मुलीचा जागीच मृत्यू झाला. अंगाचा थरकाप उडविणारी हि घटना सीसीटीव्ही कॅमेरात कैद झाली आहे. संध्या ही शहरातील राणी लक्ष्मीबाई कन्या शाळेत दहावीच्या वर्गात शिक्षण घेत होती. संध्याच्या दुर्दैवी मृत्यूने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

## महिलेस मारहाण; चौघांवर गुन्हा दाखल



**मंगरूळपीर :** शेंदुरजना मोरे येथील एका महिलेला मारहाण केल्याप्रकरणी मंगरूळपीर पोलिसांनी ४ सप्टेंबर रोजी चौघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, तक्रारदार नंदा रामहरी जटाळे (वय २७) यांनी तक्रार दाखल केली आहे. त्यात असे नमूद आहे की, फिर्यादी व आरोपी हे नातेवाईक असून, ३० ऑगस्ट रोजी जुन्या वादाचे कारण समोर करून विजय परसराम जटाळे, वासुदेव विजय जटाळे आणि दोन महिला, असे चौघे जण फिर्यादीच्या घरी आले. या चौघांनी फिर्यादीस शिवीगाळ केली. यावेळी फिर्यादीच्या सासऱ्याने हातातील लाकडी काठीने डोक्यावर मारहाण केली. त्यामुळे फिर्यादीच्या डोक्याला दुखापत होऊन रक्तस्राव झाला. या प्रकरणी मंगरूळपीर पोलिस ठाण्यात संबंधित आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सुरू आहे.

# भक्तीमय वातावरणात बाप्पाला भावपूर्ण निरोप

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**वाशिम, दि. ७ :** ढोलताशांचा गजर ... डिजेच्या तालावर थिरकणारी पावले ... गुलालाची उधळण ... अन् गणपती बाप्पा मोरया , पुढच्या वर्षी लवकर या . अशा गगनभेदी जयघोषासह अत्यंत भक्तीमय वातावरणात शनिवारी ६ सप्टेबर रोजी बाप्पाला निरोप देण्यात आला . यावेळी अबालवृध्दासह युवकांचा उत्साह ओसंडून वाहत होता . शहरात शनिवारी श्री गणेश विसर्जन सोहळ्याची सुरुवात धार्मिक वातावरण व अतिशय जल्लोषात झाली. श्री गणेश मिरणुकीत एकूण ३५ गणेश मंडळांनी सहभाग घेतला होता . प्रारंभी शनिवारी सकाळी विसर्जन सोहळ्याचे उद्घाटन खासदार संजय देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले.

मानाचा गणपती शिवशंकर गणेश मंडळ यांची पारंपरिक पद्धतीने सकाळी सर्व गणेश मंडळांच्या प्रतिनिधी व भाविकांच्या उपस्थितीत खासदारांनी प्रथम छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला माल्यार्पण करून व गणरायांची पूजाअर्चा करून विसर्जन मिरवणुकीला प्रारंभ केला. यावेळी आमदार किरणराव सरनाईक,जिल्हा पोलीस अधीक्षक अनुज तारे, उपविभागीय पोलीस अधिकारी नवदीप अग्रवाल, पोलीस निरीक्षक देवेंद्रसिह ठाकूर,माजी आ. विजयराव जाधव, माजी नगराध्यक्ष अशोक हेडा, गोविंदराव रंगभाळ, ज्येष्ठ पत्रकार माधवराव अंभोरे,माजी नगराध्यक्ष लक्ष्मणराव इंगोले, शिवसेनेचे जिल्हा प्रमुख सुरेश मापारी, डॉ. सिद्धार्थ देवळे,डॉ. सुधीर कव्हर,प्रा. दिलीप जोशी, प्रा. संगीताताई इंगोले, डॉ. कविता खराट, राजू पाटिल राजे, मो. मुस्तफा मो. मतीन अखिलभाई तेली,राजुभाऊ रंगभाळ, कॅप्टन प्रशांत सुर्वे, गजानन वडजीकर,गजानन भांदुर्गे,जुगलकिशोर कोठारी,नामदेव हजारे यांच्यासह सर्व पदाधीकारी व गणेश भक्त उपस्थित होते.त्यानंतर विसर्जन मिरवणुकीस प्रारंभ झाला. यावेळी शहरातील प्रमुख मार्गांवर सकाळपासूनच भाविकांनी मोठी गर्दी केली होती. मिरवणुकीत पारंपरिक ढोल-ताशा पथकांचा गजर, लेझीम, नृत्य पथकांच्या तालावर युवक-युवतींनी सहभाग नोंदवला. 'गणपती बाप्पा मोरया'च्या घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता.

यावेळी खासदारांनी गणेश भक्तांना संबोधित करताना सांगितले की, ''गणराय ही श्रद्धा, संस्कृती आणि ऐक्याचे प्रतीक आहे. विसर्जन सोहळा हा सामाजिक बंध मजबूत करणारा उत्सव आहे. नागरिकांनी शिस्त, संयम आणि पर्यावरणपूरक पद्धतीने विसर्जन पार पाडावे'.मिरवणुकीच्या मार्गावर सुरक्षा व्यवस्थेसाठी पोलीस प्रशासनाकडून कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात आला होता. नगरपालिका व विविध सामाजिक संघटनांकडून पिण्याच्या पाण्याची सोय, आरोग्य सुविधा आणि स्वच्छतेची तयारी करण्यात आली होती.

## आमदार, एसडीओ, तहसीलदार, एसडीपीओ, ठाणेदार यांच्या हस्ते मानाच्या गणपतीचे पूजन



**मंगरुळपीर :** मंगरुळपीर शहरात श्री गणेश विसर्जन सोहळ्याची सुरुवात धार्मिक वातावरणात, ढोल-ताशांच्या गजरात व भक्तिमय जल्लोषात झाली. या सोहळ्याचे उद्घाटन आमदार यांच्या हस्ते मानाचा गणपती बिरबलनाथ गणेश मंडळ यांची पारंपरिक पद्धतीने करण्यात आले. सर्व भाविकांच्या उपस्थितीत गणरायांची पूजाअर्चा करून विसर्जन मिरवणुकीला प्रारंभ करण्यात आला.यावेळी आमदार,एसडिओ राजेंद्र जाधव,तहसिलदार रविंद्र राठोड,एसडिपिओ विशाल क्षिरसागर,ठाणेदार किशोर शेळके,बिरबलनाथ महाराज संस्थानच्या अध्यक्ष पुष्पाताई रघुवंशी,सचिव रामकुवार रघुवंशी,अशोकभाऊ परळीकर,शमशोद्दीन जहागीरदार,पुरुषोत्तम चितलांगे,सतिष राठी,सतिष हिवरकर,सुनिल मालपाणी,अभिषेक दंडे,महेश अहीरकर,नरेश ठाकुर,कृष्णकुमार रघुवंशी,अविश रघुवंशी पदाधीकारी,गणेश भक्त उपस्थित होते. मंगरुळपीर शहरातील प्रमुख मार्गांवर सकाळपासूनच भाविकांची मोठी गर्दी उसळली होती. मिरवणुकीत पारंपरिक ढोल-ताशा पथकांचा गजर, लेझीम, नृत्य पथकांच्या तालावर युवक-युवतींनी सहभाग नोंदवला.

## अवैध देशी दारू वाहतुकीवर पोलिसांची कारवाई
### ५९ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**रिसोड, दि. ७ :** रिसोड तालुक्यात दुचाकी वर अवैधरीत्या देशी दारूची वाहतूक करणाऱ्या व्यक्तीवर रिसोड पोलिसांनी कारवाई करत त्याच्याकडून ५९ हजार २०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. सदर कारवाई ५ सप्टेंबर रोजी दुपारी चार वाजता च्या दरम्यान रिसोड वाशिम मार्गावर ग्राम सवड नजीक कबीर कुटी जवळ केली. याबाबत रिसोड पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार रिसोड वाशिम मार्गावर एक इसम हा अवैधरित्या दुचाकीवरून देशी दारूची वाहतूक करत असल्याची गोपनीय माहिती मिळाली असता रिसोड पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक सचिन गोखले, प्रशांत राजगुरू, रवी आढागळे, परमेश्वर भोने यांनी कबीर कुटी जवळ एका दुचाकी वाहनधारकास थांबवले असता त्यास विचारपूस करण्यात आली असता त्याने आपले नाव सोनू उर्फ दीपक धम्मपाल बोरकर (वय १९ वर्षे राहणार समता नगर रिसोड) असे सांगितले. त्याची झडती घेतली असता त्याच्या जवळून पुठ्याचे बॉक्स मधून देशी दारू, भिंगरी, संत्रा असे एकूण २४० नग आढळून आले. सदर दारूची किंमत १९२०० रुपये असून देशी दारू वाहतूक करत असलेली दुचाकी क्रमांक एम एच ३७ ए बी ४४६७ किंमत ४०००० रुपये असा एकूण ५९ हजार २०० रुपयांचा माल जप्त करण्यात आला.

सदर दुचाकी व दारूसह आरोपीस रिसोड पोलीस स्टेशनला आणून त्याचे विरोधात कारवाई करण्यात आली.सदरची कार्यवाही पोलीस अधिक्षक अनुज तारे , अपर पोलीस अधिक्षक लता फड, सहा.पोलीस अधिक्षक नवदिप अग्रवाल, यांचे मार्गदर्शनाखाली व पोलीस निरिक्षक. रामेश्वर चव्हाण यांचे नेतृत्वात करण्यात आली.

## कारंजा शहरात बाप्पांचे विसर्जन उत्साहात

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**कारंजा, दि. ७ :** कारंजा शहरात गणेश विसर्जन मिरवणूक उत्साहात आणि शांततेत पार पडली. पहाटे पाच वाजेपर्यंत झालेल्या या विसर्जन मिरवणुकीत तब्बल वीस गणेश मंडळांनी सहभाग नोंदवला. मानाचा गणपती म्हणून शिवाजी नगर येथील मराठा गणेश मंडळास मानाचे स्थान देण्यात आले. त्यांचे स्वागत करून मिरवणुकीला प्रारंभ झाला. मिरवणुकीत ढोल-ताशे, लेझीम, लाठीकाठी, बलखांब आणि पारंपरिक खेळांचे उत्कृष्ट सादरीकरण करण्यात आले. हे खेळ पाहण्यासाठी भाविकांची मोठी गर्दी उसळली होती. मिरवणुकीदरम्यान पोलिस प्रशासनाने चौकात चोख बंदोबस्त ठेवला. नगरपालिकेकडून घरगुती गणपतींसाठी कृत्रिम तलावाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली होती. या तलावात विसर्जन करण्याचे आवाहन नगरपालिका मुख्याधिकारी वाघमोडे यांनी केले. बालगोपालांनी देखील या कृत्रिम तलावात बाप्पांचे विसर्जन करत उत्साह व्यक्त केला.

विशेष म्हणजे यंदा गणेश मंडळांनी डीजे-मुक्त मिरवणूक काढली. त्यामुळे तालुक्याच्या कानठळ्या बसवणाऱ्या आवाजापासून कारंजावासियांना दिलासा मिळाला असून मंडळांचे सर्वत्र कौतुक होत आहे. याशिवाय, इंझोरी धरणावर सर्वधर्म आपत्कालीन संस्थेची टीम सतत हजर राहून भाविकांना सहकार्य करत होती. कुठलीही दुर्घटना होऊ नये यासाठी त्यांनी दक्षता घेतली आणि विसर्जनाची प्रक्रिया सुरक्षितरीत्या पूर्ण करण्यात मदत केली. अशा रीतीने यंदाचे गणेश विसर्जन पारंपरिक, उत्साहवर्धक आणि शिस्तबद्ध वातावरणात पार पडले.

## एसटी बसमधून महिलेचे दागिने लंपास

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**रिसोड, दि. ७ :** किनखेडा ते अकोला एसटी प्रवासादरम्यान विवाहितेच्या ब्यागेतील सोन्याचे दागिने चोरांनी लंपास केले. मात्र सदर विवाहिता तक्रार करण्यासाठी अकोला, मालेगाव किनखेडा अशी पायपीट करत आहे. मात्र अद्यापही कोणत्याही पोलीस ठाण्यात तक्रार घेऊन गुन्हा दाखल झाला नाही.

या बाबत असे की, किनखेडा माहेर असलेली ऐक विवाहिता महालक्ष्मी सन साजरा करून आपल्या सासरी जाण्यासाठी अकोला जाणाऱ्या बस मध्ये दि ६ सप्टेंबर ला गेली, सोबत आपली दोन लहान मुले होती. दरम्यान एसटी भर गच्च भरलेली असताना अज्ञात चोरट्यांनी अलगद बॅगेत ठेवललेले दागिने काढून घेतले हा प्रकार अकोला येथे उतरल्यावर महिलेच्या लक्षात येताच त्यांनी अकोला बसस्टॅण्ड पोलीस चौकीत माहिती दिली. त्यांनी सदर महिलेला जुना चौक पोलीस स्टेशन ला तक्रार करण्याचे सांगितले. तिथे गेल्यावर तेथील अधिकाऱ्यांनी सिविल लाईन पोलीस स्टेशन ला तक्रार करण्याचे सांगितले. तिथे गेल्यावर तेथील अधिकाऱ्यांनी मालेगाव ता वाशीम येथे तक्रार करण्याचे सांगितले. मालेगाव येथे सदर महिला दि ७ रोजी दिवसभर थांबली पण येथेही तक्रार न घेता शिरपूर वा अकोला येथेच तक्रार देण्याच्या सूचना देण्यात आल्या..

या सर्व प्रकारवरून पोलीस प्रशासन किती गंभीरतेने काम करत आहे हा प्रश्न निर्माण झाला आहे. शासनाच्या बस मध्ये प्रवास करणे महागात पडत आहे.

## शेंदूरजना सर्कलमधील शेतकऱ्यांचे तहसीलदारांना निवेदन
### अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक सहाय्य कधी मिळणार?

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**मानोरा, दि. ७ :** तालुक्यातील शेंदूरजना सर्कल परिसरात शेंदुरजना आढाव रुई गोस्ता मेंद्रा वटफळ इंगलवाडी हिवरा खुर्द कारपा ढोनी उज्वल नगर पाळोदी रणजीत नगर या गावा मधील जुलै ऑगस्ट सप्टेंबर २०२५ या तीन महिन्यात सततच्या पाऊस झाल्यामुळे शेतकऱ्यांचे शेतातील पिकांचे नुकसान झालेले आहे तसेच शेतात मोठ्या प्रमाणात पाणी साचल्यामुळे सोयाबीन तूर कपाशी ज्वारी व इत्यादी पीके पिवळे होऊन वाळत आहे आणि ऑगस्ट महिन्यात सतत दोन-तीन वेळ ढगफुटी सदृश्य पाऊस झाल्यामुळे शेतीचे बांध फुटून माती व गाळ वाहून जाऊन शेतीचे सुद्धा मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहेत.

वाशिम भागात मोठ्या प्रमाणात पाऊस पडला व भौगोलिकदृष्ट्या तेथे पडलेला पाऊस हा आमच्या भागात जात असलेल्या पूस नदीने येतो व त्या पावसामुळे आमच्या परिसरातील शेतीचे पण मोठ्या प्रमाणात नुकसान झाले.

आमचा भाग हा जिल्ह्यातील मागास व डोंगराळ असून कोरडवाहू शेतीचे प्रमाण हे मोठ्या प्रमाणात आहे आणि आमच्या शेतात बहुतांश शेतकरी हे एका खरीप पिकावर अवलंबून असतात आणि यावर्षी पुरामुळे व सततच्या पावसामुळे पूर्ण पीक वाया गेले त्यामुळे शासनाकडून नुकसानीची सरसकट आर्थिक मदत देण्याची विनंती केली.

निवेदन देताना सचिन रोकडे माजी जिल्हा परिषद सदस्य तथा संचालक कृ.उ. बाजार समिती, रेखा पडवाळ मा. पंचायत समिती सदस्य, भुजंगराव राठोड उपसभापती कृषी उत्पन्न बाजार समिती मानोरा, पूजा गणेश काळे सरपंच शेंदुर्जना, धनश्री रुंदन गावंडे उपसरपंच रुई, राजू विष्णू मनवर सरपंच कारपा, मंगेश राठोड शेंदुरजना, लीनाताई सचिन गावंडे सरपंच गोस्ता, अरविंद खडसे सरपंच मेंद्रा इंगलवाडी, हरिओम गावंडे रुई, गणेश रामचंद्र रबडे, कृष्णा गणेश ब्राह्मण, श्याम गावंडे रुई, इंदल जाधव शेंदुरजना, गणेश राठोड कारपा ,अविनाश राठोड कारपा, सुभाष राठोड कारपा, सुभाष साबळे रणजीत नगर, आत्माराम साबळे ढोनी, प्रकाश ठोंबरे रुई, गणेश गावंडे रुई, अविनाश गावंडे रुई, विलास आडे कारपा, पंजाबराव आडे रुंदन, गावंडे रुई व आदी सर्व शेतकरी उपस्थित होते.

आपत्ती

## शेतकरी बांधवांवर नैसर्गिक संकट ओढावले
# पीक विमा धारकांसाठी हेल्पलाईन सुरू करण्याची मागणी

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**रिसोड, दि. ७ :** रिसोड तालुक्यातील शेतकरी बांधवाकरिता व पीक विमा धारकास तक्रार करण्यासाठी हेल्पलाईन नंबर किंवा कृषी विभागाच्या वतीने एक टेबल ऑफलाईन सुविधा सुरू करण्यात यावे भाजपा उत्तर भारतीय मोर्चाचे प्रदेश सचिव लखनसिंह ठाकुर याबाबत तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर सोबत चर्चा केली. यावर्षी जून पासूनच शेतकरी बांधवांवर नैसर्गिक आपत्तीच संकट ओढावंल गेल शेतकरी बांधवांना पेरणी केल्यापासून सतत आपल्या रिसोड तालुक्यामध्ये अतिवृष्टी सुरूच आहे शासनाद्वारे शेतकरी बांधवांना पिक विमा भरण्याकरिता आव्हान करण्यात आले होते त्यानुसार अनेक शेतकरी बांधवांनी आपल्या शेतातील पिकाचा विमा कंपनीकडे भरलेला आहे, परंतु अनेक शेतकरी बांधवांना विमा कंपनीकडून नाहक त्रास होऊन कुठलाही प्रतिसाद न मिळाल्यामुळे शेतकरी बांधव अत्यंत अडचणीत आलेला आहे, अनेक शेतकरी बांधवांनी तक्रार सुद्धा केलेली आहे त्यासोबतच जेव्हा अतिवृष्टी किंवा दुष्काळी अनुदान मिळते तेव्हा सर्व विमा धारकास सरसगट लाभ देण्यात यावा.

पीक विमा मिळालेल्या व न मिळालेल्या शेतकरीयाद्या गावात कृषी विभाग मार्फत किंवा कंपनीने प्रसिद्ध कराव्या, पिक विमाधारकास तक्रार करण्यासाठी हेल्पलाइन नंबर किंवा कृषी विभागाच्या वतीने एक टेबल ऑफलाइन सुविधा मिळण्याकरिता सुरू करण्यात यावा, तसेच चालू वर्षाची नुकसान पिक विमा कंपनी मार्फत सर्वे करण्याकरिता पीक विमा कंपनीला आदेशित करण्यात यावे, १२ ऑगस्ट २०२५ पासून वाकद मंडळामध्ये अतिवृष्टी सुरूच आहे जी, त्यामुळे शेती पिकाचे अस्तिते ९०% नुकसान झालेले आहे ती नुकसान भरपाई मिळण्यात यावी त्यासोबतच मागील हंगामातील खरीप व रब्बी पिकाचा २०२३ ते २०२४ चा पीक विमा काही शेतकरी बांधवांना आत्तापर्यंत मिळाला नाही तो पिक विमा सुद्धा शेतकऱ्याच्या खात्यात जमा व्हायला पाहिजे अशा अनेक निवेदनाची दखल घेत भाजपा उत्तर भारतीय मोर्चा प्रदेशाचे सचिव लखनसिंह ठाकुर यांच्या नेतृत्वात तहसील कार्यालय रिसोड येथे उपविभागीय अधिकारी वैशाली देवकर तथा तालुका दंडाधिकारी प्रतीक्षा तेजनकर तालुका कृषी अधिकारी मदन जी तावरे यांना निवेदन देण्याकरिता वाकद येथील शेतकरी बांधव हजर होते. लखन सिंह ठाकुर सह सर्व शेतकरी बांधवांना तालुका दंडाधिकारी प्रतीक्षा तेजनकर व तालुका कृषी अधिकारी यांनी शासनाकडे निवेदनाची दखल घेऊन पाठपुरावा केला जाईल अशी ग्वाही दिली शेतकरी बांधवांमध्ये विद्याधर दामोदर मोरे, शिवलाल बिजोरे, संजय आनंदा अंभोरे, दिलीप अंभोरे, नितीन देशमुख, जगन्नाथ ढोले, हरीगीर गिरी, कडूजी पंजरकर, मोतीरामजी पंजरकर, पुरुषोत्तम मोरे, कैलास अंभोरे, मधुकर मोरे, प्रकाश मोरे, मधुकर विटकर, संजय बिजोरे, माधव मापारी, सुधीर मोरे, दामोदर गरड, संजय मापारी, सुधीर विनायक मोरे धनंजय मोरे, बेबीबाई बिजोरे, विश्वंबर मोरे, अशोक देशमुख, गजानन मोरे, राजेंद्र मोरे, गजानन देशमुख, संजय देशमुख महादेव, लक्ष्मण डहाके, सुरेशराव देशमुख, मंचकराव देशमुख, सुरेश लाटे, सुनील लाटे, अरुण अंभोरे, मधुकर कावरखे, मदर गरड, भागीरथी मोरे, निनाद देशमुख, सफिया बी सलीम खान पठाण, वंदना मोरे, निलेश मोरे, इरफान खान महबूब खान पठाण, सफिया बी सलाम खान पठाण सह अनेक शेतकरी बांधव उपस्थित होते.

## कौटुंबिक जबाबदाऱ्यासह अंजलीने केली सेट परीक्षा उत्तीर्ण



दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**मानोरा, दि. ७ :** शहरातील प्रख्यात व्यावसायिक उमेश काळे यांच्या सौ. अंजली काळे (गावंडे) यांनी कठीण समजली जाणारी महाराष्ट्र राज्य पात्रता परीक्षा (सेट) उत्तीर्ण केली.

मनामध्ये काहीतरी वेगळे करण्याची इच्छा असल्यास कौटुंबिक जबाबदारी खांद्यावर असताना सुद्धा ती पूर्ण करू शकतो हे उदाहरण शहर व तालुक्यातील विद्यार्थ्यांसमोर ठेवले आहे. अंजली काळे (गावंडे) यांचे प्राथमिक ते पदवी पर्यंतचे शिक्षण कारंजा लाड या शहरात झालेले असून पदव्युत्तर शिक्षण त्यांनी अमरावती येथील शासकीय विदर्भ महाविद्यालयांमध्ये पूर्ण केले आहे. शिक्षक होण्यासाठी गरजेचे असलेले बीएड त्यांनी केलेले असून मराठी आणि इतिहास या दोन विषयात पदव्युत्तर शिक्षण सुद्धा प्राप्त केलेले आहे. उच्चशिक्षित अंजली काळे (गावंडे) यांनी काही वर्षे ज्ञानदान सुद्धा केले असून मुलांचे संगोपन करून सेट परीक्षा उत्तीर्ण करणाऱ्या या गृहिणीचे कौतुक संपूर्ण तालुक्यात सध्या होत असून मानोरा येथे ठाणेदार म्हणून कर्तव्याला असलेल्या महिला पोलीस अधिकारी नयना पोहेकर यांनीही अंजली काळे गावंडे यांचा त्यांच्या पतीसह सन्मान केला.

अजिंक्य भारत • आपलं अकोला / वाशिम
अकोला, सोमवार, दि. ८ सप्टेंबर २०२५ www.ajinkyabharat.com


# अकोट शहरात गणेश विसर्जन मिरवणूक शांततेत

## पोलिसांचा तगडा पोलीस बंदोबस्त

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**अकोट, दि. ७ :** कायदा व सुव्यवस्था राखता यावी यासाठी जिल्हाधिकारी व जिल्हा पोलीस अधीक्षक यांच्यावतीने अकोट येथील गणेश विसर्जन एक दिवस उशिरा करण्याचे नियोजन केले जात असते. त्यानुसार आज रविवारी अकोट येथील गणेश विसर्जन पोलिसांच्या तगड्या बंदोबस्तमध्ये स्थानिक गणेश भक्तांच्या उत्साहाच्या वातावरणात निर्विघ्न पार पडले.

शहरात गणेशोत्सवाचा समारोप मोठ्या उत्साहात व भक्तीमय वातावरणात संपन्न झाला.मिरवणूकमध्ये एकूण ४६गणेश मंडळ सहभागी झाले होते.विविध मंडळांच्या गणेशमूर्तीचे विसर्जन मिरवणुका पारंपरिक वाद्यांच्या गजरात,डी,जे,ढोल-ताशांच्या दणदणाटात आणि फटाक्यांच्या आताषबाजीत करण्यात आले.दुपारी एक वाजता पासूनच शहरात विसर्जन मिरवणुकीला सुरुवात झाली होती. अकोट शहरातील मानाचे गणेश मंडळ नरसिंग मंदिर पटांगणातील मंडळ हे यात्राचौक इथे एक वाजता पोहोचले होते. या पाठोपाठ रांगेत येण्याकरिता अनेक मंडळांनी गणेश विसर्जन मिरवणूक आणायला सुरुवात केली. मिरवणूक मार्ग व प्रमुख रस्त्यांवर आकर्षक सजावट, रांगोळ्या आणि रोषणाई करण्यात आली होती. मिरवणुकीत युवक-युवतींनी लेझीम, ढोल-ताशे, झांज, पथक तसेच नृत्याच्या तालावर आपला सहभाग नोंदवला.''गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या जयघोषाने संपूर्ण आकोट शहर दुमदुमून गेले. अकोट शहरात मिरवणुकी दरम्यान कुठलाही अप्रिय प्रकार घडला नाही. उत्साह, श्रद्धा आणि आनंदाच्या वातावरणात अखेर श्री. गणरायाला निरोप देण्यात आला. मिरवणूक ठरलेल्या वेळेत रात्री दहा वाजता शांततेत संपन्न झाली. मिरवणूक दरम्यान पोलिसांचा चोख बंदोबस्त तैनात होता. गणपती बाप्पा मोरया,पुढच्या वर्षी लवकर या'' या जयघोषाने संपूर्ण वातावरण दुमदुमून गेले. नागरिकांनी मोठ्या संख्येने मिरवणुकीत सहभाग घेतला.विसर्जनासाठी पोलिस प्रशासन आणि नगरपालिकेने योग्य ती व्यवस्था केली होती. विसर्जन घाटावर सुरक्षा,स्वच्छता आणि गर्दी नियंत्रणासाठी पुरेशा प्रमाणात पोलीस कर्मचारी तैनात करण्यात आले होते.

**अकोट शहरात गणेश विसर्जन मिरवणूक दरम्यान पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त होता.ड्रोन कॅमेरा सीसीटीव्ही साध्या गणवेशात पोलिसांचे पथक तैनात व संवेदनशील भागावर विशेष लक्ष होते. पोलीस अधीक्षक, अपर पोलीस अधीक्षक, ४ उपविभागीय पोलीस अधिकारी, १० पोलीस निरीक्षक,३७ सहाय्यक पोलीस निरीक्षक, उपनिरीक्षक ५३७ पोलीस कर्मचारी ११० होमगार्ड १० महिला होमगार्ड सह, एस आर पी एफ, आर सी पी सह, पोलिसांचा तगडा बंदोबस्त, अकोट महसूल विभाग, अकोट नगर परिषद, महावितरणचे अधिकारी, कर्मचारी, गणेश विसर्जन मिरवणुकीत तैनात होते. तसेच सार्वजनिक गणेशोत्सव समिती शांतता समितीचे सदस्य राजकीय व सामाजिक संघटनाचे कार्यकर्ते पदाधिकारी पत्रकार उपस्थित होते.**

## महत्त्वाचे

### निर्माल्य विसर्जन रथ होता सेवेत



**मुंडगाव:** अकोट तालुक्यातील मुंडगाव येथील सुपिनाथ महाराज शिव संस्थानच्या वतीने गणेश उत्सवात तसेच इतर धार्मिक कार्यक्रमात जमा झालेले निर्माल्य गोळा करून ते निर्माल्य रथाव्दारे पुर्णा नदिपात्रात टाकले. त्यामुळे हे निर्माल्य कोणत्याही ठिकाणी न टाकता या निर्माल्याचा चांगल्याप्रकारे व पुर्णा नदिच्या पाण्यात निर्माल्य गोळा करून टाकण्यात आले. हा निर्माल्य रथ सुपिनाथ महाराज शिवसंस्थानचे अध्यक्ष गजानन वारकरी, विजय आखरे, सरपंच तुषार पाचकोर,वासुदेवराव लहाने, लक्ष्मणराव भारसाकळे, सदाशिव खरपकार, सुदर्शन खडसने, विनायक फुसे, गजानन येवतकर, गणेश आसोले, सागर राऊत, सह महिला मंडळ व सुपिनाथ महाराज शिव संस्थानचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

### ईद- ए - मिलाद मोठ्या उत्साहात

**पातुर नंदापुर :** येथे ईदुल मिलादुन नबि जगाला शांततेचा व मानवतेचा संदेश देणारे इस्लाम धर्माचे संस्थापक प्रेषित हजरत मोहम्मद ( स. अ.) यांच्या जयंती निमित्त आज पातुर नंदापुर येथे जश्ने ईद -मिलादुन्नबी जुलूस कमिटीच्या वतीने जुलूस ( मिरवणुकीचे) आयोजन करण्यात आले होते. सदर जुलूस मध्ये मुस्लिम समाज बांधव यांच्या वतीने विविध प्रकारचे आकर्षक देखावे ची सजावट करण्यात आली होती. नगिना मदिना मज्जित येथील खाना -ऐ -काबाची प्रतिकृती ही सर्वांचे लक्ष वेधून घेत होती. सदर जुलूस ची सुरवात ही नगिना मस्जिद येथून होऊन जुलूस हा गावातील मुख्य मार्गाने मार्गस्थ होऊन अत्यंत शांततामय रित्या संपन्न झाला.

# गणेश विसर्जनाहून परतणाऱ्या तरुणावर काळाचा घाला

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**पातूर, दि. ७ :** राज्यात गणेशोत्सवाचा उत्साह असतानाच, अकोला शहरात एक दुर्दैवी घटना घडली आहे. पातूर-अकोला रस्त्यावर गणेश विसर्जन करून परतणाऱ्या जय बजरंग गणेश उत्सव मंडळाच्या कार्यकर्त्यांच्या दुचाकीला भीषण अपघात झाला. या अपघातात एका २५ वर्षांच्या तरुणाचा जागीच मृत्यू झाला असून, अन्य ३ जण गंभीर जखमी झाले आहेत.

या अपघाताबाबत मिळालेल्या माहितीनुसार, जय बजरंग गणेश उत्सव मंडळाचे सदस्य गणेश विसर्जन करून कापसी तलावावरून अकोल्यातील आपल्या घरी परत येत होते. दुर्दैवाने, त्याच वेळी समोरून भरधाव वेगाने येणाऱ्या एका कारने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. धडक इतकी भीषण होती की दुचाकीचा अक्षरशः चुराडा झाला. दुचाकीवरील चारही तरुण रस्त्यावर फेकले गेले.

या अपघातात २५ वर्षीय रामचंद्र बबन आंधळे याचा जागीच मृत्यू झाला. त्याच्यासोबत असलेले, रविंद्र माळी, विनोद डांगे आणि राहुल सुरेश कोंड हे ३ जण जखमी झाले आहेत.. या सर्व जखमींना तातडीने अकोल्यातील शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. हे सर्व तरुण अकोल्यातील गाडगे नगर येथील शिवसेना वसाहतीचे रहिवासी असल्याची माहिती समोर आली आहे.

अपघाताची माहिती मिळताच पातूर पोलीस घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी अपघातग्रस्त वाहने ताब्यात घेतली असून, या घटनेची सखोल चौकशी सुरू आहे. गणेश विसर्जनाच्या आनंदावर या दुर्दैवी घटनेने विरजण पडले असून, शहरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

# स्व.राजीव गांधी अपघात विमा योजनेअंतर्गत तीन लाख रुपये सानुग्रह निधीचा पालकांना लाभ

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**तेल्हारा, दि. ७ :** तालुक्यातील हिवरखेड येथील नामांकित सहदेवराव भोपळे विद्यालयातील स्व.अनिकेत संजय मरोदे व स्व.रेश्मा रविन गोटे या विद्यार्थ्यांचा अकस्मात मृत्यू झाला.अनिकेत मरोदे यांचा वारी येथील पाण्याच्या डोहात तर रेश्मा गोटे हीचा तिच्या राहत्या घरी सर्पदंशाने मृत्यू झाला होता. या दुर्दैवी घटनेमुळे हळहळ व्यक्त होत होती. त्यांना महात्मा फुले शिक्षण संस्थेचे अध्यक्ष अनिलकुमार भोपळे व समस्त पदाधिकारी, संचालकांच्या मार्गदर्शनातून शाळा स्तरावरून स्व.राजीव गांधी अपघात विमा सानुग्रह योजनेचा पालकांना लाभ मिळावा याकरिता शासन स्तरावरील शिक्षण विभाग( योजना) येथे योजनेचा प्रस्ताव दाखल करण्यात आला होता. नुकतीच या प्रस्तावाला मंजुरी मिळाली असून या योजनेअंतर्गत तीन लाख रुपये निधीचा लाभ मृत्युमुखी झालेल्या विद्यार्थ्यांच्या पालकांना मिळाला आहे.याबद्दल पालकांनी समाधान व्यक्त केले.

विद्यार्थ्यांच्या पालकांना लाभ मिळवून देण्यासाठी योग्य ती८ जबाबदारी व पाठपुरावा केल्याबद्दल भोपळे विद्यालयाचे मुख्याध्यापक व संबंधित शिक्षक व कर्मचारी, प्रेस क्लबचे अध्यक्ष सतीश इंगळे,माजी केंद्रप्रमुख प्रकाश राऊत यांच्याबद्दल संस्थेच्या वतीने संस्था कार्यवाह श्यामशील भोपळे व ज्येष्ठ संचालक प्रकाश खोब्रागडे यांनी कृतज्ञता व्यक्त केली.

# प्रहार जनशक्ती पक्षाचे नेते बच्चू कडू १९ तारखेला अकोल्यात

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अकोट, दि. ७ :** येथे प्रहार जनशक्ती पक्षाचे संस्थापक बच्चु कडू हे येत्या १९ तारखेला अकोला जिल्हा दौरा करीत आहेत. त्यांच्या या दौऱ्याचे नियोजन करणे तसेच कर्जमाफी संदर्भात चर्चा करण्यासाठी अकोट कृषी उत्पन्न बाजार समिती येथे आढाव बैठक संपन्न झाली. यावेळी पक्ष निरीक्षक श्याम मसरे, जिल्हा संपर्कप्रमुख नितीन नागे, शहाणे, जिल्हाप्रमुख कुलदीप वसु, उपजिल्हाप्रमुख छोटू कराळे, युवक जिल्हाप्रमुख सुशील पुंडकर, अकोट तालुकाध्यक्ष गणेश गावंडे, अपंग क्रांतीचे जिल्हाध्यक्ष मोईन अली, अकोला पूर्व अध्यक्ष शाम वाघमारे, शेतकरी उपजिल्हाप्रमुख जीवन खवले, अकोट तालुका संघटक शुभम नारे, अकोट युवक अध्यक्ष अवी घायसुंदर, अकोट शहर अध्यक्ष गोलू भगत, युवक शहराध्यक्ष बल्ली राजा, अकोट दिव्यांग श्याम साबळे, ओम घोरड, छोटू पाटील, चौधरी शशांक गीते, अतुल गावंडे, सामी जमादार, सुशील तायडे यांसह पक्षाचे अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.या बैठकीचे सूत्रसंचालन जिल्हाप्रमुख कुलदीप वसु यांनी केले,तर आभार प्रदर्शन शुभम नारे यांनी केले.

# शेती व उद्योग वेगळा केल्यास ग्रामीण जनतेला घातक ठरेल - प्रिया राऊत

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**मंगरुळपीर, दि. ७ :** जी देशाची प्रगती दिसत आहे ती एकमेकांची घुसखोरी करूनच होतांना दिसत आहे,ही एकमेकांशी विनाशकारी स्पर्धा करून चालवलेली प्रगती होत आहे . कारण ही प्रगती ग्रामीण भागातील जनतेच्या शेतकरी व शेतमजूर यांच्या अंगी असलेल्या गुणधर्माशी अवलंबून राहिली नसुन ती फक्त शेती व्यवसायांच्या शोषणाचा ती एक भाग झाली आहे, म्हणूनच आज पूर्ण देशात संघर्ष निर्माण झाला आहे, समाजासमाजात, जातिधर्मातच नव्हे तर देश, विदेशात सुद्धा संघर्ष निर्माण झाला आहे या सर्व परिस्थितीला विकास प्रक्रियेत अडकलेला, नासलेला निस्क्रीय होत चाललेला ग्रामीण कष्टकरी समाजच कारणीभूत आहे असे म्हणायला काहीही हरकत नाही. ही खूपच द्रूर्देवी बाब आहे, या गोष्टीला जेव्हढे राजकारणी लोक जबाबदार आहेत त्या पेक्षा शंभर पटीने आपण सर्व जातधर्माची जनता जबाबदार आहोत, म्हणूनच शासनाकडून शेती वेगळी, आणि व्यापार उद्योग वेगळा करण्याचा प्रयत्न सुरू आहे हि फाळणी झाल्यास देशातील सर्व मानव जातीला घातक ठरणार आहे,लॉटरीचां खेळ खेळून कसनाऱ्या शेतीला जोपर्यंत व्यापार व्यवसायांच्या नफ्यातोट्यात सहभागी करणार नाहीत ग्रामीण भागातील विकासच नव्हे तर जिल्ह्याचा देशाचा नैतीक मार्गाने विकासच होणार नाही आज रोजी ग्रामीण भागातील जनता गुण्यागोविंदाने एकत्र नांदत आहेत, परंतु शेती व व्यापार वेगळा केल्यास यांच्यात सुद्धा संघर्ष निर्माण होण्याची भीती होईल त्यामुळे शासनाला खरच देशात तंटा नको असेल, देश प्रगतीपथावर मार्गक्रमण करून घ्यायचा असेल तर शेतीला उद्योगाचा दर्जा द्यावा अशाही शेवटी रयत क्रांती संघटनेच्या प्रिया अक्षय राऊत म्हणाल्यात.

## बडगा

### नऊ हजाराच्या दंडाची धनज पोलिसांची कारवाई

# ध्वनिमर्यादा ओलांडणारे पाच डी.जे. सेट्स ताब्यात

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**कामरगाव, दि. ७ :** गणेशोत्सवातील अनंतचतुर्दशीच्या दिवशी शहरासह ग्रामीण भागात गणेश विसर्जन मिरवणुका मोठ्या उत्साहात पार पडल्या. मात्र, यावेळी ध्वनीप्रदूषण रोखण्यासाठी पोलिस प्रशासनाने कडक पावले उचलली. धनज पोलिस ठाण्याच्या हद्दीत कामठा, टाकळी व विळेगाव येथे गणेश विसर्जन मिरवणूक सुरू असताना पाच डी.जे जप्त करून कामरगाव चौकीत आणून लावण्यात आले. हे सर्व डी.जे पेडगाव, कारंजा, कारखेडा व पिंपळगाव जि. यवतमाळ येथील आहेत. या विसर्जन मिरवणुकांदरम्यान नियमबाह्य पद्धतीने वाजवण्यात येणाऱ्या डी.जे. सेट्सवर जप्तीची कारवाई करण्यात आली.

धनज पोलिसांच्या पथकाने ग्रामिण भागातील काही ठिकाणी अनधिकृतरित्या सुरू असलेले डी.जे. बंद करून त्यांच्यावर ही कारवाई केली. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ व न्यायालयाने घालून दिलेल्या ध्वनीमर्यादा नियमांचे काटेकोर पालन करण्याचे आदेश आहेत. या पार्श्वभूमीवर गावागावात विसर्जनावेळी मोठ्या आवाजात वाजवण्यात येणाऱ्या डी.जे.मुळे नागरिकांच्या तक्रारी वाढत होत्या. त्यानुसार पोलिसांनी संबंधित ठिकाणी दाखल होऊन ध्वनीयंत्रणा ताब्यात घेतली.फ गणेश विसर्जनाच्या मिरवणुका पारंपरिक ढोल-ताशांच्या गजरात व भक्तीगीतांच्या सुरावटींमध्ये शांततेत पार पाडाव्यात, असे प्रशासनाचे आवाहन होते. मात्र काही ठिकाणी आदेशांचे उल्लंघन झाल्यामुळे पोलिसांना सक्त कारवाई करावी लागली. या कारवाईमुळे गावांमध्ये काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले असले तरी पुढील मिरवणुका शांततेत पार पडल्या.फ धनज पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, येत्या काळात कोणत्याही धार्मिक वा सामाजिक उत्सवांदरम्यान ध्वनीमर्यादा ओलांडणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येईल. नागरिकांनी परंपरांचा सन्मान राखत, पण कायद्याचे पालन करून सण साजरा करावा, असे आवाहन पोलिस प्रशासनाने केले आहे. पुढील कारवाई ठाणेदार भारत लसंते यांच्या मार्गदर्शनाखाली कामरगाव पोलीस चौकी इन्चार्ज गणेश शिंदे व सहकारी करत आहे.

अकोला बाजारपेठ

ग्लॅमर इंडस्ट्री मध्ये आपली छाप उमठवायची आहे का?
तुमच्या आवडीला करिअर मध्ये रूपांतरित करा!
ग्लॅमर इंडस्ट्री मध्ये करिअरची सुवर्ण संधी शिक्षणाची कोणतीही अट नाही
Hair City Hair & Makeup Academy
DIPLOMA IN HAIR DRESSING
मो :- ८९८३३५७३४८
रतनलाल प्लॉट चौक , अकोला

साहु ब्रदर्स
|| साहु मंगलम ||
उपलब्ध सेवा
बँकेट हॉल • लग्न समारंभ हॉल • पार्टी हॉल • स्टँडर्ड रुम्स • गार्डन • ओपन टेरिस
उपलब्ध सुविधा
६५०० स्क्वेअर फुट मेन हॉल • ५००० स्क्वेअर फुट डायनिंग हॉल • १२ स्टँडर्ड रुम्स • ३००० स्क्वेअर फुट ओपन टेरिस • स्क्वेअर फुट गार्डन
9923299920, 9326887511,7841036909
मनोरथ कॉलनी, जवळ डाबकी रोड, अकोला

संचालक अमरदिप जंजाळ सर मो :- ९५४५७९३९७९
जंजाळ फिजिकल करिअर अकॅडमी
स्पेशल इंडियन आर्मी / B.R.O.GREF
हारा वही जो लढा नही....
One Nation One Army
आमच्या अकॅडमीचे वैशिष्ट्ये...
• रनिंग साठी ४०० मिटरचा ट्रॅक
• आर्मी भरती फिजिकल व पेपर, मेडिकल पुर्ण तयारी. (१००%)
• विज्ञान व गणित शिकवण्यासाठी तज्ञ शिक्षक.
• जेवणाची व राहण्याची उत्तम व्यवस्था. (रोज सकाळी नाश्ता)
• विशेष: १६०० मीटर ४ मी. ४५ सेकंद येणाऱ्या विद्यार्थ्यांना सर्व सुविधा व फी माफ
• आमचे दरवर्षी १०० पेक्षा हि जास्त विद्यार्थी यशस्वी
आर्मी, फिजिकल साठी राहण्याची फ्रि व्यवस्था फक्त जेवणाचे पैसे घेण्यात येईल.
आजच आपला प्रवेश निश्चित करा.

कन्हैया
केदार लोलगे 9689304622
व्हिडीओ व्हिजन
फोटोग्राफी अँन्ड व्हिडीओग्राफी
वेडिंग शुट, प्री वेडिंग शुट, सिनेमॅटिक शुट
एंगेजमेंट शुट, पोस्ट वेडिंग, कॅन्डीड शुट
मालेगांव, जि. वाशिम ४४४५०३

वैभव जहुरकार 8446316203
विशाल जहुरकार 9637297978
वैभव
ॲल्युमिनीयम वर्क & ग्लास सेंटर
• स्ट्रक्चर • ॲल्युमिनीयम डोर • कंपोझिट पॅनल • ॲल्युमिनीयम पार्टीशन • ऑल ॲल्युमिनीयम वर्क
सर्व प्रकारचे ग्लास मिळतील
अकोटकार वाडी डाबकी रोड, अकोला

डॉ. बी. आर. आंबेडकर अभ्यासिका हॉल
MPSC/UPSC च्या विद्यार्थ्यां करीता
२४ तास सेवा

अंबे स्पोर्टस वेअर & मॅन्युफॅक्चर
टी-शर्ट • लोअर • गेम पॅन्ट • ट्रॅक सूट
स्पोर्ट शूज चे होलसेल व रिटेल विक्रेता
ऑर्डर प्रमाणे तयार करून मिळेल
राजू सिसोदिया
सिटी कोतवाली च्या मागे अकोला
मो :- ८३२९१११७००

मो :- ७८४१८८८८६२
सरकार मान्य संस्था कोड नं. ६३०७५
मर्यादित जागा....
प्रवेश देणे सुरु आहे...
अक्षर कंप्यूटर टायपिंग अँण्ड शॉर्टहॅन्ड इन्स्टिट्यूट
इंग्रजी/मराठी/हिंदी कंप्यूटर टायपिंग कोर्सेस
GCC-TBC गतिमान साक्षरतेकडून संगणकतेकडे राज्याच्या प्रगतीकडे

आवंडेकर प्रॉपर्टी डीलर
अकोला शहरात डुप्लेक्स, घर, दुकान, शेती, प्लॉट, फ्लॅट विकणे किंवा घेणे असल्यास संपर्क करा
ऑफिस प्रिया टावर जवळ डाबकी रोड, अकोला
आंवडेकर मो- ९९६०२९८५९७

MS-CIT World-class Comprehensive Computer Course
MKCL KLiC Courses Gateway to Knowledge Lit Careers
ऋणश्री कंप्यूटर क्लासेस
ALC CODE: 12210199
MO: 7841888862
लक्ष्मी नगर, डाबकीरोड अकोला
प्रिया टॉवर डाबकीरोड अकोला
प्रो.प्रा सचिन वानखडे

अजिंक्य भारत

आपलं बुलडाणा

बुलडाणा, सोमवार,दि.८ सप्टेंबर२०२५



## महत्वाचे

### बेलाड ते घिर्णी पायदळ दिंडी

**खामगाव** : मी गेलो अत्ते मानू नका.. भक्तीत अंतर करू नका.. कदा मजलागी विसरू नका. मी आहे इयेच, बींची प्रचिती आजही जिवंत आहे. अशा अल्लोषात व भक्तीभावाने ऋषिपंचमी निमित्ताने मौजे बेलाड येथे बेलाह ते घिर्णी दिंडीचे आयोजन करण्यात आले होते. ऋषिपंचमी व गुरुवार अत्ता योग जुळून आला होता. त्याच अनुषंगाने १९१० माद्रपद ऋषिपंचमीचे औचित्या साधून २८ ऑगस्ट रोजी बेलाह पूर्व येथील श्री हनुमान भजनी मंडळ यांच्याकडून बेताड ते घिर्णी दिंडी सोहळ्याचे आयोजन गजानन महाराज मंदीर व भाविकांच्या माध्यमातून करण्यात आले होते. या डिंडीत हभपत दिलीप महाराज साठे, हभपत रामकृष्ण महाराज क्षिरसागर, हभप गणोश महाराज संवारे, हभप प्रमोद महाराज साठे, हभप गजानन महाराज जोगी, तसेच सुशिल सावे, संजय सावरकर, बाबुराव संबारे, संतोष म हाराज संवारे, मेजर श्रीकृष्ण संवारे, बाळाभाऊ साठे, सुरेश संवारे, रामेश्ठर संवारे, रविंद्र संवारे, नंदकिशोर संवारे यांच्यासह संपूर्ण गाठकरी मंडकीच्या सहकापीने शेकडो महिला व पुरुष टाळ-मृदंगाच्या वातावरणाने हा दिंडी सोहळा संपन्न झाला.

### तांत्रिक पुरावा या विषयावर प्रशिक्षण

**खामगाव** : खामगाव जिल्हा अधिक्क्ता परिषदेच्या वतीने आज रविवार सप्टेंबर रोजी सर्व वकिलांसाठी संगणकीय तांत्रिक पुरावा या विषयावर पहिल्यांदाच प्रशिक्षण आयोजित केले आहे. है प्रशिक्षण सिंदखेडराजा येथे पार पडणार आहे. संगणकीय तांत्रिक पुरावा न्यायालयात कसा घ्यायचा याविषयी नेहमी न्यायधिश व सरकारी अभियोक्ता यांच्यासाठी प्रशिक्षण घेतल्या जाते. परंतु आता पहिल्यांदा जिल्हयात वकिलांसाठी सुध्दा असे प्रशिक्षण आयोजित केले आहे. न्यायालयात प्रॅक्टीस करतांना हॉट् सॲप, तित्सीटीव्ही तसेच कॉल रेकॉर्ड याम धील पुरावा कत्सा सादर करायचा, त्यावर क्रॉस कशी करायची याविषयी आजही अनेक वकिलांना अडचणी येतात. या प्रशिक्षणाच्या माध्यमातून अशा अडचणी कायमच्या दूर होणार आहेत.

### रमाई घरकूल योजनेचे धनादेश वितरण

**खामगाव** : रमाई घरकुल योजनेच्या लाभार्थ्यांना माजीमंत्री तथा प्रहार जनशक्ती पक्षाचे संस्थापक अध्यक्ष बच्चुभाऊ कडू व समतेचे निळे वादळचे संस्थापक अध्यक्ष भाई अशांत वानखेडे यांच्या हस्ते ३१ ऑगस्ट रोजी मलकापूर येथे तिसऱ्या हप्त्याच्या धनादेशाचे वितरण करण्यात आले. याप्रसंगी प्रहार जनशक्ती पक्षाचे कार्याध्यक्ष बल्लूभाऊ जंजाळ, बुलडाणा संपर्क प्रमुख गजानन लोखंडकर, जिल्हा उपप्रमुख अजय टप दिलीपभाऊ इंगळे, दिपक मेश्राम, डॉ. अशोक सुरडकर, इम्रान बॉस व पदाधिकारी प्रामुख्याने उपस्थित होते.

### सिंदखेड राजा येथून विवाहिता बेपत्ता

**सिंदखेड** : सिंदखेड राजा जिजामाता नगर सिंदखेड राजा येथील विवाहिता अनिता रामेश्वर मगर ही २० वर्षीय विवाहिता प्रकृती खराब झाली असे सांगून दावाखाना करून येते म्हणून ३ सप्टेंबर रोजी दुपारी घरुन गेली होती. परत न येता बेपत्ता झाल्याची फिर्याद रामेश्वर बबन मगर यांनी पोलिसात दिली. पोलिसांनी हरविल्याची नोंद घेतली आहे.

**कृषी उत्पन्न बाजार समिती, खामगाव बाजार भाव**

| वान | भाव . |
|---|---|
| ज्वारी | - १५०० - २३०० |
| गहू | - २५०० - २६०० |
| तुर | - ४००० - ६३७५ |
| हरभरा | - ५१०० - ५९२५ |
| सोयाबीन | -३७०० - ४४५० |
| उडीद | - ५३२५ - ५८०० |
| मका | - २६६५ - २६६५ |
| भुईमुग | - ४८०० -४८०० |

# जिल्ह्यात गणेश विसर्जन मिरवणूक उत्साहात

## किरकोळ वाद वगळता मिरवणुकीत सर्वत्र शांतता

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**खामगाव दि ७ :** गणपती बाप्पा मोरया... पुढच्या वर्षी लवकर या...! अशा जयघोषांनी अख्खा जिल्हा दुमदुमून गेला. दहा दिवसांच्या भक्तीमय गणेशोत्सवानंतर रविवारी जिल्ह्यात गणेश विसर्जन मिरवणुकीत उत्साह, आनंद आणि जल्लोषाचे वातावरण दिसून आले. ठिकठिकाणी ढोल-ताशांचा गजर, भजन, कीर्तन, डीजेच्या तालावर नृत्य, महिलांची दिंडी, पारंपरिक नृत्याचे सादरीकरण, सामाजिक संदेश देणारे देखावे अशा विविध उपक्रमांनी मिरवणुकीला रंगत आली.

खामगाव शहरात विसर्जन मिरवणुकीची सुरुवात सकाळी नऊ वाजता ऐतिहासिक मनाच्या लाकडी गणपतीपासून झाली. पारंपरिक पद्धतीने वाजणाऱ्या ढोल-ताशांच्या गजरात पहिल्या गणेशाची विसर्जन यात्रा निघाली आणि त्यानंतर एकाममागोमाग एक मंडळांच्या मिरवणुका निघत राहिल्या. रात्री बारा वाजेपर्यंत शहरातील प्रमुख रस्ते गणेश भक्तांनी फुलून गेले होते. मंडपातील गणेशमूर्ती, घरगुती गणपती आणि मोठ्या मंडळांच्या मूर्तींचे विसर्जन करताना भक्तांनी बाप्पाला डोळ्यांत पाणी आणून निरोप दिला. दरम्यान, संपूर्ण जिल्ह्यात पोलिसांचा तगडा बंदोबस्त ठेवण्यात आला होता. जिल्हा पोलीस अधीक्षकांच्या मार्गदर्शनाखाली सर्व तालुक्यांत तसेच संवेदनशील ठिकाणी अधिकारी, कर्मचारी, होमगार्ड आणि स्वयंसेवक तैनात होते. महिला पोलिसांचीदेखील मोठ्या संख्येने नेमणूक करून मिरवणुकीवर लक्ष ठेवण्यात आले. काही ठिकाणी किरकोळ वाद, धक्काबुक्कीची प्रकरणे घडली असली तरी ती पोलिसांनी तात्काळ आवरली. त्यामुळे मिरवणूक सर्वत्र शांततेत आणि आनंदात पार पडली. सामाजिक संघटनांनी यावेळी ''हरित गणेश'' या उपक्रमांतर्गत मातीच्या मूर्तींचे विसर्जन कृत्रिम तलावात करण्याचे आवाहन केले होते. अनेक भाविकांनी या आवाहनाला प्रतिसाद देत पर्यावरणपूरक पद्धतीने विसर्जन केले. तसेच ''स्वच्छता हीच सेवा'', ''बेटी बचाओ-बेटी पढाओ'', ''नशा मुक्त समाज'' अशा संदेशांनी सजवलेल्या झांकींनी उपस्थितांचे लक्ष वेधले. गणेश विसर्जन ही फक्त धार्मिक परंपरा नसून सांस्कृतिक, सामाजिक ऐक्याचे दर्शन घडवणारा उत्सव असल्याचे चित्र सर्वत्र पाहायला मिळाले. वयस्कर, तरुण, महिला आणि लहान मुले मोठ्या उत्साहाने सहभागी झाली. ढोल-ताशांच्या निनादात, डीजेच्या तालावर थिरकत आणि जयघोष करत भाविकांनी बाप्पाला निरोप दिला. बुलडाणा, मलकापूर, चिखली, संग्रामपूर, मेहकर आदी तालुक्यांतही उत्साहपूर्ण वातावरणात मिरवणुका काढण्यात आल्या. ठिकठिकाणी भाविकांसाठी पाणी, शरबत व नाश्त्याचे स्टॉल लावून सेवाभावी मंडळांनी प्रशंसनीय उपक्रम राबवले. शेवटी, काही ठिकाणी मध्यरात्रीनंतरही मूर्ती विसर्जनाची प्रक्रिया सुरू होती. मात्र, प्रशासन, पोलिस दल व स्वयंसेवकांच्या सक्रिय सहभागामुळे कुठेही मोठा अडथळा न होता मिरवणुका यशस्वीपणे संपन्न झाल्या. दहा दिवसांच्या आनंदोत्सवानंतर बाप्पाला निरोप देताना अनेकांच्या डोळ्यांत अश्रू तरळले. पण त्याचबरोबर ''पुढच्या वर्षी लवकर या'' या आश्वासनासह भाविकांनी नव्या उमेदीनं गणेशोत्सव पुन्हा मोठ्या उत्साहात साजरा करण्याचा संकल्प केला.

## अण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त शेगाव येथे कार्यक्रम संपन्न; केंद्रीय मंत्री आठवले यांची उपस्थिती



अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**शेगाव दि.७:** शेगाव येथे मातंग समाज समन्वय समिती महाराष्ट्र राज्य व महायुती जळगाव जामोद मतदारसंघाच्या वतीने लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. देशमुख मंगल कार्यालयात पार पडलेल्या या कार्यक्रमाला केंद्रीय सामाजिक न्याय मंत्री रामदास आठवले यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

कार्यक्रमात केंद्रीय आयुष मंत्री प्रतापराव जाधव, आमदार संजय कुटे, राणा दिलीपकुमार सानंदा, विजयबाप्पू देशमुख, विजय भालतडक, शरद शेठ अग्रवाल, नितीन शेगोकार, ज्ञानेश्वर आप्पा साखरे, सचिन धमाळ, प्रवीण मोरखडे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. आपल्या भाषणात रामदास आठवले यांनी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या संघर्षमय जीवनावर प्रकाश टाकत त्यांचे समाजसुधारणेतील योगदान उलगडून दाखवले. त्यांनी सांगितले की, ''अण्णाभाऊ साठे हे दलित, शोषित आणि वंचित घटकांचे खरे प्रतिनिधी होते. त्यांच्या साहित्याने आणि कार्याने समाजाला दिशा दिली.'' या कार्यक्रमात आठवले यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि आमदार संजय कुटे यांच्या नेतृत्वाचेही विशेष कौतुक केले. त्यांनी सांगितले की, ''या नेत्यांच्या सहकार्यातून देश व राज्यातील सामाजिक न्यायाचे स्वप्न साकार होत आहे.'' कार्यक्रमाचे आयोजन अत्यंत शिस्तबद्ध आणि उत्साही वातावरणात पार पडले.

## पानगोळे हॉस्पिटल ते गोकुळ नगर पर्यंतचा रस्ता करण्याची मनसेची मागणी

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**चिखली दि.७ :** चखली शहरातील पानगोळे हॉस्पिटल समोरुन जाफ्राबादकडे जाणाऱ्या मुख्य रस्त्यावर अत्यंत खड्डे पडले असुन संपूर्ण रस्ता खराब झाला आहे. गत काही वर्षांपुर्वीच या रस्त्याचे काम झाले असुन पुन्हा हा रस्ता जैसे थे झाला आहे.

या रस्त्याने वाहन धारकांना आपले वाहन चालविणे अत्यंत कठिण होऊन बसले असुन वाहन धारकांना आपला जिव धोक्यात घालुन या रस्त्याने वाहन चालवण्यासाठी कसरत करावी लागते. त्यामुळे मनसेच्या वतीने दिनांक ०४ सप्टेंबर २०२५ रोजी सार्वजनिक बांधकाम विभाग चिखली येथे निवेदन देण्यात आले मागणी मान्य न झाल्यास आंदोलनाचा इशारा चिखली शहर अध्यक्ष नारायण देशमुख यांनी दिला आहे. यावेळी म नसेचे शेतकरी सेनेची जिल्हाध्यक्ष प्रदीप भवर तालुका सचिव प्रवीण देशमुख तालुकाध्यक्ष संजय दळवी दिनकर खरंपास मधुकर ठेंग उपस्थित होते.

## बाप्पा मोरयाच्या जयघोषात डोणगाव येथे गणपती विसर्जन

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**डोणगाव दि.७:** डोणगाव येथे दि. ६सप्टेबर ला गणपती बाप्पा मोरया पुढच्या वर्षी लवकर या च्या जयघोषात गणपती बाप्पा ला मोठ्या थाटात वाजतगाजत निरोप देण्यात आला. यावेळी सकाळीच गणपती बाप्पा च्या मिरवणूकीला प्रभात फेरी मार्गाने सुरवात झाली यावेळी डोणगाव येथील १४ गणेश मंडळ सहभागी झाले होते तर अष्टविनायक गणेश मंडळ यांने पारंपरिक पद्धतीने टाळ मृदगांच्या निनादात गणपती बाप्पा ला निरोप देऊन डिजे मुक्तीचा संदेश दिला तर अनेक गणेश मंडळांनी खर्च टाळीत दुपारीच गणेशाचे विसर्जन करून अवास्तव खर्च टाळण्याचा संदेश दिला. तर ८गणेश मंडळांनी संपूर्ण प्रभात फेरी मार्गाने मिरवणूक काढली यामध्ये बालगोपाल मंडळी व तरुणांचा उत्साह दिसून येत होता यावेळी प्रभात फेरी मार्गाने गणेश मंडळाच्या नास्त्याची व्यवस्था सामाजिक संघटना यांनी केली होती तर अनेक पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी गणेश मंडळाच्या अध्यक्षांचे शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला यावेळी ठाणेदार अमरनाथ नागरे व शांतता समितीचे सदस्य यांनी चोख बंदोबस्त ठेवला होता. तर दुसऱ्या दिवशी ७सप्टेबर ला डोणगाव पोलीस स्टेशन च्या गणपती बाप्पा मोरया पुढच्या वर्षी लवकर या च्या जयघोषात वाजत गाजत विसर्जन करण्यात आले.

## नवदुर्गा विसर्जन सुरक्षित व्हावे व देवी देवतेचे विटंबन टाळण्याकरिता घाटाचे निर्माण करावी: विहिप

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**मलकापूर ७ :** हिंदू धर्म मधील धार्मिक उत्सव श्रीगणेशोत्सव,नवरात्र मध्ये म लकापूर शहर व तालुक्या मध्ये नदी, तलाव काठी विसर्जन घाट नसल्याने तालुक्यामधील भाविक भक्त मंडळी विसर्जनासाठी विसर्जन घाट बनवण्याबाबत विश्व हिंदू परिषद बजरंग दल द्वारे मलकापूर मतदारसंघाचे आमदार चैनसुख संचेती, उपविभागीय अधिकारी, मलकापूर मुख्य कार्यकारी अधिकारी मलकापूर नगर परिषद यांना निवेदनाद्वारे मागणी ६ सप्टेंबर रोजी मलकापूर गणेश विसर्जन मिरवणूक प्रारंभ प्रसंगी करण्यात आली.

मलकापूर मतदारसंघात ग्रामीण भागात तसेच शहरी भागामध्ये श्रीगणेश,नवदुर्गा भक्त स्वतःचे जीव धोक्यात घालून नदी पात्रात उतरतात , विसर्जन घाट नसल्याने मजबुरीत ते पुला वरुन गणेश प्रतिमा फेकतात आणि याने हिंदू देवी देवतांची विटंबना होते . विहिप द्वारे मलकापूर मतदार संघातील आपल्या देवी देवतांची विटंबना न होण्या करिता धुरपेश्वर तसेच शहर मध्ये बोदवड रोड वरील नदीच्या पुलावर विसर्जन घाट बांधण्यात यावे तसेच बोदवड रोड नदीच्या घाटात जवळ दसरा मैदान आहे या घाटांचा उपयोग विजया दशमी उत्सव पाहण्या करिता शहरातील हजारोंच्या संख्येत लोक येतात घाट निम र्ण झाल्यास या लोकांनाही उत्सव बघण्यास सुविधा होईल असे निवेदन मध्ये नोंद आहे. निवेदन देताना विश्व हिंदू परिषद बजरंग दल मलकापूर पदाधिकारी उपस्थित होते.

## कंत्राटी आरोग्य कर्मचारी तीव्र आंदोलनाच्या पवित्र्यात

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**बुलडाणा दि.७ :** पंधरा दिवसापासून बेमुदत संपावर थाली नांद करत सरकारचे लक्ष वेधले. शासकीय आरोग्य सेवेत कायमस्वरूपी सामावून घ्यावे या प्रमुख मागणीसह इतर मागण्यांसाठी आरोग्य विभागातील कंत्राटी कर्मचारी अधिकारी गेल्या पंधरा दिवसापासून बेमुदत संपावर गेलेले आहेत.

मात्र अजूनही त्यांच्या मागण्या पूर्ण होत नसल्याने बुलढाण्यात थाळी नाद करत या कर्मचाऱ्यांनी सरकारचे लक्ष वेधले. बुलढाणा जिल्ह्यातील साडेसातशे पेक्षा अधिक कर्मचारी संपावर गेल्याने आरोग्य यंत्रणा प्रभावीत झाली आहे. मोठ्या प्रमाणात गरोदर महिला, लहान बालकांचे लसीकरण ठप्प झाले आहे. तर मागण्या मंजूर करण्याऐवजी सरकार कर्मचाऱ्यांना कारवाई करण्याचा इशारा देत दबाव तंत्राचा वापर केला जात असल्याने हे कर्मचारी आता तीव्र स्वरूपाच्या आंदोलनाच्या पवित्र्यात आहेत.

## आमदार निधीतून वीरशैव लिंगायत समाजाच्या रुद्रभुमीमधे बसण्यासाठी टिनशेड द्या: मागणी

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**डोणगाव दि.७ :** डोणगाव येथील विरशैव लिंगायत सम ाजाचे रुद्रभुमी (दफन) भुमी मध्ये बसण्यासाठी टिनशेड अथवा सिमेंट बांधकामाचे सभागृह देण्यात यावे अशी मागणी डोणगाव येथील विरशैव लिंगायत समाजाचे जिल्हा अध्यक्ष सुरेश फिसके व प्रदेश प्रतिनिधी अनिलअप्पा आवटी सह संपुर्ण समाजाच्या वतीने दि. ७ सप्टेबर ला म हकर मतदार संघाचे आमदार सिद्धार्थ खरात यांना निवेदन देऊन करण्यात आली.

त्यांनी आपल्या निवेदनात सामाजिक द्रृष्टीकोनातून विरशैव लिंगायत समाज डोणगाव व ईतर रुद्रभुमी मध्ये दफन करणारे समाज नाथसम ाज व ईतर समाज यांच्या साठी आपण आमदार निधीतून डोणगाव येथे आमच्या सम ाजाजवळ उपलब्ध असलेल्या रुद्रभुमी च्या जागेत दफनभूमी मध्ये दफन विधी क्रियेसाठी येणाऱ्याना आपल्या निधीतून टिनशेड किंवा पक्के सिमेंट बांधकामाचे सभागृह देण्यात यावे जेणेकरून येणाऱ्या आप्त स्वकीय तसेच नातेवाईक यांना दफनभूमीत बसण्यासाठी जागा होईल व त्यांचे उन व वारा व पाऊस यापासून संरक्षण होईल त्यामुळे आपण सर्व समाजाच्या सामाजिक द्रृष्टीकोनातून आपल्या आमदार निधीतून त्वरित बसण्यासाठी निधी देऊन टिनशेड किंवा पक्के सिमेंट बांधकाम करून सभागृह द्यावे असे नमुद असुन सदर निवेदनावर समाजबांधवाच्या सह्या असून डोणगाव येथे आमदार सिद्धार्थ खरात यांना निवेदन देण्यात आले.

यावेळी विरशैव लिंगायत समाजाचे महाराष्ट्र वीरशैव लिंगायत सभा बुलढाणा जिल्हा अध्यक्ष सुरेश आपा फिसके व अनिल आपा आवटी व डीगांबर आपा बुरखंडे व राहुल बुरखंडे व दिपक आपा बुरखंडे गजानन सातपुते सर व ईतर रुद्रभुमि समाज बांधव उपस्थित होते.

## डिग्रस रोडवर वाहतूक जाम, पोलिसांचे दुर्लक्ष

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**देउळगाव राजा दि.७ :** तालुक्यातील सर्वात मोठी बाजारपेठ असलेल्या देऊळगाव मही येथे डिग्रस रोडवर वारंवार वाहतूक ठप्प होण्याचे प्रकार घडत आहेत. संबंधित प्रकाराकडे पोलिसांचे दुर्लक्ष असल्याने नागरिकांमध्ये संताप निर्माण होत आहे.

देऊळगाव मही येथे तालुक्यातील सर्वात मोठी बाजारपेठ असून पंचक्रोशीतील पंचवीस ते तीस खेड्यांचा या बाजारपेठेशी संबंध आहे. दररोज नागरिक खरेदीसाठी या बाजारपेठेत येत असतात रविवारी देऊळगाव मही येथे आठवडी बाजार असतो. मेन रोडवरील चौकापासून दुसरबीड, मलकापूर पांगरा, वाकद, तढेगाव, टाकरखेड वायाळ, खैरव, डिग्रस या गावाकडे या चौकातून जाण्यासाठी रस्ता आहे. मात्र या रस्त्यावर ट्रॅक्टर, प्रवाशी वाहतूक करणारे मॅक्झिमो,ॲपे अशी वाहने उभी केलेली असतात. त्यामुळे या चौकातून जाण्यासाठी वाहनांना जागाच मिळत नसलेले वारंवार या रस्त्यावरती वाहतूक ठप्प होण्याचे प्रकार वाढले आहेत. या रस्त्यावरील वाहने उभी राहत असल्याने या रस्त्यावरील मोठे व छोटे व्यापारी सुध्दा त्रस्त झाले आहे. रविवारी एसटी महामंडळाच्या दुसरबिडला जाणाऱ्या बसला जागाच मिळाली नसल्याने अर्धा तास वाहतूक ठप्प झाली होती. बसचे चालक शिवानंद जायभाये व वाहक एकनाथ बकाल यांना स्वतः खाली उतरून पुढे जाण्यासाठी

> सदर चौकात उभी केलेली मोठी व छोटी चारचाकी वाहने यामुळे रस्ता अरुंद होता. रविवारी आम्ही दुचाकीवरून प्रवास करत होतो. घडलेला प्रकार अतिशय निंदनीय व चीड आणणारा होता. पोलीस प्रशासनाने या प्रश्नाकडे तातडीने लक्ष देण्याची गरज आहे. **-सौ.अंजली आंधळे**

रस्ता मोकळा करावा लागला. देऊळगाव मही पोलीस चौकीचे या गंभीर समस्येकडे सातत्याने दुर्लक्ष होत आहे.

वाहतूक ठप्प झाल्यानंतर उभ्या असलेल्या वाहनांच्या चालकासोबत भांडणाचे प्रसंग निम र्ण होत आहे. डिग्रस चौकापासून रस्यावर उभ्या राहणाऱ्या वाहनांना त्वरित पायबंद घालून हा रस्ता वाहतूक सुरळीत होण्यासाठी मोकळा ठेवावा, अशी मागणी नागरिकांमधून व्यक्त होत आहे. रविवारी वाहतूक ठप्प होण्याच्या घडलेल्या प्रकाराबद्दल एस टी महामंडळाचे चालक शिवानंद जायभाये, वाहक एकनाथ बकाल यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली.

अजिंक्य भारत
# आपलं बुलडाणा
२
बुलडाणा, सोमवार, दि.८ सप्टेंबर २०२५

**महत्त्वाचे**

## खामगाव येथे आज रोजगार मेळावा

**खामगाव :** जिल्ह्यातील सुशिक्षित बेरोजगार युवक-युवतींना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र तथा मॉडेल करिअर सेंटर, बुलडाणा आणि मुलभूत प्रशिक्षण तसेच अनुषंगिक सूचना केंद्र खामगाव यांच्या संयुक्त विद्यमाने पंडित दिनदयाल उपाध्याय रोजगार मेळावा / प्लेसमेंट ड्राईव्ह सोमवार, दि. ८ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी १० वाजता शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था खामगाव येथे आयोजित करण्यात आला आहे. पात्र इच्छुक युवक-युवतींनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त ग.प्र. बिटोडे यांनी केले आहे. या रोजगार मेळाव्यात विविध नामांकित कंपन्यांचे प्रतिनिधी उपस्थित राहून उमेदवारांच्या मुलाखती घेणार असून, प्राथमिक निवड प्रक्रियाही करण्यात येणार आहे. तसेच निवड झालेल्या उमेदवारांना कंपन्यांमध्ये प्रत्याक्ष प्रशिक्षणाची संधी देखील उपलब्ध होणार आहे.

## रेशन दुकानात गहू उपलब्ध करून द्यावा

**मलकापूर :** हिंदु व मुस्लीम बांधवांच्या सणासुदीच्या दिवसात शासनाने गव्हाचे वितरणच बंद केल्याने तीव्र संताप व्यक्त होत असून शासनाने गव्हाचे वितरण जरीत करावे, अशी मागणी राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीच्या वतीने आज ४ सप्टेंबर रोजी उपविभागीय अधिकारी यांचेकडे एका निवेदनाद्वारे करण्यात आली. दिलेल्या निवेदनात नमूद आहे की, सार्वजनिक वितरण प्रणाली अंतर्गत स्वस्त धान्य दुकानांमार्फत गोरगरीब व पात्र लाभार्थ्यौना धान्याचा पुरवठा करण्यात येतो. यावर्षी शासनाने जून, जुलै व ऑगस्ट या तीन महिन्यांचा धान्यपुरवठा एकदाच करून वितरण केले होते. मात्र सप्टेंबर २०२५ मधील पुरवठ्यात शासनाने गहू न देता केवळ तांदूळ व ज्वारी वितरित करण्याचा निर्णय घेतल्याने तसेच हिंदू व मुस्लीम बांधवांच्या सणासुदीच्या दिवसांतच हा निर्णय घेतल्याने गरजू, गरजवंत व पात लाभार्थ्यांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.वाकतकर, वसंता चोपडे, जी. आर. पटोकार यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## अवैध वाळुची वाहतूक; दोन वाहने पकडले

**किनगाव राजा :** किनगाव राजा पोलिसांनी अवैध वाळू वाहतुकीविरुद्ध मोठी कारवाई करत दोन टिप्पर तसेच लोकेशन देण्यासाठी वापरली जाणारी स्विफ्ट डिझायर कार जप्त केली आहे. या कारवाईत चार आरोपींना अटक करण्यात आली असून एकूण १८ लाख ६२ हजार रुपयांचा मुद्देमाल पोलिसांच्या ताब्यात आला आहे. ५ सप्टेंबर रोजी पहाटे ३ वाजता हिवरखेड-पूर्णा रोडवर एमएच-२८-बीबी-६११२ क्रमांकाचा टिप्पर अवैधरित्याा वाळू वाहतूक करताना पोलिसांनी पकडला. त्यानंतर सकाळी साडेतीनच्या सुमारास किनगाव राजा बसस्थानकाजवळ दुसरा टिप्पर एमएच-२८-बीबी-९०४८ पकडण्यात आला. या वाहनात दोन ब्रास वाळू आढळून आली. या कारवाईत वाहनासह एकूण ८ लाख ६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी टिप्पर मालक संतोष गबाजी भुमकर व बीवालक भरत संजय राठोड रा. ताडशिवणी यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला. त्याचप्रमाणे दुसऱ्या प्रकरणात लोकेशन देण्यासाठी वापरण्यात आलेली स्विफ्ट डिझायर कार एमएच-२८-बीक्यू-६७४९ जप्त करण्यात आली. या कारमध्ये असलेले टिप्पर मालक समाधान नारायण मोरे आणि चालक सचिन नामदेव राठोड रा. ताडशिवणी) यांनाही पोलिसांनी अटक केली.

# बुलडाणा अर्बन कर्मचारी गणेशोत्सव मंडळाचा उपक्रम

## हिंदी गीतांचा सूमधुर कार्यक्रम सुनहरे पलला बुलडाणेकरांचा प्रतिसाद

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**बुलडाणा दि.७ :** येथील बुलडाणा अर्बन कर्मचारी गणेशोत्सव मंडळाच्या वतीने कर्मचाऱ्यांसाठी दि ४ सप्टें. रोजी बुलडाणा अर्बन संस्थेच्या गोवर्धन सभागृहात सुनहरे पल कार्यक्रम उत्साहात झाला. या उत्साह पुर्ण वातावरणात रंगलेल्या सुनहरे पल ला रसिक श्रोत्यांनी भरभरून दाद दिली. बुलडाणा अर्बन संस्थेचे सरव्यवस्थापक कैलास कासट व मान्यवरांच्या उपस्थितीत भारत मातेचे पूजन करण्यात आले.

यावेळी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी बुलडाणा अर्बन संस्थेचे संस्थापक अध्यक्ष राधेश्याम चांडक उपाख्य भाईजी, संस्थेचे अध्यक्ष डॉ सुकेश झंवर, आणि बुलडाणा अर्बन चॅरिटेबल सोसायटीच्या अध्यक्षा सौ कोमलताई सुकेशजी झंवर यांनी सर्व कर्मचाऱ्यांना शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाच्या सुरुवात राहुल श्रीकांत वडुळकर यांच्या गणेश आरतीने झाली. त्याांच्यासोबत सौ मनिषा दलाल, कैलास मिश्रा, निलेश बनसोडकर, अरुण देशपांडे, अनिल देशपांडे, यांनी सुरेख साथ दिली. प्रतिक्षा जाधव यांनी दिस चार झाले मन यांनी सुरेख गीत गाऊन प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले. माझे माहेर पंढरी या गाण्याने वातावरण भक्तिमय झाले होते. गिरीश मेहुनकर यांनी एस बॉस या चित्रपटातले अभिजित भट्टाचार्य यांनी गायलेल्या मै कोई ऐसा गीत गाऊ या गीताने प्रेक्षकांना गुणगुणायला लावले. प्रविण जाधव यांनी पाहिले न मी तुला.. या सुरेश वाडकर च्या गीताला प्रत्येक जण या गीताला गुणगुणत होते. अनिरुद्ध जोशी यांनी ऋषी कपूर व टिना मुनिम यांच्या वर चित्रीत झालेल्या दर्दे दिल दर्दे जिगर या गाण्याने वातावरण रोमॅंटिक झाले होते. वैशाली गुलवाडे यांनी कुदरत या चित्रपटातले हेमा मालिनी व राजेश खन्ना यांच्या तुने ओ रंगीले कैसा जादू किया या गीताला महिला वर्गानी भरभरून दाद दिली. अनिल देशपांडे यांनी जिंदगी एक सफर हैं सुहाना हे गीत सादर करून तर संपूर्ण वातावरण आल्हाददायक केले होते. सौ मनिषा दलाल तेरे संग प्यार नहीं तोडना, महेश बाहेकर यांनी हिची चाल तुरु तुरु,विजय डोईफोडे छल्काये जाम, सुनील जाधव जिये तो जिये कैसे,किशोर



पंडित ओ गमे जिंदगी कुछ तो दे मश्वरा, राजेंद्र वाणेरे और इस दिल में क्या रखा हैं, अरुण देशपांडे चांद से परदा किजीऐ, राजेश तायडे ओ महेबुबा तुझे जाना, अविनाश गुल्हाने ओ हंसीनी कमान उड चली, लीना पुराणीक ये समा समा हैं ये प्यार, प्रशांत काळवाघे यांनी आशिकी मधील अब तेरे बीन जी लेंगे हम या गीताने वातावरण गंभीर केले होते.प्रशांत घुसळकर रविंद्र कुळकर्णी, मनिष राऊत, संजय कस्तुरे, सुमेध सावदेकर, गोपाल सरप या सर्वांनी देखील सुरेख गीत सादर करून उपस्थितांची मने जिंकली, तर कार्यक्रमाला खरा आनंद तर कैलास मिश्रा आणि निलेश बनसोडकर यांच्या प्यार करनेवाले प्यार करते हैं शान से ,आणि निलेश बनसोडकर यांच्या कितने भी तू करले सितम गीताने तर धमाल उडवून दिली,आणि प्रेक्षकांनाही मनमुराद आनंद लुटला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुधीर वानखेडे यांनी अतिशय सुंदर केले. या कार्यक्रमाला मेलेडी मेकर्स, अम रावती यांनी सुरेख संगीतबद्ध केले. या कार्यक्रमाला बुलडाणा अर्बन कर्मचारी गणेशोत्सव मंडळाचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, व कार्यकारिणीचे सर्व सदस्य आणि मुख्यालयातील सर्व पदाधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## मोरखेड-दुधलगांव रस्त्याची दुरावस्था



अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**मलकापूर दि.७ :** तिंलुक्यातील ग्राम मोरखेड - दुधलगांव रस्त्याची दुरावस्था झाली असून मोरखेड येथील १२१ विद्यार्थी-विद्यार्थीनी दुधलगांव येथील शाळेत शिक्षणासाठी ये-जा करतात मात्र या रस्त्याावरील मरीमाता मंदिराजवळ साठीचा नाला असून ग्राम निपाणा कडून या नाल्याने पाण्याचा प्रवाह वाहत असल्याने या विद्यार्थ्यांना जीव धोक्यात घालून या रस्त्याने ये-जा करावी लागत आहे या नाल्यावर तात्काळ पुलाची निर्मिती करून पुढील रस्ता रुंदीकरण करण्याची मागणी शिवसेना (उबाठा) उपजिल्हाप्रमुख गजानन ठोसर यांनी जि.प बांधकाम विभाग अभियंता भागवत साळुंके यांना एका निवेदनाद्वारे केली आहे. निवेदनात नमूद केले आहे की मोरखेड येथील १२१ विद्यार्थी व विद्यार्थिनी दुधलगांव येथे शिक्षणासाठी ये-जा करतात मात्र मरी माता मंदिर जवळ साठीच्या नाल्यातुन पावसाळ्यात पाणी वाहत असल्याने या पाण्यातून विद्यार्थ्यांना ये- जा करावी लागत आहे प्रशासनाने याची तात्काळ दखल घेऊन दहा दिवसात या नाल्यावर पुलाची तात्काळ निर्मिती करावी व रस्त्याचे रुंदीकरण करावे अन्यथा त्या नाल्यातच दि.१५ सप्टेंबर सोमवार पासून विद्यार्थ्यांसह शेतकरी, ग्रामस्थ व शिवसेना(उबाठा) पदाधिकारी आमरण उपोषण करतील असा इशारा निवेदनाद्वारे देण्यात आला आहे. आज शनिवार सकाळची शाळा सुटतेवेळी संबंधित नाल्याच्या ठिकाणी जाऊन शिवसेना उपजिल्हाप्रमुख गजानन ठोसर,शहर प्रमुख हरीदास गणबास, युवासेना शहरप्रमुख मंगेश सातव,मोरखेड माजी ग्रा.प सदस्य गणेश उमाळे, उमेश सोनवणे सह शिवसेना पदाधिकाऱ्यांनी पाहणी केली.यावेळी नुकतीच शाळा सुटल्यावर नाल्यातील पाण्यातून मार्ग काढतांना ओम काळे, आदेश जंगले, सात्विक नाफडे व शेतकरी उपस्थित होते.

## ईद-ए-मिलाद निमित्त दगडी मस्जिदमध्ये महा रक्तदान शिबीर

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**साखरखेर्डा दि.७ :** येथे ईद ए मिलाद उन नबी च्या पावन पर्वावर खल्क फाउंडेशनच्या वतीने महा रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात हिंदू - मुस्लिम बांधवांनी सहभाग घेत १८५ रक्तदात्यांनी रक्तदान केले.

साखरखेर्डा येथील मुस्लिम बांधवांनी सकाळी ईद ए मिलाद निमित्ताने भव्य मिरवणूक काढण्यात आली. प्रत्येक ठिकाणी फुलांचा वर्षाव करुन स्वागत करण्यात आले. दुपारची नमाज अदा केल्यानंतर दगडी मस्जिद मध्ये महा रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. दुपारी दोन वाजता सुरू झालेल्या शिबिराचा शेवट रात्री आठ वाजता झाला . तब्बल १८५ रक्तदात्याांनी रक्तदान केले. या शिबिरात ठाणेदार गजानन करेवाड, अमित जाधव, डॉ. गणेश देशमुख, वंचित आघाडीचे जिल्हा सरचिटणीस विशाल गवई,



श्याम खरात, सिध्दार्थ बेंदाडे, खिदमत खल्क फाउंडेशनचे अध्यक्ष मो समीउलहक, आबीद पठाण , शे राजीक, सिकंदर पठाण, जुबेर पठाण, अब्दुल रशीद, शे अर्शद, शेख वसीम यांच्यासह १८५ नागरिकांनी रक्तदान केले. यावेळी माजी सरपंच दाऊद कुरेशी, माजी सरपंच महेंद्र पाटील , युवासेना नेते योगेश जाधव, जिल्हा परिषद माजी उपाध्यक्ष रामभाऊ जाधव, माजी उपसरपंच सय्यद रफीक, अस्लम अंजुम, आयुबसेठ कुरेशी यांची उपस्थिती होती. रक्त संकल वाशिम आणि जालना येथील रक्त पेढीने केले. यासाठी डॉ कृष्णा सांगळे आणि टीमचे योगदान लाभले.

## एकनाथ वाघ यांची हॉवर्ड विद्यापीठात उच्च शिक्षणासाठी निवड

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**चिखली दि.७ :** लोणार तालुक्यातील चिखला गावातील सुपुत्र एकनाथ भगवान वाघ यांची अमेरिकेच्या अतिशय प्रतिष्ठित हॉवर्ड विद्यापीठात उच्च शिक्षणासाठी निवड झाली त्यासाठी त्याला पावणेदोन कोटी रुपये कॉलरशिप मिळाली असल्याने परिसरात आनंदाचे वातावरण पसरले आहे.

या ऐतिहासिक यशाबद्दल त्यांचा सत्कार समारंभ बिबी येथील वसंतराव नाईक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात पार पडला. संस्थेचे सचिव अभय जगारावजी चव्हाण व संचालिका मायाताई अभय चव्हाण यांच्या हस्ते एकनाथ व त्याचे वडिल यांचा शाल, श्रीफळ, हार व रोख रक्कम २१ हजार रुपये देऊन गौरव करण्यात आला. यावेळी उपस्थित सर्व मान्यवरांनी व विद्यार्थ्यांनी टाळ्यांच्या गजरात एकनाथ यांचे स्वागत केले. या प्रसंगी बोलताना सचिव अभय दादा चव्हाण म्हणाले, ''आज आपल्या भागातील मुलाने थेट हॉवर्डसारख्या जागतिक दर्जाच्या विद्यापीठात प्रवेश मिळवून इतिहास घडवला आहे. ग्रामीण भागातील मुले मेहनत, चिकाटी आणि आत्म विश्वासाच्या जोरावर कुठेही पोहोचू शकतात याचे हे मोठे उदाहरण आहे. एकनाथ वाघ यशस्वी झाले म्हणजे आपल्या चिखलाच नव्हे तर संपूर्ण लोणार तालुक्याचा, बुलढाणा जिल्ह्याचा आणि महाराष्ट्राचा अभिमान आहे.'' ते पुढे म्हणाले, ''आपले शिक्षणसंस्थापक व माजी आमदार कै. जगरावजी चव्हाण यांनी शिक्षण प्रसारासाठी आयुष्यभर परिश्रम घेतले. त्यांच्या स्मृतिदिनानिमित्त दरवर्षी १ लाख ११ हजार रुपयांची विशेष शिष्यवृत्ती देण्यात येणार आहे. या उपक्रमाचा पहिला मानकरी एकनाथ वाघ आहे. या शिष्यवृत्तीमुळे दरवर्षी ग्रामीण भागातील हुशार विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळेल.''

सत्कारानंतर स्वतः एकनाथ वाघ यांनी आपल्या शैक्षणिक प्रवासाचा उलगडा केला. ते म्हणाले, ''मी एका साध्या शेतकरी कुटुंबात जन्मलो. आमच्या घरची आर्थिक परिस्थिती अत्यंत कठीण होती. पण शिक्षणाची आवड आणि शिक्षकांचा आधार यामुळे मी कधीच हार मानली नाही. गावातून जिल्हा, जिल्ह्यातून राज्य आणि आता थेट अमेरिकेपर्यंतचा हा प्रवास सोपा नव्हता. अनेक अडचणी आल्या, पण प्रत्योक संकटाने मला मजबूत केले.'' ते पुढे म्हणाले, ''आज मी इथे उभा आहे, ते माझ्या आई-वडिलांच्या आशीर्वादामुळे, शिक्षकांच्या मार्गदर्शनामुळे आणि मित्रांच्या पाठिंब्यामुळे. विद्यार्थ्यांना एवढंच सांगू इच्छितो की, आपल्याकडे साधनं कमी असली तरी स्वप्नं मोठी असली पाहिजेत. असेही त्यांनी सांगीतले.

## ओबीसी अधिकारी,कर्मचारी संघाचे राज्य अधिवेशन १४ सप्टेंबरला

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**शेगाव दि.७ :** मंडल आयोग अहवालाची अंम लबजावणीची घोषणा तत्कालीन प्रधानमंत्री व्ही. पी. सिंग यांनी ७ ऑगस्ट १९९० रोजी केली होती. तसेच सत्याशोधक समाजाची स्थापना महात्मा ज्योतीराव फुले यांनी २४ सप्टेंबर १८७३ रोजी केली होती. या दोन ऐतिहासिक दिवसांच्या स्म रणार्थ ओबीसी अधिकारी कर्मचारी संघाच्यावतीने गतवर्षी प्रमाणे यावर्षी सुध्दा राज्य अधिवेशन व एक दिवशीय चिंतन शिबीराचे आयोजन येत्या १४ सप्टेंबर (रविवार) रोजी शेगाव येथील विघ्नहर्ता हॉटेल येथे करण्यात आले आहे, अशी माहीती पत्रकार परिषदेत संघटनेचे महासचिव राम वाडीभष्मे यांनी दिली.

या अधिवेशनाचे अध्यक्षस्थान संघटनेचे संस्थापक अध्यक्ष व माजी उपजिल्हाधिकारी सुनील शेळके भूषविणार आहेत. तर प्रमुख वक्ते म्हणून युनिटी ऑफ मुलनीवासी समाजाचे राष्ट्रीय अध्यक्ष व ओबीसी अभ्यासक कमलाकांत (कुमार) काळे आणि जीएसटी विभागाचे माजी असिस्टंट कमिशनर व एससी, एसटी, ओबीसी कर्मचारी वेल्फेअर फेडरेशनचे राष्ट्रीय अध्यक्ष संजय थुल उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत. तसेच अधिवेशनाचे स्वागताध्यक्ष पद संघटनेचे बुलडाणा जिल्हाध्यक्ष किशोर पवार हे भूषविणार आहेत.

दरम्यान उद्धघाटकीय सत्रात ओबीसी सम ाजाचे अभ्यासक व लेखक कमलाकांत (कुमार) काळे हे ओबीसी आरक्षण : सामाजिक लढा व आताची परिस्थीती या विषयावर भाष्य करतील तर माजी असिस्टंट कमिशनर संजय थुल हे अधिकारी व कर्मचारी यांच्या समोरील आव्हाने या विषयावर आपले विचार मांडतील. तर द्वितीय सत्रात नीट, जेईई व स्पर्धा परीक्षेत यशस्वी झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार केला जाणार असून, त्यानंतर सामूहिक चर्चा, ठराव व संघटनेची पुढील कार्यदिशा सुनिश्चित केली जाईल.

या अधिवेशनाला ओबीसी समाजातील अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी व समाजबांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन कार्यक्रमाचे स्वागताध्यक्ष व संघटनेचे बुलडाणा जिल्हाध्यक्ष किशोर पवार यांनी केले आहे.

## शेंदुर्जन परिसरात अतिवृष्टीमुळे पिकांचे मोठे नुकसान

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**शेंदुर्जन दि.७ :** शेंदुर्जन आणि आजूबाजूच्या भागात गेल्या दीड महिन्यापासून सुरू असलेल्या सततच्या पावसामुळे शेतीत मोठं नुकसान झालं आहे. पिकांची वाढ खुंटली असून, शेतकरी हवालदिल झाले आहेत. सतत पाऊस पडल्यामुळे सोयाबीन पिवळं पडलं आहे आणि शेंगा पोकळ राहिल्या आहेत. सूर्यप्रकाश नसल्यामुळे दाणे भरलेले नाहीत, ज्यामुळे शेतकऱ्यांचं मोठं नुकसान झालं आहे. त्यााचप्रमाणे, तुरीचं पीकही पूर्णपणे खराब झालं आहे. झाडं पिवळी पडून त्यांची पानं गळून पडली आहेत, केवळ उभ्या काड्याच शिल्लक आहेत. यामुळे तुरीचं पीकही पूर्णपणे निकामी झालं आहे.



याशिवाय, सततच्या पावसामुळे कपाशीची वाढ थांबली आहे. परिणामी, कपाशीचं पीक घेणंही शेतकऱ्यांसाठी अशक्य झालं आहे. एकंदरीत, हे शेतकऱ्यांसाठी एक मोठं संकट असून, हा ओला दुष्काळच म्हणावा लागेल. त्यामुळे, शेतकरी प्रशासनाकडून अतिवृष्टीची मदत मिळण्याची मागणी करत आहेत. शेंदुर्जन मंडळाची पाहणी करून तातडीने मदत द्यावी, अशी त्यांची मागणी आहे.

## गो.से.महाविद्यालयात शिक्षक दिन उत्साहात साजरा



अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**खामगाव दि.७ :** विदर्भ शिक्षण प्रसारक मंडळ, खामगाव संचलित गो.से. विज्ञान, कला व वाणिज्य महाविद्यालयातील रा.से.यो. पथकाद्वारे शिक्षक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात उपप्राचार्य डॉ. प्रफुल्ल उबाळे, रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी डॉ. डी. टी. अढाऊ, सह-कार्यक्रमाधिकारी प्रा. उमेश खंदारे तसेच विद्यार्थी यांच्या उपस्थितीत डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन आणि थोर समाजसुधारक संत गाडगे महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आली.

सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. उमेश खंदारे यांनी केले. विद्यार्थ्यांनी शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त करणारी मनोगते सादर केली. उपप्राचार्य डॉ. प्रफुल्ल उबाळे यांनी मार्गदर्शन करताना विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्व घडविण्यातील शिक्षकांचे अनमोल योगदान अधोरेखित केले. कु. धनश्री पिळवटकर हिने शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त करणारी कविता सादर केली. या प्रसंगी प्रा. डॉ. अढाऊ यांनी शिक्षक विद्यार्थ्यांचे व्यक्तिम त्व विकास घडविण्यात मोलाची भूमिका बजावतात, असे प्रतिपादन केले. त्यांनी विद्यार्थ्यांना मिळालेल्या संधीचं सोनं करण्याचा सल्ला दिला. कार्यक्रमास महाविद्यालयातील प्रा. डॉ. खडसे सर, रा.से.यो.चे स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. एस. तळवणकर सरांचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रा.से.यो. स्वयंसेविका कु. पूजा हिने केले तर कु. दीक्षा ढोके हिने मान्यवरांचे आभार मानले. असे प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविल.

## गगनभेदी गर्जनाने साखरखेर्डा नगरी दुमदुमली, आठ गणेश मंडळाचे थाटात विसर्जन

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**साखरखेर्डा दि.७ :** येथील आठ गणेश मंडळांनी सार्वजनिक गणेशोत्सव मिरवणुकीत सहभागी होऊन मोठ्या उत्साहात श्रीगणेशाचे विसर्जन केले . यावेळी गणपती बाप्पा मोरया पुढच्या वर्षी लवकर या , या गगनभेदी गर्जनाने साखरखेर्डा नगरी दुमदुमली होती . तर सकाळी बालगणेश मंडळाच्या १५ मंडळातील कार्यकर्त्यांनी विसर्जन केले .

सर्वप्रथम महात्मा ज्योतिबा फुले सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ दुपारी दोन वाजता दगडी मस्जिद समोर आले . तेथून मुख्य मिरवणूक सुरू झाली . गुलालाची उधळण करीत गणपती बाप्पा मोरया पुढच्या वर्षी लवकर या , या गगनभेदी गर्जनाने साखरखेर्डा नगरी दुमदुमली होती . महात्मा ज्योतिबा फुले मंडळाने यावर्षी मल्लखांब प्रात्याक्षिके सादर केली. त्या पाठोपाठ अहिल्याबाई होळकर सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ, बालनाथ सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ , परदेशी सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ , श्री शिवाजी व्यायाम शाळा सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ , हिंदू सुर्य महाराणा प्रताप सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ , संत रविदास सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ , श्री शिवाजी हायस्कूल सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ सहभागी झाले होते . प्रत्येक मंडळासमोर आप आपले कार्यकर्ते नाचत होते . दगडी मस्जिद, गुजरी चौक, अहिल्याबाई होळकर नगर, रोहिल पुरा, महात्मा ज्योतिबा फुले नगरातून मिरवणूक सायंकाळी सात वाजता भोगावती नदीवरील पुलावर विसर्जन मिरवणूक थांबली . त्याानंतर गायखेडी तलाव , महालक्ष्मी तलाव आणि महाराणा प्रताप सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ, श्री शिवाजी व्यायाम शाळा मंडळांनी पेनटाकळी प्रकल्पावर श्री गणरायाचे विसर्जन केले . ग्राम पंचायतीच्या वतीने सरपंच सौ ज्योती अमित जाधव आणि कर्मचाऱ्यांनी ग्राम पंचायत समोर पुष्पवृष्टी करीत गणरायाला निरोप दिला . तर संपूर्ण मिरवणूक मार्गावर महिलांनी रांगोळ्यांच्या



पायघड्या घालीत मनोभावे पुजा केली . यावेळी माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष रामभाऊ जाधव , माजी सरपंच चंद्रशेखर शुक्ल , सरपंच सौ ज्योती अमित जाधव , उपसरपंच अंकिता संग्रामसिंह राजपूत , तंटामुक्ती अध्यक्ष संतोष मंडळकर , शांतता कमेटी सदस्य रावसाहेब देशपांडे, अशोक इंगळे, डी एन पांचाळ, रमेश ठोसरे, डॉ . निलम महाजन, संजय जगताप, गजानन इंगळे, निलेश पोंधे, शिवा पाझडे, अंकुर देशपांडे, गोपाल भिमराव शिराळे, रामदाससिंग राजपूत, बादलसिंग राजपूत, सुरेश राजपूत, संतोष राजपूत, गोपाल राजपूत, शिवा गायकवाड, राजु जैन, जगदिश इंगळे, बालाजी इंगळे, शिवाजी शर्मा , देवानंद खंडागळे, आशिष कामे यांनी आप आपल्या मंडळातील कार्यकर्त्यांना शांततेत विसर्जन कसे होईल यासाठी प्रयत्न केले. जिल्हा पोलीस अधीक्षक निलेश तांबे, अप्पर पोलीस अधीक्षक अमोल गायकवाड, उपविभागीय पोलिस अधिकारी प्रदीप पाटील यांनी वेळोवेळी बैठका घेऊन उत्सव आनंदाने साजरा करताना इतर समाजाला कोणताही त्रास होणार नाही याची काळजी घेण्याचे आवाहन केले होते. ६ सप्टेंबर रोजी त्यांच्या मार्गदर्शनाखाली ठाणेदार गजानन करेवाड, दुय्यम ठाणेदार रविंद्र सानप, पी एस आय गणेश डोईफोडे, राखीव पोलीस दलाचे पोलिस निरीक्षक धैर्यशील गाडगे, पोलीस निरीक्षक शांतीकुमार पाटील, बुलढाणा राखीव दलाचे राकेश बुरम, राहुल दिवान त्यांच्या समवेत ३४ पोलीस कर्मचारी, ४३ होमगार्ड, २२ आर सी पी कर्मचारी, राज्य राखीव दलाची टीम बंदोबस्ताला होती .

अजिंक्य भारत

# आपलं अमरावती

अमरावती, सोमवार दि. ८ सप्टेंबर २०२५

डॉ. पांडेस् मेड. रेमेडीज (OPC) प्रा.ली.

डॉ. रविराज पांडे ( एम.डी. )

वात, दमा, अस्थमा, वजन वाढविणे, कमी करणे, त्वचा रोग, वंधत्व, लैंगिक समस्या, स्त्री रोग, सर्व प्रकारच्या व इतर रोगांवर उपचार व मार्गदर्शन केल्या जाईल.

व्यंकटेश कॉलनी, शंकरनगर जवळ, अमरावती. ( दर सोमवारी )

C/o राईकवार हॉस्पिटल जयस्तंभ चौक परतवाहा ( दर महिन्याचा 3 रा. शनिवार )

C/o महाराष्ट्र मेडिकल बनोसा रोड, दर्यापूर ( दर महिन्याचा 2 रा. गुरुवार )

वेळ : दुपारी 2 ते सायंकाळी 7 वाजेपर्यंत

मो. 9890043911, 9372151186

## थोडक्यात

### आज विभागीय महिला लोकशाही दिन

**अमरावती, :** महिला व बालविकास विभागाच्या ४ मार्च २०१३ च्या शासन निर्णयानुसार समस्याग्रस्त पिडीत महिलांना त्यांचे प्रश्न मांडण्याकरिता व्यासपीठ मिळावे तसेच त्यांच्या हक्कांचे संरक्षण होवून न्याय मिळावा यादुष्टीने महिलांच्या तक्रारी/अडचणी शासकीय यंत्रणेकडून सोडवून समाजातील समस्यासग्रस्त/पिडीत महिलांना सुलभ मार्गदर्शनाची सुविधा उपलब्ध व्हावी, यासाठी एक प्रभावी उपाययोजना म्हणून महिला लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येते. प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या सोमवारी विभागीय आयुक्तस्तरावर, तिसऱ्या सोमवारी जिल्हाधिकारी कार्यालय तर दर महिन्याच्या चौथ्या सोमवारी तालुका स्तरावर तहसिल कार्यालय या ठिकाणी आयोजित करण्यात येतो. तरी समस्याग्रस्त व पिडीत महिलांनी सदर उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन महिला व बालविकास विभागीय उपआयुक्त विलास मरसाळे यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे करण्यात आले आहे.

### आज शिवाजी महाराज महाराजस्व अभियान

शिरखेड: छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान मौजा पिंपळखुटा मोठा येथे 8 सप्टेंबर रोजी सकाळी 11 वाजता ग्रामपंचायत कार्यालय परिसर येथे आयोजित केलेले आहे. या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून चंदू यावलकर आमदार मोर्शी मतदारसंघ हे उपस्थित राहणार आहेत. तसेच माननीय उपविभागीय अधिकारी प्रदीप कुमार पवार व सागर ढवळे तहसीलदार मोर्शी व माने तालुका कृषी अधिकारी उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत. तसेच यावेळी शेती विषयक व शासनाच्या विविध योजनांच्या बाबत तज्ञांकडून मार्गदर्शन व माहिती देण्यात येणार आहे. तसेच विविध दाखले यांचे वाटप होऊन शेतकऱ्यांच्या समस्या त्वरित निकाली काढण्यात येतील. या शिबिराला उपस्थित राहून या योजनेचा लाभ घ्यावा ही नम्र विनंती

### बंधाऱ्यावरून लोखंडी फाट्यांची चोरी

**मोर्शी :** मनीपूर शेत शिवारात जलसंधारण विभागाचा बंधारा आहे. त्यावरून अज्ञात चोरट्योन ५० पैकी ३७ लोखंडी फाट्या चोरून नेल्या. त्यांची अंदाजे किंमत ४२ हजार रुपये आहे. याबाबत मृदा व जलसंधारण अधिकारी किशोर मनोहरराव बोबडे (४१, रा. अमरावती) यांनी मोर्शी पोलिसात तक्रार नोंदवली. याप्रकरणी अज्ञाताविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

### क्षुल्लक कारणावरून नातेवाईकाला मारहाण

**मोर्शी :** माझ्या घरी का आला असे म्हणत एका नातेवाईकाने दुसऱ्याला काठीने मारहाण करीत पुराणीने शरीरावर टोचे दिले. ही घटना खेड येथे घडली. या प्रकरणी जखमी मनीष नामदेव सोनोने (२०) याच्या तक्रारीवरून मोर्शी पोलिसांनी अजय भोकरे (२७) याच्यासह एका महिलेविरुद्ध गुन्हा नोंदवला.

### चारित्र्यावर संशय घेत मारहाण


**मोर्शी :** पती व सासू विवाहितेच्या चारित्र्यावर संशय घेकत तिला शिवीगाळ करीत मारहाण करतात, तसेच जीवे मारण्याची धमकी देतात. ही घटना पार्टी येथे घडली. विवाहितेच्या तक्रारीवरून मोर्शी पोलिसानी पती व सासू विरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला.

# साडेसहा हजार वारसांचा सात-बारा जिवंत

## मृतकांची वारस नोंद; फेरफार नोंदणीत जिल्ह्याची दमदार कामगिरी

दै. अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**अमरावती, दि. ७ :** अनेक प्रकरणांत मृत खातेदारांच्या वारसाची नोंद सात-बाऱ्यावर नाही. विहित कालावधीत अशा नोंदी अभिलेखात न झाल्याने वारसांना अडचणींना सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे जिल्ह्यात १ एप्रिलपासून 'जिवंत सातबारा मोहीम' राबविण्यात येत आहे. या मोहिमेत जिल्ह्यात आतापर्यंत ६३७४ वारस फेरफार झाले आहे. यामध्ये जिल्ह्याची कामगिरी दमदार राहिली आहे.



सर्वप्रथम हे अभियान १ मार्चपासून बुलढाणा जिल्ह्यात राबविण्यात आले. या मोहिमेला उत्तम प्रतिसाद मिळाल्याने आता राज्यातील प्रत्येक गावात अभियान राबविण्यात येत आहे. जिल्हाधिकारीअशिष येरेकर, उपजिल्हाधिकारी विवेक जाधव व आरडीसी अनिल भटकर यांच्या मार्गदर्शनात जिल्हाभरात ही मोहीम राबविण्यात येत असल्याने वारस नोंदीचे प्रलंबित फेरफार निकाली निघत आहेत.

मृत शेतकऱ्याचे वारसामध्ये सहमती नसल्यास फेरफार तसाच प्रलंबित राहतो व अडचणी वाढत जातात. त्यामुळे शासनाच्या विविध योजनांपासून वारसदार शेतकरी वंचित राहतात. मोहिमेच्या सुरुवातीला ग्राम महसूल अधिकाऱ्यांनी गावनिहाय सर्व्हे केला आहे. यामध्ये १० हजारांवर खातेदार मृत असल्याचे निदर्शनास आले. या सर्व मृत खातेदारांना वारसाला त्यांच्या शेतजमिनीशी संबंधित सर्व अधिकार मिळावेत, यासाठी १०० दिवसांच्या कृती कार्यक्रमात 'जिवंत सात-बारा' मोहीम राबविण्यात आली. यानंतरही ही प्रक्रिया निरंतर सुरु राहणार असल्याने जिल्ह्यातील शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे.

अनेकवेळा मृत खातेदाराच्या नावावरच जमिनी राहत असल्याने वारसांना मालकी हक्कासाठी न्यायालयात जावे लागते. यासाठी मृतांची नावे सात-बारावरून हटवून त्यांच्या वारसांची नावे चढणार आहे. शासनाच्या १०० दिवसांच्या कृती कार्यक्रमात जिवंत सात-बारा ही मोहीम राबविण्यात आली. त्यानंतर ही मोहीन निरंतर सुरू आहे. यामध्ये ग्राम महसूल अधिकाऱ्यांद्वारा 10 हजारांवर मृत खातेदारांचा शोध घेण्यात आला, यामध्ये 6591 अर्ज प्रशासनाला प्राप्त झाले. यामध्ये ६३७४ प्रकरणे मंजूर करण्यात आलेली आहेत. ग्राम महसूल अधिकाऱ्यांद्वारा गावनिहाय मृत शेतकऱ्यांची यादी तयार करण्यात आलेली आहे. वारसदारांना वारसासंबंधीचे कागदपत्रे तलाठींकडे सादर करावे लागतील. चौकशी होऊन मंडळ अधिकारी वारस ठराव ई-फेरफार प्रणालीत मंजूर करतील व नंतर पुढील प्रक्रिया होईल.

### मोहिमेचे नागरिकांना फायदे

मृत शेतकऱ्याचे वारसामध्ये सहमती नसल्यास फेरफार तसाच प्रलंबित राहतो शासनाच्या विविध योजनांपासून वारसदार शेतकरी वंचित राहतात. मृत खातेदारांना वारसाला त्यांच्या शेतजमिनीशी संबंधित सर्व अधिकार मिळावेत, यासाठी 'जिवंत सात-बारा' ही मोहीम उपलब्धी ठरली आहे.

मृत खातेदारांच्या अभिलेख्यांतील नोंदी वर्षानुवर्षे कायम राहिल्याने वारसांना अडचणी जात होत्या. या मोहिमेत सर्व प्रकरणे निकाली काढण्यात येत आहेत.

**विवेक जाधव,**
**उपजिल्हाधिकारी ( महसूल )**



# हरविलेल्या चिमुकलीला पोलिसांनी केले आई-वडिलांच्या स्वाधीन

दै. अजिंक्य भारत |प्रतिनिधी

**पापळ, दि. ७ :** अमरावती जिल्ह्यातील मंगरुळ चव्हाळ पोलीस ठाण्याच्या कर्मचाऱ्यांनी हरविलेल्या एका अल्पवयीन मुलीचा शोध लावून तिच्या आई-वडिलांच्या स्वाधीन करून समाजासमोर एक आदर्श घालून दिला आहे. दिनांक ६ सप्टेंबर रोजी मंगरुळ चव्हाळ पोलीस ठाण्यात प्रभाकर राठोड (रा. गाडखेड, उत्तर प्रदेश) यांनी तक्रार दिली की त्यांची 16 वर्षीय मुलगी हरवली असून ती नागपूरला जात असल्याची शक्यता आहे. तक्रारीनंतर पोलीस निरीक्षक अनिल आनंद यांच्या मार्गदर्शनाखाली तात्काळ तपास सुरू करण्यात आला. पोलीस उपनिरीक्षक अशोक कुमार, म.पो.हे.कॉ. अशोक, किरण, तसेच स्थानिक गुन्हे शाखेचे पथक व पोलीस कर्मचारी यांनी विविध ठिकाणी शोधमोहीम राबविली. तपासात मुलीने मोबाईलद्वारे दिलेल्या संपर्कावरून ती नागपूरच्या एका आश्रमात असल्याचे स्पष्ट झाले. पोलीस पथकाने तात्काळ नागपूर गाठून मुलीचा शोध घेतला. मुलीला सुरक्षितपणे पोलिसांनी ताब्यात घेतल्यावर तिला तिच्या आई-वडिलांच्या स्वाधीन करण्यात आले. या कामगिरीबद्दल समाजातील लोकांनी पोलीस प्रशासनाचे कौतुक केले. मुलगी हरविल्यामुळे त्रस्त झालेल्या कुटुंबानेही पोलिसांचे आभार मानले. या यशस्वी कामगिरीत पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी तत्परता दाखवून हरविलेल्या मुलीला सुखरूप कुटुंबाकडे सोपविले. या घटनेतून समाजात पोलीसांबद्दल विश्वास व आदर अधिक दृढ झाला आहे.

# नेरपिंगळाई मानाच्या गणपतीला आ.राणांची उपस्थिती

## हजारो भाविक भक्तांच्या उपस्थितीत मिरवणूक

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नेरपिंगळाई** - अमरावती जिल्ह्यातील मोर्शी तालुक्यातील नेर पिंगळाई येथे मोठ्या प्रमाणात गणेशोत्सव साजरा केला जातो त्याचाच एक भाग म्हणजे नेर येथील सुप्रसिद्ध असलेला मठा अधिपती म्हणून नावा रूपास आलेल्या गुलाब पुरी महाराज मठातील मानाचा मानला जाणारा गणपती बाप्पा ज्याची सुरुवात स्वातंर्त्यापूर्वी काळापासून करण्यात आली असून संपूर्ण विदर्भातील एकमेव नवसाला पावणारा अशी या गणपती बाप्पाची ख्याती सर्वदूर आहे या गणपती चरणी परिसरातील पंचकोशीतील अनेक भाविक लोटांगण घालून आपली मनोकामना बाप्पाचे चरणी मागत असतात व भाविकांचे सांगण्यावरून हा बाप्पा सर्वांचे नवसाला पावतो अशी



आख्यायिका येथील आहे. अशा या नेर पिंगळाई आई येथील मानाचे मानले जाणाऱ्या मठाधिपती गणपती बाप्पाचे दर्शनाकरिता लोकप्रिय आ.रवि राणा यांनी आज विसर्जन मिरवणुकी दरम्यान भेट दिली व मठाधिपती चरणी संपूर्ण महाराष्ट्राच्या कल्याणाकरता येथील शेतकरी कष्टकरी शेतमजूर यांचे उत्कर्षाकरिता मनोभावे मनोकामना अर्पण करून प्रार्थना केली.

यावेळी त्यांचे समवेत युवा स्वाभिमान पार्टी चे महिला जिल्हाध्यक्ष सोनाली ताई नवले, युवा स्वाभिमान चे कार्याध्यक्ष धीरज केने, प्रदीप आलोणे, अमोल वानखडे, आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. म. जिल्हाध्यक्षा यु. स्वा. पार्टी सोनाली ताई नवले,विजयभाऊ कपिले गुलाबपुरी महाराज संस्थान, शिरीष नवले, आदर्श नवले, अमोल वानखडे, निखिल खंडारकर, श्रेयस खवले, चंदू खंडारकर, अजय लाडविकर,गुड्डू लाडविकर, विजय कोथळकर,कैलासभाऊ कनेर माजी ग्रामपंचायत सदस्य तथा तालुका उपाध्यक्ष बीजेपी, प्रदिपभाऊ तायवाडे, निलेश बडासे बूथ प्रमुख, सागर माहोरे युवा जिल्हाध्यक्ष बीजेपी,अमोल नवले नितीन खोपे, प्रदीप डोळस, शिरखेड, नितीन मोरे शिरखेड,कल्पनाताई पाखोडे उपाध्यक्ष बीजेपी, प्रीती तायवाडे, मेघाताई उभाड,अर्चनाताई मावळे, शीतल काकस, वैष्णवी कनेर, रुक्मिणी निंबेकर, पंकज बोपले आदि उपस्थित होते.

# जि.प.च्या ३१७ शिक्षकांना तत्काळ रुजू होण्याचे आदेश

## मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे शिक्षण विभागाला पत्र

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अमरावती, दि. ७ :** जिल्हा परिषद शाळांमध्ये ३१७ शिक्षकांच्या बदल्या करण्यात आले असून बदली झालेल्या शिक्षकांना तातडीने कार्यमुक्त करुन शनिवारपर्यंत त्यांनी संबंधित शाळेवर हजर व्हावे, असे आदेश सीईओंनी काढले आहेत.

शासन निर्णयानुसार जिल्हा परिषदांच्या प्राथमिक शिक्षक संवर्गाच्या जिल्हांतर्गत बदल्यांबाबतचे सुधारित धोरण निश्चित करण्यात आले आहे. त्या अनुषंगाने शासनाकडून निर्गमित पत्रं, परिपत्रके आदी मार्फत प्राप्त निर्देशांचे पालन करून प्राथमिक शिक्षकांची विशेष संवर्ग शिक्षक भाग १, विशेष शिक्षक संवर्ग भाग २, बदली अधिकार प्राप्त शिक्षक, बदली पात्र शिक्षक या संवर्गातून पात्र शिक्षकांची बदली प्रक्रिया ऑनलाईन पोर्टलवर पूर्ण झालेली आहे. शिक्षकांचे प्राप्त संगणकीय बदली आदेश सर्व गट शिक्षणाधिकारी यांचे कार्यालयीन पोर्टलवर पाठविण्यात आलेले आहेत. विशेष संवर्ग शिक्षक भाग १ (४४ शिक्षक), विशेष संवर्ग शिक्षक भाग २ (१५३ शिक्षक), बदली अधिकार प्राप्त शिक्षक (शिक्षक ८०), बदलीपात्र शिक्षक (शिक्षक ४०) असे एकूण ३१७ बदली झालेले शिक्षक आहेत. या संवर्गनिहाय बदली झालेल्या शिक्षकांना कार्यरत शाळेतून बदली झालेल्या शाळेत रूजू होणेस्तव गुरुवारी मध्यान्होत्तर कार्यमुक्त करण्यात आले आहे.

पंचायत समिती चिखलदरा व धारणी मधील बदली झालेल्या शिक्षकांना शून्य शिक्षकी शाळा होणार नाही याची दक्षता घेऊन व पर्यायी व्यवस्था करूनच गट शिक्षणाधिकारी यांनी कार्यमुक्त करावे अशाही सुचना देण्यात आल्या आहेत.

# ग्रामसभेनंतर रोजगार सेवकाची हकालपट्टी

## नांदगाव पेठ येथील ग्रामसभा ठरली वादळी



दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नांदगाव पेठ, दि. ७ :** नुकतीच झालेली ग्रामसभा गावाच्या राजकारणात व प्रशासनात नवा इतिहास रचणारी ठरली. गावातील अवैध धंदे हा ग्रामसभेतील सर्वात ज्वलंत मुद्दा ठरला. ग्रामपंचायत सदस्य छत्रपती पटके यांनी गावात काही व्यक्तींमार्फत सुरू असलेल्या अवैध धंद्यांचा थेट पर्दाफाश केला. गावाच्या शांततेला, युवकांच्या भविष्याला आणि सामाजिक आरोग्याला धोका पोहोचवणाऱ्या या धंद्यांना ग्रामसभेतून एकमुखाने थांबविण्याचा ठराव घेण्यात आला.

गावात कोणत्याही प्रकारचे अवैध धंदे सुरू राहणार नाहीत, दोषींवर कठोर कारवाई केली जाईल,असा ठाम इशारा ग्रामस्थांनीच दिला. या ठरावाची अंमलबजावणी करण्यासाठी पोलीस आयुक्त व स्थानिक पोलीस निरीक्षकांना लेखी सूचना देऊन कार्यवाहीची मागणी करण्यात आली.याच ग्रामसभेत दुसरा मुद्दा अधिक वादग्रस्त ठरला तो म्हणजे रोजगार सेवक संकेत चापके याच्या भ्रष्ट कारभाराचा. रोजगार योजनांमध्ये अफरातफर, बनावट कामांची नोंद, लाखोंची बिले काढून निधीचा अपव्यय, अशा अनेक गंभीर आरोपांची उकल ग्रामसभेत झाली. ग्रामस्थांचा संताप इतका वाढला की अखेर एकमुखाने ठराव घेऊन त्याला पदावरून तात्काळ कमी करण्यात आले.

गावाच्या पैशावर डल्ला मारणाऱ्यांना ग्रामसभा सोडणार नाही,असा संदेश यावेळी देण्यात आला.

ग्रामसभेतील या ऐतिहासिक ठरावांमुळे नांदगाव पेठ गाव भ्रष्टाचारमुक्त व अवैध धंदेमुक्त होण्याच्या दिशेने मोठे पाऊल टाकत आहे.

ग्रामस्थांच्या ऐक्याने व न्यायाच्या लढ्याने ग्रामसभा खऱ्या अर्थाने गावाचे भविष्य बदलणारी ठरली आहे. या ग्रामसभेला सभेच्या अध्यक्ष सरपंचा कविता डांगे, उपसरपंच मजरखा ग्रामपंचायत सदस्य आशा चंदेल, छत्रपती पटके, माजी जि.प.सदस्य नितीन हटवार, मोरेश्वर इंगळे, दिलीप चौधरी, अरुण राऊत, मोहन शेंदरकर, प्रकाश शेळके, ग्राम विकास अधिकारी हर्षदा बोंडे, तलाठी आदेश गजभिये नितीन सत्रे, राजू भगत, संतोष शेंदरकर, नंदिनी साबळे, मंगला भोडेकर यांच्यासह अनेक युवक, नागरिक उपस्थित होते.

### १७ पैकी ४ सदस्य सभेला उपस्थित

ग्रामसभेमध्ये ग्रामपंचायतचे १७ पैकी केवळ ४ सदस्य हजर होते.याबद्दल उपस्थितीत गावकऱ्यांनी खंत व्यक्त केली तसेच गावातील कर्मचाऱ्यांचा सुद्धा अल्पसा प्रतिसाद ग्रामसभेला दिसून आला त्यामुळे त्या त्या विभागाच्या वरिष्ठांना लेखी पत्र देऊन त्यांच्यावर कठोर कार्यवाही करण्याची मागणी माजी जिल्हा परिषद सदस्य नितीन हटवार यांनी केली. ग्रामसभेमध्ये पांदण रस्ते मोकळे करण्याची समिती व महिला बालकल्याण नियोजन समिती स्थापन करण्यात आली.

# बालकाच्या पोटावर सळईचे चटके


## मेळघाटात अमानुष प्रकार सुरूच | चौपन गावातील घटना

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**धारणी, दि. ७ :** सिमोरी गावाजवळ लहान बाळाच्या पोटावर उपचार म्हणून, लोखंडी सळईचे चटके देण्यात आल्याची चर्चा समाप्त झालेली नसताना, हरिसाल प्राथमिक आरोग्य केंद्रातील चोपन गावातील देवराज साकोम (३५ दिवस) च्या पोटोवर चटके देत म्हणजे, डम्मा देण्यात आल्याचे प्रकाशात येताच, पुन्हा मेळघाटातील अघोरी प्रथा आणि अमानवीय उपचाराचे दर्शन झाले आहे. आरोग्य व्यवस्था सध्या कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या आंदोलनामुळे पार ढासळली असल्याचा परिणाम समोर आला आहे.

धारणी पासून ४० कि मी अंतरावर असलेल्या चौपन छोटाशा गावातील देवराज भीमराव साकोम (वय ३५ दिवस) बालकाच्या पोटावर डम्माचे चटके व जखम दिसून आल्याने संबंधीत आरोग्य कर्मचाऱ्यांच्या पायाखालची जमीन सरकलेली दिसते. दर महिन्याला गावाला भेट देणाऱ्यांना महिनाभरानंतर हा बाळ दिसला होता. तडकाफडकी हरिसालप्राथमिक आरोग्य केंद्रात भरती करण्यात आले होते. प्राथमिक उपचारानंतर धारणी उपजिल्हा रुग्णालयात रेफर करण्यात आले, त्यानंतर देवराजची प्रकृती बरी झाली.

माहितीनुसार देवराजला शौचास येत नसल्याचे बघून आईवडिलांनी भुमकाला दाखवले. आदिवासी परंपरेनुसार भुमका नाव सुकलालने पोटावर गरम सळाखीने चटके देण्याचा प्रयत्न केला. माहितीप्रमाणे पुरातन उपचार म्हणून मेळघाटात ही अंधश्रध्देची प्रथा प्रचलीत असून, अनेकबालके या प्रथेची बळी



ठरलेली आहेत. आरोग्य यंत्रणेमार्फत अंधश्रध्दे विरुध्द जनजागरण योग्य प्रमाणे होत नाही, किंवा प्राथमिक आरोग्य केंद्र व उप केंद्रातील कर्मचारी अथवा इतर स्थानिक कर्मचारी सेवा भावनेने काम करत नसल्याने नेहमी मेळघाटात अमानुष प्रकार घडतात.

सध्या देवराजला आरोग्य लाभले असल्याने विषय संपल्यासारखा झाला आहे. मात्र प्रशासन, ग्राम स्तरावरील पदाधिकारीआजही मेळघाटात अंधश्रद्धेच्या नावाखाली उपचार केले जात असल्यामुळे कुपोषण वाढत आहे आणि अनेक बालमृत्यू होत आहेत.

गेल्या काही दिवसांपासून मेळघाटात लहान बालकावर अघोरी विद्या केल्या जाते. कधी विड्याचे तर कधी सळाखीचे तर कधी अगरबत्तीचे चटके दिल्या जाते. त्यामुळे लहान बालकाची प्रकृती खालावते. रूग्णालयात उपचारासाठी नेल्यावर हा प्रकार उघडकीस येतो. मेळघाटात ही अघोरी विद्याची ही चौथी घटना आहे. पोलिसांनी गुन्हे दाखल केल्यावरही मेळघाटातील आदिवासींना झड पोहोचत नाही.

अजिंक्य भारत
# आपलं अमरावती

अमरावती, सोमवार दि. ८ सप्टेंबर २०२५

## थोडक्यात

### लोखंडी साहित्याची चोरी

**अमरावती :** राजापेठ पोलिस ठाण्याच्या हद्दीतील शंकरनगर परिसरातील बापू कॉलनी येथे सुरू असलेल्या एका बांधकामस्थळावरून अज्ञात चोरट्यांनी तब्बल २.२५ टन लोखंडी सळ्यांची चोरी केली. या सळ्यांची किंमत सुमारे १ लाख २५ हजार रुपये इतकी असल्याचे सांगितले जात आहे. या प्रकरणी पराग रमेश लाखेकर (३४) यांनी पोलिसात तक्रार दाखल केली असून, राजापेठ पोलिसांनी अज्ञात आरोपींविरुद्ध गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

### उपचारादरम्यान युवकाचा मृत्यू

**अमरावती :** पोट दुखत असल्याने अभिजित दिनेश बारबुद्धे (३१, रा. तपोवन) याला जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल केले. मात्र, तेथे उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. याबाबति दिनेश जनार्धन बारबुद्धे (६७) यांनी गाडगे नगर पोलिसात तक्रार दिली. पोलिसांनी मर्ग नोंदवला.

### वाहतुकीस अडथळा निर्माण केल्याने कारवाई

**अमरावती :** रहदारीस अडथळा निर्माण करीत आपले वाहन सार्वजनिक रस्त्यांवर उभे करणाऱ्या एका हातगाडी विक्रेत्यासह एका चार चाकी (एमएच १२-एमआर २६५०) चालकाविरुद्ध कारवाई करण्यात आली. फ्रेजरपुरा पोलिसांनी जेलकडे जाणाऱ्या मार्गावर हातगाडी विक्रेता महिलेवर, तर राजापेठ पोलिसांनी शंकर नंदकिशोर उर्फ नंदुराव पोटे (२८) याच्याविरुद्ध गुन्हा नोंदवला.

### जनावरांना गोशाळेत सोडले

**अमरावती :** नागपुरी गेट पोलिसांनी मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे जनावरांच्या अवैध तस्करीवर कारवाई करीत ५२ जनावरांना जीवनदान दिले. ६० पैकी ८ जनांवरांचा मृत्यू झाला. ही कारवाई लालखडी परिसरातील पन्नीपुरा मैदानात करण्यात आली. कारवाई दरम्यान पोलिसांनी ट्रकसह एकूण २७ लाख २५ हजारांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी पोलिसांनी तिघांवर गुन्हे दाखल केले असून एक जण फरार आहे. पुढील तपास नागपुरी गेट पोलीस ठाण्याचे पोलीस करीत आहे.

### भीमराव भांडे महाराज यांचे निधन

**खोलापूर :** येथील श्री ह भ प वैकुंठवासी भिमराव जी महाराज भांडे यांचे वयाच्या ८० व्या वर्षी वृद्धापकाळाने दु:खद निधन झाले. त्यांनी हयातभर खोलापुर श्री काळा हनुमान मंदिर अंतर्गत गेल्या अनेक वर्षापासून अखंड हरिनाम सप्ताह, दैनंदिन हरि पाठ, काकडा आरती, पंढरीची दरवर्षीप्रमाणे वारी ज्ञानेश्वरी प्रवचन पंचक्रोशीतील हरिनाम सप्ताह मध्ये हरिकीर्तन आणि गावातील अनेक तरुण मंडळी परमार्थाला लावली आहेत. महाराजांनी परमार्थ जिवंत ठेवला आहे श्री ह.भ.प. भीमराव जी महाराज भांडे यांच्या जाण्याने गावातील परमार्थात पोकळी निर्माण झाली आहे. त्यांची अंतिम शवयात्रा दिंडी ताळ मृदुंगाच्या गजरात पूर्णा नदी तीरावर नेऊन त्यांचे पार्थिव शरीर अनंतात विलीन करण्यात आले. परिसरातील मोठ्या संख्येने भावीक त्यांच्या अंत्यविधीला हजर होते. त्यांच्या मागे पत्नी दोन मुलं सुना व नातवंड आप्तपरिवार आहे. कुटुंबाकडून त्यांचे अस्थिविसर्जन पंढरपूर येथे करण्यात येणार आहे.



# वाघाच्या हल्ल्यात मरण पावलेल्याच्या कुटूंबियाला पाच लाखांची मदत

## आमदार केवलराम काळे यांनी दिली भेट

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**चुरणी, दि. ७ :** राजदेवबाबा कॅम्प परिसरात गस्तीवर असताना वाघाच्या हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या प्रेम राजेश कास्देकर (वय 30, रा. तारुबंदा) यांच्या कुटुंबाला आमदार केवलराम काळे यांनी प्रत्यक्ष भेट देऊन सांत्वन केले.

या प्रसंगी प्रेम कास्देकर यांची पत्नी निर्मला प्रेम कास्देकर यांना पाच लाख रुपयांचा धनादेश वनविभागाकडून प्रदान करण्यात आला. त्याचबरोबर आमदार केवलराम काळे यांनीही वैयक्तिक स्तरावरून आर्थिक मदत केली. घटनास्थळाला भेट दिल्यानंतर आमदार काळे यांनी या दुर्घटनेतील दोषींवर कारवाई करण्याचे आदेश दिले असून,



परिसरात भीतीचे वातावरण निर्माण करणाऱ्या नरभक्षी वाघाला तात्काळ जेरबंद करण्यासाठी राज्याचे वनमंत्री यांना पत्र पाठवले आहे. या वेळी सहाय्यक उपवनसंरक्षक प्राची उरले, वनपरिक्षेत्र अधिकारी राहुल धाईत, राजेंद्र महल्ले, ठाणेदार अवतारसिंग चव्हाण, झाल्टे साहेब, हंकारे साहेब, मानद वन्यजीव रक्षक जयंत वडतकर, तसेच वनविभागाचे इतर अधिकारी व कर्मचारी, मृतकाचे नातेवाईक, गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या घटनेमुळे संपूर्ण गावात शोककळा पसरली असून, वनविभागाकडून सतर्कता वाढविण्यात आली आहे. आमदार काळे यांनी यापुढील काळात अशा घटना टाळण्यासाठी वनविभागाने आक्रमक भूमिका घ्यावी, असे सांगितले.

# अहमद हुसेन यांचा आनंदमय सेवानिवृत्ती सत्कार

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**रिद्धपूर, दि. ७ :** गुलिस्ता उर्दू प्राथमिक शाळा मोर्शी येथे सेवारत सहायक शिक्षक अहमद हुसेन तजम्मूल हुसेन रिध्दपूर यांच्या सेवानिवृत्ती निमित्ताने विविध उपक्रमांतर्गत आनंदमयी वातावरणात सोत्साह सत्कार सोहळा शाळेच्या शिक्षकवृंदांनी २ सप्टेंबर रोजी आयोजित केला होता.

विद्यार्थ्यांनी यावेळी अहमद हुसेन यांचे जोरदार स्वागत केले. शाळेचे मुख्याध्यापक मुश्ताक अहमद खान यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न सोहळ्याचे सुत्रसंचलन जमील अहमद यांनी तर आभार प्रदर्शन वसीम अहमद यांनी केले. तसेच स्वागताध्यक्ष म्हणून मौलाना इरफान यांनी जबाबदारी पार पाडली. यावेळी शिक्षकांनी तथा विद्यार्थ्यांनी समयोचित भाषणांद्वारा अहमद हुसेन १९९७ ते २०२५ दरम्यान सेवाकाळातील त्यांच्या कारकिर्दीचा मागोवा घेऊन त्यांचे भावी आयुष्यासाठी शुभचिंतन व्यक्त केले. याप्रसंगी त्यांना विविध भेटवस्तू भेट देऊन गौरविण्यात आले. शाळेचे शिक्षक वकील नायक, जावेद खान, शिक्षिका शाहिना खान, जोहरा जबीन, नौसिन बानो, सबा परवीन, शमीम बानो, महेविश बानो व अनीस अहमद यांनी शुभेच्छा दिल्या.



# बांधकामावरून वायर लंपास

**अमरावती:** फ्रेझरपुरा पोलिस स्टेशन हद्दीतील पुंडलिकबाबा नगर परिसरात बांधकाम सुरू असलेल्या घरातून वायर चोरीची घटना शुक्रवारी उघडकीस आली. जितेंद्र मधुकरराव यावले (५३) यांच्या घरात इलेट्रिक फिटिंगजचे काम सुरू असताना अज्ञात चोरट्याने तब्बल 23 हजार रुपये किमतीच्या वायर चोरून नेल्या. याबाबत जितेंद्र यावले यांनी दिलेल्या तक्रारीवरून फ्रेझरपुरा पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला. या घटनेचा पुढिल तपास फ्रेजरपुरा पोलिस करीत आहे.

# श्री विवेकानंद विद्यामंदिरात 'एक पेड मां के नाम' अभियानांतर्गत वृक्षारोपण

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**शिरखेड, दि. ७ :** दिनांक 6 व ७ ऑगस्ट २०२५ रोजी 'एक पेड मा के नाम' या अभियानांतर्गत श्री विवेकानंद विद्यामंदिर, शिरखेड येथील विद्यार्थ्यांनी शाळेच्या मोकळ्या परिसरात पिंपळ,चिंच,कडुनिंब,सिताफळ याप्रकारची विविध झाडे लावून पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला.या उपक्रमात विद्यालयाचे मुख्याध्यापक जे. एम. तट्टे सर यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षकवृंद नितीन जाणे, अतुल तट्टे, भाग्यश्री खांनदे, मयुरेश केचे, निकेश चरोडे, अर्चना नवले, शुभांगी भोकरे, मंजू खराते तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी श्री. राधेश्याम निकम व धनंजय लांडगे यांनी उत्साहाने सहभाग नोंदवून मोलाचे सहकार्य केले.



या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाबद्दल जागरूकता वृध्दिंगत होत आहे. सध्या शाळेच्या परिसरात एक हजारांहून अधिक झाडे असून त्यामुळे परिसर सदैव हिरवागार व आकर्षक आहे. विद्यार्थ्यांनी लावलेल्या नव्या झाडांमुळे हा परिसर आणखी निसर्गरम्य व पर्यावरण पूरक होण्यास मदत होणार आहे.



# बालकृष्ण गणेश उत्सव मंडळातर्फे सत्कार समारोह

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**बेनोडा, दि. ७ :** बालकृष्ण गणेश उत्सव मंडळ गुजरी बाजार चौक बेनोडा तर्फे सत्कार समारोहाचे आयोजन केले होते. या सत्कार समरोहात नीरज टावरी यांच्या तर्फे जगदीष मासोदकर यांचा स्पलिक सत्कार करून त्याना अहेर केला आणी त्यांना ११ हजार रुपये बक्षीस दिले. मासोदकर यांनी नीरज टावरी यांचा मुलगा पेठ येथील पुलावरून पाण्यात पडला असता त्यंनी पाण्यात उडी घेवून मुलाला बाहेर काढले. आणी त्याच सोबत डॉ. व्ही आर अढाऊ यांची अष्टविनायकचे अध्यक्ष झाल्याबद्दल शाल आणी श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. बेनोडा पोलिस स्टेशनचे ठाणेदार विवेक देशमुख यांचा सुद्धा शाल आणी श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. अक्षय चोरे याची ग्राम महसूल अधिकारी म्हणून निवड झाल्याबद्दल त्याचा सुद्धा मंडळा तर्फे शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. मंडळाचे अध्यक्ष स्थान ठाणेदार विवेकजी देशमुख यांना दिले होते. कार्यक्रम पार पाडण्यासाठी मंडळातील सभासद . श्याम चोरे, राम चोरे, प्रफुल गावंडे , रोशन लाड, अंकुश निंभोरकर , मनोजटावरी, पंकज गोहाड, अमोल गोहाड, तेजस फरकाडे, अश्वेघ चोरे , हार्दिक पापडकर, मनोज चोरे , आयुष चोरे, अश्वेघ चोरे, सुनिल पुंड, यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमाचे संचलन व आभार प्रदर्शन देवेंद्र धोटे सर यांनी केले.

# गणेशदास राठी विद्यालयात शिक्षक-पालक सभा

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अमरावती, दि. ७ :** स्थानिक श्री गणेशदास राठी छात्रालय समिती द्वारा संचालित श्री गणेशदास राठी विद्यालयात शुक्रवार २९ ऑगस्ट रोजी शिक्षक पालक सभेचे आयोजन करण्यात आले होते. शिक्षक पालक विद्यार्थी यांचे परस्पर संबंध कसे असले पाहिजे तसेच विद्यार्थ्यांच्या समस्या व त्यावर उपाय, विद्यार्थ्यांचा शैक्षणिक व सर्वांगीण विकास जास्तीत जास्त कसा होईल या विषयावर चर्चा करण्यात आली. या पालक सभेची सुरुवात या कार्यक्रमाला लाभलेले माननीय अध्यक्ष श्री गणेशदास राठी विद्यालयाचे प्राचार्य नवनीतजी भट्टड, अतिथी उपमुख्याध्यापिका मालानी, सुताणे, पालक सभेचे प्रमुख प्रतिनिधी प्रवीण केंदळे, यशवंत सदार, मेघा बागडे, श्रीमती सोनू जोगदंडे यांच्या हस्ते माता सरस्वतीचे, पूजन दिप प्रज्वलन करून करण्यात आले. पालक सभेचे प्रमुख प्रतिनिधी प्रवीण केंदळे, यशवंत सदार, मेघा बागडे, सोनू जोगदंडे यांचे स्वागत पुष्पगुच्छ देऊन करण्यात आले. प्रास्ताविक श्रीमती शितल गांधी मॅडम यांनी केले. विद्यार्थ्यांचा शालेय विकास, विद्यार्थ्यांना येणाऱ्या अडचणी, शाळेचा विकास, शाळेमध्ये होणारे नवनवीन उपक्रम याविषयी चर्चा करण्यात आली. शाळेचे प्राचार्य नवनीतजी भट्टड सरांनी उत्कृष्ट असे मार्गदर्शन पालकांना व विद्यार्थ्यांना केले. शाळेमध्ये असलेल्या विविध सोयीसुविधा व नवनवीन उपक्रम या बद्दल त्यांनी पालकांना मार्गदर्शन केले. शाळेच्या उपमुख्याध्यापिका श्रीमती मालानी मॅडम यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात सांगितले की शाळेमध्ये विद्यार्थ्यांनी नियमित उपस्थित राहणे गरजेचे आहे त्यामुळे विद्यार्थ्यांचा शालेय शैक्षणिक विकास होईल. तसेच विद्यार्थ्यांनी शालेय नवनवीन उपक्रमात सहभागी होणे आवश्यक आहे तसेच निरनिराळ्या स्पर्धात्मक परीक्षेमध्ये सहभागी होणे सुद्धा आवश्यक आहे.



# महापालिकेची प्रारूप प्रभाग रचना जाहीर!

- १५ सप्टेंबरपर्यंत हरकती स्वीकारण्याची मुदत
- १६ ते २२ सप्टेंबरपर्यंत हरकतींवर सुनावणी
- ९ ते १३ ऑक्टोंबर दरम्यान अंतिम प्रभागरचना



दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अमरावती, दि. ७ :** सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महापालिका प्रशासनाने बुधवारी रात्री उशिरा बहुप्रतीक्षित २२ प्रभागांची प्रारूप रचना जाहीर केली. यामध्ये २१ प्रभाग चार सदस्यांचे तर एक ९ क्र मांकाचा एसआरपी वडाळी हा प्रभाग ३ सदस्यांचा राहणार आहे. एकूण २२ प्रभागातील ८७ सदस्यांच्या निवडीसाठी महापालिकेने प्रारूप प्रभाग रचना जाहीर केली. हरकतींसाठी १५ सप्टेंबरपर्यंतची मुदत देण्यात आली आहे. बुधवारला रात्री उशिरा प्रारुप प्रभाग रचना जाहिर होताच निवडणूक लढण्यासाठीइच्छुक असलेल्या उमेदवारांमध्ये मोठा उत्साह दिसून आला. सर्वांनी आपापल्या मोबाईलवर तसेच सोईने आपापल्या प्रभागाच्या सीमारेषा तपासण्यावर जोर दिला आहे.

एकूण २२ प्रभागातील ८७ सदस्यांच्या निवडीसाठी महापालिकेने प्रारूप प्रभाग रचना जाहीर केली. पैकी २१ प्रभाग हे चार सदस्य संख्येचे तर एक प्रभाग क्रमांक ९ एसआर तीन सदस्य संख्येचा असणार आहे. पाच सदस्य संख्येचा एकही प्रभाग अस्तित्वात नाही. संबंधित सर्व प्रभागांची प्रारूप प्रभाग रचना जाहीर होण्यापूर्वी निवडणूक लढण्यासाठी इच्छुक असलेल्यांसह त्यांच्या समर्थकांमध्ये मोठी उत्सुकता दिसून आली.

प्रत्यक्षात, प्रभाग रचना जाहीर झाल्यानंतर कोणत्या प्रभागात यावेळी फेरबदलझाला आहे, याची माहितीघेण्याचा १५ सप्टेंबरपर्यंत प्रयत्न प्रत्येक जण करताना दिसून आला. दरम्यान, हरकती, आक्षेप, सूचना दाखल करण्याची मुदत आहे. त्यानंतर दाखल झालेल्या हरकती विचारात घेतल्या जाणार नसल्याचे महापालिका प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

# सेवानिवृत्त सैनिक जाधव याचे स्वागत

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**कारला, दि. ७ :** केंद्रीय राखीव पोलिस दलात कार्यरत असलेले सालोरा खुर्द येथील सैनिक अनिरुद्धसिंह जाधव हे सेवानिवृत्त होऊन घरी आले त्यावेळी त्यांचे भव्य स्वागत करण्यात आले.

अमरावती तालुक्यातील सलोरा खुर्द येथील सुपुत्र अनिरुद्धसिंह नीलकंठसिंह जाधव हे केंद्रीय राखीव पोलिस दलात १९८८मधे रुजू झाले. त्यांनी तेव्हापासून देशाच्या विविध भागात आपली ड्यूटी बजावुन भारत मातेची सेवा केली. २०२५ पर्यंत सदतिस वर्ष भारत मातेची सेवा बजावुन ते ३१ ऑगस्ट रोजी दिल्ली येथील मुख्यालयातून सेवानिवृत्त झाले. सेवानिवृत्त होऊन ते आज आपल्या अमरावती येथील घरी आले त्यावेळी कॉलनीवासी व नातेवाईक यांनी भव्य असे स्वागत केले.



यावेळी संकेत कॉलनी परिसर भारत माता की जय,वंदे मातरम् च्या गगनभेदी घोषणानी दुमदुमला. आधी स्थानिक गर्ल्स हायस्कूल चौकात पत्नी सौ मनीषा जाधव, मुलगा विराज जाधव,विजयसिंह सिसोदिया,छाया गिरासे,चंद्रसिंह गिरासे, प्रभाकर काकडे, वंदना काकडे, नरेंद्र जिरापुरे, प्रशांत सिसोदिया यांनी स्वागत केले त्यानंतर घरी रायसिंह जाधव, रजेसिंह जाधव,भरत जाधव, अनिल झोटिंग, कुणाल झोटिंग, संजय पवार, शरद आखरे, रमेश धनोरकर, अमन जिरापुरे, कुलदीप जाधव,रत्नदीप जाधव, दीपक जाधव,अक्षत चव्हाण,राणा सिसोदिया, शाम खताळे,सुमन जाधव, अंजिरा सिसोदिया, सुरेखा जाधव, योगिता जाधव, पूनम सिसोदिया,प्राजक्ता गिरासे, अर्चना जिरापुरे,लता पवार, अर्चना आखरे, रजनी धनोरकर उपस्थित होते.

# शहरातील १५२ मंडळांच्या बाप्पांना निरोप

## बाप्पांच्या विसर्जनासाठी भाविकांमध्ये उत्साह

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अमरावती, दि. ७ :** शहरात गत दहा दिवस बाप्पांच्या आगमनानंतर नागरिकांमध्ये दररोज बाप्पांची आरती, महाप्रसाद, मिरवणूकी, शोभा यात्राची धूम होती. शनिवार ६ सप्टेंबर पासून बाप्पांच्या विसर्जनाला सुरूवात होणार असल्याने भाविकांमध्ये प्रचंड उत्साह आहे. शनिवारला पोलिस आयुक्तालयाच्या हद्दीतील १५२ सार्वजनीक गणेशोत्सव मंडळाचे छत्री तलाव, प्रथमेश तलाव, वडाळी, कोंडेश्वर, अंजनगाव बारी सह विविध ठिकाणी विसर्जन होणार आहे. तसेच आगामी ५ दिवसात उर्वरित ४३८ मंडळांच्या गणपतींचे विसर्जन करणार आहेत. तर लालबागच्या राजाची शाही व भव्य मिरवणूक ११ सप्टेंबरला निघणार असल्याने विसर्जनाच्या सर्व दिवसांसाठी शहर पोलिस ताफा सज्ज झाला आहे. पोलिस आयुक्तालयाच्या हद्दीत यंदा दहा पोलिस ठाण्याच्या हद्दीत एकूण ५९० सार्वजनीक ठिकाणी गणपतींची स्थापना झाली. त्यापैकी

सहा दिवसात ५९० मंडळाच्या गणपतींचे विसर्जन शहरात २००० वर पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त

पोलिसांनी दिलेल्या परवानगीनुसार ५ सप्टेंबरला ६ मंडळांनी विसर्जन मिरवणू काढून बाप्पांना निरोप दिला. यामध्ये भातकुली पोलिस ठाण्याच्या हद्दीतील १, गाडगेनगरमधील ४, नांदगावपेठ मधील १ या मंडळांचा समावेश होता. शनिवार ६ सप्टेंबर रोजी अनंत चुर्तथी असल्याने तब्बल १५२ लहान-मोठ्या मंडळांची विसर्जन मिरवणूक निघणार आहे. याअनुषंगाने, गणेश विसर्जन बंदोबस्ता-करीता पोलीस आयुक्तालय स्तरावर ०३ पोलीस उपायुक्त, ०४ सहा. पोलीस आयुक्त, २५ पोलीस निरीक्षक, ७० सपोनि / पोउपनि १३५० पोलीस अंमलदार, आरसीपी व क्युआरटी प्लॉटून, ०१ एसआरपीएफ कंपनीव १ प्लॉटूनसह ४००+१०० पुरुष व महीला होमगार्डस् असा एकूण २०१० पोलिसांचा पोलीस बंदोबस्त नेमण्यात येणार आहे.



तसेच, पो. ठाणेनिहाय शहरातील महत्वाचे चौक, गर्दीचे ठिकाणे, मिश्र व संवेदनशिल वस्तीच्या ठिकाणी फिक्स पॉईट लावण्यात येणार आहे. नागरिकांचे सुरक्षेसाठी १४ सीआर मोबाईल, १० दामिनीपथके, बीटमार्शल व डायल ११२ चीवाहने शहरात सतत पेट्रोलिंगसाठी राहणार आहेत.

## गणेशोत्सव



आर्णी : मनवा माघाडे व वैदही माघाडे रा. सिसोदिया लेआउट प्रभाग क्र. या दोघीही बाप्पांची पूजा करताना.



यवतमाळ : बाल गणेश उत्सव मंडळ, शिंदे प्लॉट येथील महिला भगिनी श्री. गणेशाला निरोप देताना

## महत्वाचे



### रजनीकांत बोरेले यांचा लाडू-तुलेने सत्कार

**पांढरकवडा :** आरटीआय कार्यकर्ते आणि कृषी उत्पन्न बाजार समितीचे नवनिर्वाचित संचालक रजनीकांत बोरेले यांचा पांढरकवडा येथे खोबरा लाडूंनी तुला करत जाहीर सत्कार करण्यात आला. खासदार संजय देशमुख आणि आमदार संजय देरकर यांच्याहस्ते हा सोहळा शनिवारी पार पडला. सत्कारानंतर आपल्या भाषणात बोरेले यांनी स्थानिक प्रशासनावर जोरदार हल्ला चढवला. नगर परिषदेत कोट्यवधींचा भ्रष्टाचार झाला असून, याबाबत उच्च न्यायालयात याचिका दाखल असल्याची माहिती त्यांनी दिली. राजकीय पक्ष आणि पोलिस गुन्हेगारांना पाठीशी घालत असल्याचा आरोपही त्यांनी केला. खासदार देशमुख व आमदार देरकर यांनीही आपल्या भाषणात शासकीय कारभारावर ताशेरे ओढत बोरेले यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याचे आश्वासन दिले. या कार्यक्रमाला मोठा पोलिस बंदोबस्त तैनात होता.



### ईद-ए-मिलादनिमित्त रक्तदान

**आर्णी :** प्रेषित मोहम्मद पैगंबर यांच्या जयंतीनिमित्त (ईद-ए-मिलादुन्नबी), आर्णी येथे गुरुवारी (दि. ४) आयोजित रक्तदान शिबिराने सामाजिक सलोख्याचा आदर्श निर्माण केला. या उपक्रमात सर्व जाती-धर्माच्या १५३ नागरिकांनी रक्तदान केले. यात २८ मुस्लिमेतर दाते आणि सहा महिलांचा समावेश होता, हे विशेष. मानवतेचा धर्म सर्वश्रेष्ठ हा संदेश देत, या शिबिरास शहरातील सर्वच राजकीय, सामाजिक आणि व्यावसायिक क्षेत्रांतील मान्यवरांनी हजेरी लावली. माजी आमदार ख्वाजा बेग, माजी नगराध्यक्ष आरिज बेग, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष शेख युनूस अब्दुल गणी, सामाजिक कार्यकर्ते सैयद रियाज, समद पहेलवान, सद्दाम शेख, अली खान, इमरान बेग, रफिक खान यांनी या उपक्रमात पुढाकार घेतला. पोलिस ठाण्याचे अधिकारी व कर्मचारीही यात सहभागी झाले होते. यवतमाळच्या वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या पथकाने रक्त संकलनाचे नियोजन केले. या यशस्वी आयोजनातून आर्णीकरांनी एकात्मतेची परंपरा जपल्याची भावना व्यक्त होत आहे.

### क्षुल्लक कारणावरून मारहाण


**पुसद :** पुसद शहरातील सेवादासनगर परिसरात एका शुल्लक कारणावरून तिघांनी मिळून एका तरुणावर हल्ला केल्याची घटना घडली आहे. यात भांडण सोडवण्यासाठी आलेल्या तरुणाच्या आईलाही मारहाण करण्यात आली. विशाल बळीराम पवार हे आपल्या शेळ्या घेऊन जात असताना त्यांनी एका शेळीला दगड मारला. तो दगड चुकून आरोपीच्या घराच्या ताट्याला लागला. याच क्षुल्लक कारणावरून आरोपींनी विशालसोबत वाद घालण्यास सुरुवात केली. वादाचे रूपांतर हाणामारीत झाले आणि आरोपींनी वेळवाच्या काठीने विशालला मारहाण करून जखमी केले.

# अधरपुस प्रकल्पाला जलपर्णींचा विळखा!

## दीड कोटी रुपये पाण्यात, भ्रष्टाचाराच्या चौकशीची जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**पुसद, दि. ७ :** 'तेलही गेले, तूपही गेले, हाती आले धुपाटणे' अशी अवस्था सध्या पुसद तालुक्यातील अधरपुस प्रकल्पाच्या बाबतीत झाली आहे. अवघ्या दोन महिन्यांपूर्वी दीड कोटी रुपये खर्चून साफ केलेल्या या प्रकल्पाला जलपर्णीने पुन्हा एकदा विळखा घातला असून, हा खर्च पाण्यात गेल्याचा आरोप करत नागरिकांनी या प्रकरणाच्या उच्चस्तरीय चौकशीची मागणी केली आहे.



अधरपुस प्रकल्पावर सध्या जलपर्णींचे साम्राज्य पसरले आहे. या जलपर्णींमुळे प्रकल्पाच्या सांडव्याच्या गेटवर मोठ्या प्रमाणात कचरा आणि लाकडे अडकत असून, गेट उघडण्यात तांत्रिक अडचणी निर्माण होत आहेत. धक्कादायक बाब म्हणजे, संबंधित विभागाने मागील वर्षी मिळालेल्या दीड कोटी रुपयांच्या निधीतून जून महिन्यातच जलपर्णी काढण्याचे काम एका कंत्राटदारामार्फत पूर्ण केले होते. मात्र, काम पूर्ण झाल्याच्या अवघ्या दोन महिन्यांतच संपूर्ण धरण पुन्हा जलपर्णींने कसे व्यापले, असा संतप्त सवाल नागरिक विचारत आहेत. कामाच्या दर्जावर आणि हेतूवरच शंका उपस्थित होत असून, या प्रकरणात मोठा भ्रष्टाचार झाल्याचा आरोप होत आहे. काही सुज्ञ नागरिकांनी याबाबत संबंधित अभियंत्यांना विचारणा केली असता, त्यांना समाधानकारक उत्तरे न देता केवळ अधिकारी भाषेत उत्तरे देऊन बोळवण करण्यात आली. त्यामुळे हा निधी नेमका कुणाच्या घशात गेला, याची चौकशी थेट जिल्हाधिकाऱ्यांनी करावी, अशी मागणी जोर धरत आहे. या समस्येमुळे केवळ धरणालाच धोका नाही, तर परिसरातील नागरिकांचे आरोग्यही धोक्यात आले आहे. जलपर्णीमुळे पाणी दूषित होऊन रोगराई पसरण्याची शक्यता असल्याने, प्रशासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

### रोग पाहुणा, घरातून जाईना

**प्रतिष्ठित नागरिक गोविंदराव देशमुख सोनेकर यांनी या समस्येच्या आरोग्यविषयक धोक्याकडे लक्ष वेधले आहे. जलपर्णींमुळे धरणातील पाणी दूषित होऊन परिसरात गंभीर आजार पसरण्याची भीती त्यांनी व्यक्त केली आहे. या दूषित पाण्यामुळे रोगराई निर्माण होऊन ती 'घरातून न जाणाऱ्या पाहुण्यासारखी' बनेल. त्यामुळे प्रशासनाने वेळीच जलपर्णींचे निर्मूलन करून संभाव्य आरोग्य संकट टाळावे, अशी मागणी जोर धरू लागली आहे.**

### खाई त्याला खवखवे

**जलपर्णींच्या जलद पुनरागमनामुळे स्थानिक नागरिकांमध्ये भ्रष्टाचाराबद्दल तीव्र संशय निर्माण झाला आहे. दीड कोटी रुपये खर्च करूनही परिस्थिती 'जैसे थे' कशी, हा प्रश्न प्रत्येकाच्या मनात आहे. या कामात सहभागी असलेले अधिकारी आणि कंत्राटदार यांच्यात संगनमत असल्याचा आरोप नागरिक करत आहेत. जिल्हाधिकाऱ्यांनी या प्रकरणाची सखोल चौकशी केल्यास या 'खवखवी'मागील खरे कारण समोर येईल आणि दोषींवर कारवाई होईल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.**

### पैसा पाण्यात, पुन्हा संकट दारात

**गतवर्षी शासनाने जलपर्णी हटविण्यासाठी दीड कोटी रुपयांचा निधी मंजूर केला होता. संबंधित विभागाने कंत्राट देऊन जून महिन्यात हे काम पूर्ण केल्याचा दावा केला. मात्र, अवघ्या दोन महिन्यांतच संपूर्ण प्रकल्प पुन्हा जलपर्णीने व्यापला आहे. त्यामुळे हा कोट्यवधी रुपयांचा खर्च पूर्णपणे वाया गेल्याची चर्चा असून, नागरिकांच्या पैशाचा अपव्यय झाल्याचा आरोप होत आहे. यामुळे आता प्रकल्पाच्या सुरक्षेचे संकट पुन्हा दारात उभे राहिले आहे.**

# फळविक्रेत्याची लेक होणार डॉक्टर

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**यवतमाळ, दि. ७ :** प्रतिकूल परिस्थितीवर केवळ जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर मात करता येते, हे यवतमाळच्या एका फळविक्रेत्याच्या मुलीने सिद्ध केले आहे. शहरातील स्वप्नपूर्ती नगर येथील अनुष्का मिलिंद कांबळे हिने 'नीट' परीक्षेत घवघवीत यश मिळवत, पहिल्याच फेरीत वाशिमच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात एमबीबीएससाठी प्रवेश निश्चित केला आहे.

अनुष्काचे वडील मिलिळपव कांबळे फळे विकून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात, तर आई सुरेखा या गृहिणी आहेत. दोघांचेही शिक्षण केवळ दहावीपर्यंत झाले असून, कुटुंबात उच्चशिक्षणाची पार्श्वभूमी नाही. तरीही डॉक्टर होण्याचे स्वप्न



उराशी बाळगून अनुष्काने कठोर परिश्रम घेतले. 'जिद्द असेल तर कोणतेही यश मिळवता येते, हेच माझ्या मुलीने दाखवून दिले,' अशी भावना तिची आई सुरेखा यांनी व्यक्त केली. तिच्या या यशाबद्दल यवतमाळमधील शिक्षणप्रेमी नागरिक आणि फळविक्रेता असोसिएशनने तिचे अभिनंदन केले असून, तिच्या जिद्दीचे सर्वत्र कौतुक होत आहे. अनुष्काच्या यशामुळे सर्वसामान्य कुटुंबातील मुलामुलींना मोठी प्रेरणा मिळाली आहे.

# 'आयुष्मान भारत' योजनेची जनजागृती करा

## प्रशांत गावंडे : तालुका आरोग्य अधिकाऱ्यांना सरपंचांसह नागरिकांचे निवेदन

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**महागाव, दि. ७ :** केंद्र शासनाच्या 'आयुष्मान भारत' योजनेपासून एकही गरजू रुग्ण वंचित राहू नये, यासाठी महागाव तालुक्यातील सामाजिक कार्यकर्ते प्रशांत गावंडे यांनी पुढाकार घेतला आहे. या योजनेची प्रत्येक गावात आरोग्य विभागामार्फत व्यापक जनजागृती व्हावी, या मागणीचे लेखी निवेदन त्यांनी तालुका आरोग्य अधिकारी डॉ. प्रसेनजीत धूळधुळे यांना दिले.



प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेंतर्गत पात्र गरीब आणि गरजू कुटुंबांना वार्षिक पाच लाख रुपयांपर्यंतचे मोफत आरोग्य संरक्षण मिळते. मात्र, अनेक ग्रामीण भागांतील नागरिकांना या योजनेची आणि त्यासाठी आवश्यक असलेल्या 'आयुष्मान कार्ड'ची पुरेशी माहिती नाही. परिणामी, अनेक गरजू कुटुंबे योजनेच्या लाभापासून वंचित राहतात आणि आजारपणात त्यांना खासगी रुग्णालयांमध्ये मोठा आर्थिक भुर्दंड सोसावा लागतो. हीच गंभीर बाब लक्षात घेऊन, आरोग्य विभागाने प्रत्येक गावात शिबिरे घेऊन किंवा अन्य प्रभावी माध्यमातून या योजनेची माहिती सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवावी, अशी आग्रही मागणी प्रशांत गावंडे यांनी केली आहे. प्राथमिक शिक्षण आणि शेतकऱ्यांच्या पांदण रस्त्यांच्या प्रश्नांवर नेहमी आवाज उठवणारे गावंडे यांनी आरोग्याच्या या महत्वाच्या विषयालाही हात घातला आहे. त्यांनी आपल्या विविध सहकाऱ्यांसह तालुका आरोग्य अधिकारी डॉ. धूळधुळे यांची भेट घेऊन त्यांना आपल्या मागणीचे लेखी स्वस्पात निवेदन दिले. यामुळे सर्वसामान्यांना आर्थिक अडचणींशिवाय उत्तम आरोग्यसेवा मिळू शकेल, असे निवेदनात म्हटले आहे. या महत्वपूर्ण मागणीला विविध गावांतील सरपंच आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी सक्रिय पाठिंबा दर्शवला. निवेदन देताना उटी ग्रामपंचायतच्या सरपंच ज्योती गणेशराव वानखेडे, टेंभीचे सरपंच अमोल चिकने, पोहंडुळ येथील सामाजिक कार्यकर्ते दिनेश रावते, तसेच गणेश बाबाराव वानखेडे, अमोल शिंदे, ज्ञानोबा नावाडे, मंगेश देशमुख, कैलास ठेंगे, रामेश्वर वानखेडे, गजानन मेंद, अनिल गावंडे, विनायक सोनुले, सुनील वानखेडे, प्रसाद गावंडे, विनोद मेंद, अक्षय गावंडे आणि गजानन पानपट्टे उपस्थित होते. उटी, टेंभी, कळगाव, पोहंडुळ आणि कान्हा पिंपळगाव येथील अनेक नागरिकही यावेळी हजर होते.

# महाराष्ट्र ग्रामीण बँकेच्या कोअर बँकिंग प्रणालीचे एकत्रीकरण

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**यवतमाळ, दि.७ :** केंद्र शासनाच्या अर्थ मंत्रालय आणि वित्तीय सेवा विभागाने ७ एप्रिल २०२५ रोजी प्रसिद्ध केलेल्या राजपत्रानुसार, तत्कालीन महाराष्ट्र ग्रामीण बँक आणि विदर्भ कोकण ग्रामीण बँक यांचे एकत्रीकरण होऊन एक मे २०२५ पासून संपूर्ण महाराष्ट्रासाठी नवीन 'महाराष्ट्र ग्रामीण बँक' अस्तित्वात आली आहे. पूर्वीप्रमाणेच ही बँक पूर्णतः शासकीय मालकीची असून, यामध्ये भारत सरकार, महाराष्ट्र राज्य सरकार आणि बँक ऑफ महाराष्ट्र यांचे भागभांडवल आहे. या एकत्रीकरणाच्या अनुषंगाने, विदर्भ कोकण ग्रामीण बँकेच्या कोअर बँकिंग प्रणालीचे महाराष्ट्र ग्रामीण बँकेच्या कोअर बँकिंग प्रणालीसोबत विलीनीकरण करण्याची प्रक्रिया दि. १३ सप्टेंबर ते १६ सप्टेंबर २०२५ या कालावधीत नियोजित करण्यात आली आहे.

या प्रक्रियेदरम्यान बँकेच्या एटीएम, मोबाईल बँकिंग, इंटरनेट बँकिंग, यूपीआय, आरटीजीएस, एनईएफटी, आयएमपीएस, डीबीटी, व्हीकेवायसी, आधार-आधारित पेमेंट प्रणाली, धनादेश वटविणे, स्थायी सूचना यासारख्या सर्व डिजिटल व इतर बँकिंग सेवा तात्पुरत्या स्वरूपात विस्कळित किंवा खंडित होऊ शकतात. एकत्रीकरणाची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर सर्व सेवा पुन्हा पूर्ववत सुरू होतील, असे बँकेने कळविले आहे. बँकेने ग्राहकांना होणाऱ्या गैरसोयीबद्दल दिलगिरी व्यक्त केली आहे. तसेच, या काळात संभाव्य तातडीच्या आर्थिक गरजा पूर्ण करण्यासाठी ग्राहकांनी पूर्वतयारी करावी, असे आवाहनही केले आहे. कोणतीही अडचण, शंका किंवा तक्रार असल्यास ग्राहकांनी बँकेच्या नजीकच्या शाखेशी किंवा ु.ारहरसीराळप.ळप या अधिकृत संकेतस्थळावर संपर्क साधावा. दि.१५ सप्टेंबरपासून सर्व सेवा ग्राहकांसाठी पुन्हा सुरळीत होतील आणि त्या अधिक तत्पर व सोयीच्या असतील, असेही बँकेतर्फे सांगण्यात आले आहे.

# उमरखेड येथे आरोग्य तपासणी शिबिर

## मुख्यमंत्री सहाय्यता निधीचा स्तुत्य उपक्रम

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**उमरखेड, दि. ७ :** तालुक्यात पसरलेल्या साथीच्या आजारांच्या पार्श्वभूमीवर, 'आरोग्याचा श्रीगणेश' हा अभिनव उपक्रम राबवण्यात आला. मुख्यमंत्री सहायता निधी व धर्मदाय रुग्णालय मदत कक्षाच्या समन्वयातून, उपजिल्हा रुग्णालयाच्या वैद्यकीय पथकाने दोन दिवसांत विविध गणेश मंडळांमध्ये जाऊन तब्बल ६०० रुग्णांची मोफत तपासणी करून औषधोपचार केला.

४ व ५ सप्टेंबर रोजी झालेल्या या उपक्रमांतर्गत शहरातील किसान गणेश मंडळ, लोकप्रिय गणेश मंडळ, पोलिस वसाहत गणपती मंडळ, शिवम गणेश मंडळ आणि शिवराय गणेश मंडळात शिबिरे घेण्यात आली.



वैद्यकीय अधीक्षक डॉ. किशोर कपाळे यांच्या नेतृत्वात डॉ. नितीन अख्यमवार, डॉ. प्रवीण गायकवाड, डॉ. अभय विरखडे, डॉ. धनंजय मोरे, डॉ. ज्योती जाधव, नेत्र चिकित्सा अधिकारी राजकुमार माळवे आणि इतर कर्मचाऱ्यांच्या पथकाने रुग्णांना सेवा दिली. सणासुदीच्या काळात, आजारपणामुळे त्रस्त झालेल्या नागरिकांना थेट मंडळात जाऊन आरोग्यसेवा पुरवल्याने या उपक्रमाला मोठा प्रतिसाद मिळाला. या कार्याचे समाजातील सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

# यवतमाळात घरोघरी जाऊन डास अळ्यांचा शोध

## 'वस्तीसेविकां'चा वॉर, जिल्हा हिवताप कार्यालय व नगरपरिषदेचा नाविन्यपूर्ण उपक्रम

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**यवतमाळ, दि. ७ :** हातात टॉर्च आणि टेमिफॉसचे द्रावण घेऊन शहरातील गल्ल्यांमध्ये फिरणारी १५० महिलांची फौज... हे चित्र आहे शहराने डेंग्यूविरुद्ध पुकारलेल्या प्रभावी युद्धाचे. जिल्हा हिवताप कार्यालय आणि नगरपरिषदेने 'वस्तीसेविकां'च्या माध्यमातून घरोघरी जाऊन डास उत्पत्तीस्थाने नष्ट करण्याची मोहीम युद्धपातळीवर हाती घेतली असून, त्याचे सकारात्मक परिणाम दिसू लागले आहेत.

सन २०२३ मध्ये यवतमाळ शहरात ६६ डेंग्यू रुग्ण आढळल्याने आरोग्य यंत्रणेपुढील आव्हान वाढले होते. यावर मात करण्यासाठी जिल्हा हिवताप अधिकारी डॉ. तन्वीर शेख यांनी वस्तीसेविकांच्या नियुक्तीची संकल्पना मांडली. या उपक्रमामुळे २०२४ मध्ये रुग्णसंख्या घटून केवळ १४ वर आली. या यशाच्या पार्श्वभूमीवर, २०२५ मध्ये जिल्हाधिकारी विकास मिना, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मंदार पत्की आणि जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुभाष ढोले यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम अधिक व्यापक करण्यात आला आहे. १५० वस्तीसेविका शहरातील ७३ हजार ४९० घरांमध्ये महिन्यातून दोनदा सर्वेक्षण करत आहेत. घरातील पाण्याची भांडी, कुंड्या, टायर्स तपासून डासअळ्या नष्ट करणे आणि नागरिकांमध्ये जनजागृती करण्याचे काम त्या करत आहेत. जुलै ते ऑक्टोबर या कालावधीत ही मोहीम अविरत सुरू राहणार असून, यामुळे डेंग्यू नियंत्रणात यश मिळत असल्याचा विश्वास डॉ. तन्वीर शेख यांनी व्यक्त केला आहे.

### प्रत्येक घर, प्रत्येक कोपरा तपासणीखाली

**वस्तीसेविकांचे काम अत्यंत सूक्ष्म पातळीवर चालते. त्या घरातील पाण्याची भांडी, टाक्या तर तपासतातच, शिवाय अनेकदा दुर्लक्षित होणारे फ्रिजच्या मागील ट्रे, फुलदाण्या, कुंड्यांखालील ताटल्या आणि परिसरातील टाकाऊ वस्तूही तपासतात. जिथे डासअळी आढळेल, ती जागा त्वरित रिकामी केली जाते किंवा औषधाने निर्जंतुक केली जाते. डासांची उत्पत्ती मुळातच रोखण्याची ही पद्धत सर्वाधिक प्रभावी ठरत आहे.**

### ओळखा डेंग्यूच्या 'टायगर' डासाला

**डेंग्यूचा फैलाव 'एडिस इजिप्टाय' नावाचा डास करतो. त्याच्या अंगावर काळे-पांढरे पट्टे असल्याने त्याला 'टायगर मॉस्क्यूटो' असेही म्हणतात. हा डास दिवसा चावतो आणि घरातील स्वच्छ साठवलेल्या पाण्यात अंडी घालतो. पाण्याच्या टाक्या, कुलर, कुंड्या आणि भंगार साहित्यात साचलेले पाणी त्याच्यासाठी सर्वोत्तम उत्पत्तीस्थाने आहेत. त्यामुळे आठवड्यातून एकदा 'कोरडा दिवस' पाळणे अत्यंत महत्वाचे आहे.**

# विद्यार्थ्यांना डिजिटल शिक्षणाचे बळ

**यवतमाळ, दि. ७ :** शैक्षणिक क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढवून गरजू विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचण्याच्या उद्देशाने रोटरी क्लब ऑफ यवतमाळ मिडटाउनने पुढाकार घेतला आहे. क्लबतर्फे कळंब येथील श्री चिंतामणी हायस्कूलमध्ये इयत्ता दहावी 'ब'च्या ७५ गरजू विद्यार्थ्यांना 'एज्युकेशन अॅप'चे मोफत वाटप करण्यात आले. प्रत्येक अॅपची किंमत १५७५ रुपये आहे. या उपक्रमांतर्गत जिल्ह्यात एकूण एक हजार अॅप वाटप करण्याचा मानस क्लबचे अध्यक्ष सुनील खडसे यांनी व्यक्त केला. त्यांनी अॅपच्या उपयुक्ततेविषयी मार्गदर्शन केले. प्रमुख अतिथी विद्या खडसे आणि अमृता खडसे यांनीही विद्यार्थ्यांना संबोधित केले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष चंद्रशेखर मेत्रे, मुख्याध्यापक राठोड, शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

## महत्वाचे

### रासप अध्यक्ष महादेव जानकर मंगळवारी जिल्हा दौऱ्यावर



**यवतमाळ :** राष्ट्रीय समाज पक्षाचे अध्यक्ष तथा माजी मंत्री महादेव जानकर मंगळवारी (दि. ९) यवतमाळ जिल्ह्याच्या एकदिवसीय दौऱ्यावर येत आहेत. या दौऱ्यात ते पत्रकार परिषदेच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या समस्यांना वाचा फोडणार असून, शहरात सुरू असलेल्या संत मोरारी बापूंच्या रामकथेलाही हजेरी लावणार आहेत. पक्षाचे जिल्हाध्यक्ष सूरज ठाकूर यांनी दिलेल्या माहितीनुसार, जानकर यांचे सकाळी ७ वाजता शासकीय विश्रामगृह येथे आगमन होईल. सकाळी ९ वाजता ते पत्रकारांशी संवाद साधतील. त्यानंतर ते पक्षाचे माजी राज्य कार्यकारिणी सदस्य नानासाहेब देशमुख आणि जिल्हाध्यक्ष सूरज ठाकूर यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेटी देतील. दुपारी १ वाजता ते रामकथा श्रवणासाठी उपस्थित राहणार आहेत. दिवसभराच्या कार्यक्रमानंतर सायंकाळी ५ वाजता ते मुंबईकडे प्रयाण करतील. त्यांच्यासोबत पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ. तौसिफ शेख हेदेखील असणार आहेत. जानकर यांच्या या दौऱ्यामुळे जिल्ह्यातील राजकीय वातावरण तापण्याची शक्यता असून, राजकीय वर्तुळाचे याकडे लक्ष लागले आहे.

### १५ हजारांची शेळी लंपास

**बाभुळगाव :** बाभुळगाव तालुक्यातील ग्रामीण भागात चोरट्यांनी उच्छाद मांडला असून, आता जनावरेही सुरक्षित नसल्याचे चित्र आहे. तालुक्यातील परसोडी येथे अंधाराचा फायदा घेत एका अज्ञात चोरट्याने शेतकऱ्याची बकरी चोरून नेल्याची घटना शनिवारी घडली. याप्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. योगेश हरिभाऊ नेवारे यांची १५ हजार रुपये किमतीची बकरी घराबाहेर बांधलेली होती. रात्रीच्या वेळी चोरट्याने ही संधी साधून बकरी लंपास केली. सकाळी उठल्यावर नेवारे यांना हा प्रकार लक्षात आला. त्यांनी तात्काळ पोलिसांत धाव घेत तक्रार नोंदवली. या घटनेमुळे परिसरातील पशुपालकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. बाभुळगाव पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला असून, पोलीस अधिक तपास करत आहेत.

### अपघातात वृद्ध जखमी

**पुसद :** तालुक्यात भरधाव आणि निष्काळजीपणे चारचाकी वाहन चालवून एका वृद्ध पादचाऱ्याला गंभीर जखमी केल्याची घटना घडली आहे. या अपघातात वृद्धाच्या मणक्याला जबर मार लागला असून, त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. बोरगडी येथील रहिवासी असलेले बबन गणपतराव पाईकराव (६४) हे शेतातून आपल्या घराकडे पायी येत होते. त्यावेळी मागून भरधाव वेगाने आलेल्या चारचाकी वाहनाने त्यांना जोरदार धडक दिली. हा अपघात इतका भीषण होता की, पाईकराव गंभीर जखमी झाले. त्यांच्या तक्रारीवरून पुसद पोलिसांनी आरोपी वाहनचालक अमरनुराई याच्याविरुद्ध निष्काळजीपणे वाहन चालवून दुखापत केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे.

# ‘पुढच्या वर्षी लवकर या’च्या गजरात बाप्पाला भावपूर्ण निरोप

## यवतमाळमध्ये विसर्जनास प्रारंभ; भक्ती आणि आसवांनी भरल्या डोळ्यांनी निरोप

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**



**यवतमाळ, दि.७ :** ‘गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या’चा जयघोष, आसवांनी भरलेले डोळे आणि मनात साठवलेल्या मंगलमय आठवणींच्या साक्षीने, यवतमाळ जिल्ह्यात दहा दिवसांच्या गणेशोत्सवाची सांगता झाली आहे. अनंत चतुर्दशीचे औचित्य साधून शनिवारपासून (दि. ६) लाडक्या बाप्पाच्या विसर्जन सोहळ्याला प्रारंभ झाला असून, शहरात सर्वत्र भक्तिमय आणि भावुक वातावरण निर्माण झाले आहे.

भाद्रपद महिन्यातील शुक्ल चतुर्थीला आगमन झालेल्या गणरायाच्या सेवेत मागील दहा दिवस यवतमाळकर तल्लीन झाले होते. घराघरांत आणि सार्वजनिक मंडळांमध्ये आरत्यांचे सूर, मोदकांचा गोडवा आणि बाप्पाच्या दर्शनासाठी लागलेली रीघ यामुळे संपूर्ण वातावरण चैतन्यमय झाले होते. दहा दिवसांच्या या आनंद सोहळ्यानंतर बाप्पाला निरोप देण्याचा क्षण अत्यंत भावविभोर करणारा होता. भक्तांनी जड अंतःकरणाने गणरायाला निरोप दिला आणि पुढच्या वर्षी लवकर येण्याचे साकडे घातले. घरगुती गणेशमूर्तींचे विसर्जन शनिवारीच करण्यात आले, तर शहरातील सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांच्या विसर्जन मिरवणुकांना प्रारंभ झाला आहे. प्रशासनाने सार्वजनिक मंडळांना विसर्जनासाठी दोन दिवसांची मुदत दिली आहे. त्यामुळे शहरात पुढील दोन दिवस भक्तिरसात न्हाऊन निघालेल्या भव्य मिरवणुकांचे दृश्य पाहायला मिळणार आहे. ढोल-ताशांच्या गजरात आणि बाप्पाच्या जयघोषात निघालेल्या या मिरवणुकांमध्ये सहभागी होत नागरिक आपल्या लाडक्या दैवताला निरोप देत आहेत. हा उत्सव म्हणजे एकता, आनंद आणि भक्तीचा एक अनोखा संगम ठरला आहे.

### जिल्ह्यात चोख बंदोबस्तात शांततेत विसर्जन

**गणेश विसर्जन सोहळा शांततेत आणि निर्विघ्नपणे पार पडावा, यासाठी जिल्हा पोलिस अधीक्षक आणि त्यांच्या पथकाने संपूर्ण जिल्ह्यात चोख बंदोबस्त ठेवला आहे. विशेषतः संवेदनशील भागांमध्ये अतिरिक्त पोलिस कुमक तैनात करण्यात आली आहे. यंदा पारंपरिक वाद्यांच्या गजरात विसर्जन करण्यावर भर दिल्याने कुठेही डीजेचा दणदणाट ऐकू आला नाही. तसेच, कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी रेकॉर्डवरील गुन्हेगारांना ताब्यात घेण्यात आले होते.**

### पर्यावरणाचा जागर; कृत्रिम तलावांना पसंती

**यंदाच्या गणेशोत्सवात यवतमाळकरांनी पर्यावरण रक्षणाचाही संदेश दिला. नगरपरिषदेच्या वतीने शहरात विविध ठिकाणी घरगुती गणेश विसर्जनासाठी कृत्रिम तलावांची निर्मिती करण्यात आली होती. नागरिकांनी या आवाहनाला उत्स्फूर्त प्रतिसाद देत नैसर्गिक जलस्रोत प्रदूषित होण्यापासून वाचविले. मूर्तींसोबतचे निर्माल्य आणि पूजेचे साहित्य वेगळेजमा करून त्याची योग्य विल्हेवाट लावण्याची व्यवस्थाही प्रशासनाने केली होती. या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.**

### देव तारी त्याला कोण मारी!

# डॉक्टरांच्या सतर्कतेने वाचला गणेशभक्ताचा जीव

## गणेश विसर्जन मिरवणुकीत भक्त कोसळला



**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

✦ संभाजी भोयर

**यवतमाळ, दि.७ :** गणेश विसर्जनाचा जल्लोष आणि डीजेच्या दणदणाटात एकीकडे तरुणाई थिरकत असताना, दुसरीकडे एका गणेशभक्तावर काळाने घाला घातला होता. मात्र, ‘देव तारी त्याला कोण मारी’ या उक्तीचा प्रत्यय देत, मिरवणुकीत योगायोगाने उपस्थित असलेल्या पाच डॉक्टरांनी देवदूताप्रमाणे धावून येत या भक्ताचे प्राण वाचविले. उमरखेड शहरात घडलेल्या या हृदयस्पर्शी घटनेने डॉक्टरांच्या सामाजिक बांधिलकीचे अनोखे दर्शन घडले.

शनिवारी (दि. ६) उमरखेड शहरात गणेश विसर्जन मिरवणुकीचा उत्साह शिगेला पोहोचला होता. हजारो भाविकांच्या गर्दीने रस्ते फुलून गेले होते. याचवेळी, शहरातील नामांकित डॉक्टर्स, ज्यात डॉ. गजानन हिंगमिरे, डॉ. राम नाईक, डॉ. कुणाल काळे, डॉ. आशीष उगले आणि डॉ. रितेश शिंदे यांचा समावेश होता, मिरवणुकीतील देखावे पाहण्यासाठी पायी फिरत होते. चौभारा चौकातून खडकपुऱ्याकडे जाणाऱ्या रस्त्यावर गर्दीत एक व्यक्ती अचानक निपचित पडलेली त्यांच्या निदर्शनास आली. क्षणाचाही विलंब न लावता या सर्व डॉक्टरांनी धाव घेत रुग्णाची तपासणी केली. त्या व्यक्तीच्या तोंडातून फेस येत होता आणि त्याची शुद्ध हरपली होती. मिरवणुकीची प्रचंड गर्दी आणि अरुंद रस्त्यांमुळे रुग्णवाहिका वेळेवर पोहोचणे अशक्य होते. प्रत्येक क्षण महत्त्वाचा होता. यावेळी डॉ. हिंगमिरे आणि डॉ. नाईक यांनी प्रसंगावधान दाखवत मदतीसाठी आवाहन केले. त्याला प्रतिसाद देत सामाजिक कार्यकर्ते श्रीराम तिवारी यांनी आपली दुचाकी तत्काळ उपलब्ध करून दिली. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून, डॉ. कुणाल काळे यांनी त्या रुग्णाला स्वतःच्या पाठीला बांधले आणि दुचाकीवरून शासकीय रुग्णालयात दाखल केले. या कार्यात डॉ. उगले आणि डॉ. शिंदे यांनी मोलाची मदत केली. डॉक्टरांच्या या निःस्वार्थ सेवेमुळे आणि समयसूचकतेमुळे एका गणेशभक्ताला जीवनदान मिळाले असून, त्यांच्या या कार्याचे शहरात सर्वत्र कौतुक होत आहे.

# मोबाईल चोरट्यांना अवघ्या दोन तासांतच केली अटक

## वणी पोलिसांची कारवाई; मुद्देमाल जप्त

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**



**वणी, दि.७ :** वणी बसस्थानकावर प्रवाशांचे मोबाईल चोरणाऱ्या दोन आरोपींना, गुन्हा दाखल झाल्यानंतर अवघ्या दोन तासांतच अटक करण्यात वणी पोलिसांना यश आले आहे. पोलिसांनी त्यांच्याकडून चोरलेले दोन्ही मोबाईल फोन जप्त केले आहेत.

बुधवारी, दि.३ सप्टेंबर रोजी, राहुल कुंभेकर (वय ५५, रा. राजूर कॉलरी) आणि बजरंग परबत (वय ३२,रा. निजामपूर, जि. वाशिम) हे वणी बसस्थानकावरून चंद्रपूरला जाणाऱ्या बसमध्ये चढत असताना, अनोळखी चोरट्यांनी त्यांच्या खिशातील मोबाईल चोरले. याप्रकरणी त्यांनी तातडीने वणी पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. पोलिसांनी भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०३(२) अंतर्गत गुन्हा नोंदवून तत्काळतपास सुरू केला. गुप्त माहितीच्या आधारे, पोलिसांनी समीर साबिर पठाण (वय १९, रा. रंगनाथ नगर, वणी) आणि अर्जुन गोपाळ आडे (वय ३०, रा. रंगनाथ नगर, वणी) या दोन संशयितांना ताब्यात घेतले. त्यांची झडती घेतली असता, त्यांच्याकडे चोरीला गेलेले काळ्या रंगाचा आणि निळ्या रंगाचे दोन्ही मोबाईल फोन सापडले. पोलिसांच्या या जलद कारवाईमुळे प्रवाशांना मोठा दिलासा मिळाला आहे. ही कामगिरी उपविभागीय पोलिस अधिकारी सुरेश दळवे यांच्या मार्गदर्शनात ठाणेदार गोपाल उंबरकर आणि डी.बी. पथकातील पोलिस उप निरीक्षक धीरज गुल्हाने, पोलिस कॉन्स्टेबल मोहम्मद वसीम, मोनेश्वर खंडरे, गणेश मेश्राम, नंदकुमार पुप्पलवार आणि गजानन कुडमेथे यांनी यशस्वीरित्या पार पाडली. या जलद कारवाईमुळे प्रवाशांना दिलासा मिळाला आहे.

# बांधकाम कामगारांना मंडळाच्या नियोजनशून्य कारभाराचा फटका

## डॉ. विष्णू उकंडे यांचा आरोप; कामगारांना प्रत्येकी ३000 रुपये द्या


**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**



**पुसद, दि.७ :** बांधकाम कामगार मंडळाच्या नियोजनशून्य कारभारामुळे ‘डिनर सेट’ वाटपासाठी आलेल्या हजारो बांधकाम कामगारांना रिकाम्या हातांनी परतावे लागल्याची घटना पुसदमध्ये घडली आहे. याप्रकरणी शिवसेनेचे उप-जिल्हाप्रमुख डॉ. विष्णू उकंडे यांनी मुख्यमंत्र्यांकडे धाव घेत दोषींवर कारवाई व कामगारांना प्रत्येकी तीन हजार रुपये भरपाई देण्याची मागणी केली आहे.

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार मंडळाने पुसदजवळील शेलू येथे १ सप्टेंबर रोजी 'डिनर सेट' वाटपाचे आयोजन केले होते. यासाठी हजारो कामगारांना ऑनलाइन ‘अपॉइंटमेंट लेटर’ देऊन, गैरहजर राहिल्यास योजना रद्द होईल, असे स्पष्टपणे कळविले होते. त्यामुळे गौरी पूजनाचा महत्त्वाचा सण आणि मुसळधार पाऊस असतानाही हजारो कामगार मोठ्या आशेने कार्यक्रमस्थळी जमले होते. मात्र, कामगार विभागाचे सचिव विवेक कुंभार आणि संबंधित कंत्राटदाराच्या अक्षम्य हलगर्जीपणामुळे एकाही कामगाराला डिनर सेट मिळाला नाही. यामुळे सर्वांना रात्रीच्या पावसात रिकाम्या हातांनी घरी परतावे लागले, ज्यामुळे त्यांना मोठा मानसिक व आर्थिक फटका बसला.

या गंभीर प्रकाराची तातडीने दखल घेत कामगार व उद्योग समितीचे संस्थापक तथा शिवसेनेचे उप-जिल्हाप्रमुख डॉ. विष्णू उकंडे यांनी पालकमंत्री संजय राठोड यांची भेट घेऊन त्यांना या अनास्थेची माहिती दिली. तसेच, जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनाही निवेदन पाठवून याप्रकरणी तातडीने लक्ष घालण्याची आग्रही विनंती केली आहे. या निवेदनातून त्यांनी अनेक महत्त्वपूर्ण मागण्या केल्या आहेत. पीडित कामगारांना तत्काळ'डिनर सेट'चे वाटप करावे, त्यांना झालेला त्रास आणि मजुरीचे नुकसान यासाठी प्रत्येकी तीन हजार रुपये भरपाई द्यावी, या प्रकारास जबाबदार असलेल्या अधिकाऱ्याला निलंबित करावे आणि संबंधित कंत्राटदाराचा ठेका रद्द करावा, अशा प्रमुख मागण्यांचा यात समावेश आहे. तसेच, यवतमाळ जिल्ह्याचा मोठा भौगोलिक विस्तार पाहता आर्णी, दारव्हा, यवतमाळ आणि राळेगाव येथेही वाटप केंद्र सुरू करावीत, अशी मागणीही त्यांनी केली. निवेदन देताना त्यांच्यासोबत संजय चव्हाण आणि संतोष घोगवाड उपस्थित होते.



## राम कथा...

### क्षणचित्रे







# रामराज्यासाठी पाच पिढ्या घडवाव्या लागतात : संत मोरारी बापू

## यवतमाळात कालपासून संत मोरारी बापूंच्या ‘रामकथा पर्वा’ला प्रारंभ; भक्तिरसात न्हाऊन निघाली यवतमाळनगरी

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**



**यवतमाळ, दि.७ :** पहिल्याच दिवशी मातृ-पितृपक्षावर निरूपण करताना राष्ट्रसंत मोरारी बापू म्हणाले, ‘जो आई-वडिलांच्या वचनांची पूर्तता करतो, तोच खरा पुत्र होय.’ भारतीय परंपरेतील साधूमत, वेदमताच्या मध्ये लोकमताला आणि राजकारणाला स्थान दिले, तर रामराज्याची संकल्पना प्रत्यक्षात येते. मात्र, रामराज्य आणणे सोपे नाही, त्यासाठी पाच पिढ्या घडवाव्या लागतात. यावेळी त्यांनी हनुमान गाथा सांगून हनुमान चालिसा पठणामुळे श्रद्धा आणि बुद्धी दोन्ही वाढेल, असे सांगितले.

टाळ-मृदंगाचा गजर, 'जय सियाराम'चा जयघोष आणि हजारो भाविकांच्या अथांग सागराच्या साक्षीने, प्रसिद्ध कथाकार राष्ट्रसंत मोरारी बापू यांच्या नऊ दिवसीय रामकथा पर्वाला शनिवारपासून (दि. ६) यवतमाळात भक्तिमय वातावरणात प्रारंभ झाला. दारव्हा मार्गावरील चिंतामणी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या विस्तीर्ण परिसरात १४ सप्टेंबरपर्यंत दररोज सकाळी ९:३० ते दुपारी १:३० या वेळेत हा भक्तीचा सोहळा रंगणार आहे.

कथा पर्वाचे यजमान डॉ. विजय दर्डा, राजेंद्र दर्डा आणि दर्डा परिवाराने टाळ-मृदंगाच्या गजरात रामकथेची पवित्र पोथी डोक्यावर घेऊन शोभायात्रेने मुख्य मंचावर आणली. शोभायात्रा समिती प्रमुख सीमा दर्डा यांनी या शोभायात्रेचे नेतृत्व केले. कथेची वेळ जवळ येऊ लागताच भाविकांचे लोंढे कथास्थळाकडे दाखल होत होते, ज्यामुळे संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता. याप्रसंगी यजमान डॉ. विजय दर्डा यांनी मोरारी बापूंचे स्वागत करताना, ‘बापूंचे पाय यवतमाळच्या मातीला लागले, मी स्वतःला भाग्यवान समजतो. माझ्या आई वीणादेवी आणि पत्नी ज्योत्स्ना यांची ही इच्छा आज पूर्ण होत आहे,‘ अशा भावना व्यक्त केल्या. आंतरराष्ट्रीय ख्यातीचे जैन आचार्य डॉ. लोकेश मुनी यांनी, ‘मोरारी बापूंच्या कथेतून कोट्यवधी नागरिकांमध्ये नैतिकता आणि मूल्यांची प्रतिष्ठापना होते,‘ असे गौरवोद्गार काढले. यावेळी जैन आचार्य डॉ. लोकेश मुनी, महामंडलेश्वर डॉ. संगीतकृष्ण सावरिया बाबा, राज्याचे मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड, आदिवासी विकास मंत्री प्रा.डॉ. अशोक उईके, खासदार संजय देशमुख, माजी मंत्री शिवाजीराव मोघे, आमदार बाळासाहेब मांगुळकर, आमदार संजय देरकर, माजी आमदार वामनराव कासावार, आयोजन समितीचे कार्याध्यक्ष कीर्ती गांधी, सचिव किशोर दर्डा, सुनीत कोठारी, पूर्वा कोठारी, लव दर्डा, राज्याच्या माहिती तंत्रज्ञान विभागाचे प्रधान सचिव पराग जैन, प्रवीण चंद्रकोटक (अहमदाबाद), सीए जयेंद्र शहा, किरीटभाई भन्साळी, युनिकेम लॅबोरेटरीज लि.चे चेअरमन प्रकाश मोदी, उद्योगपती संजय ठक्कर, मनमोहन पटेल (कॅलिफोर्निया), राजेश दोशी (मुंबई), रेमंडचे समूह सीएफओ अमित अग्रवाल, विकास शहा (अहमदाबाद) आदी मान्यवर उपस्थित होते.

### देश-विदेशातील मान्यवरांची मांदियाळी

**मोरारी बापूंच्या रामकथेसाठी केवळ राज्यातूनच नव्हे, तर देश-विदेशातूनही भाविक आणि विविध क्षेत्रांतील मान्यवर यवतमाळात दाखल झाले आहेत. यामध्ये राजकारण, उद्योग, प्रशासन आणि सामाजिक क्षेत्रातील दिग्गजांचा समावेश आहे. अमेरिकेच्या कॅलिफोर्नियातून आलेले मनमोहन पटेल, अहमदाबाद येथील प्रवीण चंद्रकोटक, मुंबईतील प्रसिद्ध उद्योजक आणि विविध कंपन्यांचे उच्चाधिकारी यांच्या उपस्थितीमुळे या आयोजनाला एक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्वरूप प्राप्त झाले आहे.**